एकात्मिक बालविकास सेवा योजना

महाराष्ट्र शासन

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

'STARS' प्रकल्पांतर्गत

# बालशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम
# वाचन साहित्य

## (सेवांतर्गत ब्लेन्डेड अभ्यासक्रम)









## बालशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम : वाचन साहित्य

- **प्रवर्तक** : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन
- **प्रकाशक** : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **प्रेरणा** : **मा. आय. ए. कुंदन (भा.प्र.से.)**
  प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य.
- **मार्गदर्शन** : **मा. सूरज मांढरे (भा.प्र.से.)**
  आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
  **मा. आर. विमला (भा.प्र.से.)**
  राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
- **संपादक** : **मा. राहूल रेखावार (भा.प्र.से.)**
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **सहसंपादक** : **मा. रमाकांत काठमोरे**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी संपादक** : **डॉ. माधुरी सावरकर**
  उपसंचालक, सेवापूर्व शिक्षण, बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी सहसंपादक** : **डॉ. गितांजली बोरुडे**
  उपविभाग प्रमुख, बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **श्रीमती सुषमा कोंडुसकर**
  अधिव्याख्याता, बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **संपादन साहाय्य** : **श्रीमती सुप्रिया नवले**
  विषय सहाय्यक, बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **प्रथम आवृत्ती** : ऑक्टोबर २०२४
- **प्रती** : ५३,८५०
- **अर्थसाहाय्य** : स्टार्स प्रकल्पांतर्गत, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे द्वारा.
- **मुद्रक** : रुना ग्राफिक्स, पुणे.


- © सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन.

एकात्मिक बालविकास सेवा योजना

महाराष्ट्र शासन

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

'STARS' प्रकल्पांतर्गत

# बालशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम
# वाचन साहित्य

## (सेवांतर्गत ब्लेन्डेड अभ्यासक्रम)









## मनोगत

राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० मध्ये पायाभूत स्तर समाविष्ट केल्याने, ३ ते ६ वर्षे या वयोगटाचा शिक्षण धोरणात प्रथमच समावेश झाला. हे धोरण व त्यावर आधारित राज्याने विकसित केलेला राज्य अभ्यासक्रम आराखडा, यांमध्ये बालशिक्षणाची मांडणी अधिक विस्ताराने करण्यात आली आहे, त्यामुळे अंगणवाडी सेविकांना बालशिक्षणाविषयीचे ज्ञान, क्षमता आणि कौशल्ये अधिक विकसित करण्याची संधी प्राप्त झाली आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने, या सगळ्याचा साकल्याने विचार करून, बालशिक्षण सेवांतर्गत प्रमाणपत्र अभ्यासक्रम तयार केला आहे. या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा पथदर्शी अभ्यास घेण्यात आला व त्याआधारे अभ्यासक्रमाला अंतिम स्वरूप देण्यात आले. प्रशिक्षणासाठी वाचनसाहित्य म्हणून ही हस्तपुस्तिका आपल्या हाती देताना मला आनंद होत आहे.

हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम बारावी व त्यापेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असणाऱ्या, सर्व अंगणवाडी सेविकांनी यशस्वीपणे पूर्ण करावयाचा आहे. प्रशिक्षण अंगणवाडी सेविकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी, नवीन तंत्रज्ञानाचा वैशिष्ट्यपूर्ण वापर करण्यात आलेला आहे. या प्रशिक्षण हस्तपुस्तिकेत, राज्य अभ्यासक्रमातील महत्त्वाच्या आशयांवर आधारित, बारा घटकसंचांचा समावेश आहे. अंगणवाडी सेविकांनी हे घटकसंच संपर्कसत्रात सहभागी होणे, मोबाइलवर व्हिडिओ पाहणे, स्वाध्याय सोडवणे, प्रात्यक्षिके करणे अशी, ऑनलाइन आणि ऑफलाइन कार्यपद्धती वापरून अभ्यासायचे आहेत. या प्रकारे ही प्रशिक्षण योजना संमिश्र स्वरूपाची (ब्लेंडेड) आहे. नवीन तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे, अंगणवाडीचे कामकाज सांभाळून सेविकांना हे प्रशिक्षण आपापल्या बिट पातळीवर सुलभतेने पूर्ण करता येईल. व्हिडिओ पाहून, अंगणवाडीत शिकवण्याच्या काही नवीन संकल्पना समजून घेता येतील. त्या पक्क्या होण्यासाठी; त्यावर दिलेले स्वाध्याय सोडवायचे आहेत, त्यापुढे जाऊन, संकल्पनांचा वापर वर्गात शिकवण्यासाठी झाला पाहिजे. यादृष्टीने सेविकांनी सक्षम होण्यासाठी, काही प्रात्यक्षिके करावयाची आहेत. शेवटी एक बहुपर्यायी प्रश्नांची चाचणीही द्यायची आहे. प्रशिक्षण कार्यवाही समजून घेणे, शंकासमाधान, समक्ष विचारविनिमय, मूल्यांकन इत्यादींसाठी संपर्कसत्रांचे नियोजन केले आहे.

बिट पातळीवर संपर्कसत्रे घेतली जाणार आहेत. अभ्यासक्रम कालावधीत एकूण पाच संपर्कसत्रे घेतली जातील. त्यात पहिले संपर्कसत्र हे उद्बोधन सत्र असेल. या सत्रात पर्यवेक्षिका, प्रशिक्षण योजना सविस्तर समजावून देतील. पुढची चार संपर्कसत्रे ही सहविचार सत्रे असतील. त्यात केलेल्या कामाचा आढावा, शंकासमाधान, अनुभवांची देवाणघेवाण, पुढे शिकायच्या घटकसंचांची ओळख, काही आशय समक्ष शिकणे अशा प्रकारचे कामकाज होईल. प्रमाणपत्र अभ्यासक्रमात सर्वांगीण बालविकास साधण्यासाठी, आवश्यक आशयाचा समावेश असणारे एकूण १२ घटकसंच आहेत. एका सत्रात तीन घटकसंच याप्रमाणे चार सत्रांत ते पूर्ण केले जातील. दोन संपर्कसत्रांच्या दरम्यानच्या दिवसांत, ठरवलेल्या तीन घटकसंचांचे अध्ययन, त्यावरील स्वाध्याय व वर्गात करण्यासाठी सुचवलेली प्रात्यक्षिके करावयाची आहेत.

व्हिडिओसोबतच आशय समजून घेण्यासाठी, या पुस्तिकेत प्रत्येक घटकसंचासाठी एक प्रकरण आहे. प्रत्येक घटकसंचात काही घटक आहेत. प्रत्येक घटकात आपण काय शिकणार, हे सुरुवातीला दिले आहे. त्यानंतर व्हिडिओ पाहायचे आहेत व प्रत्येक घटकावरील काही बहुपर्यायी प्रश्न सोडवायचे आहेत. घटकावरील स्वाध्याय व प्रात्यक्षिके याच पुस्तिकेत दिली आहेत. याप्रमाणे या हस्तपुस्तिकेत दिलेल्या घटकसंचातील सर्व घटकांचा अभ्यास अंगणवाडी सेविकांना पूर्ण करता येईल.

हे बालशिक्षण प्रमाणपत्र प्रशिक्षण नियोजन, परिषदेने एकात्मिक बालविकास कार्यक्रम आयुक्तालयाच्या समन्वयाने विकसित केले आहे. या नियोजनात आयसीडीएस कार्यालयाचे प्रतिनिधी, शासकीय अधिकारी, बालशिक्षण क्षेत्रातील नामवंत संस्था, अनुभवी तज्ज्ञ यांचा मोलाचा सहभाग मिळाला आहे. या सर्वांचे अनेक वर्षांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान, बालशिक्षण विषयातील संशोधनाची जाण, व्यावहारिक अनुभव, बांधिलकी या बाबींचाही रचना करताना विशेष लाभ झाला आहे.

अंगणवाडीत अपार ऊर्जा असलेली बालके, डोळ्यांत कुतूहल साठवून, परिसरातील विविध गोष्टी समजून घेण्यासाठी, शिकण्यासाठी, विविध रीतीने व्यक्त होण्यासाठी उत्सुक असतात. या प्रशिक्षणात सेविकांना, बालशिक्षणशास्त्राची तत्त्वे वापरून, बालकांना कोणताही ताण येणार नाही, अशा पद्धतीने, त्यांच्या सहजप्रवृत्तीनुसार, स्वयंप्रेरणेने शिकवण्याची किमया कशी साध्य करायची, याचा परिचय होणार आहे. या कौशल्यांचा वापर करून सेविका अंगणवाडीत आलेल्या बालकांचा सर्वांगीण विकास करू शकतील आणि राज्यातील बालशिक्षण नवीन उंचीवर नेतील, याची मला खात्री वाटते. यासाठी सर्व प्रशिक्षणार्थींना मन:पूर्वक शुभेच्छा!

**राहूल रेखावार (भा.प्र.से.)**
**संचालक**
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे.

# प्रस्तावना

सर्व अंगणवाडीताईंना सस्नेह नमस्कार!

तुम्ही अंगणवाडीत ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना अनेक प्रकारे सेवा पुरवत आहात. बालकांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी, तुम्ही त्यांना अनौपचारिक शिक्षण देता. प्राथमिक शिक्षणस्तरावर, औपचारिक शिक्षणात मुले सहजपणे रुळावीत, गुंतून रहावीत यासाठी त्यांची तयारी करून घेता. हे एक अतिशय मोलाचे काम आहे. त्याबद्दल तुम्हां सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन!

नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणात, शिक्षणाच्या शिडीची सुरुवात वयोगट ३ ते ८ वर्षे या पायाभूत स्तराने केली आहे. त्यात अंगणवाडीतील बालकांचा ३ ते ६ वर्षे वयोगटाचा प्रथमच समावेश झाला आहे. याला बालवाटिका असे नाव दिले आहे. या निर्णयामुळे बालशिक्षणाचे एक पाऊल पुढे पडले आहे. या धोरणाच्या आधारे, राज्याने राज्य अभ्यासक्रम आराखडा, पायाभूत स्तर २०२४ हा शिक्षणाचा नवीन आराखडा तयार केला.

इ. स. २०१६ पासून, अंगणवाडीत 'आकार' हा अभ्यासक्रम तुम्ही वापरत होतात. नव्या धोरणानुसार आता पायाभूत स्तरासाठी नवीन राज्य अभ्यासक्रम आराखडा तयार झाला आहे. त्यात अनेक नवीन गोष्टी शिकण्याची संधी आपल्याला मिळेल. त्याची ठळक उदाहरणे पाहायची झाली, तर नवीन अभ्यासक्रमात बालकाच्या सर्वांगीण विकासाचे वर्णन अधिक विस्ताराने केले आहे. त्यामध्ये बालकांसाठी वाचनसमृध्द वातावरण तयार करणे, उदयोन्मुख वाचन-लेखन अशा वैशिष्ट्यपूर्ण कल्पना आहेत. शिकवण्याचे अधिक चांगले नियोजन करणे, अध्ययन कोपरे मांडून सहज शिक्षणाचे वातावरण तयार करणे, अशा बाबींचा समावेश आहे. खेळ आणि खेळणी यांचा वापर करून, बालकांचे अनौपचारिक शिक्षण आनंददायी कसे करायचे, यावर भर आहे. अंगणवाडीसाठी आणि बालकाच्या प्रगतीसाठी कुटुंब आणि समाज यांचा सहयोग अतिशय मोलाचा असतो. तो कसा मिळवावा, याची चर्चा केली आहे. खेळांतून, नेहमीच्या उपक्रमांतून, दडपण वाटू न देता सहज मूल्यमापन कसे करायचे, याविषयी काही वेगळ्या कल्पना मांडल्या आहेत. शिकण्यावर परिणाम करणारे महत्त्वाचे घटक कोणते? विशेष गरजा असणाऱ्या मुलांच्या शिक्षणाचे आव्हान कसे पेलायचे? मुले बालशाळेत सुरक्षित कशी राहतील? त्यांचे हक्क कोणते आहेत? ते त्यांना मिळतील याची खात्री कशी करायची? या प्रश्नांची चर्चाही त्यात आहे. सध्याचे आधुनिक युग विज्ञान-तंत्रज्ञानाचे आहे. त्याचा फायदा बालकांना शिकवताना कसा करून घेता येईल, तसेच नव्या युगाशी जुळवून घेताना आपले ज्ञान, कौशल्य, क्षमता कशा वृद्धिंगत करता येतील, यासाठी देखील मार्गदर्शन मिळेल.

नवीन धोरणातील या सगळ्या गोष्टींचा लाभ अंगणवाडीमधील बालकांना सत्वर मिळायला हवा आणि अंगणवाडीत नवचैतन्य यायला हवे, यासाठी हे सेवांतर्गत प्रशिक्षण बालशिक्षण विभागाने तयार केले आहे. त्यात पायाभूत अभ्यासक्रम आराखड्याची ओळख आणि अध्ययन-अध्यापनाच्या विविध तंत्रांचा तुम्हांला परिचय व्हावा, याकरता परिषदेकडून पायाभूत अभ्यासक्रम आराखड्यानुसार, बालशिक्षण सेवांतर्गत प्रशिक्षण कार्यक्रम अधिक विस्ताराने तयार केला आहे. त्यात सर्व आवश्यक घटकांचा पुरेसा परिचय तुम्हांला होईल. तुमचे ज्ञान, कौशल्य, क्षमता यांत वाढ व्हायला मदत होईल. याशिवाय ते पूर्ण केल्यावर, तुम्हांला प्रमाणपत्रही मिळणार आहे. हे प्रशिक्षण कसे असेल, याची उत्सुकता तुमच्या मनात असणारच. यासाठीच ही पुस्तिका

तयार केली आहे. ही पुस्तिका अनेक तज्ज्ञांच्या मदतीने विकसित केली आहे. प्रशिक्षणाच्या कार्यपद्धतीचा पथदर्शी अभ्यास, राज्यातील आठ निवडक जिल्ह्यांतील निवडक बिटांमध्ये घेण्यात आला. या अभ्यासातून जिल्हास्तरीय बालशिक्षण समन्वयक, अंगणवाडी पर्यवेक्षिका आणि अंगणवाडी सेविका यांच्याकडून अभिप्राय घेण्यात आले. त्या आधारे पुस्तिकेत आवश्यक बदल करून, ही पुस्तिका अंतिम करण्यात आली. तुम्हांला तसेच 'आयसीडीएस'मधील अधिकारी वर्ग आणि बालशिक्षण क्षेत्रातील व्यक्ती यांनाही या संदर्भ पुस्तिकेचा उपयोग होईल.

आता आपण या प्रमाणपत्र प्रशिक्षणाची तोंडओळख करून घेऊया. हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम एकूण सहा महिन्यांचा आहे. राज्य अभ्यासक्रम आराखड्यातील आशयावर आधारित एकूण बारा घटकसंचांचा (मोड्यूल्स) अभ्यास या कालावधीत करायचा आहे. यांतील काही अभ्यास ऑनलाइन व्हिडिओ पाहून करायचा आहे, तर काही अभ्यास घटकसंचांवरील स्वाध्याय, प्रात्यक्षिके, बिट पातळीवरील संपर्कसत्रांत विचारविनिमय असा ऑफलाइन करायचा आहे. याप्रकारे हा अभ्यासक्रम ऑनलाइन व ऑफलाइन असा संमिश्र स्वरूपाचा (blended) आहे. अंगणवाडीचे आपापले काम सांभाळून, आपापल्या कार्यक्षेत्रात तो पूर्ण करता येणार आहे.

बारा घटकसंचांपैकी, प्रत्येक घटकसंचात कमी-जास्त घटक आहेत. प्रत्येक घटक समजावून देणाऱ्या ऑनलाइन व्हिडिओंचा वापर, हे या प्रशिक्षणाचे वैशिष्ट्य आहे. व्हिडिओ निर्मितीमध्ये घटकाचा आशय ठरवून तो थोडक्यात, पण वेधकपणे मांडणे, आशयाला अनुकूल पीपीटी तयार करणे, सादरीकरणाचा सराव, प्रत्यक्ष चित्रीकरण असे अनेक टप्पे पूर्ण करावे लागतात. यासाठी बालशिक्षण विभागाने आयोजित केलेल्या अनेक कार्यशाळांतून सहभागी झालेल्या अनुभवी व्यक्तींनी हे काम चिकाटीने आणि कौशल्याने पार पाडले आहे. त्या त्या घटकांतील तज्ज्ञ आणि अनुभवी व्यक्तींनी ते व्हिडिओ सादर केले आहेत. हे व्हिडिओ मोबाइल किंवा संगणक यांवर पाहता येतील. या मुख्य व्हिडिओंमध्येच, अधूनमधून काही संकल्पना स्पष्ट करणारे आणखी लहान-लहान व्हिडिओही तयार आहेत. काही ठिकाणी व्हिडिओ थांबवून, आपले अनुभव आठवण्याची आणि लिहिण्याची संधी दिली आहे.

व्हिडिओ पाहून झाल्यावर, प्रत्येक घटकात दिलेले स्वाध्याय सोडवायचे आहेत. ते घटकाचा आशय आणि तुमचा अनुभव यांवर आधारित आहेत. प्रत्येक घटकातील शिकण्या-शिकवण्याविषयीची तत्त्वे, अंगणवाडीत शिकवताना वापरली गेली पाहिजेत. ही गोष्ट वर्गात सराव करून साध्य होणार आहे, म्हणून प्रत्येक घटकात स्वाध्यायासोबत काही प्रात्यक्षिके सुचवली आहेत. ही प्रात्यक्षिके दोन संपर्कसत्रांच्या दरम्यान, आपल्या वर्गात करून पाहायची आहेत व त्या विषयीच्या नोंदी करायच्या आहेत.

व्हिडिओ पाहणे, स्वाध्याय, प्रात्यक्षिके हा भाग तुम्हांला आपला आपण पूर्ण करायचा आहे, म्हणजे स्वयंअध्ययन करून पूर्ण करायचा आहे, पण या सगळ्याची कार्यपद्धती समजावून घेणे, शंका-समाधान, अधूनमधून उजळणी, आढावा, ऑनलाइन शिकता न येणाऱ्या गोष्टी प्रत्यक्ष शिकणे, यासाठी काय व्यवस्था आहे, असा प्रश्न तुमच्या मनात येईल. त्यासाठी एकूण पाच संपर्कसत्रे घेण्यात येतील. तुमच्या बिट पातळीवर होणाऱ्या मासिक आढावा बैठका, यांचा त्यासाठी वापर केला जाईल. दोन संपर्कसत्रांत, किमान ३० दिवसांचा

कालावधी राहील. या संपर्कसत्रात, तुमच्या बिटच्या पर्यवेक्षिका हे सगळे समन्वयाचे आणि मार्गदर्शनाचे काम करतील.

पाचपैकी पहिले संपर्कसत्र हे उद्‌बोधन सत्र असेल. यात संपूर्ण प्रशिक्षणाची कार्यवाही समजावून सांगितली जाईल, म्हणून या सत्रास उपस्थिती अनिवार्य आहे. प्रत्येक दोन संपर्कसत्रांदरम्यान, ३ घटकसंच याप्रमाणे चार कालखंडांत मिळून, बारा घटकसंचांचा अभ्यास पूर्ण करावयाचा आहे.

या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे मूल्यांकन, घटकसंच ऑनलाइन पाहणे, संपर्कसत्रात सहभाग, स्वाध्याय व प्रात्यक्षिक कामाची पूर्तता आणि बहुपर्यायी प्रश्न असणारी चाचणी सोडवणे या चार मुद्द्यांच्या आधारे होईल. मिळालेल्या एकूण गुणांनुसार, प्रमाणपत्रावर श्रेणी नोंदवली जाईल व अखेरीस परिषदेमार्फत प्रमाणपत्र देण्यात येईल.

प्रशिक्षण घेण्याची सुरुवात करण्यासाठी, आपल्याला प्रथम 'युनिलर्न प्लॅटफॉर्म'वर आपल्या नावाची नोंदणी करावी लागेल. त्यात काही अडचणी आल्यास, पर्यवेक्षिका मदत करतील. प्लॅटफॉर्मवर आपल्याला सर्व व्हिडिओज उपलब्ध होतील. सोबतच ही प्रशिक्षण पुस्तिका घेऊन, एकेका घटकसंचाचा अभ्यास तुम्हांला करता येईल.

पुस्तिकेतील प्रत्येक घटकामध्ये, आपण काय शिकणार याची यादी दिली आहे. त्यानंतर तुम्हांला तुमच्या मोबाइलवर व्हिडिओज पाहता येतील. काही व्हिडिओंमध्ये तुम्हांला थोडा वेळ थांबून, त्यांतील आशयावर आधारित प्रश्न सोडवायचे आहेत. त्याविषयी व्हिडिओमध्ये स्पष्ट सूचना आहेत. व्हिडिओ संपल्यावर आपण काय शिकलो, हे पाहण्यासाठी काही बहुपर्यायी प्रश्न सोडवायचे आहेत. त्यानंतर या पुस्तिकेत दिलेले स्वाध्याय सोडवायचे आहेत. नंतर या घटकावर आधारित कोणती प्रात्यक्षिके पुढील संपर्कसत्रापूर्वी पूर्ण करायची आहेत, त्यांची यादी दिली आहे. त्यानुसार योग्य ते नियोजन करायचे आहे. याप्रकारे या पुस्तिकेच्या आधारे, प्रत्येक घटकसंचाचा अभ्यास आपल्याला पूर्ण करता येईल.

तुम्ही अनेक वर्षे अंगणवाडीत 'आकार' या अभ्यासक्रमातील कितीतरी उपक्रम घेऊन, बालकांना शिक्षण देत आहात. त्यामुळे हे प्रशिक्षण पूर्ण करणे तुम्हांला मुळीच कठीण जाणार नाही. या प्रशिक्षणामुळे अंगणवाडीतील वार्षिक नियोजन, रोजचे वेळापत्रक अधिक चांगल्या रीतीने तयार करता येईल. बालकाचा सर्वांगीण विकास होईल, अशा रीतीने उपक्रमांत विविधता आणि नेमकेपणा आणता येईल. विविध खेळ आणि खेळणी यांचा वापर, त्यामागील उद्‌देश समजून करता येईल. या सर्वांतून बालकांनाही आनंद मिळेल, आपणालाही आनंद मिळेल आणि शिक्षणाचा पाया सहज शिक्षणातून हसत-खेळत पक्का करता येईल, याची मला खात्री वाटते. प्रशिक्षण उत्तमरीतीने पूर्ण करण्यासाठी आणि त्याआधारे अंगणवाडीतील बालकांचे शिक्षण अधिक चैतन्यमय होण्यासाठी, माझ्या सर्वांना मनापासून शुभेच्छा!

**डॉ. माधुरी सावरकर**
उपसंचालक, सेवापूर्व शिक्षण,
बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग,
राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# अनुक्रमणिका


| घटकसंच क्र. | | शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १) | बालशिक्षणाचे स्वरूप | | १ |
| | १.१ | भारतातील बालशिक्षणाची सुरुवात | ३ |
| | १.२ | पायाभूत स्तर : सर्वांगीण बालविकास चित्र | ६ |
| | १.३ | भाषा शिक्षण व साक्षरता | १० |
| | १.४ | अध्यापनशास्त्र | १२ |
| | १.५ | अध्ययन-अध्यापनासाठी आशयाची निवड, संघटन आणि संदर्भीकरण | १६ |
| | १.६ | बालकांच्या अध्ययनाच्या प्रगतीसाठी मूल्यांकन | १९ |
| | १.७ | वेळेचे व्यवस्थापन | २२ |
| | १.८ | अध्ययनावर परिणाम करणारे काही महत्त्वाचे घटक | २६ |
| | १.९ | प्राथमिक स्तराला जोडणारे दुवे | ३० |
| | १.१० | साहाय्यीभूत शैक्षणिक परिसंस्था निर्मिती | ३४ |
| २) | बालविकासाची ओळख | | ३७ |
| | २.१ | बालविकासाची ओळख | ३९ |
| | २.२ | वाढ व विकास | ४१ |
| | २.३ | वाढीचे व विकासाचे टप्पे (अवस्था) व वैशिष्ट्ये | ४६ |
| | २.४ | बालविकासाची तत्त्वे | ५० |
| | २.५ | बालकांच्या गरजा | ५३ |
| | २.६ | सर्वांगीण विकास आणि पंचकोश | ५७ |
| | २.७ | मुलांना समजून घेणे | ५९ |
| ३) | अंगणवाडी अभ्यासक्रमाची तत्त्वे | | ६३ |
| | ३.१ | 'आकार' अभ्यासक्रम (२०१५) | ६५ |
| | ३.२ | विकासाची क्षेत्रे : राज्य अभ्यासक्रम आराखडा पायाभूत स्तर २०२४ प्रमाणे | ६८ |
| | ३.३ | अभ्यासक्रमाचे घटक | ७२ |
| ४) | अध्ययन-अध्यापनशास्त्र | | ८१ |
| | ४.१ | अंगणवाडीतील सुरक्षित, प्रेरक व सौहार्दपूर्ण वातावरण | ८३ |
| | ४.२ | अध्ययनाच्या गरजा | ८६ |
| | ४.३ | अध्ययन प्रक्रिया | ८९ |
| | ४.४ | अध्यापन पद्धती - खेळाद्वारे अध्ययन | ९० |
| ५) | खेळ व खेळणी आधारित अध्यापन पद्धती | | ९७ |
| | ५.१ | खेळाचे स्वरूप | ९९ |
| | ५.२ | खेळ आधारित अध्ययन-अध्यापन पद्धती | १०२ |
| | ५.३ | खेळणी आधारित अध्ययन-अध्यापन पद्धती | १०५ |
| | ५.४ | खेळाचे नियोजन | १०७ |
| | ५.५ | जादुई पिटारा | १०९ |
| ६) | साक्षरता व संख्याज्ञान | | ११३ |
| | ६.१ | उदयोन्मुख साक्षरता | ११५ |
| | ६.२ | मजकूर समृद्ध वातावरण | ११६ |
| | ६.३ | उदयोन्मुख वाचन | ११८ |

| घटकसंच क्र. | शीर्षक | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| | ६.४ | उदयोन्मुख लेखन | १२० |
| | ६.५ | सहभागी लेखन | १२२ |
| | ६.६ | भाषेच्या रचनेची जाणीव | १२३ |
| | ६.७ | लिपी परिचय | १२५ |
| | ६.८ | गणनपूरक संबोध | १२७ |
| | ६.९ | संख्याज्ञान | १३१ |
| | ६.१० | मापन | १३४ |
| ७) | वर्गवातावरण व व्यवस्थापन | | १३९ |
| | ७.१ | सकारात्मक वर्गवातावरणाची गरज | १४१ |
| | ७.२ | सकारात्मक वर्गवातावरण | १४२ |
| | ७.३ | अंगणवाडीतील व्यवस्थापन | १४६ |
| | ७.४ | अंगणवाडी व्यवस्थापनात, अंगणवाडी सेविकेची भूमिका | १४७ |
| ८) | विशेष गरजा असलेली बालके | | १५१ |
| | ८.१ | विशेष गरजा असलेली बालके : अर्थ व प्रकार | १५३ |
| | ८.२ | विशेष गरजा असलेली बालके ओळखणे | १६१ |
| | ८.३ | सेविकेची भूमिका | १६२ |
| | ८.४ | सर्वसमावेशक शिक्षण | १६३ |
| ९) | कुटुंब व समाज | | १६७ |
| | ९.१ | कुटुंब सहभाग | १६९ |
| | ९.२ | पालक सभा व कार्यशाळा | १७० |
| | ९.३ | समाज सहभाग | १७० |
| १०) | नियोजन व मूल्यांकन | | १७३ |
| | १०.१ | नियोजन | १७५ |
| | १०.२ | मूल्यांकन | १८२ |
| ११) | बालकांचे हक्क व सुरक्षितता | | १९५ |
| | ११.१ | बालकांचे हक्क | १९७ |
| | ११.२ | बालकांची सुरक्षितता | २०० |
| | ११.३ | मुलांचे समाजमान्य नसलेले वर्तन | २०६ |
| | ११.४ | अंगणवाडीतील स्वयंशिस्त | २११ |
| १२) | अंगणवाडी सेविकांच्या क्षमता व कौशल्य विकसन | | २१९ |
| | १२.१ | संवाद कौशल्य | २२१ |
| | १२.२ | व्यवस्थापन कौशल्य | २३० |
| | १२.३ | एकविसाव्या शतकातील कौशल्ये | २३५ |
| | १२.४ | अंगणवाडीताईंची भूमिका व जबाबदारी | २४२ |
| परिशिष्ट १ : पारिभाषिक शब्दावली | | | २४७ |
| परिशिष्ट २ : संदर्भग्रंथ सूची | | | २५० |
| परिशिष्ट ३ : श्रेयनामावली | | | २५२ |

## बालशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम



बालकाच्या मेंदूची वाढ आठ वर्षांपर्यंत अतिशय वेगाने होते हे संशोधनाने सिद्ध झाले आहे. तीन ते सहा या वयोगटातील बालके अंगणवाडीत शिकतात. या काळात शरीर, मन, बुद्धी यांतील बदलांनुसार बालकाला जितके समृद्ध अनुभव मिळतील, तेवढे त्याचे भावी जीवन अधिक समृद्ध होण्याची शक्यता वाढते, असे अनुभव देण्यासाठी, अंगणवाडीताईला या संवेदनशील वयाला अनुरूप बालशिक्षणशास्त्र कोणते याचा परिचय होणे गरजेचे आहे. यातील अपेक्षित क्षमता आणि कौशल्ये यांचा परिचय आणि विकास होण्याच्या हेतूने, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेद्वारे 'बालशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम' हा ब्लेंडेड अभ्यासक्रम तयार केला आहे. हा अभ्यासक्रम 'राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर – २०२४' वर आधारित आहे.

## घटकसंच १ : बालशिक्षणाचे स्वरूप

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेद्वारे 'बालशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम' हा ब्लेंडेड अभ्यासक्रम तयार केला आहे. त्यामध्ये एकूण १२ घटकसंच आहेत. यामधील पहिल्या घटकसंचात अभ्यासक्रमातील इतर सर्व घटकसंचाचा आपण थोडक्यात परिचय करून घेणार आहोत.

हे घटक अभ्यासताना भारतात बालशिक्षण कसे रुजत गेले, बालकाच्या सर्वांगीण विकासाची मांडणी कशी होत गेली याची रूपरेषा दिसून येईल. पायाभूत स्तरावरील भाषाशिक्षण व साक्षरता यांतील संबंध लक्षात येईल. बालशिक्षणाचे अध्यापनशास्त्र प्राथमिक स्तरापेक्षा नेमके वेगळे कसे, का इत्यादी प्रश्नांची उत्तरे मिळतील. सहज, आनंददायी आणि प्रभावी मूल्यांकनासाठी वापरावयाची साधने आणि पद्धती यांची तोंडओळख होईल. वेळेचे व्यवस्थापन करण्याविषयी काही व्यवहार्य मुद्दे लक्षात येतील. अध्ययनावर परिणाम करणाऱ्या कळीच्या घटकांविषयी जागरूकता येईल. अंगणवाडीतून प्राथमिक स्तरावर गेल्यावर तेथे मुले सहजपणे रुळावीत यासाठी दोन्हींमध्ये आवश्यक असणारे दुवे लक्षात येतील. पायाभूत स्तरावरील शिक्षणाला मदत करणारी शिक्षण यंत्रणा, पालक, तंत्रज्ञान प्रशिक्षण, नियोजन इत्यादी घटकांचा परिचय होईल.

या घटकसंचापुढील ११ घटक संचांमध्ये, परिचय झालेल्या या सर्व गोष्टी अंगणवाडीतील वर्गात प्रभावीपणे कशा अमलात आणता येतील, याविषयीच्या कार्यपद्धतींची विस्ताराने माहिती होईल.

## माझ्या नोंदी :

# घटकसंच १ : बालशिक्षणाचे स्वरूप

## घटक क्र. १.१ : भारतातील बालशिक्षणाची सुरुवात

**या घटकात आपण काय शिकणार?**

१.१.१ भारतातील बालशिक्षणाचा प्रारंभ

१.१.२ एकात्मिक बालविकास सेवा योजना (आयसीडीएस)

१.१.३ ८६ व्या क्रमांकाची घटनादुरुस्ती व 'आकार' बालशिक्षणक्रम निर्मिती

१.१.४ राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२० व बालशिक्षण

१.१.५ राज्य अभ्यासक्रम आराखडा, पायाभूत स्तर, २०२४

१.१.६ राज्य अभ्यासक्रम आराखडा, पायाभूत स्तराचे ध्येय

**प्रास्ताविक :**

प्रिय अंगणवाडीताई,

नमस्कार,


मी अंगणवाडी बोलतेय. अंगणवाडी सेविकांच्या या प्रशिक्षणात सर्व अंगणवाडीताईंचं स्वागत! राज्यात नवीन शिक्षण धोरणावर आधारित पायाभूत स्तराचा अभ्यासक्रम आराखडा तयार झाला आहे. बालशिक्षणाची इथपर्यंतची वाटचाल कशी घडत आली याची झलक आपण पाहूया.



नवीन शिक्षण धोरणात शिक्षणाच्या वयोगटांची नवी शिडी आहे. त्यावर ३ ते ६ या चिमुकल्या वयोगटाला पहिल्यांदाच जागा मिळाली आहे. या वयोगटाचं नाव ठेवलंय बालवाटिका! हा सारा प्रवास कसा झाला, हे तुम्हांला सांगावंस वाटतंय. तुम्हांलाही तो ऐकायला नक्कीच आवडेल.

चला तर माझ्याबरोबर. आपण साधारण सव्वाशे वर्षं मागे जाऊया...

### १.१.१ भारतातील बालशिक्षणाचा प्रारंभ :



कोणाकोणाचे फोटो दिसतात बरं समोर? तुम्ही सगळ्यांना नक्कीच ओळखलं असणार!

गिजुभाई बधेका यांनी बालशिक्षणाचं रोप भारतात लावलं. इ. स. १९१८ या वर्षी दक्षिणामूर्ती संस्थेत मॉंटेसरी पद्धतीचा वापर करणारे पहिले बालमंदिर स्थापन केले. तिथे शास्त्रशुद्ध बालशिक्षण पद्धती वापरल्या.



या आपल्या ताराबाई मोडक. बालकांना शिकवताना योग्य अध्यापनशास्त्र, प्रयोग आणि अनुभव यांचा आधार घेऊनच शिकवावं, असा आग्रह यांनी धरला आणि बालशिक्षण अगदी खेडोपाडी, आदिवासी वाड्या–वस्त्यांवर नेण्यासाठी त्या झटल्या.



या आपल्या अनुताई वाघ.
यांनी हेच काम पुढे नेण्यासाठी सारं आयुष्य वेचलं.

**समाजसुधारक, तत्त्ववेत्ते यांचेही योगदान** : बालशिक्षण पुढे नेण्यात, आणखीही अनेकांचे प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष असे मोठेच योगदान आहे.

महात्मा जोतिबा फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, गुरुदेव रवींद्रनाथ टागोर, स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी, योगी अरविंद, जे. कृष्णमूर्ती हे सारे समाजसुधारक आणि तत्त्ववेत्ते यांचेही मोठे योगदान आहे. आपण त्यांचे ऋणी आहोत.

### १.१.२ एकात्मिक बालविकास सेवा योजना : (आयसीडीएस)

बालशिक्षणाचं काम कोणी पुढं नेलं? एकात्मिक बालविकास सेवा योजना २ ऑक्टोबर, १९७५ मध्ये सुरू झाली. या योजनेखाली अंगणवाड्या सुरू झाल्या. या घडीला आयसीडीएसच्या एक लाख दहा हजार चारशे पंचेचाळीस अंगणवाड्या आहेत. तिथे शिक्षण, पोषण, आरोग्य इत्यादी सेवा तुम्ही पुरवता. अशा प्रकारे बालसंगोपन आणि बालशिक्षणाची दोरी तुमच्याच तर हातात आहे. तुम्ही ती छान सांभाळली आहे. आता नव्या दमानं पुढचं पाऊल टाकायचं आहे.

INTEGRATED CHILD
DEVELOPMENT
SCHEME

### १.१.३ ८६ व्या क्रमांकाची घटनादुरुस्ती व 'आकार' बालशिक्षणक्रम निर्मिती :

बालशिक्षणाच्या विकासवाटेवरचा एक मैलाचा दगड म्हणजे, संविधानातील ८६ व्या क्रमांकाची घटनादुरुस्ती!




का बरं याला इतकं महत्त्व आहे? ते जाणून घेऊ. कुटुंब असो की समाज; एकोप्याने आणि परस्परसहकार्याने नांदण्यासाठी काही नियमांची गरज असते. भारतीय राज्यघटना ही देशाने स्वीकारलेली एक नियमांची यादीच आहे. त्या आधारेच देशात सारे कायदे तयार होतात.

घटनेत अत्यावश्यक कारणासाठी दुरुस्त्या केल्या जातात. अशीच एक दुरुस्ती म्हणजे, ८६ व्या क्रमांकाची घटनादुरुस्ती. त्या दुरुस्तीमुळे बालकांना तीन वर्षे पूर्ण झाली की प्राथमिक शाळेची पूर्वतयारी होण्यासाठी शिक्षण मिळावं, तसेच पूर्वशालेय शिक्षण सहा वर्षे पूर्ण होईपर्यंत मिळावं, हा घटनेतील नियमाचा भाग झाला. या बदलाचा आधार घेऊन, बालशिक्षण क्षेत्रात देशात प्रथम महाराष्ट्र राज्याने पुढाकार घेऊन, 'आकार' हा बालशिक्षणक्रम तयार केला.

**थांबूया, लिहूया :**

'आकार' तुमच्या परिचयाचा आहे, हो ना! सांगा बरं, 'आकार' हा बालशिक्षणक्रम कोणत्या संस्थेने तयार केला? त्यातलं काय काय आठवतंय तुम्हांला? आता याबद्दलचे कोणतेही चार मुद्दे लिहा.

**'आकार' बालशिक्षणक्रम निर्मिती :**

राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे या संस्थेने अनेक तज्ज्ञ, तसेच आयसीडीएस आणि युनिसेफ यांचे सहकार्य घेऊन, 'आकार' हा बालकांसाठीचा अभ्यासक्रम तयार केला. चांगलं शिक्षण होण्यासाठी बाळाचा मेंदू, शरीर, भावना या सगळ्यांचा सविस्तर विचार यात केला आहे. बाळ कधी शिकतं? कसं शिकतं? चांगलं कधी शिकतं? याचा विचार केला आहे. आनंद आणि शिक्षण हे दोन्ही हातात हात घालून कसे पुढे जाईल? यावरील संशोधनाचाही वापर केला आहे. या नंतर 'आकार' बालशिक्षणक्रमावर आधारित, अंगणवाडी उपक्रमांची यादी आणि वर्णन असलेली एक पुस्तिका, आयसीडीएसने तयार केली. ती वापरण्यासाठी सेविकांना प्रशिक्षण दिलं. इ. स. २०१६ पासून, यानुसार अंगणवाडीत बालकांच्या भविष्याला 'आकार' देण्याची आपली धडपड सुरू आहे.

### १.१.४ राष्ट्रीय शिक्षण धोरण, २०२० व बालशिक्षण :

इ.स. २०२० मध्ये, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर झालं. यातील शैक्षणिक रचनेत, ३ ते ८ हा वयोगट हा पायाभूत स्तर आणि त्यातलाही ३ ते ६ वयोगट, म्हणजे अंगणवाडीचा 'बालवाटिका गट' हे आपल्याला माहीत झालं आहे. यामुळे नेमका काय बदल झाला बरं? आधीच्या धोरणाप्रमाणे शिक्षणशिडीवर सहा वर्षे पूर्ण झाल्यानंतर, इयत्ता पहिली, ही शिक्षणाची पहिली पायरी होती; त्याऐवजी आता, तीन वर्षे पूर्ण झाल्यावर बालवाटिकेचं पहिलं वर्ष, ही पहिली पायरी झाली. यामुळे बालशिक्षणाने नक्कीच एक मोठं पाऊल पुढे टाकलं आहे.

### १.१.५ राज्य अभ्यासक्रम आराखडा, पायाभूत स्तर, २०२४

नवीन धोरण राज्याच्या मातीत रुजण्यासाठी, त्यात राज्याच्या गरजांनुसार बदल केले. एक तर महाराष्ट्रातील बालशिक्षणतज्ज्ञांच्या कार्याचा समावेश केला आणि दुसरं म्हणजे, शिकणं नैसर्गिक आणि कसदार होण्यासाठी राज्यातल्या स्थानिक भाषा, बोलीभाषा यांचा समावेश केला. याबरोबरीने सणसमारंभ, इथले खेळ–खेळणी, परंपरा यांचा विचार केला, तसेच स्थानिक संदर्भ आणि बालसाहित्य वापरण्यासाठी प्राधान्य दिलं. असा सारा विचार करून 'राज्य अभ्यासक्रम आराखडा, पायाभूत स्तर, २०२४' तयार झाला. बालकांसाठी 'आकार' नंतरचा पुढचा अभ्यासक्रम याआधारेच तयार होत आहे.

### १.१.६ राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तराचे ध्येय

पायाभूत स्तराचे ध्येय आपल्याला माहीत हवे; ते असे आहे

**''३ ते ८ वर्षे या वयोगटातील प्रत्येक बालकाला, इ. स. २०२५ पर्यंत मोफत, सुरक्षित,**

**गुणवत्तापूर्ण आणि विकासाच्या दृष्टीने सुयोग्य वातावरण मिळवून देणारे, प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षण सहज उपलब्ध व्हायला हवे.''**

आता यात आपली जबाबदारी कोणती आहे, तर आपल्यासमोर येणाऱ्या मुलांच्या शिकण्यासाठी योग्य वर्गवातावरण निर्माण करणं. या बरोबरच मुलांची शारीरिक, भावनिक सुरक्षितता राखून चांगले शिक्षण देणे. आपण सारे नेहमीप्रमाणे आनंदाने आणि यशस्वीपणे ती जबाबदारी पार पाडूया. तुम्हांला सर्वांना या प्रवासात माझ्या खूप खूप शुभेच्छा!

## घटक क्र. १.२ : पायाभूत स्तर : सर्वांगीण बालविकास चित्र

**या घटकात आपण काय शिकणार?**

१.२.१ घराकडून अंगणवाडीकडे

१.२.२ परिचित विकास क्षेत्रांनुसार अंगणवाडीमधील कृतींचे गट

१.२.३ पायाभूत स्तराच्या अभ्यासक्रम आराखड्यातील विकास क्षेत्रे : अंगणवाडीमधील कृतींचे वर्गीकरण

१.२.४ पायाभूत विकास क्षेत्रे : माझ्या अंगणवाडीतील कृतींचे प्रमाण

### प्रास्ताविक :

'आकार' हा अभ्यासक्रम आपण अंगणवाडीत वापरतो. त्यामुळे सर्वांगीण विकास म्हणजे काय, याची थोडी माहिती आपल्याला आहे. आता नवीन अभ्यासक्रम आराखडा आला आहे. त्यात पायाभूत स्तरावर सर्वांगीण बालविकास क्षेत्रे कोणती आहेत, त्यांचा अर्थ काय आहे, याची प्राथमिक माहिती आज आपण समजून घेऊया, म्हणजे आपल्याला त्याप्रमाणे शिकणं-शिकवणं याचे नियोजन अधिक चांगलं करता येईल.

### १.२.१ घराकडून अंगणवाडीकडे :

मुलं चांगली शिकावीत, यासाठी पालकांची नेहमीच धडपड असते. तीन वर्षांची होईपर्यंत ती घरी बरंच काही शिकलेली असतात. शाळेबाहेरच मुले शिकत असतील, तर मग अंगणवाडीत ती आणखी काय बरं शिकतात? याचे उत्तर म्हणजे एक तर चांगलं शिकणं म्हणजे काय, याविषयी पालकांना थोडीफार माहिती असते, पण ती बऱ्याचदा खूप अपुरी असते. त्यापेक्षा अधिक चांगली माहिती अंगणवाडीताईंना प्रशिक्षणातून आणि अनुभवांतूनही मिळालेली असते. शरीर, मन, मेंदू यांचा विकास कसा होतो, कसा करायचा यावर बरंच संशोधन झालं आहे. अंगणवाडीतील सर्वांगीण विकासाचे चित्र या संशोधनावर तयार केलेले असते. असा विकास कमी वेळात घडवून आणण्यासाठी कसं शिकवायचं, त्यासाठी कोणतं साहित्य आणि पद्धत योग्य आहे. हेही ताईंना माहीत असतं. नवीन धोरणातल्या पायाभूत स्तरावर हे सर्वांगीण बालविकास विकासाचं चित्र कसं आहे, ते आपण पाहायचे आहे.

**थांबूया, लिहूया :**

ते पाहण्यापूर्वी थोडी उजळणी करूया. 'आकार' बालशिक्षणक्रम आठवा. त्यातली विकास क्षेत्रे आठवा. त्यातली कोणतीही तीन क्षेत्रे निवडा आणि मुलांची त्या तीन क्षेत्रांमध्ये कोणकोणती प्रगती व्हावी अशी अपेक्षा असते, ते कार्यपुस्तिकेत लिहा.

## १.२.२ परिचित विकास क्षेत्रांनुसार अंगणवाडीमधील कृतींचे गट :

'आकार' मधल्या क्षेत्रांची आपण उजळणी केली. आता नवीन पायाभूत अभ्यासक्रम आराखड्यात बालकाची विकासक्षेत्रे कोणती आहेत, हे माहीत करून घेण्यासाठी, एक छोटीशी कृती आपल्याला करायची आहे.

| कृती | कृती | कृती | कृती |
|---|---|---|---|
| बेडूक उड्या मार. | चित्रात काय काय दिसते सांग. | ओल्या मातीला हवा तो आकार दे. | चेंडू लांब फेक. |
| आवडेल ते पुस्तक बघ. | तुकडे जुळव, हत्ती कर. | डोक्यावर पुस्तक ठेवून चाल. | अभिनय करून गाणं म्हण. |
| ठोकळे घे, आगगाडी कर. | गोलावरील गप्पा करा. | बाहुलीचा वाढदिवस कर. | सारखे आकार जुळव. |
| गटामध्ये मिळून-मिसळून खेळा. | रोज दात घासायचे. | शाळेत यायचा रस्ता कोणता? | आवडते फूल काढ आणि रंगव. |
| पक्ष्याचा आवाज काढ. | रंगाप्रमाणे मणी वेगळे कर. | अंगठ्याने ठसे काढ. | आपली पाळी येईल त्यावेळी रिंग टाका. |

वरील तक्ता पाहा. त्यात मुलांनी करावयाच्या काही कृती दिल्या आहेत. बेडूक उड्या मार, गोलावर बसून गप्पा करूया, वगैरे. अशा खूप काही कृती अंगणवाडीत तुम्ही करून घेता, पण असं होतं का पाहा बरं; बऱ्याचदा कोणती कृती करून घेतली, तर कोणता विकास होतो याचा विचार आपण करतोच असं नाही. मग मुलांचा सर्वांगीण विकास होतो की नाही हे ठरवणार कसं? म्हणून आता यासाठी थोडा सराव करूया. कसा करायचा?

**थांबूया, कृतीचे गट करूया :** वरील तक्त्यात दिसणाऱ्या कृतींचे तुम्हांला गट करायचे आहेत. जी क्षेत्रं तुम्हांला माहीत आहेत, म्हणजे शारीरिक विकास मानसिक विकास वगैरे; त्या क्षेत्रांनुसार त्यांचे गट करायचे आहेत आणि तुमच्या वहीत लिहायचे आहेत. वाटलं तर गट करताना, 'आकार' हा अभ्यासक्रमही पाहायला हरकत नाही.

## १.२.३ पायाभूत स्तराच्या अभ्यासक्रम आराखड्यातील विकास क्षेत्रे : अंगणवाडीमधील कृतींचे वर्गीकरण :

आता तुम्ही कृतींचे गट केले असतील. हेच गट नवीन क्षेत्रानुसार कसे असतील, हे पुढील

तक्त्यात पाहू या. त्यात डावीकडे पहिला रकाना पाहा. तिथे नवीन पायाभूत स्तरावरची विकासक्षेत्रे दिलेली आहेत आणि प्रत्येक क्षेत्रापुढे आधीच्या तक्त्यामध्ये ज्या कृती दिल्या होत्या, त्यातल्याच जुळणाऱ्या कृती लिहिल्या आहेत. तुम्ही केलेले गट हे 'आकार' अभ्यासक्रमानुसार असतील आणि या तक्त्यात जे गट आहेत, ते नवीन क्षेत्रानुसार. त्यामुळे काही ठिकाणी तुमचे गट जुळतील तर काही ठिकाणी नक्कीच जुळणार नाहीत, म्हणून हा पुढचा तक्ता पाहताना, आता या प्रश्नांचा विचार करा आणि उत्तरे वहीत लिहा.

**थांबूया, कृती करूया :** या तक्त्यात तुम्हांला कोणती नवीन क्षेत्रे दिसली? तुम्ही केलेले कृतींचे गट कुठे जुळतात? कुठे वेगळे आहेत?

| विकास क्षेत्र | कृती | कृती | कृती | कृती |
|---|---|---|---|---|
| **१) शारीरिक विकास** | बेडूक उड्या मार. | रोज दात घासायचे. | डोक्यावर पुस्तक ठेवून चाल. | चेंडू लांब फेक. |
| **२) सामाजिक, भावनिक नैतिक विकास** | मिळून मिसळून खेळायचे. | गोलगप्पा करू या. | बाहुलीचा वाढदिवस कर. | आपली पाळी येईल त्यावेळी रिंग टाका. |
| **३) बोधात्मक विकास** | तुकडे जुळव, हत्ती कर. | ठोकळे घे. आगगाडी कर. | रंगाप्रमाणे मणी वेगळे कर. | सारखे आकार जुळव. |
| **४) भाषा व साक्षरता** | चित्रात काय काय दिसते सांग. | अभिनय करून गाणं म्हण. | शाळेत यायचा रस्ता कोणता, ते सांग. | आवडेल ते पुस्तक बघ. |
| **५) सौंदर्यात्मक आणि सांस्कृतिक विकास** | मातीचा हवा तो प्राणी कर. | पक्ष्याचा आवाज काढ. | अंगठ्याने ठसे काढ. | आवडते फूल काढ आणि रंगव. |

आपण पाहिलं, की पायाभूत स्तरावर सर्वांगीण विकासाची फेरमांडणी पाच क्षेत्रांत केली आहे.

या क्षेत्रांची नावं वाचून, त्याविषयी काही माहिती आपल्याला समजते. याहून अधिक तपशीलवार माहिती असणं गरजेचं आहे. घटकसंच २ आणि ३ तुम्ही पाहाल, त्यावेळी ती मिळणार आहे.

**पायाभूत विकासक्षेत्रे : अंगणवाडीत अनुभवलेली आणखी उदाहरणे :**

आता आपल्याला नवीन पायाभूत विकास क्षेत्रांचा थोडा अधिक परिचय झाला आहे. प्रत्येक क्षेत्रातील काही उदाहरणेही आपण पाहिली आहेत.

**थांबूया, कृती करूया :** आता तुम्ही नवीन पाच विकासक्षेत्रांची नावे कार्यपुस्तिकेत लिहा. अंगणवाडीत घेत असलेल्या आणखी कृती आठवा. अशा कृतींची आणखी काही उदाहरणे प्रत्येक विकासक्षेत्राच्या पुढे लिहा.

## १.२.४ पायाभूत विकासक्षेत्रे : माझ्या अंगणवाडीतील कृतींचे प्रमाण

'जेवताना सगळं खायचं', असं आपण मुलांना का सांगतो?, तर चांगलं पोषण होण्यासाठी शरीराला गरजेच्या साऱ्या गोष्टी मिळाव्यात म्हणून! तसंच बालकाचा सर्व अंगांनी विकास होतो आहे का?, त्यासाठी सगळ्या विकासक्षेत्रांतले उपक्रम आपण घेतो का? ते पुरेशा प्रमाणात आहेत का? हे पण पाहायला हवं नाही का! पण पाहायचं कसं? त्यासाठी एक सोपी रीत आहे; ती अशी :

**थांबूया, तक्ता भरूया :** आपण मुलांना कोणत्या क्षेत्रात साधारण किती प्रमाणात कृती करायला



देतो, याचा नुसता अंदाज करा. खालील तक्ता तुमच्या वहीत तयार करा आणि त्यात पुढीलप्रमाणे नोंदी करा. आपण प्रत्येक क्षेत्रात करून घेत असलेल्या कृती, भरपूर प्रमाणात करून घेतो, की मध्यम, साधारण की कमी प्रमाणात, हे प्रमाण केवळ टिकमार्क करून, योग्य रकान्यात नोंदवा.

यावरून कोणत्या क्षेत्रात आपण कृती पुरेशा करून घेतो आणि कुठे कमी जास्त होतात, हे समजेल. त्यानुसार रोजच्या शिकवण्यात योग्य तो बदल करता येईल.

| विकासक्षेत्राचे नाव | भरपूर | मध्यम | साधारण | कमी |
|---|---|---|---|---|
| शारीरिक विकास | | | | |
| सामाजिक, भावनिक, नैतिक विकास | | | | |
| बौद्धिक विकास | | | | |
| भाषा व साक्षरता विकास | | | | |
| सौंदर्यदृष्टी व सांस्कृतिक विकास | | | | |

**समारोप :** एवढं साधं काम नेहमी करत राहिलं, तरी आपल्याला मुलांच्या विकासाबद्दल, काही काळानंतर अधिक चांगली समज येत जाईल. पुढच्या पायरीवर केवळ अंदाज न करता, निरनिराळ्या क्षेत्रांतल्या कृती प्रत्यक्ष मोजून हा तक्ता भरता येईल, त्यामुळे मुलांचा विकास अधिक डोळसपणे साधणे शक्य होईल. यासाठी आपल्या सर्वांना शुभेच्छा.

**पायाभूत विकासक्षेत्रे : माझ्या अंगणवाडीतील कृतींचे प्रमाण :** हा जो तक्ता तुम्ही आता भरला आहे, तो आता दर महिन्याला भरावा. जिथे प्रमाण कमी–जास्त वाटेल, त्या क्षेत्रामधील कृतींचे प्रमाण पुढील महिन्यात त्यानुसार कमी–जास्त करावे. त्यासाठी कोणत्या कृतींचा नव्याने समावेश केला, त्यांची नावे लिहावीत. याबद्दल पर्यवेक्षकांशी चर्चा करावी.

त्यानुसार काही कृती नव्याने सुरू करायच्या असतील, तर त्याही लिहाव्यात.

## घटक क्र. १.३ : भाषा शिक्षण व साक्षरता

**या घटकात आपण काय शिकणार?**

१.३.१ भाषा शिक्षणाची तत्त्वे

१.३.२ पायाभूत स्तरावरील भाषाशिक्षण व साक्षरता

### १.३.१ भाषा शिक्षणाची तत्त्वे :

मानवजात भाषासमृद्ध आहे असं म्हणतात. म्हणजे काय, तर आपल्या गरजा, आपले विचार, आपल्या कल्पना दुसऱ्या व्यक्तीपर्यंत पोहोचवण्यासाठी, कोणतातरी समान दुवा असावा लागतो, तो समान दुवा आपल्याला आपल्या बोलीभाषेच्या माध्यमातून मिळतो.

**लहान बाळ त्याच्या गरजा इतरांयंत कसे पोहोचवत असेल?, आईला कसे समजते, की माझ्या बाळाला भूक लागली आहे किंवा त्याने अंथरूण ओले केले आहे? जर बाळ दिव्यांग असेल, तर त्याची भाषा कशी असेल?**

**बाळ बोलायला शिकत असते, की त्याला बोलता येत असते, की ते नंतर बोलायला लागते?**

**त्याचे शब्दभांडार कसे वाढत असेल? मूल संवादासाठी कोणती भाषा वापरते?**

भाषासंपादनासाठी बालकांशी सतत संभाषण करणे, त्यांच्याबरोबर असताना गाणी म्हणणे, मुलांना गोष्टी सांगणे, प्रौढ व्यक्ती एकमेकांशी बोलत असताना, काही संवाद बालकांच्या कानावर पडणे, त्यांच्याशी चित्रगप्पा मारणे, प्रश्न विचारून त्यांना विचारप्रवृत्त करणे, मुलांना प्रश्नांची उत्तरे द्यायला लावणे अशा गोष्टींची आवश्यकता असते. मुले गृहभाषा/परिचित भाषा/मातृभाषा ऐकत मोठी होत असतात, त्यामुळे ती भाषा त्यांना अवगत होते आणि बोलताही यायला लागते.

पायाभूत स्तरासाठी तयार केलेल्या अभ्यासक्रम आराखड्यात, 'मूल भाषेचे शिक्षण कसे घेते' याबद्दलची आपण माहिती घेतो आहोत. त्यात, मूल कोणत्या चौकटीतून जात असताना भाषा संपादित करते, त्याबद्दल संशोधनामधून अभ्यासलेल्या निष्कर्षांची माहिती आहे. या चौकटीलाच तत्त्वे असे म्हणतात.

### १.३.२ पायाभूत स्तरावरील भाषाशिक्षण व साक्षरता :



१) मुलांशी त्यांच्या मातृभाषेत संवाद साधला, तर आपण विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे ती नीट समजून घेऊन देतात, याचे कारण काय असू शकते?

२) मुलांना अंगणवाडीत आल्यावर त्यांच्याच भाषेत अध्ययन अनुभव दिला, तर आशय पटकन समजतो. याचे कारण काय असू शकेल?

३) वेगवेगळ्या भाषा बोलणारी मुले वर्गात असतील तर ती एकमेकांशी संवाद कसा साधत असतील?

**खूप महत्त्वाची माहिती तुम्हांला मिळणार आहे, ती लक्षपूर्वक वाचा आणि लक्षात ठेवा.**

- नव्या विचारांनुसार मुलांची मातृभाषा/गृहभाषा/परिचित भाषा याला खूप महत्त्व आहे.
- मुलांची मातृभाषा/गृहभाषा/परिचित भाषा यालाच $L_1$ म्हणजे लँग्वेज 1 असं म्हटले आहे.
- पायाभूत स्तरावर म्हणजेच ३ वर्षे ते ८ वर्षे या काळात बालकांचे खेळणे, ऐकणे, बोलणे हे सर्व सुनियोजित पद्धतीने $L_1$ च्या माध्यमातून झाले पाहिजे.
- मुलांना लहानपणापासून इतर भाषाही बोलायला शिकवल्या पाहिजेत. यालाच बहुभाषिकत्व म्हणतात.
- ६ वर्षे ते ८ वर्षे या काळात, मुलाला इतर भाषांमध्ये संवाद साधण्याची संधी द्यायला हवी.
- अशा इतर भाषा मौखिक संवादासाठी शिकल्या व शिकवल्या जातात व त्या स्वाभाविकपणे आणि सहजतेने आत्मसात केल्या जातात, त्या भाषांना $L_2$, $L_3$, $L_4$ असे म्हटले जाते.
- मूल शाळेत जाऊ लागते, तेव्हा वाचन, लेखन या औपचारिकतेकडे जाऊ लागते, अशावेळी त्याची $L_1$ हीच वाचन, लेखन करण्याची भाषा असावी.
- औपचारिक वाचन, लेखनाच्या भाषेला $R_1$ असे म्हटले आहे; म्हणजे ती शालेय शिक्षणासाठी माध्यम भाषा असू शकते, तसेच सर्वांत पहिल्यांदा मूल वाचन, लेखन ज्या भाषेत शिकते, ती भाषा $R_1$ असे म्हटले आहे.



- कधी कधी $L_1$ आणि $R_1$ सारखीच असते.
- पण कधी कधी $L_1$ आणि $R_1$ वेगवेगळी असू शकते.
- पुढे मूल इतर भाषांमधेही वाचन, लेखन कौशल्य प्राप्त करते. त्याला $R_2$, $R_3$ असे म्हटले आहे.

**प्रात्यक्षिक :**

१) अंगणवाडीत येणाऱ्या प्रत्येक मुलाची $L_1$ व $R_1$ विचारून, त्याचा तक्ता बनवून वर्गात लावा.

२) उदयोन्मुख साक्षरता, यासाठी वर्गात पूरक वातावरणनिर्मिती करा. यासाठी तुम्ही काय काय केले आहे, त्याच्या नोंदी करून ठेवा.

## घटक क्र. १.४ : अध्यापनशास्त्र

**या घटकात आपण काय शिकणार?**

१.४.१ अध्ययन-अध्यापन प्रक्रिया

१.४.२ अध्ययनाची तत्त्वे

१.४.३ नियोजन

१.४.४ खेळाद्वारे अध्ययन

१.४.५ उदयोन्मुख साक्षरता, साक्षरता आणि संख्याज्ञान

१.४.६ वर्गातील सकारात्मक वातावरण/सकारात्मक वर्गसंस्कृती

१.४.७ भौतिक वातावरणाचे संघटन

१.४.८ शिक्षक-मूल-पालक संबंध





आता डोळे मिटून प्रत्येकाने आपण अंगणवाडीच्या वर्गात जायचे. बाई दिसतायत का? आणखी काय काय दिसतंय? शांतपणे सगळे बघून घ्यायचे.

**जे आठवतंय, त्यावर एक छोटा निबंध लिहू शकाल का? त्याला एक छानसे नावही द्या.**

हळूच डोळे उघडायचे आणि काय दिसले ते लक्षात ठेवायचे. कसा होता तुमचा वर्ग? कुठे होती तुमची शाळा? वर्गात काय काय होते? तुम्हांला बाईंची भीती वाटत होती का? वर्गात खूप मुलं-मुली होती का? डब्यात काय नेत होतात? दप्तर नेत होतात का? दप्तरात काय काय असायचे? बाईंच्या हातात पट्टी होती का? तुम्ही कधी मार खाल्लाय का?

आपल्याला जे सगळे आठवते, त्याच्या मागे एक शास्त्र असते, ज्याचं नाव आहे अध्यापनशास्त्र. अध्यापनशास्त्रात फक्त शिकवल्या जाणाऱ्या गोष्टींचाच समावेश नसतो, तर मुलाला शिक्षण अनुभव देण्यासाठी ज्या सर्व गोष्टी केल्या जातात, त्या सगळ्यांचा यात समावेश होतो. त्यातील प्रत्येक पूरक गोष्टीची पूर्तता करताना, पायऱ्या असतात. मग मुलांसाठी अध्ययन अनुभव देताना जे उद्दिष्ट डोळ्यांसमोर असते त्यानुसार काम करावे लागते. उदाहरणार्थ, एक अनुभव जरी पुरवायचा असेल, तरी त्या अनुभवाच्या माध्यमातून

उद्दिष्टपूर्ती व्हावी, यासाठी अनुभवाचा आशय, त्याची मांडणी, त्यासाठी बोलण्याची भाषा, नियोजन, त्यासाठी साधन साहित्य गोळा करणे अथवा निर्मिती करणे, त्या साधन साहित्याचे संघटन, त्यानुसार वर्गरचना, वर्गमांडणी, वर्गातील व वर्गाबाहेरील साधन साहित्य आणि बैठकव्यवस्था करावी लागते, पालकांना काही सूचना द्याव्या लागतात. आठवड्यात कोणती खेळणी खेळायला द्यायची याबद्दल विचार, वर्गातील पटसंख्या लक्षात घेऊन, तेवढ्या साहित्याची तयारी करणे, तसेच वर्गात अध्ययनपूरक व सकारात्मक वातावरण निर्माण करणे आणि सर्वांत शेवटी उद्दिष्टपूर्ती झाली की नाही, याची तपासणी करण्यासाठी मूल्यमापन करावे लागते. इतक्या सगळ्या बाबी लक्षात घ्याव्या लागतात, म्हणजेच अनुभव कसा असावा, मुलांपर्यंत कसा पोहोचवावा, त्यांनी काय शिकावे असे वाटते आहे, याची रचना करण्यापासून ते त्याची पूर्तता होते आहे की नाही, याकडे लक्ष पुरवणे म्हणजेच अध्यापनशास्त्र असे म्हणता येईल.

### १.४.१ अध्ययन-अध्यापन प्रक्रिया :

अध्यापनशास्त्र हा 'शिकवणे आणि शिकणे' या प्रक्रियेचा एक दृष्टिकोन असतो. यामध्ये शिकणाऱ्या व्यक्तीमध्ये अंतर्बाह्य बदल घडवून आणण्यासाठी, सर्व गोष्टींचे नियोजन केले जाते; म्हणजेच विद्यार्थी, त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी, परिस्थिती, वातावरण, त्यांचा परिसर, त्यांच्या क्षमता, त्यांची कौशल्ये, आकलनशक्ती, त्यांचे वर्तन, मानसिकता, वयानुसार गरजा, वयानुसार वैशिष्ट्ये, या सर्व गोष्टी विचारात घेऊन, शालेय वातावरणातील प्रत्येक गोष्टीचे नियोजन करावे लागते.

### १.४.२ अध्ययनाची तत्त्वे :

प्रत्येक शास्त्राला काही मूलभूत आधार असावा लागतो, त्याप्रमाणे अध्यापन म्हणजेच शिकवणे या प्रक्रियेलाही, काही तत्त्वे आधारभूत आहेत.

### १.४.३ नियोजन :

अध्ययन आणि अध्यापन प्रक्रिया योग्यप्रकारे होऊन, मुलामध्ये फरक पडतो; परंतु, त्यासाठी उत्तम आखणी करावी लागते आणि वेळेचा सदुपयोग करून घ्यावा लागतो. वर्षभरासाठी, महिन्यासाठी, आठवड्यासाठी, एका दिवसासाठी नियोजन करून ठेवले, तर अध्ययन- अध्यापन प्रक्रिया सुयोग्य घडते.

### १.४.४ खेळाद्वारे अध्ययन :

खेळ हा बालकाच्या आयुष्याचा अविभाज्य घटक आहे. त्याद्वारेच बालकाचे उत्तम शिक्षण होऊ शकते. उदा. चित्रकोडी, वेगवेगळे डॉमिनो संच (अंक जिना, शब्द जिना, अक्षर जिना), ठोकळे व त्याच्या रचना, अशा खेळांतून अनेक प्रश्न निर्माण होतात. उत्सुकता, जिज्ञासा जागी होते. प्रयोगशील वृत्ती विकसित होते. ती स्वतःचे निर्णय स्वतः घ्यायला शिकतात. खेळताना मुलं एकमेकांशी आंतरक्रिया करतात, त्यातून भाषा विकासाला चालना मिळते. शारीरिक हालचाली होतात.

## १.४.५ उदयोन्मुख साक्षरता, साक्षरता आणि संख्याज्ञान :

ही एक महत्त्वाची प्रक्रिया आहे आणि शिक्षणातील महत्त्वाचा टप्पा आहे.

साक्षरतेची सुरुवात म्हणजे उदयोन्मुख साक्षरता. इथून सुरुवात होऊन, मूल साक्षर बनून पुढे/नंतर त्याला छापील वाचता लिहिता येऊ लागते. याच्याच बरोबरीने सुरुवात होते, ती संख्याज्ञानाची.

### उदयोन्मुख साक्षरतेसाठी वातावरणनिर्मिती :

- बालकाला वाचन साहित्याची ओळख करून देणे, ही वाचनाची पहिली पायरी आहे.
- बालकाला लेखन साहित्याची ओळख होणे.
- साहित्य हातात कसे धरतात व वापरतात हे समजणे.
- 'लेखन कसे दिसते', हे चित्राच्या स्वरूपात समजणे.
- छापील शब्द, अक्षरे, त्यांचे ध्वनी समजू लागणे.
- बोलताना, वाचन करताना, लिहिताना ठरावीक वेग असतो, हे समजणे. याप्रमाणे यासाठी घरापासून अंगणवाडीपर्यंत सर्व ठिकाणी वातावरणनिर्मिती करावी.
- वाचन करताना डोळे दोन्ही कडांना फिरतात, तसेच वरून खाली नजर फिरते हे समजू लागणे.

## १.४.६ वर्गातील सकारात्मक वातावरण/सकारात्मक वर्गसंस्कृती :

- हे सर्व घटक एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.
- बालकांना स्वयंशिस्त लागणे गरजेचे आहे.
- मुलाला स्वावलंबनाकडे नेणे, हे शिक्षकाचेही कर्तव्य आहे. यासाठी वर्गवातावरण खूप सकारात्मक असावे.
- मुलाला दडपण न वाटता, मोकळेपणा वाटला पाहिजे असे ते असावे.
- वर्गवातावरण हे विशेष गरजा असणाऱ्या मुलांनाही समावेशनाची संधी देईल असे असावे.
- अध्ययन-अध्यापन प्रक्रिया आनंदमय वातावरणामध्ये घडली, तर आपल्याला बालकांमध्ये अपेक्षित बदल घडताना दिसतात.
- शिक्षक हा घटक या संपूर्ण प्रक्रियेत खूप महत्त्वाचा असतो. बालकांकडून शिक्षक या व्यक्तीचे सहजच अनुकरण केले जाते.
- त्यामुळे शिक्षकांचे चालणे, बोलणे, त्याच्या हालचाली, चेहऱ्यावरचे हावभाव, देहबोली इत्यादी सर्व जाणीवपूर्वक आदर्श असावे.
- मूल नकळत या सर्व बाबींचे निरीक्षण करून, ते वर्तन उचलत असते.

### १.४.७ भौतिक वातावरणाचे संघटन :

मुळातच कोणतेही काम आखीवरेखीव केले, की त्याला संघटित स्वरूप असतेच; म्हणजेच बालकाच्या अध्ययन प्रक्रियेसाठी शिक्षकाने आजूबाजूचे वातावरण अध्ययनपूरक निर्माण करायचे असते. यामध्ये भौतिक वातावरण, भौतिक सुविधा, वस्तू, साधन साहित्य यांचे व्यवस्थित संघटन करून ठेवावे. योग्य वेळी योग्य वस्तूंचा, साहित्याचा वापर करावा.

### १.४.८ शिक्षक–मूल–पालक संबंध :

अध्ययन आणि अध्यापन प्रक्रियेचे तीन खांब म्हणजे शिक्षक–मूल–पालक. मुलाच्या सर्वांगीण विकासामध्ये एकाही घटकाची कमतरता चालत नाही. शाळेच्या कार्यक्रमात पालकांचा सहभाग असेल, तर मुलाची जडणघडण होण्याला गती प्राप्त होते.





#### कृती :

आपण काम करत असलेला आताचा आपला अंगणवाडीचा वर्ग आठवायचा. आपल्याकडे सादरीकरणात उल्लेख असलेल्या काही गोष्टी आहेत का, ते आठवायचे किंवा आपल्या लहानपणीच्या शाळेत असे काही होते का, ते आठवायचे आणि जे आठवले असेल, त्याची यादी वहीत करायची.

#### तुम्हांला एक काम करायचे आहे.

आता तुमचा निबंध परत एकदा वाचून पाहा. अशीच होती का तुमची शाळा? आणि आता आपण ज्या अंगणवाडीत काम करतो, तिथे या सगळ्या गोष्टी प्रत्यक्षात आणतो का? हे तपासून बघा.

### प्रात्यक्षिक :

**हे करून पाहा :**

१) आपल्या अंगणवाडीच्या साप्ताहिक वेळापत्रकामध्ये दिलेल्या सर्व कृती व उपक्रमासाठी लागणाऱ्या साहित्य व साधनांची एक यादी वहीमध्ये करून, एक आठवडा आधीच, म्हणजे आधीच्या शनिवारीच, वाराप्रमाणे सर्व साहित्याच्या पिशव्या भरून तयार ठेवा.

२) बालकांबरोबर वावरताना, जाणीवपूर्वक आपली भाषा, उठणे, बसणे, हातवारे, चेहऱ्यावरचे हावभाव या गोष्टींकडे लक्ष ठेवावे व काही चुकते आहे असे वाटल्यास त्यात लगेच बदल करावेत.

## घटक क्र. १.५ : अध्ययन-अध्यापनासाठी आशयाची निवड, संघटन आणि संदर्भीकरण

**या घटकात आपण काय शिकणार?**

१.५.१ पाठ्यक्रम

१.५.२ आशयसंघटनाचे मार्ग

१.५.३ अध्ययन वातावरण

**वर्गकार्य :** खाली काही वाक्ये दिली आहेत, ती प्रत्येकाने पूर्ण करायची आहेत.

१) माझी अंगणवाडी ............... आहे.

(मुख्य रस्त्याजवळ, वस्तीत, समाज मंदिरात, देवळात, इतरत्र)

२) माझ्या अंगणवाडीत मुलांची संख्या ........ आहे.

३) माझ्या अंगणवाडीत मुलांना यायला आवडते त्याची कारणे...

(तुमच्या उत्तरापुढे '✓' खूण करायची आहे. एकापेक्षा जास्त उत्तरे असू शकतात.)

- अंगणवाडीत खाऊ मिळतो.
- अंगणवाडीत भरपूर खेळायला मिळते.
- अंगणवाडीत खूप खेळणी आहेत.
- अंगणवाडीत गाणी म्हणतात.
- अंगणवाडीत गोष्टी सांगतात.
- अंगणवाडीच्या ताई खूप आवडतात.
- ताई खूप छान बोलतात.
- ताई गप्पा मारतात.
- ताई रागवत नाहीत.
- ताई जवळ घेतात.
- अंगणवाडी ताईंकडे दाखवायला खूप चित्रे आहेत.
- अंगणवाडीत खेळायला भरपूर जागा आहे.
- ताई खूप छान माहिती देतात.



**आम्हांला आमची अंगणवाडी खूप आवडते.**

यापूर्वी आपण अध्यापनशास्त्र म्हणजे काय हे माहीत करून घेतले, म्हणजे आता लक्षात ठेवायचे, आपण अंगणवाडीत ज्या सर्व गोष्टी करतो, त्या अध्यापनशास्त्राचाच भाग आहेत. आता आपण जे जाणून घेणार आहोत, त्या सर्व गोष्टींचा पाया अध्यापनशास्त्र आहे; म्हणजेच अध्यापनशास्त्र आपल्याला जे सांगते, ते सर्व केले, तर आपण बालकांना उत्कृष्ट दर्जाचे शिक्षण देऊ शकतो.




अध्यापनशास्त्र हा आधार धरूनच, सर्व शैक्षणिक नियोजन घडत असते.

**दिलेली आकृती बघून तुम्ही उत्तरे देऊ शकता का, ते बघू हं!**

१) मुलांना कोणतीही माहिती देताना, आपण आपल्या मनात येईल ती माहिती देतो का?

२) आपण विषय कसा ठरवतो?

३) माहिती देण्यापूर्वी आपण आपल्या वहीत काही लिहून ठेवतो का?

४) माहिती सांगायला बसल्यानंतर साहित्याची जमवाजमव करतो का?

५) मुलांच्या कोणत्याही कृती चाललेल्या असताना आपण माहिती देतो का?

६) आपल्याला हवा आहे तितका वेळ आपण माहिती देत राहतो का?

७) वर्गात वेळापत्रक वापरतो का?

### १.५.१ पाठ्यक्रम :

अध्यापनशास्त्राची तत्त्वे लक्षात घेऊन, सर्वप्रथम पाठ्यक्रम विकसित करावा लागतो. पाठ्यक्रम विकसित करतानाही, काही तत्त्वांचा आधार घ्यायचा असतो. पाठ्यक्रम कोणासाठी (टार्गेट ग्रुप) करत आहोत, हे सर्वांत आधी लक्षात ठेवून, पुढे राज्य अभ्यासक्रम आराखड्यानुसार मार्गदर्शक तत्त्वे वापरावीत. पाठ्यक्रम ज्ञानरचनावादाला अनुसरून, म्हणजेच तीन तत्त्वांच्या पायावर उभा करावा लागतो. सोप्याकडून अवघडाकडे, माहीत असलेल्या गोष्टींकडून माहीत नसलेल्या गोष्टींकडे आणि मूर्ताकडून अमूर्ताकडे. जसे विषय हाताळणार, त्यानुसार पाठ्यक्रम करावा लागतो.

### १.५.२ आशयसंघटनाचे मार्ग :


यामध्ये विचार असतो, तो पाठ्यक्रमाला अनुसरून तयार होणारा आशय, मुलांपर्यंत कसा पोहोचवावा याचा, यासाठी विशिष्ट दृष्टिकोन ठरवणे, पुस्तके तयार करणे याचा समावेश असतो; परंतु पाठ्यपुस्तके ३ ते ६ वयोगटासाठी नसतात. अशावेळी पुस्तके पालकांसाठी तयार करावीत, ज्या आधारे त्यांचाही अध्यापन-अध्ययन प्रक्रियेत सहभाग घेता येऊ शकेल. साधन साहित्य

निर्मिती करणे, त्याची मांडणी व रचना ठरवणे, म्हणजेच मुलांपर्यंत सहजतेने पोहोचणे आणि त्यांना सहज उपलब्धी करून देणे, हे मोठे काम असते.

सर्व काम चालू असताना महत्त्वाची गोष्ट ही, की टार्गेट ग्रुप म्हणजेच कोणासाठी काम चालू आहे हे लक्षात ठेवून, प्रत्येक गोष्ट करणे. त्यानुसार नियोजन करून, वेळेची आखणी, बैठकव्यवस्था, पुरेसे साहित्य, त्याची सहज उपलब्धतता या बाबी तपासाव्या लागतात.

### १.५.३ अध्ययन वातावरण :

एकदा सर्व संघटन झाले, की प्रत्येक साहित्य कुठे, किती प्रमाणात, कसे वापरायचे, कसे मांडायचे, कशी रचना करायची या संदर्भानुसार व नियोजनानुसार, वर्गातील व वर्गाबाहेरील वातावरणनिर्मिती या गोष्टींकडे वळावे. बालकांमध्ये अपेक्षित बदल घडावेत, सर्वांना समान संधी मिळाव्यात, साहित्याची समान वाटणी व्हावी, तसेच मुलांवर कोणतेही दडपण नसेल अशी वर्गसंस्कृती, म्हणजेच सकारात्मक अध्ययनपूरक वातावरणनिर्मिती करावी.




अध्यापनशास्त्र

### हे करून पाहा :

१) वरील प्रकरणामधून माहिती मिळाल्यावर, आपल्याकडे कोणत्या गोष्टींच्या कमतरता आहेत त्या वहीत लिहून काढा.

२) वेळापत्रकातील प्रकल्प विषयाचा आशय मुलांपर्यंत पोहोचवण्यासाठी, किती प्रकारची साधने व साहित्य संघटित करावे लागेल, त्याची यादी प्रत्येक शुक्रवारी वहीत करून ठेवा व प्रत्यक्ष साधन साहित्य शनिवारी संघटित करून पिशवी तयार करा.

**प्रात्यक्षिक :**

१) वर्गातील वातावरण आणि वर्गाबाहेरील वातावरण यांमध्ये कोणत्या साधन साहित्याचा समावेश होतो, त्याची यादी वहीत करून, तक्ता तयार करून, तुम्हांला दिसेल अशा जागी लावून ठेवा.

## घटक क्र. १.६ : बालकांच्या अध्ययनाच्या प्रगतीसाठी मूल्यांकन

**या घटकात आपण काय शिकणार?**

१.६.१ मूल्यांकनाची गरज व महत्त्व

१.६.२ मूल्यांकन पद्धती, साधने व प्रतिसादांचा अन्वयार्थ काढणे

१.६.३ नोंदी, अहवाल व दस्तऐवज

मूल जेव्हा आपल्या अंगणवाडीत प्रवेश घेते, तेव्हा त्याचा शिक्षण प्रवास सुरू होतो. घरामधूनही मुलाचे शिक्षण होतच असते; परंतु ते शिक्षण, समोर घडणाऱ्या प्रसंगांतून, सहवासात येणाऱ्या व्यक्तींच्या बोलण्यांतून, त्यांच्याबरोबर येणाऱ्या अनुभवांतून घडत असते.


मग अंगणवाडीत वेगळे काय असते? तर अंगणवाडीत मुलाला आखीव रेखीव, नियोजनबद्ध व रचनात्मक कार्यक्रम मिळतो. अध्ययन अनुभव मिळतात. सर्वांत विशेष असे की, दिले जाणारे अनुभव विशिष्ट हेतू समोर ठेवून आखलेले असतात.


जर विशिष्ट हेतू डोळ्यांसमोर असतील, तर ते हेतू पूर्ण झाले की नाही, याची तपासणी करावी लागते. जसे आपण शाळेत परीक्षा देतो आणि त्यावर ठरत असते की आपण पुढच्या वर्गात जाणार किंवा नाही. अगदी तसेच आपल्या अंगणवाडीत घडते; पण परीक्षा, प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका असं काहीही न वापरता.

मुलं अंगणवाडीत रोज काही ना काही कृती करत असतात, म्हणजेच मुलं क्रियाशील असतात. आपण रोज त्यांना बघत असतो. आपल्या डोळ्यांसमोर, त्यांच्यात झालेले बदल घडत असतात. होणारे बदल निश्चितच आपण देत असलेल्या अनुभवांमुळे घडत असतात, पण ते किती प्रमाणात झाले, किती वेगाने होत आहेत हे सर्व जाणून घ्यायला हवे.

याचाच अर्थ शिक्षणाच्या प्रवासात गाडी अधूनमधून कोणत्या तरी स्टेशनवर थांबवावी लागेल आणि गाडीची तपासणी करावी लागेल.

**शिक्षण प्रवासाला सुरुवात**





**गाडी स्टेशनवर थांबली, काय काय घडतंय तपासून पाहा.**




स्टेशनवर गाडी थांबली आहे. चित्राचं नीट वाचन करा आणि तिथे काय काय दिसतं आहे, यावरून तुमच्या शब्दात पूर्ण चित्राचं वर्णन वहीत लिहा.

मुलाने अंगणवाडीत प्रवेश घेतल्यावर त्याचा शिक्षणप्रवास सुरू झाल्यापासून, साधारणपणे तीन वर्षे मुले आपल्याबरोबर असतात. त्या काळात आपला मुख्य हेतू मुलांचा सर्वांगीण विकास घडवणे हाच असतो, पण विकास बरोबर होतो आहे की नाही, हे तपासणे आवश्यक असते. यासाठी एक प्रक्रिया असते, म्हणजेच वेळोवेळी मुलांचे निरीक्षण करणे आवश्यक असते, त्याच्या नोंदी ठेवाव्या लागतात. मुलांना प्रश्न विचारून त्यांची भाषा, मौखिक प्रकटीकरण कसे आहे हे पाहावे लागते. मुले खेळत असताना त्यांच्या शरीराची ठेवण कशी आहे, ती पळतात कशी, इतरांबरोबर सहकार्याने खेळतात का, त्यांच्या वयानुसार सर्व क्रिया त्यांना करता येतात का, हे पाहावे लागते.

ही पूर्ण प्रक्रिया सातत्यपूर्ण असावी लागते आणि त्याचा आढावा ठरावीक काळानंतर घ्यायचा असतो; म्हणजेच घेतलेल्या नोंदी, केलेली निरीक्षणे या सर्वांवरून त्या मुलाबद्दलचे, त्याच्या वर्तनाचे अर्थ आणि आडाखे बांधायचे. त्याचा अहवाल तयार करायचा. त्याची स्वतंत्र संचयिका पोर्टफोलिओ (फाईल) तयार करायची. यालाच मुलाच्या प्रगतीचे मूल्यांकन म्हणतात.

### १.६.१ मूल्यांकनाची गरज व महत्त्व :

#### मूल्यांकनाची गरज :

१) मुलाची प्रगती त्याच्या मानदंडानुसार चालू आहे की नाही, हे पाहता यावे.

२) शिक्षकांना मुलांबरोबर काम करण्याची योग्य दिशा मिळावी.

३) प्रत्येक मुलाची व्यक्तीविशिष्टता जाणून घेता यावी.

४) सर्वांगीण विकासाच्या प्रत्येक क्षेत्रात मुलाची प्रगती होते आहे का, हे जाणून घेता यावे.

#### मूल्यांकनाचे महत्त्व :

१) मूल्यांकनामुळे मुलाची बलस्थाने बारकाईने शोधता येतात आणि कमतरता असेल तिथे आधारभूत गोष्टी पुरवता येतात. उदा. वाचादोष असेल, तर वाचातज्ज्ञ व्यक्तींकडे पाठवता येते किंवा गाणी, गोष्टी, गप्पा अशा कृतींद्वारे मदत करता येते.

२) एखाद्या विकासामध्ये मूल कमी पडत असेल किंवा मागे पडत असेल, अशावेळी मूल्यांकनाच्या मदतीने हस्तक्षेप (intervention) करून, लवकरात लवकर दोष निवारणास/कमतरता दूर करण्यास मदत होते.

३) मूल्यांकनाद्वारे विश्लेषण केलेल्या माहितीच्या आधारे, पालकांना मुलाच्या विकासाच्या प्रवासात क्रियाशील राहण्यास मदत होते.

४) अध्यापन साहित्यनिर्मितीसाठी, अध्यापनाच्या नियोजनात मूल्यांकन साहाय्यभूत ठरते.

५) मुलाच्या विकासाबाबत व सिद्धतेबाबत मूल्यांकन, शिक्षकाला अंतर्दृष्टी देते, म्हणजेच मुलाचे अंतरंग जाणून घेण्याची कुवत निर्माण करते.

### १.६.२ मूल्यांकन पद्धती, साधने व प्रतिसादांचा अन्वयार्थ काढणे :

कोणतीही गोष्ट पद्धतशीरपणे होण्यासाठी, संशोधने व अभ्यासाअंती निश्चित केलेल्या निरनिराळ्या पद्धतींचा अवलंब करणे आवश्यक असते. आपण पायाभूत स्तरासाठी काम करतो, तेव्हा मोठे आव्हान असते, कारण आपल्यासमोरील मूल अजून कोणत्याच बाबतीत सिद्ध नसते, परंतु त्याची प्रगती होते आहे का नाही याकडे लक्ष ठेवावेच लागते. अशावेळी मुलाच्या हालचाली, वर्गातील त्याचे वर्तन, त्याने काढलेली चित्रे, खेळताना इतर समवयस्कांशी त्याचे वागणे, प्रौढ व्यक्तींशी वागणे, बोलताना वापरली जाणारी भाषा आणि मूल्यमापनाच्या वेळी दिलेली उत्तरे, करत असलेल्या कृती, सर्व बाबतीतील क्रियाशीलता किंवा अक्रियाशीलता यांवरून प्रगतीचे विश्लेषण करावे लागते.

यासाठी निरीक्षण व नोंदी, पडताळा सूची/तपाससूची, पालकांची मुलाखत, आवश्यकतेनुसार सातत्यपूर्ण निरीक्षण, मुलाने काढलेल्या चित्राचे विश्लेषण अशा साधनांचा वापर करावा लागतो.

उदा. मूल मैदानावर खेळत आहे, तेव्हा पळतं कसं, या कृतीचे निरीक्षण केल्यास सर्वसाधारणपणे असे आढळते, की ३ वर्षांचे मूल हालचालीत सफाईदारपणा नसल्याने, थोडं अडखळत पळतं.

४ वर्षांच्या मुलाच्या पळण्यात बराच सफाईदारपणा आलेला असतो. ५ वर्षांचं मूल मात्र वेगाने आणि कौशल्यपूर्ण पद्धतीने पळू शकते. पळताना थांबवल्यास थांबू शकते.

याचा अन्वयार्थ असा होतो, की पायाचे मोठे स्नायू जसे विकसित होत जातात व आजूबाजूच्या जागेचा अंदाज येतो, तशी हालचालीत सफाई येते.

### १.६.३ नोंदी, अहवाल व दस्तऐवज :

मुलाच्या प्रगतीच्या नोंदी ठेवणं महत्त्वाचं असतं. ते महत्त्व आपण सर्वांत प्रथम मुद्द्यात, मूल्यांकनाची गरज व महत्त्व मांडताना पाहिलं आहे.

या नोंदी मुलाच्या विकासाबाबत व सिद्धतेबाबत शिक्षकाला, अंतर्दृष्टी देतात, म्हणजेच मुलाचं अंतरंग जाणून घेण्याची कुवत निर्माण करतात.

मुलाने शाळेत प्रवेश घेतल्यापासून, सर्वांगीण विकासाच्या विविध नोंदींची संचयिका ठेवल्यामुळे, नंतर त्या दस्तऐवजाचा संदर्भ घेता येतो व अहवाल तयार करता येतो; ज्याचा उपयोग मुलाच्या विकासासाठी करता येते.

### प्रात्यक्षिक :

**हे करून पाहा.**

१) अंगणवाडीत जेवढी पटसंख्या असेल, तेवढ्या संख्येने वर्तमानपत्राच्या कागदाच्या पिशव्या तयार करा. प्रत्येक पिशवीवर एकेका मुलाचे नाव घालून, त्या मुलाने केलेल्या कृती, काढलेली चित्रे यांचा संचय त्यांच्या पिशवीत करून ठेवा.

२) पालकांबरोबरच्या भेटीत, प्रगतीची चर्चा असेल त्यावेळी, पिशवीमधील संचाद्वारे, मुलाने केलेल्या कृती पालकांना दाखवा. त्याचा अर्थ, उपयोग समजावून सांगा.

## घटक क्र. १.७ : वेळेचे व्यवस्थापन

**या घटकात आपण काय शिकणार?**

१.७.१ अंगणवाडीतील दैनंदिन वेळापत्रक

१.७.२ दैनंदिन वेळापत्रक : नियोजनासाठी आवश्यक बाबी

१.७.३ शालेय वार्षिक दिनदर्शिका – नियोजन विचार

१.७.४ शालेय वार्षिक दिनदर्शिका : नियोजनासाठी आवश्यक बाबी

### प्रास्ताविक :

नेहमीची वेळ झाली, की चिमुकली पावलं अंगणवाडीकडे वळतात. मुलं शिकतील, मोठी होतील या मोठ्या आशेने आईवडील मुलांना अंगणवाडीत पाठवत असतात. आपणही त्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी काम करतच असतो. अभ्यासक्रमात असलेल्या मुलांच्या सर्वांगीण विकासाच्या अपेक्षा, आपल्या हातात

असलेल्या वेळात पूर्ण करायच्या असतात. यासाठी हाती असणारा वेळ जास्तीतजास्त चांगल्या रीतीने कसा वापरता येईल, हे आपण पाहणार आहोत.

### १.७.१ अंगणवाडीतील दैनंदिन वेळापत्रक :

मुलांचा विविध अंगाने विकास करणे, हे तसे एक मोठे आणि कौशल्याचे काम आहे. ते करण्यासाठी मुलांना वर्षभर योग्य असे वेगवेगळे अनुभव द्यावे लागतात. यासाठीच मुलं रोज अंगणवाडीत येत असतात. या वयोगटातल्या मुलांची वाढ अतिशय वेगाने होत असते. मुलांच्या जीवनातला हा सोन्याचा काळच म्हणायला हवा. तो कारणी लागणं फार महत्त्वाचं असतं. यासाठीच विकास घडवतील अशा कृती, उपक्रम आणि रोजचा उपलब्ध वेळ यांचा चांगला मेळ घालावा लागतो. हा मेळ घालून अंगणवाडीचं दैनंदिन वेळापत्रक तयार होतं. एक चांगलं वेळापत्रक कसं तयार करता येईल, हे आज आपल्याला पाहायचंय. त्यासाठी पहिल्यांदा एक नमुना वेळापत्रक पाहूया.

**अंगणवाडी : (वयोगट ३ ते ६) नमुना वेळापत्रक**

हे आहे एक नमुना वेळापत्रक. या वेळापत्रकाचं जरा निरीक्षण करूया. यात काही गोष्टी नेहमीच्या आणि परिचयाच्या दिसतील. उदा. मुक्त खेळ, परिपाठ इत्यादी. तर काही नवीनही दिसतील. ज्या काही नवीन दिसतील, त्यांची नोंद करा. हे नमुना वेळापत्रक पाहताना, काही प्रश्नांचा विचार आपल्याला करायचा आहे.

**निरीक्षण करूया, लिहूया :**

- यातल्या कृती कोणकोणत्या विकासक्षेत्रांशी संबंधित दिसतात?
- तुमच्या अंगणवाडीचं नमुना वेळापत्रक आहे. त्यात खालील नमुन्यापेक्षा काही वेगळेपणा दिसतो का? असला तर कुठे दिसतो?

| अ.क्र. | कृती | कालावधी मि. |
|---|---|---|
| १) | मुक्त खेळ | ३० |
| २) | परिपाठ, प्रार्थना, चेतना व्यायाम, आरोग्य तपासणी, दिनदर्शिका, हवामान तक्ता, हजेरी, ओळखपत्र तयार करणे, बातमी सांगणे इत्यादी. | १० |
| ३) | छोटी सुट्टी | १० |
| ४) | बोधात्मक विकास | ३० |
| ५) | भाषा आणि साक्षरता विकास | १५ |
| ६) | मोठी सुट्टी | २० |
| ७) | शारीरिक विकास (वर्गातील व वर्गाबाहेरील खेळ) | २० |
| ८) | सौंदर्यदृष्टीचा विकास व सर्जनशील कृती/परिसर परिचय/विज्ञानानुभव (एक दिवसाआड) | २० |

| अ.क्र. | कृती | कालावधी मि. |
|---|---|---|
| ९) | गोष्ट | १० |
| १०) | आज आपण काय केले/रोजची उजळणी | ०५ |

**(राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर – २०२४ : पृष्ठ क्र. २०८ वरून)**

### दैनंदिन वेळापत्रक : नियोजन विचार

**विचार करूया, लिहूया :** दैनंदिन वेळापत्रक तुम्हाला माहीतच आहे, तुम्ही वापरलेही आहे. समजा हे वेळापत्रक तुम्ही तयार करा असं म्हटलं, तर त्यासाठी कोणकोणत्या बाबी लक्षात घ्यायला लागतील? या प्रश्नाचं उत्तर तुमच्या वहीत लिहा. आणखी काही मुद्दे आहेत का, ते नंतर पाहूया.

### १.७.२ दैनंदिन वेळापत्रक : नियोजनासाठी आवश्यक बाबी

यासाठी कोणकोणत्या बाबी माहीत हव्यात?

आता तुम्ही या प्रश्नाचं उत्तर लिहिलंच आहे. पुढे दिलेल्या मुद्द्यात आणखी काही नवे मुद्दे सापडतात का ते पाहा आणि समजा असतील, तर त्या मुद्द्यांची नोंद करून ठेवा.

१) रोजचे मिळणारे तास किती, वर्षातले कामकाजाचे दिवस किती, यावरून वर्षात मिळणारा एकूण वेळ किती, हे माहीत पाहिजे.

२) कृती/उपक्रम यांची निवड विचारपूर्वक करायला हवी. म्हणजे काय? कृती निवडताना त्या पाचही विकासक्षेत्रांशी संबंधित आहेत ना हे पाहायला हवं, त्यात विविधता हवी. एकट्याने की जोडीने, वर्गातील की वर्गाबाहेरील कृती, असा सगळा विचार करून, या निरनिराळ्या कृतींमधले प्रमाण योग्य आहे का ते पाहायला हवं.

३) तासिकांचा क्रम ठरवताना, असा ठेवायला हवा, की मुले कंटाळणार नाहीत. त्यासाठी मुक्त हालचाली, बडबडगीते, खेळ, वर्गातल्या कृती, बाहेरच्या कृती अशा विविध कृती आलटून पालटून वेळापत्रकात ठेवायला पाहिजेत.

४) आपल्याला माहीत आहे, की या वयात मुलं कोणत्याही कृतीत जास्त वेळ रमत नाहीत. हे लक्षात घेऊन, कोणतीही कृती किती वेळासाठी घ्यायची, कृती किती वेळाने बदलायची याचे भान नक्कीच ठेवायला हवं.

५) आपल्या गावातल्या, परिसरातल्या स्थानिक गरजा वेगळ्या असू शकतात. वेळापत्रकात त्याप्रमाणे बदल करायला हवा.

अजूनही काही मुद्दे अनुभवातून आपण लक्षात घेऊ शकतो. अधिक सोयीचे वेळापत्रक करू शकतो.

## १.७.३ शालेय वार्षिक दिनदर्शिका – नियोजन विचार :

अशा दैनंदिन वेळापत्रकाशिवाय आणखी कोणकोणती वेळापत्रके तुम्हांला माहीत आहेत?

आठवड्याचे वेळापत्रक असते का? महिन्याचे असते का? वार्षिक दिनदर्शिकाही असते का? ते आठवा.

वार्षिक दिनदर्शिका म्हणजे काय? आता हे पूर्ण वर्षाचं असं एक मोठं नियोजन आहे. अंगणवाडीच्या एका शैक्षणिक वर्षात कोणकोणते उपक्रम घ्यायचे? कोणत्या महिन्यात/आठवड्यात कोणत्या दिवशी घ्यायचे? या सगळ्यांचे आधीच नियोजन करणं सोयीचं असतं. त्यामुळे कमी वेळात अधिक उपक्रम आणखी चांगल्या रीतीने आपल्याला घेता येतात. असा संपूर्ण वर्षाचा नियोजनाचा तयार तक्ता, म्हणजे शालेय वार्षिक दिनदर्शिका.

### थांबूया, लिहूया :



अशी वार्षिक दिनदर्शिका तुम्हांला तयार करायला दिली, तर संपूर्ण वर्षात अंगणवाडीत होणारे कोणकोणते कार्यक्रम, घडामोडी लक्षात घ्याव्या लागतील? उत्तराचे मुद्दे नोंदवून ठेवा.

## १.७.४ शालेय वार्षिक दिनदर्शिका : नियोजनासाठी आवश्यक बाबी

तुम्ही आत्ताच या विषयीचे काही मुद्दे लिहिले असतील. आणखी काही मुद्दे आहेत का? ते पाहूया. वार्षिक दिनदर्शिका तयार करताना, दैनंदिन वेळापत्रक तयार करताना जे मुद्दे पाहिले ते तर ध्यानात घ्यावे लागतातच, पण याशिवाय वर्षातील सर्वच घडामोडी लक्षात घ्याव्या लागतात.

अंगणवाडीचा रोजचा कालावधी, सुट्या, वर्षाचे एकूण कामाचे दिवस, सणवार साजरे करण्याचे विशेष दिवस, क्रीडास्पर्धा, इतर शालेय समारंभ, प्रदर्शने, सहली, पालकशिक्षक सभा, शिक्षक प्रशिक्षणाचे दिवस, स्नेहसंमेलन अशा एक ना दोन, किती तरी गोष्टी पाहाव्या लागतात. यात तुम्ही आणखी कितीतरी भर घालू शकाल.

कॅलेंडर पाहून अशा सगळ्या गोष्टींची महिनावार यादी करून तयार ठेवली, तर आपलं काम सोपं होईल. प्रत्येक वर्षी मागचा आढावा घेतला तर दैनंदिन किंवा वार्षिक वेळापत्रक अधिक चांगले होऊ शकेल.

**समारोप :** या सगळ्यांचा विचार करून, आताच्या आपल्या सध्याच्या नियोजनात काही बदल करणे गरजेचे आहे, असे तुम्हांला वाटले का? वाटले असेल, तर आवश्यक तिथे बदल करूया आणि मुलांना आवडणारे आणि समृद्ध करणारे जास्तीत जास्त अनुभव देऊया. या कामासाठी सर्वांना शुभेच्छा.

**प्रात्यक्षिक :**

**हे करून पाहा :** अंगणवाडीत सध्या घेत असलेल्या ५० कृती/उपक्रमांची यादी करावी. या कृती/उपक्रम पाच विकासक्षेत्रांत विभागून लिहाव्यात.

१) शारीरिक विकास

२) सामाजिक, भावनिक, नैतिक विकास

३) बोधात्मक विकास,

४) भाषा व साक्षरता विकास

५) सौंदर्यदृष्टी आणि सांस्कृतिक विकास.

प्रत्येक क्षेत्रात किमान पाच उपक्रम यावेत. ज्या क्षेत्रात आले नसतील, ते शोधून आवश्यक भर घालावी.

## घटक क्र. १.८ : अध्ययनावर परिणाम करणारे काही महत्त्वाचे घटक

**या घटकात आपण काय शिकणार?**

१.८.१ दिव्यांगत्व, विकासातील विलंब आणि लवकर दखल

१.८.२ बालकांची सुरक्षा आणि भावनिक सुरक्षितता

**प्रास्ताविक :**

सारे शिकूया पुढे जाऊया, हे आपले स्वप्न आहे. ते पूर्ण करण्यासाठी मुले कधी शिकतात? कशी शिकतात? शिकताना कशामुळे अडतात? असे शिकण्यावर परिणाम करणारे घटक माहीत हवेत. काही घटक आपल्याला माहीतही आहेत. यातील दोन महत्त्वाचे घटक आपण पाहणार आहोत.

**विनाअडथळा विकासासाठी..**

अंगणवाडीत संपूर्ण गावातून येणारी मुले असतात. ती अनेक बाबतीत वेगवेगळी असतात. घरातील परिस्थिती वेगळी असते, शिक्षणाचे वातावरणही वेगवेगळे असते. मुलांच्या क्षमता कमीजास्त असतात. मुलांच्यात काही कमतरताही असू शकतात. असा वेगळेपणा असूनही, ठरवलेला अभ्यासक्रम सर्वांनी व्यवस्थित पूर्ण करावा असा आपला उद्देश असतो. त्यासाठीच तर असते अंगणवाडी. हे साध्य करण्यासाठी मुलांना सन्मान देणारं, त्यांची उमेद वाढवणारं वातावरण राखणं गरजेचं आहे. मुलं शिकताना दोन महत्त्वाच्या गोष्टी जरी ध्यानात ठेवल्या, तरी त्यांच्या शिकण्यातले बरेच अडथळे कमी होतील. यातली पहिली गोष्ट म्हणजे. एखाद्या मुलाच्या विकासात विलंब होतो आहे, हे ओळखता यायला पाहिजे आणि एकदा ओळखले, की लवकर दखल घेतली पाहिजे. पुढे काय उपाययोजना करायची हे लवकर ठरायला पाहिजे आणि दुसरी गोष्ट म्हणजे, बालकांना सुरक्षा आणि भावनिक सुरक्षितता मिळेल याची खात्री केली पाहिजे. या दोन्हीविषयी थोडी अधिक चर्चा करूया.

## १.८.१ विकासातील विलंब आणि लवकर दखल :

अंगणवाडीत ३ ते ६ या वयोगटामधील मुलं असतात. या वयात सर्व प्रकारचा विकास अतिशय वेगाने होत असतो, पण विकासाचे टप्पे कोणी लवकर गाठते तर कोणी उशिरा. उदाहरणार्थ, कोणी लवकर बोलतं तर कोणी उशिरा. कोणी लवकर समजूतदार होतं तर कोणी हट्टी राहतं आणि हे नैसर्गिकच असतं. इथे काळजी करण्याचं कारण नसतं. पण त्याच वेळी गाफील राहून चालत नाही. लक्ष ठेवून राहावं लागतं. कोणाला एखाद्या बाबीत फार विलंब झाला, तर विशेष काही कारण नाही ना हे पाहावं लागतं. अनेक वेळा साध्या गोष्टी असतात. मुलांचं पोट दुखणं, डोळ्यांवर ताण येऊन डोकं दुखणं यामुळेसुद्धा मुले शिकत नाहीत. वर्गात सहभागी होत नाहीत. ते लक्षात येऊन, वेळीच उपाय केले, तर शिक्षणाची गाडी पुन्हा लवकरच रुळावर येते. अशी आणखी काही उदाहरणं आठवत असतील तर पाहा.

**थांबूया, लिहूया :**

असे आणखी एक दोन अनुभव आठवा आणि वहीत थोडक्यात लिहा.

**दिव्यांगत्व, विकासातील विलंब आणि दखल :** विकासात विलंब करणारं आणखी एक महत्त्वाचे कारण आहे, ते म्हणजे दिव्यांगत्व.

ऐकू न येणारी, पाहण्यात मोठा दोष असणारी मुलं अंगणवाडीत असू शकतात. आसपासचे भान नसणारी स्वमग्न मुले, तसेच मतिमंद अशीही काही मुले असतात. आपल्याला माहिती आहे, की त्यांना आपण दिव्यांग मुले असे म्हणतो.

तुम्ही नक्कीच अशी दिव्यांग मुले पाहिलेली असणार. ती नीट शिकावीत यासाठी काही वेगळे प्रयत्न करावे लागले का? कोणते?

**थांबूया, लिहूया :**

अशा दिव्यांग मुलांना कशी मदत करावी लागली, याची दोन उदाहरणे आठवा आणि वहीत थोडक्यात लिहा.

याविषयी अधिक मुद्दे पुढे पाहणार आहोत.

**दिव्यांगत्व : अंगणवाडीत प्राथमिक निदान व पाठपुरावा :**

दिव्यांग मुले असतील, तर अंगणवाडी त्यांना कशी कशी मदत करू शकते? तुम्ही अनुभव लिहिलेच आहेत. आणखी काही मुद्दे पाहूया.

१) पहिली पायरी म्हणजे एखाद्या मुलाचा विकास, इतर मुलांच्या तुलनेने खूपच लांबला असेल, तर मग काळजीपूर्वक निरीक्षण करून, त्याच्या नोंदी करायला सुरुवात केली पाहिजे.

२) तुम्हांला माहीतच असेल, की जागतिक आरोग्य संघटनेने अशी मुले ओळखण्यासाठी, प्रश्नांची एक यादी केली आहे. त्यात दहा प्रश्न आहेत. ही यादी वापरून मुलांचे निरीक्षण केले, तर दिव्यांग मुलं ओळखणं सोपं होतं.

३) मुलांची शिकण्याची समस्या कायम राहिली, तर मुलांच्या कुटुंबीयांशी बोलायला पाहिजे. मात्र त्यांना एकदम मानसिक धक्का बसणार नाही, धीर वाटेल अशा प्रकारे सांगावे लागेल.

४) गरज वाटेल त्यावेळी घरच्यांना विश्वासात घेऊन, बालरोग तज्ज्ञांना भेटून त्यांचा सल्ला घेण्याविषयी सुचवायला हवे.

५) काही निश्चित निदान होईल त्यावेळी कुटुंब, शिक्षक आणि डॉक्टर यांनी एकत्र बसायला हवं आणि पुढे कसे कसे काम करायचे ते ठरवायला हवे.

६) ठरलेल्या नियोजनाप्रमाणे काम करताना, त्यांच्या नोंदी नीट ठेवायला हव्यात. अशा नोंदी केलेली वही, संदर्भासाठी लागेल त्यावेळी तयार असायला हवी.

७) आणखी एक बाब म्हणजे अभ्यासाच्या बाबतीत पालकांशी बोलायला हवं आणि केवळ त्या मुलांचा विचार करून मुलाला पचेल, रुचेल अशी शिक्षण योजना तयार करायला हवी.

८) दिव्यांगत्वाचे स्वरूप बरेच गंभीर असेल, तर मग कुटुंब आणि डॉक्टर यांच्याशी नेहमी संपर्कात राहून पाठपुरावा करावा लागेल.

या मुलांना शिकताना मर्यादा पडतात. या मर्यादेच्या अंगणात त्यांचे शिक्षण, खंड न पडता कसे सुरू राहील? मुलाला शिकण्याचा आत्मविश्वास राहावा यासाठी वर्गात काय करता येईल? याविषयी थोडी अधिक माहिती बघूया.

### दिव्यांग मुलांचे शिक्षण होण्यासाठी नियोजन : कसे असेल हे नियोजन?

१) मुलांबद्दल जास्तीत जास्त माहिती गोळा करावी. मर्यादा लक्षात घेऊन, त्यांना जमतील, झेपतील, अशी लहान कामं, कृती करायला सांगायला पाहिजेत. ती मुलांना जमली ना, की त्यांचा आत्मविश्वास नक्की वाढतो.

२) आपली वागणूक प्रेमळ असावी. मुलाला जवळ बसवून घ्यावं. बोलताना अगदी सोपी भाषा वापरावी. एखादी लहानशी गोष्ट पार पाडली, तरी त्याचं कौतुक करून, उमेद वाढवावी.

३) आपण या मुलांना काही कृती देतो, त्यावेळी डोळे, कान, त्वचा अशा अनेक इंद्रियांचा वापर करावा लागेल, अशा कृती निवडाव्यात.

४) इतर मुलांपेक्षा त्यांना अधिक कृती द्याव्यात. जास्त सराव घ्यावा.

५) सामान्य मुलांबरोबर मिसळण्याच्या संधी त्यांना द्यायला हव्यात, म्हणजे ती मुलं हळूहळू वर्गात सामावून जायला मदत होईल.

६) दिव्यांग मुलांशी कसं वागायचं हे इतर मुलांना समजावून सांगितलं, तर ती यांना मदत करतील. चेष्टामस्करी करणार नाहीत.

७) सगळ्याचं सार जर सांगायचं म्हटलं, तर या मुलांना शिकवताना 'आस्था, आधार आणि प्रोत्साहन' हा मंत्र आणि सूत्र कायम लक्षात असायला पाहिजे.

## १.८.२ बालकांची सुरक्षा आणि भावनिक सुरक्षितता

मुलांच्या शिकण्यावर परिणाम करणारा, 'विकासातील विलंब' हा घटक आपण पहिला. पुढचा घटक आहे, 'मुलांची सुरक्षा आणि सुरक्षितता'. शारीरिक आणि मानसिक–भावनिक अशा दोन्ही अंगांनी आपण त्यांचा विचार करू या.

### थांबूया, लिहूया :

१) अंगणवाडीत बालकांची शारीरिक सुरक्षितता कोणकोणत्या कारणाने धोक्यात येऊ शकते?
मुलं खेळताना पडतात, एकमेकांशी भांडतात, जिन्यावर पळतात असे अनेक प्रसंग हा प्रश्न वाचून डोळ्यांसमोर आले असतील. असे आणखी प्रसंग आठवा आणि असे धोके टाळण्यासाठी तुम्ही कोणते उपाय करता, ते आठवून तुमच्या वहीत लिहा.

२) बालकांना भावनिक सुरक्षितता मिळावी, म्हणजे अंगणवाडीत त्यांना मोकळेपणाने बोलता, वावरता यावं, निर्धोक वाटावं, कुठलंही दडपण वाटू नये यासाठी तुम्ही कोणकोणते उपाय करता? थोडे थांबा आणि तुमच्या वहीत मुद्दे लिहा.

### बालकांची भावनिक सुरक्षितता :

भावनिक सुरक्षितता असेल, तर मुलांना शिकण्यासाठी योग्य वातावरण तयार होते. ती कशी राखायची?

- एक तर आपण मुलांना कोणत्याही प्रकारची शारीरिक शिक्षा करता कामा नये. अपमानास्पद वागणूक देता कामा नये.
- कोणत्याही प्रकारे मुलांवर दडपण येईल, त्यांना भीती वाटेल, अशी कोणतीही कृती टाळावी लागेल.
- सर्व मुलांना कृतीमध्ये सहभागाची समान संधी द्यावी लागेल. ताईचं आपल्याकडे लक्ष आहे असं प्रत्येकाला वाटायला पाहिजे.
- मुलांशी होणारा संवाद त्यांची उमेद वाढवणारा असेल, याची काळजी नेहमीच घ्यावी लागेल.
- काही मुलांचं वागणं अयोग्य असू शकतं. अशावेळी त्याची दखलही घ्यायला लागेल आणि कारणे शोधून ती दूर करायला लागतील. शेवटची आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे, मुलांमध्ये असणाऱ्या, उणिवा, व्यंग आणि इतर काहीही खाजगी गोष्टी यांची माहिती आवश्यक नसेल तर इतरांसमोर उघड करणे योग्य होणार नाही.

**समारोप :** मुलांच्या विकासाला विलंब झाला, तर आपण जागरूक असतोच, पण आता अशा वेळी काय करता येईल याविषयी आणखी काही मुद्दे आपल्याला समजले असतील. ही या विषयाची तोंडओळख आहे. याविषयी अधिक तपशीलवार माहिती आपल्याला घटकसंच ११ मध्ये मिळणार आहे, त्यामुळे मुलांच्या विकासातले अडथळे आपल्याला लवकर समजतील आणि त्यावर लवकर उपाययोजना करता येईल. यामुळे 'सारे शिकूया पुढे जाऊया' ही आपली मनातली आकांक्षा पूर्ण व्हायला नक्कीच मदत होईल.

## घटक क्र. १.९ : प्राथमिक स्तराला जोडणारे दुवे

**या घटकात आपण काय शिकणार?**

१.९.१ पायाभूत स्तरातून प्राथमिक स्तरात प्रवेश

१.९.२ प्राथमिक स्तराला जोडणारे दुवे आणि ते तयार करण्याची रीत

१.९.३ प्राथमिक स्तरावर शिक्षणातील बदल

**प्रास्ताविक :**

नमस्कार, आपल्या गावात आपण राहण्याची जागा बदलली, तर अनेक बदलांशी जुळवून घेताना आपण गोंधळून जातो, नाही का? तसंच पायाभूत स्तरावर शिकणारी मुलं, उद्या ज्यावेळी प्राथमिक स्तरावर प्रवेश घेतात, त्यावेळी त्यांना अनेक बदलांना तोंड द्यावे लागते.

यावेळी प्राथमिक स्तराला जोडणारे काही दुवे असायला हवेत, म्हणजे काय? तर काही ना काही उपाय करून, मुले सहज रुळतील असे काहीतरी करायला हवे. असे काय काय करता येईल?


याविषयी आज आपण थोडी चर्चा करणार आहोत.

### १.९.१ पायाभूत स्तरातून प्राथमिक स्तरात प्रवेश :

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – २०२० मध्ये शिक्षणाची रचना बदलली. त्यातला तीन ते आठ वर्षे वयोगटाचा स्तर हा पायाभूत स्तर आहे, हे आपल्याला आता माहीत झालं आहे. यामधल्या तीन ते सहा वर्षे या वयोगटाला बालवाटिका असं नाव आहे. पुढची दोन वर्षं इयत्ता पहिली आणि दुसरीची आहेत.

पायाभूत स्तरावरून मुलं प्राथमिक स्तरावर प्रवेश घेतात. प्राथमिक शाळेत गेल्यावर मुलांना कोणकोणत्या बदलांना सामोरं जायला लागतं? काही गोष्टी पूर्वीसारख्याच, पण काही मात्र नवीन असतात. नव्या आणि जुन्यात काही सारखेपणाही असतो. हा सारखेपणाचा दुवा नव्याशी जुळवून घ्यायला मदत करतो. उदाहरणार्थ, सायकल सोडून आपण स्कूटर शिकायला लागलो, की काय होते? सायकलवर तोल राखता येणे, हँडलचा वापर या गोष्टी स्कूटर शिकताना तशाच असतात. हा दोन्हीतला दुवा आहे. त्यामुळे स्कूटर शिकणं पूर्णपणे नवीन वाटत नाही.

क्लच, ब्रेक अशा नव्या गोष्टींची सवय करणं सोपं जातं. पायाभूत स्तर ते प्राथमिक स्तराचा प्रवास हादेखील काहीसा असाच आहे.




**आकृती ९.१ पायाभूत स्तरावरील शैक्षणिक रचना**

**(राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर – २०२४ : पृष्ठ क्र. २२५ वरील)**


## १.९.२ प्राथमिक स्तराला जोडणारे दुवे आणि ते तयार करण्याची रीत :

अशा प्रकारे पुढच्या टप्प्यावर गेल्यावर, अंगणवाडीतील मुलं प्राथमिक वर्गात सुरळीतपणे रुळायला हवीत.

### थांबूया, लिहूया :

वरच्या स्तरावर गेल्यावर, मुलांच्या रोजच्या वेळापत्रकात वेळ, विषय इत्यादी बाबतीत कोणकोणते बदल होऊ शकतात? तुमच्या कार्यपुस्तिकेत लिहा. तुम्ही असे बदल अनेक वेळा पाहिले आहेत. त्यावेळी त्या मुलांना कोणकोणत्या अडचणी आल्या, ते जरा आठवा. त्या दूर करण्यासाठी, मुलांना अशावेळी तुम्ही काय काय मदत केली, हे तुमच्या वहीत लिहा.


### अध्ययनदुवे तयार करण्यासाठी विविध कार्यनीती :



प्राथमिक स्तरावर मुले रुळावीत यासाठी, तुम्ही जे काही केले असेल ते सुरळीतपणे करण्यासाठी तुम्ही तयार केलेले दुवेच आहेत. त्यांना आपण अध्ययन दुवे असे म्हणतो. असे दुवे तयार करण्याचे आणखी काही मार्ग पाहू या. राज्य अभ्यासक्रम आराखड्यावरील आकृतीप्रमाणे, कार्यनीती दिल्या आहेत. यातली मुख्य कल्पना अशी, की अंगणवाडीतील मुले आणि प्राथमिक वर्गातली/ शाळांतली मुले एकत्र येऊन मिसळली पाहिजेत. हळूहळू एकमेकांशी मैत्री झाली पाहिजे आणि शेवटी अंगणवाडीतल्या मुलांना प्राथमिक शाळेचं वातावरण ओळखीचे झाले पाहिजे इतके, की तिथे शिकण्याची ओढ निर्माण झाली पाहिजे. यासाठी एक तर शक्य त्या ठिकाणी अंगणवाडीचे वर्ग हे, प्राथमिक शाळेच्या आवारात किंवा जवळच्या परिसरात भरवले, तर उत्तम. दुसरं म्हणजे पूर्वप्राथमिक आणि प्राथमिक वर्ग सुरू होण्याची वेळ एकच असावी आणि तिसरं म्हणजे पायाभूत आणि प्राथमिक स्तरावरचे काही काही उपक्रम एकत्रितपणे आयोजित करता येतात का, ते पाहावं. मुलांनी त्याचा आनंद एकत्र घ्यावा. असे कोणकोणते उपक्रम एकत्र मिळून आयोजित करता येणे शक्य आहे ते पाहूया.

**पायाभूत व प्राथमिक स्तरावरील मुलांचे संयुक्त उपक्रम :**

अंगणवाडी आणि प्राथमिक वर्गातील मुले कोणकोणत्या वेळी एकत्र येऊ शकतात? उदाहरणार्थ खेळाचे सामने, संमेलन, सणवार, उत्सव अशा किती तरी प्रसंगी मुले एकत्र येऊन आनंद घेऊ शकतात.




**थांबूया, लिहूया :**

तुम्हांला असे आणखी कित्येक प्रसंग माहीत असतील. तुमच्या कार्यपुस्तिकेत असे अजून ५/६ प्रसंग लिहा.

## १.९.३ प्राथमिक स्तरावर शिक्षणातील बदल :

आपल्याला माहीत आहे, की मुले प्राथमिक स्तरावर गेल्यावरही, काही गोष्टी पायाभूत स्तराप्रमाणेच राहतात, पण त्यांचे स्वरूप बदलू शकते. काही वेळा पूर्णपणे नवीन गोष्टी शिकाव्या लागतात. उदा. मुले नवीन क्षमता मिळवतात आणि नवीन कौशल्ये शिकतात.

**थांबूया, लिहूया :**

प्राथमिक स्तरावर, शिक्षणात क्षमता, विषय, त्यांचा विस्तार याबाबतीत कोणकोणते बदल होत असतील, असे तुम्हांला वाटते? तुमच्या वहीत, कार्यपुस्तिकेत मुद्दे लिहा.

**प्राथमिक स्तरावरच्या शिक्षणात सातत्य व बदल :** या बदलांच्या विषयी आता आणखी विचार करूया. मुले बालवाटिकेत असताना निरनिराळ्या पायाभूत क्षमतांच्या विकासाच्या तयारीत असावीत, एवढीच अपेक्षा असते. प्राथमिक स्तरावर मात्र क्षमता आणि कौशल्यांचा पद्धतशीर विकास करण्यावर भर असतो. शालेय विषयांच्या बाबतीत पायाभूत स्तरावर आणि प्राथमिक स्तरावर विषयांची नावे एकसारखी वाटली, तरी विषयांचा विस्तार बदलतो. अपेक्षांमध्येही निश्चितपणे बदल जाणवतो. काय काय बदल दिसतात हे समजण्यासाठी तक्त्यातले भाषा विषयाचे उदाहरण पाहूया. भाषा विषयात पायाभूत स्तरावर उदयोन्मुख साक्षरता अपेक्षित असते. म्हणजे काय, तर उमलायला लागलेली साक्षरता. पायाभूत स्तरावर मुलाला प्रत्यक्ष वाचन, लेखन शिकवायचे नसते, तर चित्रांची, गोष्टींची पुस्तके, कुठे काय करायचे याच्या भिंतीवर सूचना, अशा प्रकारे मुलांना केवळ साक्षर वातावरणात ठेवायचे असते. हळूहळू मुलांच्या वागण्यातून 'वाचन-लेखन म्हणजे काय', याची अंधुक कल्पना त्यांना आली आहे असे जाणवते. उदाहरणार्थ, भले वाचता लिहिता न का येईना, मुलं पुस्तक उलट सुलट धरतात, पानं उलटतात, पानावर कुठेही बोट फिरवतात, कागदावर गिरगिटतात आणि एवढंच पुरेसं असतं. प्राथमिक स्तरावर मात्र साक्षरतेची पुढची पायरी अपेक्षित असते. म्हणजे घरात बोलली जाणारी गृहभाषा म्हणजे लँग्वेज L1 येण्याची अपेक्षा असते. याशिवाय, L1 आणि अपेक्षित असलेली दुसरी भाषा L2 यामध्ये लेखन-वाचन येणे अपेक्षित असते. गणित, शारीरिक शिक्षण याबाबतीत असे कोणते बदल आहेत, ते पुढच्या तक्त्यात वाचा आणि समजून घ्या.

| विषय | पायाभूत स्तर | प्राथमिक स्तर |
|---|---|---|
| **भाषा** | बालवाटिकेमध्ये उदयोन्मुख साक्षरता अपेक्षित असते. | प्राथमिक स्तरावर इयत्ता पाचवीपर्यंत L1, L2 यांचे लेखन, वाचन यावे असे उद्दिष्ट. (L1- मातृभाषा/गृहभाषा/परिचित भाषा व L2 याशिवाय इतर भाषा) |
| **गणित** | पायाभूत स्तरावर वस्तूंचे गट करणे, आकार, संख्या यांचे आकृतिबंध ओळखणे अशा प्रकारच्या अपेक्षा असतात. | तिसरीअखेर पायाभूत संख्याज्ञान यावे ही अपेक्षा. |
| **शारीरिक शिक्षण** | मुक्त खेळ | मुलांना खेळांचा परिचय होऊन, त्यात सहभागही अपेक्षित. |

**समारोप :** आपण पाहिले, की पायाभूत स्तरावरून प्राथमिक स्तरावर मुले जातात त्यावेळी एकूणच शिकण्याची उद्दिष्टे, आशय यात बदल होतात. शिकवणे आणि ते तपासणे, यांच्या पद्धतीमध्येही बदल होतात. अशा वेळी मुले नीट रुळावीत यासाठी आपले प्रयत्न असतातच. आता त्यासाठी आणखी काही मुद्दे आपल्या लक्षात आले असतील. त्यांचा वापर तुम्ही आता नक्कीच कराल आणि या पुढचे नियोजन करताना, एक पायरी पुढे जाल. या कामासाठी आपल्या सर्वांना शुभकामना.

## घटक क्र. १.१० : साहाय्यीभूत शैक्षणिक परिसंस्था निर्मिती

**या घटकात आपण काय शिकणार?**

१.१०.१ अंगणवाडीताईंचे सक्षमीकरण

१.१०.२ पायाभूत सुविधा आणि अध्ययनाचे स्रोत

१.१०.३ शैक्षणिक व प्रशासकीय यंत्रणा यांची भूमिका

१.१०.४ पायाभूत स्तरासाठी पालक व समाजाची भूमिका

१.१०.५ अध्ययन–अध्यापन प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा वापर

### १.१०.१ अंगणवाडीताईंचे सक्षमीकरण :

कोणत्याही शिक्षणप्रक्रियेचा एक खांब शिक्षक असतो. आपल्या प्रक्रियेत, शिक्षक या भूमिकेत अंगणवाडीताई आहे, यामुळे तिचा पाया पक्का रोवला जाण्याची गरज आहे. शिक्षक या भूमिकेत अंगणवाडीताईचा पाया पक्का रोवायचा म्हणजे नेमके काय करावे लागेल?

शिक्षणप्रक्रियेत, म्हणजेच अध्ययन–अध्यापन प्रक्रियेत काळानुसार बदल घडले पाहिजेत. हे बदल घडवून आणण्याचे प्रमुख स्थान म्हणजे शाळा. अगदी पायाभूत स्तरापासून बदल झाला, तरच प्रत्येक विद्यार्थी योग्य दिशेने वाटचाल करण्यास सुसज्ज होईल.

### १.१०.२ पायाभूत सुविधा आणि अध्ययनाचे स्रोत :

यामध्ये नवीन कल्पनांनुसार भौतिक सुविधांचे आराखडे तयार करावेत. कशाचाही अतिरेकी वापर न होऊ देता, मुलांना सुरक्षितता देऊन, आनंद देणाऱ्या सुसज्ज सुविधा पुरवाव्यात.

अध्ययनास पूरक पायाभूत सुविधा, प्रत्येक मुलापर्यंत जायला हव्यात.

प्रत्येक मुलाकडे योग्य पद्धतीने लक्ष पुरवण्यासाठी, शिक्षक–मुले हे प्रमाण योग्य राखले जावे.

मुलाच्या क्षमता, अवधान कक्षा, मेंदूविकास या सगळ्यांचा विचार करून, मुलाच्या प्रवेशाचे वय निश्चित व्हावे. अध्ययन प्रक्रियेत कोणताही अडथळा न येता, ही प्रक्रिया आनंददायक व्हावी.

### १.१०.३ शैक्षणिक व प्रशासकीय यंत्रणा यांची भूमिका :

कोणतीही प्रक्रिया पार पाडताना, त्याची प्रमुख जबाबदारी एखाद्या व्यक्तीकडे, यंत्रणेकडे सोपवावी लागते. त्याप्रमाणेच शिक्षणक्षेत्रातही अशा जबाबदाऱ्या वाटून द्याव्या लागतात. त्यासाठी अनुभवाची

जोड असावी लागते. त्याप्रमाणेच या जबाबदाऱ्या पुढील पदांवरील व्यक्ती किंवा यंत्रणा यांच्याकडे सोपवाव्या लागतात.

१) मुख्याध्यापक

२) केंद्र व तालुका स्तरावरील शिक्षण अधिकारी (जे अनेक बाबतीत शिक्षकांना मार्गदर्शन करत असतात.)

३) शिक्षण प्रक्रियेत, गुणवत्तापूर्ण शिक्षणाची हमी देणाऱ्या योजनांची आखणी करणारी व्यक्ती आणि यंत्रणा असावी लागते.

वर दिलेल्या व्यक्ती किंवा यंत्रणा यांचा योग्य क्रम लावा. सर्वांत आधी कोण व शेवटी कोण?

### १.१०.४ पायाभूत स्तरासाठी पालक व समाजाची भूमिका

**कृती :** या मुद्द्याबद्दल जाणून घेण्यासाठी आपण दोन गट पाडू आणि दोन्ही गटांनी आपापल्या अंगणवाडीत पालक आणि समाज यांचा सहभाग घेण्यासाठी, आपण काय करता, याची यादी तयार करायची आहे. ही यादी एकत्र वाचून, आपण साधर्म्य असणाऱ्या आणि नवीन वाटणाऱ्या गोष्टी यांमध्ये विभागूया.

### १.१०.५ अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा वापर

आपल्यासाठी हे शब्द नवीन तर नक्कीच नाहीत परंतु आपण अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत याचा वापर करत आहोत का? आठवा आणि सांगा.

- मोबाइल
- संगणक

या दोन गोष्टी तर आता आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनल्या आहेत. आपण सर्वजण मोबाइलचा वापर अतिशय सफाईदारपणे करत आहात. अनेक गोष्टींचे अहवाल लेखन, आराखडे भरून देण्याचे काम तुम्ही सगळे छान करत आहात, म्हणजेच तंत्रज्ञान तुम्हांला नवीन नाही.

**प्रात्यक्षिक :**

**हे करून पाहा :**

१) पायाभूत स्तरावरील अध्ययन अनुभव देण्यासाठी, तुम्ही स्वतःची तयारी कशी कराल, ते सविस्तर स्पष्ट करा.

२) मुलांच्या शिकण्यात पालकांचा सहभाग वाढावा, यासाठी पालकांचे प्रबोधन कसे कराल, ते सविस्तर लिहा.

३) वर्गातील वातावरण आणि वर्गाबाहेरील वातावरण, यांमध्ये कोणत्या साधन साहित्याचा समावेश होतो, त्याची यादी करून वर्गात लावा, त्याचा फोटो काढा आणि पर्यवेक्षिकेला पाठवा.

---

## स्वाध्याय

१) तुमच्या गावात कोणकोणत्या भाषा बोलल्या जातात ते लिहा.

मुलांशी त्यांच्या मातृभाषेत संवाद साधला, तर ती आपण विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे समजून घेऊन देतात, याचे कारण काय असू शकते, सविस्तर लिहा.

२) तुमची अंगणवाडी आणि जवळची प्राथमिक शाळा यांचा विचार करून, तुम्हांला जाणवलेले कोणतेही पाच अध्ययन दुवे लिहा.

३) वेगवेगळ्या भाषा बोलणारी मुले वर्गात असतील, तर ती एकमेकांशी संवाद कसा साधत असतील? उदाहरणासह स्पष्ट करा. मुलांना अंगणवाडीत आल्यावर त्यांच्याच भाषेत अध्ययन अनुभव पुरवले, तर त्यांना समजते का, याविषयी सांगा, उदाहरण द्या.

४) मुलांच्या सौंदर्यदृष्टीचा विकास होण्यासाठी ५ उपक्रम/कृती लिहा.

५) 'अध्यापनशास्त्राचा पाया' ही आकृती, हस्तपुस्तिकेत पाहा आणि त्या आधारे तुम्हांला समजलेला अर्थ सविस्तर लिहा.

६) दैनंदिन वेळापत्रकात कोणत्या गोष्टी असल्या पाहिजेत, ते सविस्तर लिहा. नमुना दैनिक वेळापत्रक तयार करा व पर्यवेक्षिकेला पाठवा.

# घटकसंच २ : बालविकासाची ओळख




बालकाच्या आयुष्याची पहिली आठ वर्षे ही अत्यंत महत्त्वाची असतात. याच काळामध्ये त्याच्या भावी जीवनाची पायाभरणी होते व शारीरिक, भाषिक, बोधात्मक आणि सामाजिक–भावनिक या आयामांसह त्याचा विकास होत असतो.

व्यक्तीच्या जीवनातील इतर कोणत्याही टप्प्यातील विकासाच्या गतीपेक्षा, या आठ वर्षांच्या कालावधीमध्ये मेंदूच्या विकासाची गती ही अधिक वेगवान असते. मेंदूशास्त्रविषयक (Neuro Science) संशोधनानुसार, व्यक्तीच्या मेंदूचा ८५ टक्क्यांपेक्षा जास्त विकास वयाच्या सहाव्या वर्षापर्यंत होतो.

*(संदर्भ : राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर – २०२४ : पृष्ठ क्र. ३)*

**घटकसंचाविषयी थोडेसे....**

बालविकास हा विषय बालशिक्षणात कोणत्याही विषयाचा पाया आहे. बालविकासाचा अर्थ समजला, तरच बालशिक्षणात कोणत्या बाबी का करायच्या, कोणत्या हेतूने करायच्या किंवा ठरावीक पद्धतीनेच का करायच्या; हे समजणे सोपे जाते, म्हणूनच बालविकासाची ओळख या घटकामध्ये वाढ व विकास या संकल्पना व त्यांतील फरक, वाढीचे–विकासाचे टप्पे व वैशिष्ट्ये, बालविकासाची तत्त्वे, बालकांच्या गरजा, पंचकोश, सर्वांगीण विकास या बाबींचा अभ्यास आपण करणार आहोत.

माझ्या नोंदी :

# घटकसंच २ : बालविकासाची ओळख

## घटक क्र. २.१ : बालविकासाची ओळख

**या घटकात आपण काय शिकणार?**

२.१.१ बालविकासाचा अर्थ

२.१.२ बालविकासाच्या अभ्यासाचे महत्त्व व गरज

**प्रास्ताविक :**

बाळे आणि लहान मुले ही नेहमीच सर्वांच्या आकर्षणाचा आणि जिव्हाळ्याचा विषय असतात. लहान मुले भावी पिढीचा पायाच असतात. त्यांच्याबद्दल, त्यांच्या वैशिष्ट्यांबद्दल जाणून घेण्याची सगळ्यांनाच उत्सुकता असते. मुले मोठी होत असताना, त्यांच्यात कोणते बदल होतात, बदल होताना, शारीरिक बदल कसे होतात, मानसिक बदल कोणते होतात, वर्तन कसे परिपक्व होत जाते या गोष्टी जाणून घेणे, त्यानुसार मुलांशी कसे वागायचे हे ठरवणे सोपे जाते.

इतर सर्व विषयांप्रमाणे बालविकास या विषयाचाही इतिहास आहे. इ. स. १००० ते १५०० या काळापासून मुलांकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगवेगळ्या प्रकारे बदलत गेला. अगोदर मुलांकडे मानवाची प्रतिकृती म्हणून बघत होते, म्हणजेच लहान मूल ही एक प्रौढ व्यक्ती आहे, असेच मानले गेले होते, तर सोळाव्या शतकात मुलाला वाढवण्यासाठी कडक धोरणांचा वापर व्हायचा, म्हणजेच शिस्त लावताना कडक शिक्षा दिल्या जायच्या. सतराव्या शतकापासून मात्र शिक्षणतज्ज्ञांनी मुलांकडे बघण्याचा वेगळाच दृष्टिकोन समाजाला दिला. मुलाचे वय, विकास व त्याच्या गरजा यांचा अत्यंत जवळचा संबंध असतो, हे त्यांनी दाखवून दिले. आठराव्या शतकानंतर बालविकासाचे शास्त्र आणखी प्रगत होत गेले, त्यामध्ये अनेक संशोधने झाली आणि आजच्या युगामध्ये आपण सर्वचजण, मुलांकडे खूप वेगळ्या दृष्टिकोनातून बघू लागलो आहोत. आता आपण बालविकास या विषयाचा अभ्यास करणार, म्हणजेच ती अभ्यासाची एक स्वतंत्र शाखा आहे. चला तर माझ्याबरोबर. आपण साधारण सव्वाशे वर्षे मागे जाऊया...

### २.१.१ बालविकासाचा अर्थ

पूर्वी मुलांचा अभ्यास करताना, साधारणत: मुलाच्या जन्मापासून केला जात असे; परंतु कालांतराने असे लक्षात आले, की मातेच्या गर्भात असताना सुद्धा मुलावर परिणाम करणारे अनेक घटक असतात आणि त्यांचा परिणाम संपूर्ण आयुष्यावर झालेला दिसतो, म्हणूनच बालविकास या विषयाचा अभ्यास करताना, प्रसुतीच्या आधीच्या काळात म्हणजेच म्हणजेच प्रसूतिपूर्व काळात त्याच्या मातेची प्रकृती कशी होती?, मातेवर कोणते आघात झाले होते का?, मातेचे भावनिक वर्तन कसे होते?, मातेचा आहार कसा होता? अशा अनेक घटकांचा अभ्यास करावा लागतो,

याचे प्रमुख कारण असे असते, की प्रसूतिपूर्व काळापासून सुरू असणारा मुलांचा विकास, ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. पुढे जाऊन मुलाच्या जन्मानंतरच्या आयुष्याचाही अभ्यास करणे सोपे जाते.

बालविकास हे एक शास्त्र आहे, त्यामुळे त्याचा अभ्यास करताना, अर्थ समजावून सांगताना अभ्यासपूर्ण व्याख्या दिल्या जातात. अशीच एक सोपी व्याख्या पुढे दिली आहे.

बालविकास याचा अर्थ : 'बालविकास हे मुलाच्या वर्तनाचे व विकासाचे शास्त्र आहे.'
(राजमल देवदास – टेक्स्टबुक ऑफ चाईल्ड डेव्हलपमेंट)

बालविकास याचा अर्थ मला समजला आहे.

पायरी १) गाळलेल्या जागेत तुम्ही उत्तरे भरलीत की, तुम्हांला समजले आहे हे लक्षात येईल.

- मुलाचा विकास ............................ काळात सुरू होतो.
- बालविकास हे मुलाच्या ................. व ................. शास्त्र आहे.
- प्रसूतिपूर्व काळापासून सुरू असलेला मुलांचा विकास ही ................. प्रक्रिया आहे.
- मुलांचा विकास त्यांच्या ................. वरून समजतो.

पायरी २) नाही सापडली उत्तरे? काही हरकत नाही. वर दिलेला परिच्छेद परत एकदा वाचून बघितला, की उत्तरे नक्कीच सापडतील.

## २.१.२ बालविकासाच्या अभ्यासाचे महत्त्व व गरज :

**महत्त्व :** आता आपण शास्त्रोक्त शब्दात जाणून घेऊ.

१) मुलाची वाढ कशी होते आणि विकास कसा होतो याची माहिती होते.

२) बालविकासाचे ज्ञान असेल, तर मुलाकडे बघण्याचा दृष्टिकोन सकारात्मक होतो.

३) मुलांना समजून घेता येते.

४) मुलांबरोबर काम करण्यासाठी सहनशीलता राहते.

५) मुलांची व्यक्तिविशिष्टता जपता येते.

**गरज :** बालविकासाचे ज्ञान शिक्षकाला असणे गरजेचे आहे, कारण...

१) बालविकासाची तत्त्वे अभ्यासणे व त्याचा उपयोग मुलांकडे सकारात्मकतेने पाहणे यासाठी करणे.

२) प्रत्येक वयाची वैशिष्ट्ये समजणे आवश्यक आहे.

३) मुलाला नीट हाताळता येणे आवश्यक असते.

४) मुलाच्या भावना समजून घेणे गरजेचे असते.

५) मुले कसा विचार करतात, हे समजण्यासाठी बालविकास म्हणजे काय आणि कसा होतो हे माहीत असणे आवश्यक आहे.

६) पालकांना मदत करण्यासाठी बालविकासाचे ज्ञान असायला हवे.

**प्रात्यक्षिक :**

**हे करून पाहा :**

१) अंगणवाडीत मुलांचे निरीक्षण करत, त्यांच्या वैशिष्ट्यांच्या नोंदी ठेवायच्या आणि त्यानंतर आपण सदरच्या प्रकरणाचा जो अभ्यास केला आहे, ते प्रकरण परत वाचायचे आणि निरीक्षणे व प्रकरणात दिलेली माहिती यांचा पडताळा घ्यायचा.

२) आपण स्वतः रोज अंगणवाडीत काम करत असताना, स्वतःचे बोलणे, हालचाली, मुलांबरोबरचे आपले वागणे या प्रत्येक गोष्टीवर लक्ष ठेवायचे व स्वतःचे वागणे–बोलणे केव्हा केव्हा नकारात्मक होते, हे लक्षात, घेऊन स्वतःमध्ये बदल करण्याचा प्रयत्न चालू ठेवायचा.

## घटक क्र. २.२ : वाढ व विकास

**या घटकात आपण काय शिकणार?**

२.२.१ वाढ व विकास या शब्दांचा (संज्ञांचा) अर्थ

२.२.२ वाढ व विकास यांतील फरक

### २.२.१ वाढ व विकास या शब्दांचा (संज्ञांचा) अर्थ :

आतापर्यंत विकास आणि वाढ हे शब्द वाचनात खूप वेळा आले, ते वेगवेगळ्या अर्थाने वापरले आहेत.



**चित्र क्र. २.२.१**

**चित्र क्र. २.२.१ अ :** चित्र बघून काय लक्षात येतं आहे? चित्रात काय दिसतं आहे? बाळाला उभं राहता यायला लागलं आहे, चालता यायला लागलं आहे. हे कशामुळे होते आहे? सामान्य भाषेत आपण याला, 'बाळ मोठं झालं' असं म्हणतो, पण बालविकास या शास्त्राच्या भाषेत, यालाच बाळाची वाढ होताना दिसते आहे, असे म्हणतात. बाळ झोपलेल्या अवस्थेत होतं आणि आता उभं राहू लागलं आहे, म्हणजेच त्याचा विकास होताना किंवा त्याच्यात प्रगती होताना दिसते आहे असे म्हटले जाते. आता वाढ आणि विकास या दोन्ही संकल्पना नेमक्या कशा पद्धतीने वापरल्या जातात, ते जाणून घेतले म्हणजे बालविकास या विषयाचा पाया तयार होतो.

चला आता एक छोटे काम करू या. खाली दिलेल्या तक्त्यात आपली उत्तरे भरूया.

अंगणवाडीत आम्ही हे बालकांसाठी करतो/करत नाही. (तुमचे उत्तर रकान्यात दिलेल्या उत्तरावर बरोबरची खूण करून नोंदवा.)

| अ. क्र. | शारीरिक वाढ व विकास | आमचे उत्तर होय/नाही |
|---|---|---|
| १) | अंगणवाडीत नव्याने प्रवेश घेतल्यावर बालकाची उंची मोजली जाते. | होय/नाही |
| २) | अंगणवाडीत नव्याने प्रवेश घेतल्यावर बालकाचे वजन मोजले जाते. | होय/नाही |
| ३) | अंगणवाडीत नव्याने प्रवेश घेणाऱ्या बालकाच्या आहाराबद्दल, त्याच्या मातेकडे चौकशी करून नोंदी ठेवल्या जातात. | होय/नाही |
| ४) | जन्माच्या वेळचे बालकाचे वजन विचारून त्याची नोंद ठेवली जाते. | होय/नाही |
| ५) | बालकांच्या आजाराबद्दल नोंदी ठेवल्या जातात. | होय/नाही |
| ६) | ठरावीक कालावधीच्या अंतराने बालकाची उंची व वजन मोजले जाते. | होय/नाही |
| ७) | बालके खेळत असताना, बसलेली असताना किंवा उभी असताना, त्यांच्या शरीराची ठेवण कशी आहे, याचे निरीक्षण करून नोंद ठेवली जाते. | होय/नाही |
| ८) | बालकाच्या आहाराच्या सवयींची नोंद ठेवली जाते. | होय/नाही |

| अ. क्र. | शारीरिक वाढ व विकास | आमचे उत्तर होय/नाही |
|---|---|---|
| ९) | प्रत्येक बालकाचा डोक्याचा घेर, दंड घेर, छाती घेर मोजून नोंदी ठेवल्या जातात. | होय/नाही |
| १०) | घेतलेल्या सर्व नोंदी वाढीच्या तक्त्यावर दाखवल्या जातात. | होय/नाही |

तक्त्यात उत्तरे लिहिता लिहिता, तुमच्या लक्षात आले का, की तुम्ही बालकाची उंची, वजन, आहार यांची माहिती भरली. हे सगळे शब्द बालकाची 'वाढ' कशी होते हे सांगतात, म्हणजेच तुम्ही सगळ्या गोष्टी मोजून त्याची उत्तरे नोंदवून ठेवता.

यावरून आपण असे म्हणू शकतो का, की

- जे शारीरिक बदल मोजता येतात, त्यांना वाढ म्हणतात.
- विशिष्ट साधनांच्या साहाय्याने वाढ मोजता येते.
- वाढ झाली की, डोळ्याला दिसते उदा. उंची वाढली, वजन वाढले.
- शरीराची ठेवण आपण बघतो, तेव्हा हाडांची लांबी कळते आणि प्रमाणबद्धता कळते.

आता खालील चित्र बघून तुम्ही त्यावर तुमचे म्हणणे नोंदवा.



चित्र क्र. २.२.२




चित्र क्र. २.२.३

वरील चित्र २.२.२ बघताना मनात काय येते? झाड उंच झाले आहे. झाड मोठे झाले आहे किंवा झाड वाढले आहे. आता बाळांचे चित्र २.२.३ बघा. काय दिसते आहे? बाळ मोठे झाले आहे, बाळाची

उंची वाढली आहे. आपल्याला डोळ्याने दिसते आहे, म्हणून आपण हे म्हणू शकतो. तसेच हे बदल आपण मोजूही शकतो.

वाढ या शब्दाची व्याख्या अशी आहे, की 'शरीरात होणारे संख्यात्मक व परिमाणात्मक (मोजता येणारे) बदल म्हणजेच वाढ होय.'

**विकास :** आता विकास या शब्दाचा नेमका अर्थ जाणून घेऊया.



**चित्र क्र. २.२.४**



**चित्र क्र. २.२.५**

आता आपण विकास या शब्दाचा अर्थ जाणून घेऊ. चित्र क्र. २.२.४ ड नीट बघा. त्यामध्ये माणसाच्या शरीराची तुलना झाडाबरोबर केली आहे. जसे : झाडाच्या जमिनीखालील भागात काय घडते आणि झाडाच्या आतल्या भागात काय घडते, हे आपल्याला डोळ्यांना दिसत नाही, तसेच आपल्या शरीराचे आहे. आता दुसरे चित्र क्र. २.२.५ नीट बघा. आपल्या मेंदूत कोणत्या घडामोडी घडतात, त्या आपल्याला बाहेरून दिसत नाहीत. या सगळ्याचा अर्थ काय, ते जाणून घेणे महत्त्वाचे आहे. झाडाला घातलेले पाणी मुळापर्यंत जाते, खत मिळाले की, झाड टवटवीत दिसते, पण ही प्रक्रिया कशी घडते यातले डोळ्यांना काहीच दिसत नाही. मेंदूत काय घडते, हे पण कळत नाही, पण झोपलेल्या अवस्थेतील बाळ हळूहळू उठू लागते, रांगू लागते, उभे राहू लागते. आधी रडून भूक लागली सांगणारे बाळ 'दुदू दे' म्हणू लागते. अचानक बाळाच्या तोंडात दात दिसायला लागतात, पण हे सगळे बदल बाळाच्या शरीरावर दिसतात, तेव्हा किंवा बाळ बोलू लागल्यावरच कळतात. मग आपण म्हणतो बाळ हुशार आहे. किती बोलतंय. घरभर पळतंय, म्हणजे बाळामध्ये प्रगती दिसते. ही प्रगती म्हणजेच विकास असं म्हणतात, म्हणजेच विकास दिसून येण्यासाठी, संख्यात्मक किंवा मापनीय बदलही दिसणं गरजेचं आहे आणि शरीरांतर्गत आणि मेंदूच्या कार्यातही बदल व्हायला हवा. ते आपले गुण म्हणून पुढे येतात.

विकास म्हणजे 'शरीरात होणारे संख्यात्मक आणि गुणात्मक बदल म्हणजे विकास होय.'

## २.२.२ वाढ व विकास यांतील फरक :

आता वाढ आणि विकास म्हणजे काय हे समजले, पण ती संकल्पना अधिक स्पष्ट होण्यासाठी त्यातील फरक जाणून घ्यायला हवा.

| अ.क्र. | वाढ | विकास |
|---|---|---|
| १) | शरीरात होणारे परिमाणात्मक बदल म्हणजे 'वाढ' होय. | व्यक्तीच्या शारीरिक तसेच मानसिक व भावनिक वर्तनात होणारे बदल म्हणजे 'विकास' होय. |
| २) | उदा. उंची, वजन, दातांची संख्या | उदा. शारीरिक कौशल्ये, भाषिक विकास, दात येणे. |
| ३) | शरीराच्या आतील भाग पेशींच्या संख्येत वाढ होते, हाडांच्या लांबीत वाढ होते. | परिपक्वतेमुळे रचनात्मक व कार्यात्मक बदल होणे म्हणजे विकास. |
| ४) | वाढ मोजता येण्यासारखी असते. | विकासाचे मापन करता येत नाही, तर विकास वर्तनातून, बोलण्यातून जाणून घ्यावा लागतो. |
| ५) | वाढ ठरावीक काळानंतर थांबते. उदा. उंचीत होणारी वाढ. | विकास ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. ती थांबत नाही, पण प्रत्येक वेळी ती दिसेलच असे नाही; त्यामुळे एखादी क्रिया किंवा कृती अचानक केली जात आहे, असे वाटते. |
| ६) | वाढ नुसत्या डोळ्यांना दिसते. | विकास समजण्यासाठी वर्तनाचं, हालचालींचं, बोलण्याचं बारकाईने निरीक्षण करावे लागते. |
| ७) | वाढ होते, तेव्हा विकास होतोच असे नाही. उदा. वजन वाढते तेव्हा क्षमता वाढतातच असे नाही. | वाढ थांबली असली किंवा पूर्ण झाली असली तरी सुद्धा अनेक क्षमता विकसित होत राहतात. |
| ८) | वाढ नेहमी प्रगतीदर्शक असेलच, असे नाही. उदा. आजारामधील वाढ, जसे की, कॅन्सरची गाठ. | विकास नेहमी प्रगतीदर्शकच असतो. उदा. बालकांच्या कौशल्य आणि क्षमता विकसित होत राहतात. त्यांच्या हालचाली आणि वर्तन हे त्याचे द्योतक असते. |

## घटक क्र. २.३ : वाढीचे व विकासाचे टप्पे (अवस्था) व वैशिष्ट्ये

**या घटकात आपण काय शिकणार?**

२.३.१ वाढीचे व विकासाचे टप्पे (अवस्था)

२.३.२ वाढ व विकासाच्या प्रत्येक टप्प्यानुसार वैशिष्ट्ये

### २.३.१ वाढीचे व विकासाचे टप्पे (अवस्था)

बालविकासशास्त्राची ओळख करून घेताना, आपण कशाचा अभ्यास केला, हे तुम्हांला आठवत असेलच. त्यामध्ये आपण उल्लेख केला होता, तो बालविकासाच्या अभ्यासाचा. बाळ आईच्या गर्भात वाढत असल्यापासूनच, त्याचा अभ्यास केला जातो असे सांगितले आहे. त्याच्या जन्मानंतर डोळ्यांना दिसणाऱ्या वाढीचा आणि विकासाचा अभ्यास केला जातो असेही सांगितले आहे.

आता आपण बघणार आहोत, गर्भात असताना बाळ कोणत्या अवस्थेत असते आणि जन्मानंतर त्याच्यात वेगळे काय काय आढळते?

**वाढ व विकासाचे प्रमुख दोन टप्पे**

विकासाचे टप्पे (अवस्था)

जन्मपूर्व टप्पा (अवस्था) | जन्मोत्तर (जन्मानंतरचा) टप्पा (अवस्था)

जन्मपूर्व टप्पा

- बालकाचा विकास प्रसूतिपूर्व काळातच सुरू होतो.
- त्यामुळे जन्मपूर्व टप्पा हा विकासाचा पहिला टप्पा आहे.






जन्मोत्तर टप्पा

- प्रसूतिपूर्व काळात सुरू झालेला विकास जन्मानंतरही चालू राहतो.
- त्यामुळे जन्मोत्तर टप्पा हा विकासाचा पुढचा टप्पा आहे.

चित्र बघून लक्षात येते आहे का? चित्रात काय दिसते आहे? जन्मपूर्व टप्पा आणि जन्मोत्तर टप्पा, असे दोन भाग दिसत आहेत. विकासाचे हे प्रमुख टप्पे आहेत. जन्मपूर्व टप्प्यात गर्भ गर्भाशयात असतो, म्हणजेच तो प्रसूतिपूर्व टप्पा आहे. जन्मोत्तर टप्पा बाळाच्या जन्मानंतर सुरू होतो. त्यालाच जन्मानंतरचा किंवा जन्मोत्तर टप्पा म्हटले जाते. आपल्या जीवनचक्राचे, आपल्या वयानुसार भाग पडतात. त्या-त्या वयानुसार आपण निरनिराळ्या गोष्टी करू शकतो, यालाच विकासाचे टप्पे म्हणतात.



- बीजावस्था : गर्भधारणा ते २ आठवडे
- पेशींचा समूह तयार होतो.



- भ्रूणावस्था : २ ते ८ आठवडे
- पेशींच्या समूहापासून मानवी देह तयार होण्यास सुरुवात होते.
- सर्वांत मोठा टप्पा, कारण हृदय आणि मेंदू तयार होतो.



- गर्भावस्था : ९ आठवडे ते जन्म
- तयार झालेल्या सर्व अवयवांची वाढ होते आणि विकासही सुरु राहतो.

जन्मपूर्व अवस्थेत, गर्भाच्या वाढीचे एकूण तीन टप्पे असतात. चित्रं नीट बघा आणि नावं वाचा. त्याखाली कोणत्या प्रकारे वाढ व विकास होतो, ते दिले आहे ते वाचा. प्रसूतिपूर्व वाढ व विकासाचे महत्त्व लक्षात घ्या.


पहिल्या तीन महिन्यांत विशेष काळजी का घ्यावी लागते, ते लक्षात घ्या.

**बालविकास अभ्यासातील वाढ व विकासाचे टप्पे :**

खालील आकृतीचे नीट वाचन करा. बालविकास हा विषय माहीत करून घेत असताना, आपल्या जीवनचक्रामध्ये आपण कोणते टप्पे (अवस्था) पार करत असतो, त्याचे चित्र खाली दिले आहे, परंतु येथे सर्व टप्पे (अवस्था) दिलेले नसून, अंगणवाडीत काम करत असताना, आपल्याबरोबर असणाऱ्या वयोगटापर्यंतच्या टप्प्यांचा (अवस्थांचा) विचार केला आहे.

आपल्याबरोबर असतो तो वयोगट कोणता असतो, हे तुम्हांला नक्कीच समजले असेल. चला मग, या आकृतीचे तुम्ही केलेले वाचन बरोबर आहे का तपासू या.

**जीवनचक्रातील वाढीचे व विकासाचे टप्पे**



आपल्याबरोबर असतो तो वयोगट कोणता असतो, हे तुम्हांला नक्कीच समजले असेल. चला मग, वरील आकृतीच्या साहाय्याने खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१) आपल्याबरोबर अंगणवाडीत असणाऱ्या वयोगटाच्या टप्प्याचे नाव? ................

२) अंगणवाडीत मूल यायला लागते, त्याआधी त्याचे किती टप्पे पार पडलेले असतात? ...............

३) अंगणवाडीत पोहोचेपर्यंत, मूल ज्या टप्प्यात असते त्या टप्प्यांना महत्त्व आहे का? महत्त्व असेल, तर कोणते महत्त्व आहे? ................

### २.३.२ वाढ व विकासाच्या प्रत्येक टप्प्यानुसार वैशिष्ट्ये :

**तक्ता : विकासाच्या प्रत्येक टप्प्यानुसार वैशिष्ट्ये**

| अ.क्र. | विकासाचे टप्पे | विकासाच्या टप्प्यांची वैशिष्ट्ये |
|---|---|---|
| अ) | जन्मपूर्व टप्पा : (९ म. ९ दि./२८० दि./ ३६ ते ४० आ.) | • बीजावस्था (० ते २ आ.) – स्त्रीबीज व शुक्रपेशी एकत्रित आल्यावर, स्त्रीबीजाचे फलन होते. फलित स्त्रीबीजाला झायगोट म्हणतात.<br>• भ्रूणावस्था (२ ते ८ आ.) – या अवस्थेत गर्भाचा मेंदू, पाठीचा कणा, हृदय तयार होते.<br>• गर्भावस्था (९ आ. ते जन्म) – सर्व अवयवांची निर्मिती होते व विकास होतो. सर्व अंतर्गत संस्था कार्य करू लागतात, गर्भाच्या हालचाली सुरू होतात. |
| | | **जन्मोत्तर टप्पे** |
| १) | अर्भकावस्था | • नवजात अवस्था (० ते १५ दि.) – बाळाचा जन्म झाल्यावर त्याला वातावरणाशी जुळवून घ्यावं लागतं. त्याचं स्वतंत्र जीवन सुरू होतं.<br>• अर्भकावस्था (२ आ. ते १८ महिने) – पायाभरणीचा काळ असतो. मेंदूचा विकास वैशिष्ट्यपूर्ण रीतीने होतो.<br>• शैशवावस्था (१८ म. ते २ व.) – चालणं आणि बोलणं ही दोन प्रमुख कार्ये आत्मसात केली जातात. स्वावलंबनाकडे वाटचाल सुरू होते. मेंदूचा विकास वैशिष्ट्यपूर्ण रीतीने होतो. |
| २) | बाल्यावस्था | • पूर्वबाल्यावस्था (३ व. ते ६ व.) – सामाजिकदृष्ट्या मुलं स्वतंत्र होऊ लागतात.<br>• बालके अधिक स्वतंत्र व स्वावलंबी होतात. अनेक कौशल्यं प्राप्त होतात. मेंदूचा विकास वेगाने सुरू होतो व येणाऱ्या अनुभवांनुसार मेंदूपेशींची विशिष्ट जोडणी होऊन, मेंदूचा वैशिष्ट्यपूर्णरीतीने विकास होतो. |


आपण अभ्यास करत असलेल्या राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यानुसार, बालशिक्षणाचा विचार करताना ३ ते ६ ऐवजी मात्र ३ वर्षे ते ८ वर्षे या वयोगटाचा एकत्रित विचार केलेला आहे. बालशिक्षण अभ्यासक्रम आराखड्यात याच टप्प्याला पायाभूत स्तर असे नाव दिलेले आहे.

आता परत एकदा वर दिलेली विकास टप्प्यांची चित्रं वाचा आणि विचार करून, पुढील प्रश्नांची उत्तरे वहीत लिहा.

१) आकृतीमध्ये ६ वर्षांनंतर दिलेल्या विकास टप्प्याचे नाव काय आहे?

२) ज्या विकास टप्प्यात पुढील वयोगटाची बालके असतात, त्यांचा विचार शिक्षणाच्याबाबतीत अंगणवाडी वयोगटाबरोबर का केला असेल?

आता पुढील आकृती वाचा आणि समजून घ्या.




**राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार शैक्षणिक रचना**

पायाभूत स्तरामध्ये खास शिक्षणासाठी जीवनचक्रातील दोन टप्पे एकत्र केले आहेत. आपल्या अंगणवाडीच्या कामाचा विचार करता, आपल्याला मात्र वयोगट ३ वर्षे ते ६ वर्षे यांच्याचबरोबर काम करायचे आहे.

## प्रात्यक्षिक :

### हे करून पाहा :


१) अंगणवाडीत बालकांचे निरीक्षण करत, त्यांच्या वैशिष्ट्यांच्या नोंदी ठेवायच्या आणि त्यानंतर आपण सदरच्या प्रकरणाचा जो अभ्यास केला आहे, ते प्रकरण परत वाचायचं आणि निरीक्षणे व प्रकरणात दिलेली माहिती यांचा पडताळा घ्यायचा.

## घटक क्र. २.४ : बालविकासाची तत्त्वे

कोणतीही कृती करताना, एका ठरावीक क्रमाने करावी लागते, तरच तिचा अपेक्षित परिणाम दिसतो. मानवी विकासाची प्रक्रिया विशिष्ट क्रमाने होत असते. विकासाचे टप्पे एकमेकांशी निगडित असतात. विकासाच्या प्रक्रियेचा क्रम व आकृतिबंध ठरावीक असला, तरीही व्यक्तीनुसार व विकासाच्या अवस्थेनुसार विकासाच्या गतीमध्ये बदल होतात.

विकासाची प्रक्रिया समजण्यासाठी, विकासातील पायाभूत गोष्टी समजून घेऊन, विकासामध्ये असणाऱ्या विविधतेची कारणे समजून घ्यायला हवीत. विकासातील पायाभूत गोष्टी, म्हणजेच विकासाची तत्त्वे आहेत.

- विकास गुणात्मक असतो आणि तो सर्व पैलूंशी निगडित असतो. शारीरिक, कारक, बोधात्मक, भाषिक, भावनिक व सामाजिक यांमध्ये होणारे सर्व बदल परिपक्वतेकडे नेणारे असतात.
- **विकास ही सतत चालणारी प्रक्रिया असते :** विकास ही बदलाची प्रक्रिया असून, ती गर्भधारणेपासून मृत्यूपर्यंत सतत चालू असते. शारीरिक व मानसिक गुणधर्मांचा विकास, वाढीच्या सर्वांत वरच्या पातळीच्या मर्यादेपर्यंत, हळूहळू चालू राहतो. पुढील अवस्थेवर अगोदरच्या अवस्थेचा परिणाम होत असतो.



| अर्धपरिपक्व नवजात बालक | नवजात बालक (० ते २८ दिवस) | अर्भक आणि शिशु (२८ दिवस ते २ वर्षे) | बालक (२ ते ११ वर्षे) | किशोर (१२ ते १८ वर्षे) |
|---|---|---|---|---|

- **याशिवाय बाळाच्या वाढीच्या अजून दोन दिशा असतात.**

  **अ) मस्तकानुवर्ती क्रम :** यामध्ये विकासाच्या बदलांची दिशा डोक्यापासून पायाकडे अशा प्रकारे असते. रचनात्मक दृष्टीने, डोक्याचा व मेंदूचा विकास आधी होतो व त्यानंतर मान, धड व शरीराच्या इतर भागांचा विकास होतो.

  **ब) अक्षानुवर्ती क्रम :** विकासाची दिशा शरीराच्या मध्यभागापासून बाह्यभागाकडे असते. सुरुवातीला पाठीच्या कण्याचा विकास होतो व त्यानंतर हात व बोटांचा विकास होतो.

**विकासाच्या मस्तकानुवर्ती व अक्षानुवर्ती क्रमातील फरक**

| मस्तकानुवर्ती क्रम | अक्षानुवर्ती क्रम |
|---|---|
| डोक्यापासून पायाच्या दिशेने विकास होतो. | विकासाचा क्रम जवळ ते दूर म्हणजेच शरीराच्या मध्यभागापासून (हृदयापासून) ते बाह्यभागाकडे होतो. |
| जन्मपूर्व अवस्थेत डोके, धड व पाय या क्रमाने रचना व कार्यात सुधारणा होते. | जन्मपूर्व अवस्थेत हातांच्या कलिका विकसित होतात व त्यानंतर हात व बोटांचा विकास होतो. |
| जन्मोत्तर अवस्थेत बाळ डोक्याची हालचाल करते. | जन्मोत्तर अवस्थेत, बाळ हातांची हालचाल करायला शिकते. एकदा बाहूच्या कारक कौशल्यांचा विकास झाला, की बोटांच्याद्वारे सूक्ष्म हालचाली होतात. |

- **विकास सामान्याकडून विशिष्टाकडे होतो :**

  विकास सामान्य (साध्या) कौशल्यापासून, विशिष्ट (गुंतागुंतीच्या) कौशल्यापर्यंत होतो. उदा. बाळाला अनियंत्रित हालचाली करता येतात, परंतु विशिष्ट निर्धारित उद्दिष्टाला अनुसरून हालचाली करता येत नाहीत. बाळ अनोळखी व्यक्ती किंवा अपरिचित वस्तूला बघून, सामान्य स्वरूपाची भीतीची भावनिक प्रतिक्रिया देते. भीती ही विशिष्ट स्वरूपाची असते व रडणं, लपणं, दूर जाणं यांसारख्या प्रतिक्रिया दिल्या जातात.

- **विकासाची गती भिन्न असते :**

  विकास ही गर्भधारणेपासून मृत्यूपर्यंत सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. विकासाची गती भिन्न असते. काही अवस्थांमध्ये जलद गतीने विकास होतो, तर काही अवस्थांमध्ये धीम्या गतीने होतो. विकास कधीच एकाच गतीने होत नाही. प्रसूतिपूर्व काळात विकासाचा वेग सर्वांत जास्त असतो, पण हाच वेग प्रसूतीनंतरच्या काळात भिन्न असतो. उदा. मेंदूचा विकास अर्भकावस्थेमध्ये जलद गतीने होतो, तर लैंगिक अवयवांचा विकास होऊन, त्यामध्ये परिपक्वता येण्यासाठी, किशोरावस्था येईपर्यंत थांबावे लागते.

- **विकासामध्ये व्यक्तिभिन्नता असते :**

  विकासाचा आकृतिबंध सर्वांसाठी सारखा असला, तरीही प्रत्येक व्यक्तीच्या विकासाच्या गतीमध्ये व पातळीमध्ये ही भिन्नता दिसून येते. अनुवंश व वातावरणाच्या प्रभावामुळे, एकाच वयाची सर्व बालके विकासाच्या विशिष्ट टप्प्यावर सारख्या प्रमाणात पोहोचू शकत नाहीत. अनुवंशामुळे बालकाची क्षमता निर्धारित होते, तर वातावरणामुळे ती क्षमता किती प्रमाणात विकसित होईल याचे निर्धारण होते. उदा. काही बालके लवकर चालण्यास शिकतात, तर काही बालके उशिरा चालण्यास शिकतात. असे असले, तरी मुलाची वाढ व विकास वयानुरूप योग्य वाटत नसेल किंवा फार विलंबित असेल, तर याची नोंद घ्या व पालकांना योग्य मार्गदर्शन करा.

- **विकासाच्या निरनिराळ्या अंगांमध्ये (म्हणजेच शारीरिक, सामाजिक, भावनिक, भाषिक, बोधात्मक अशा विकासांमध्ये) परस्पर संबंध असतो. :**

  उदा. उत्तम आरोग्य असणारे बालक सामाजिक, बौद्धिकदृष्ट्या तत्पर असते.

- **विकास ही परिपक्वतेची व अध्ययनाची निष्पत्ती असते :**

  **परिपक्वता :** परिपक्वता म्हणजे जन्मतः प्राप्त गुणधर्माची नैसर्गिकरीत्या होणारी वाढ होय. विशिष्ट वयानुसार या क्षमतांमध्ये वाढ दिसून येते.

  **अध्ययन :** अनुभव व सरावामुळे वर्तनात घडून येणारा कायमस्वरूपी बदल, म्हणजे अध्ययन. सराव व प्रयत्नाचा अध्ययनावर परिणाम होतो. अनुवंशाने प्राप्त क्षमतांचा विकास, अध्ययनामुळे घडून येतो. सराव, अनुकरण व परस्पर सहसंबंध लक्षात येणे, यातून अध्ययन घडून येते.

- **परिपक्वता व अध्ययन यातील परस्पर संबंध.**

  बालकांच्या परिपक्वता व अध्ययनाचा सर्वांगीण विकासावर प्रभाव दिसून येतो. परिपक्वता या प्रक्रियेचा उपयोग अध्ययन प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी होतो. आवश्यक परिपक्वता प्राप्त झाली असेल, तरच अध्ययन परिणामकारक होते. उदा. चालणे–बोलणे शिकण्यासाठी शारीरिक परिपक्वता व योग्य सराव मिळणे आवश्यक आहे.

- **मानवजातीची उपजत कार्ये :**

  **मानवजातीची उपजत कार्ये :** सरकणे, रांगणे, बसणे, चालणे ही मानव प्राण्याची उपजत कार्ये आहेत. ही कार्ये परिपक्वतेनुसार विशिष्ट वयात आपोआप विकसित होत असतात. त्यांना प्रशिक्षणाची गरज नसते. बाह्य वातावरणातील घटकांचा त्यावर फारसा परिणाम होत नाही.

  **व्यक्तिविशिष्ट कार्ये :** पोहणे, सायकल चालवणे, नृत्य करणे ही व्यक्ती व्यक्तीनुसार बदलू शकणारी म्हणजेच व्यक्तिविशिष्ट कार्ये असून, ती प्रशिक्षणावर अवलंबून असतात. वातावरणातील

घटक, उदा. प्रशिक्षण, उपलब्ध संधी, सराव यांचा व्यक्तिविशिष्ट कार्यावर परिणाम होतो. ही कार्ये प्रशिक्षणाने विकसित होत असली, तरीही त्यासाठी विशिष्ट परिपक्वतेची पातळी गाठणे आवश्यक असते. परिपक्वतेच्या आवश्यक पातळीशिवाय प्रशिक्षणाचा उपयोग होऊ शकत नाही.

- **वर्गीकरण करा :**

  मानवजातीची उपजत कार्ये आणि व्यक्तिविशिष्ट कार्ये या दोन गटांत खालील कृतींचे वर्गीकरण करा.

  चालणे, चढणे, शास्त्रीय गायन करणे, बसणे, तबला वाजवणे, गिरगिटणे, गोलाच्या आत रंगवणे, बसणे, सरपटणे, स्मितहास्य, नाचणे.

## घटक क्र. २.५ : बालकांच्या गरजा

**या घटकात आपण काय शिकणार आहोत?**

२.५.१ बालकांच्या गरजा

२.५.२ प्रौढांची भूमिका

### २.५.१ बालकांच्या गरजा :

बालकांचे वय, विकासाची अवस्था, विकासाची पातळी यांप्रमाणे त्यांच्या गरजा वेगळ्या असतात, तसेच गरजांचे स्वरूपही वेगळे असते. यात प्रामुख्याने शारीरिक, मानसिक, भावनिक व सामाजिक गरजांचा समावेश असतो.

गरजांची वेळेवर व योग्य प्रकारे पूर्ती करणे हे पालक, काळजीवाहू व्यक्ती आणि समाजाची जबाबदारी आहे. या सर्व प्रकारच्या गरजा मुलांच्या सर्वांगीण विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात. बालकांना सभोवतालच्या वातावरणात व स्वतःला सुखकारक वाटण्यासाठी, त्यांच्या गरजांची पूर्ती वेळोवेळी होणे आवश्यक असते. लहान बालके असाहाय्य व परावलंबी असतात, त्यामुळे त्यांच्या गरजांची पूर्ती करणे मोठ्यांचे कर्तव्य ठरते. निरोगी वाढ व विकासासाठी विविध गरजांची पूर्ती हा आवश्यक घटक आहे.

| अ. क्र. | गरजांचे प्रकार | गरजा |
|---|---|---|
| १) | शारीरिक गरजा | • अन्न<br>• वस्त्र<br>• निवारा<br>• आरोग्य<br>• आजार/रोगांपासून बचाव |

| अ. क्र. | गरजांचे प्रकार | गरजा |
|---|---|---|
| २) | मानसिक व सामाजिक गरजा | • प्रेम व वात्सल्याची गरज<br>• कोणाचे तरी असण्याची गरज<br>• स्वीकृती<br>• सुरक्षितता<br>• समवयस्क गट<br>• खेळ<br>• आत्मविश्वास विकसित होणे |

**१) शारीरिक गरजा :**

शारीरिक गरजा या पायाभूत गरजा असून, मनुष्यास जीवन जगण्यास व उरलेले जीवन व्यतीत करण्यासाठी आवश्यक आहेत. वाढीच्या प्रत्येक अवस्थेत, प्रत्येक टप्प्यावर या गरजांची पूर्तता होणे आवश्यक आहे.

- **अन्न :**

  मुलाला पुरेसा, आरोग्यदायी, पौष्टिक व समतोल आहार मिळणे, ही त्याची मूलभूत गरज आहे. शारीरिक वाढीसाठी वाढत्या वयानुसार, आहाराचे प्रमाण व दर्जा यांमध्ये बदल करणे आवश्यक आहे. शारीरिक व मानसिक या दोन्हींचा वाढीवर परिणाम होतो. सुरुवातीच्या काळात आहार निकृष्ट असेल, तर शारीरिक वाढ खुंटते, शिवाय मेंदूच्या वाढीवरही परिणाम होतो.

- **वस्त्र :**

  ऋतुमानानुसार किंवा हवामानानुसार सुखकारक, आरामदायक वाटणारे कपडे आवश्यक आहेत. संरक्षण मिळवण्यासाठी योग्य कपड्यांची गरज असते.

- **निवारा :**

  निवासस्थान ही देखील मूलभूत गरज आहे. मुलांना योग्य असा सुरक्षित निवारा मिळणे आवश्यक आहे.

- **आरोग्य :**

  योग्य वाढीसाठी आरोग्यदायी सवयी, स्वच्छता, आहार, परिसर, विश्रांती व व्यायाम यांच्यात समतोल गरजेचा आहे.

- **आजारांपासून बचाव :**

  लहान वय हे संवेदनक्षम असल्यामुळे मुलांना संसर्ग, रोग, आजार होण्याची शक्यता असते त्यापासून संरक्षण, प्रतिबंध उपाय किंवा बचाव म्हणून, वैद्यकीय सल्ल्याप्रमाणे योग्य वयात लसीकरण करण्याची गरज आहे.

**२) मानसिक-सामाजिक गरजा :**

मुलांना त्यांच्या गरजपूर्तीसाठी प्रेमळ, प्रौढ व्यक्तींची गरज असते. भोवतालच्या व्यक्ती बरोबर स्थिर व सुसंगत असे नातेसंबंध प्रस्थापित करता यायला पाहिजेत. यासाठी सुरक्षितता, वात्सल्य व आत्मविश्वास यांसारख्या मानसिक, सामाजिक गरजांची पूर्तता होणे आवश्यक आहे.

- **प्रेम व वात्सल्य :**

  प्रेम व वात्सल्य मिळणे ही प्रत्येक बालकाच्या आयुष्यातील मूलभूत भावनिक गरज आहे. मुलांना प्रौढांकडून निरपेक्ष प्रेम हवे असते. सभोवतालच्या व्यक्ती प्रेमळ आहेत, समजून घेतात असा बालकाला अनुभव आला, तर त्याला सुरक्षित वाटते, मैत्रीचे नाते निर्माण होते व त्यायोगे विश्वास वाढीस लागतो. बालकांना वात्सल्याची गरज असते, ज्यातून त्यांना कळते की, ते इतरांना आवडतात व ते इतरांना हवेसे आहेत. या भावनेतूनच आपलेपणा, कोणाला तरी आपण हवे असल्याची जाणीव निर्माण होते.

- **ततभाविता : (Belongingness)**

  प्रत्येकाच्या आयुष्यात आपण कोणाचे तरी आहोत किंवा आपले कोणीतरी आहे ही महत्त्वाची स्थिती असते. आपण कोणावर तरी प्रेम करणे, आपल्यावर दुसऱ्यांनी प्रेम करणे व आपल्याला स्वीकारणे म्हणजे ततभावना होय. याची पूर्ती होणे आवश्यक असते.

- **स्वीकृती/स्वीकार : (Acceptance)**

  आपण जसे आहोत तसा आपला इतरांकडून स्वीकार होणे याची प्रत्येकास गरज असते. याचाच अर्थ मुलांचा त्यांच्या गुणदोषासह स्वीकार होणे, मुले जशी आहेत, जसे त्यांचे व्यक्तिमत्त्व आहे त्यास महत्त्व देणे, मूल्य देणे, त्यांना समजून घेऊन स्वीकारणे ही प्रत्येकाची गरज असते.

- **सुरक्षितता : (Security)**

  सभोवतालच्या व्यक्ती आपल्याला स्वीकारतात ही भावना निर्माण होणे म्हणजे सुरक्षिततेची भावना होय. जर इतरांनी आपल्याला नाकारले आहे अशी जाणीव होऊ लागली, तर मुलास असुरक्षित वाटू लागते. मुलाच्या सर्व मूलभूत गरजांची योग्य वेळी, योग्य प्रकारे पूर्तता झाली, तर त्यातूनच मुलास इतरांबद्दल व स्वतःबद्दल विश्वास वाटू लागतो व त्यातून

सुरक्षिततेची भावना निर्माण होते. सुरक्षित वाटणे म्हणजे संरक्षणाची हमी पालकांनी देणे आवश्यक असते.

- **समवयस्क/समवयीन गट : (Peer Group)**

  आपल्याच वयाच्या इतर मुलांबरोबर म्हणजेच समवयीन गटाबरोबर वाढणे ही सामाजिक गरज आहे. मुलांना मित्र असणे, त्यांच्यामध्ये बंध असणे, त्यांच्याबरोबर खेळणे, आंतरक्रिया करणे यास संधी मिळाली पाहिजे. मुलांच्या विकासात समवयस्कांचा वाटा महत्त्वाचा व मोलाचा आहे. मुले समवयस्कांबरोबर राहून इतरांचे वर्चस्व स्वीकारतात व गटाचे नियम पाळण्यास शिकतात. नेतृत्व करण्यास शिकतात व त्याचबरोबर इतरांबरोबर देवाणघेवाण, सहकार्य, अधिकारास मान्यता, गटाचे नियम पाळण्यास शिकतात.

- **खेळ/क्रीडा : (Play)**

  मुलांच्या आयुष्यात खेळामुळे अनेक गरजांची पूर्ती होते. मुलांच्या विकासाची प्रत्येक बाजू, अंग खेळाद्वारे अधिक चांगली (enhance) होते. जगाचा अनुभव घेणे, कौशल्ये आत्मसात करून सराव करणे, त्यात सुधारणा करत नैपुण्य मिळवणे इत्यादीसाठी खेळ हा एकमेव भाग आहे. विविध प्रकारच्या खेळांच्या साहित्यातून मुले हाताळण्यास, शोध घेण्यास, प्रयोग करण्यास व जिज्ञासेचे समाधान करण्यास शिकतात. वयोगटानुसार खेळण्याचा प्रकार व साहित्य बदलत जाते. बाळांना खुळखुळा, मऊ खेळणी द्यावीत, तर शालेय पूर्वअवस्थेतील मुलांना ठोकळे, कोडी इ. खेळ पुरवावे. याचबरोबर मुलांना मुक्त व उत्स्फूर्त खेळ, नाट्यात्मक खेळ, सर्जनशील खेळ व रचनात्मक खेळाचीही गरज असते.

- **आत्मविश्वास वाढविणे :**

  स्वतःवर विश्वास ठेवणे, स्वतःच्या क्षमतांवर विश्वास ठेवणे त्यामुळे आत्मविश्वास वृद्धिंगत होतो. ज्या त्या वयाला अनुसरून त्या त्या वयास योग्य अशा गोष्टी मुलांना स्वतंत्रपणे करावयास दिल्या, निर्णय घेण्यास संधी दिली तर त्यांचा आत्मविश्वास विकसित होण्यास मदत होते. उदा. शैशवावस्थेतील मुलास हाताने खाण्यास परवानगी देणे, पुढाकार घेण्यास संधी देणे इत्यादी.

### २.५.२ प्रौढांची भूमिका :

**बालकांच्या गरजांची पूर्ती करताना पालक व काळजीवाहू प्रौढांची भूमिका ही पुढील बाबतीत अत्यंत महत्त्वपूर्ण राहते.**

- मुलांचा गुणदोषांसहित स्वीकार करा.
- त्यांना निस्वार्थी प्रेम व माया द्या.

- वेगवेगळ्या अवस्थेतील गरजा ओळखून पूर्तता करा.
- योग्य मर्यादा आखून मुलांना स्वातंत्र्य द्या.
- मुलांना त्यांच्या गतीप्रमाणे वाढू द्या, पूर्वतयारी नसताना पुढच्या अवस्थेत ढकलू नका. बुद्धीला चालना देणारी विविध प्रकारची खेळणी, वस्तू, चित्रे, पुस्तके, ठोकळे इ. पुरवा.
- मुलांच्या गरजा योग्य वेळी योग्य प्रमाणात पुरवा.
- मुलांना प्रत्येक अवस्थेमध्ये विकासातर्फे कार्ये मिळवण्यास मदत करा.


## घटक क्र. २.६ : सर्वांगीण विकास आणि पंचकोश

**या घटकात आपण काय शिकणार आहोत?**

२.६.१ सर्वांगीण विकास म्हणजे काय

२.६.२ सर्वांगीण विकास आणि पंचकोश यांचा संबंध

### २.६.१ सर्वांगीण विकास म्हणजे काय :




**पंचकोश विकास**

(संदर्भ : राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर – २०२४, पृष्ठ क्र. ८)

‘आकार’ अभ्यासक्रमात जो सर्वांगीण विकासाच्या घटकांचा उल्लेख आढळतो तोच उल्लेख राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर – २०२४ मध्ये पंचकोश या नावाने केलेला आहे. मुलांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठीचे घटक आणि पंचकोश एकच असल्याचे या आकृतीवरून लक्षात येते.

### २.६.२ सर्वांगीण विकास आणि पंचकोश यांचा संबंध :

**१) शारीरिक विकास : (अन्नमय कोश, प्राणमय कोश)**

शरीर व शरीरातील अवयवांची वाढ व विकास म्हणजे, शारीरिक विकास होय. शरीराच्या आकारमानात होणारे बदल, मेंदूचा विकास, ज्ञानेंद्रियांची क्षमता वाढणे, शारीरिक प्रमाणबद्धता,

विविध शारीरिक संस्थांचे कार्य हे सर्व शारीरिक विकासाचे भाग आहेत. शारीरिक विकासाचा मुलांच्या वर्तनावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष दोन्ही प्रकारे परिणाम होत असल्याने मुलांची शारीरिक वाढ कशी होते हे समजणे आवश्यक आहे. शारीरिक वाढीचा नमुना सर्वांमध्ये एकसारखा असला तरी व्यक्तिपरत्वे वाढीचा वेग वेगळा असतो, प्रत्येक अवस्थेत वेगवेगळा असतो.

**२) कारक विकास : (अन्नमय कोश)**

कारक विकास म्हणजे, शरीरातील स्नायूंचा विकास होय. या स्थूल व सूक्ष्म स्नायूंच्या आधारानेच मूल वेगवेगळी कौशल्ये संपादन करत असते. यालाच आपण कारक कौशल्ये असे म्हणतो. कारक विकास म्हणजे, चेताकेंद्र, चेता आणि स्नायू यांच्या समन्वयाने शारीरिक हालचालींवरील नियंत्रणाचा विकास होय. या वयात शरीर लवचीक असते, त्यामुळे कौशल्ये लवकर आत्मसात केली जातात.

उदा. चमच्याने खाता येणे, घास पाचही बोटांनी तोंडात घालता येणे.

जर मूल सतत जांभया देत असेल, तर त्याचे भोजन पोटभर आणि झोप नीट झाली आहे ना याकडे लक्ष देणे. मुलांच्या शारीरिक (अन्नमय कोशाचा) विकास समजण्यासाठी केवळ वजन, उंची, रक्तातील लोहाचे प्रमाण, लसीकरण एवढे पुरेसे नाही, तर शाळेत मुलांची आजारपणामुळे अनुपस्थितीची नोंद, झोप, स्वच्छतेच्या सवयी इत्यादी अनेक गोष्टी बघण्याची गरज आहे.

**३) बोधात्मक विकास : (विज्ञानमय कोश)**

यात विविध मानसिक प्रक्रिया व बौद्धिक क्षमतांच्या विकासाचा समावेश होतो. ज्यांच्या वापराने आपल्याला सभोवतालच्या जगाचे ज्ञान होते. या प्रक्रिया म्हणजे अवधान, स्मरण, शैक्षणिक व दैनंदिन ज्ञान, विचार, समस्यापूर्ती, कल्पनाशक्ती, सर्जनशीलता इ. होय. या सर्वांसाठी आपण भाषा हे माध्यम वापरतो म्हणून भाषा विकासाचा समावेशही येथे होतो. उदा. सूचना समजून पालन करता येणे, शब्दकोडी घालता येणे, विनोद सांगता येणे.

**४) भावनिक विकास : (मनोमय कोश)**

भावनिक विकास म्हणजे, भावनांचा विकास आणि व्यक्तिगत व सामाजिक समायोजनावर त्यांचा कसा परिणाम होतो याचा अभ्यास करणे. आपल्या आयुष्यात भावनांची भूमिका खूप मोठी असल्याने भावनिक विकासाचा अभ्यास करणे गरजेचे आहे. यात सकारात्मक भावना, नकारात्मक भावना, भावनांचे प्रगटीकरण व त्यावर ताबा, भावनिक परिपक्वता यांचा अभ्यास केला जातो. उदा. अंगणवाडीत न रडता बसणे, खेळताना मारामारी न करणे.

**५) सामाजिक विकास : (मनोमय कोश)**

सामाजिक विकास म्हणजे, समाजाच्या अपेक्षेनुसार वर्तन करण्याची क्षमता संपादन करणे.

या प्रक्रियेला सामाजिकीकरण म्हणतात. सामाजिक संबंध प्रस्थापित करताना समाजमान्य पद्धतीने वर्तन करण्यास शिकणे. सामाजिक कल, दृष्टिकोन विकसित करणे हे महत्त्वाचे असते. प्रत्येक सामाजिक समूहाचे नियमन वेगळे, मूल्ये वेगळी, मान्य–अमान्य वर्तनाचे मानदंड वेगळे असतात. हे सर्व मुलांनी शिकून त्यानुसार वर्तन करावे. मुले समवयस्क, प्रौढ यांच्याशी सामाजिक संबंध कसे प्रस्थापित करायचे हे शिकतात. थोडक्यात सामाजिक विकासासाठी आवश्यक असणारी कौशल्ये शिकतात. उदा. विविध खेळ, एकत्र भोजन, क्षेत्रभेट इ.

**६) नैतिक विकास :**

सामाजिक नैतिक विकास दोन भिन्न (distinct) परंतु परस्पर संबंधित अशा टप्प्यात (phase) होतो. ते म्हणजे नैतिक वर्तनाचा विकास व नैतिक मूल्यांचा/संकल्पनांचा विकास. व्यक्ती ज्या समूहामध्ये राहतो त्या समूहाच्या मानदंडानुसार वर्तनाचा विकास म्हणजे, नैतिक विकास होय. व्यक्ती ज्या समूहातून अथवा संस्कृतीतून येतो त्याचे वर्तनासंबंधी काही नियम असतात, ज्यानुसार त्या समूहातील सदस्यांकडून तसे वर्तन अपेक्षिले जाते. नैतिकदृष्ट्या योग्य–अयोग्य, चूक–बरोबर शिकणे व त्यानुसार वर्तन करणे यांचा समावेश नैतिक विकासात होतो. उदा. सर्वांचा आदर करणे.

**(वाट पंचकोश विकासाची – डॉ. मधुश्री सावजी – यातून संकलित)**

## घटक क्र. २.७ : मुलांना समजून घेणे

**आपण या घटकात काय शिकणार आहोत**

२.७.१ मुलांना समजून घेणे

२.७.२ मुलांना समजून घेण्याच्या पद्धती

### २.७.१ मुलांना समजून घेणे :

मुलांना समजून घेणे याचा अर्थ फार पूर्वीच्या काळी मुलांचा अभ्यास करण्याचे प्रयत्न केले गेले. मुलांना वाढवताना, पालक व शिक्षक मार्गदर्शनासाठी पारंपरिक विचारांचाच उपयोग करत होते. परंतु, या अभ्यासाचे बारकावे किंवा अचूक निष्कर्ष फारसे उपलब्ध नाहीत. आपण अगोदर बालविकासाचा इतिहास वाचला होता त्यानुसार लहान मूल म्हणजे मानवाची प्रतिकृती आहे म्हणजेच मोठ्या माणसाचीच लहान प्रतिकृती असेच मानले जायचे. तोच मुद्दा येथेही ग्राह्य धरून प्रौढ व्यक्तींचाच अभ्यास केला जात असे. यातून जे निष्कर्ष निघत असत त्यावरूनच मुलांना समजून घेता येईल असाच समज होता.

परंतु कोणताही अभ्यास आणि त्याचे निष्कर्ष यासाठी गरज असते ती सुसंघटित व सुसूत्र अभ्यासाची, तरच त्यात अचूकता येऊ शकते. मुलांना समजून घेणे सोपे नाही त्यासाठी खूप बारकाव्यानिशी

निरीक्षणे व नोंदी, वर्तनाचे निरीक्षण व अभ्यास, हालचालींचा अभ्यास, मुलांच्या मौखिक प्रगटीकरणाचा अभ्यास, त्यांच्या बोलण्याचा अभ्यास करणे गरजेचे असते.

**बालशिक्षणात मुलांना समजून घेण्याचे महत्त्व लक्षात घ्यायला हवे.**

- मुलांची स्थिती माहीत करून घेता येते. म्हणजेच मूल अंगणवाडीत येते तेव्हा ते मलूल आहे का उत्साही आहे हे ओळखल्यावर मार्गदर्शन करणे सोपे जाते.
- मुलांच्या सर्वांगीण विकासास पोषक असे वातावरण पुरवता येते.
- मुलांना सामाजिक समायोजनासाठी मदत करता येते. एकदा बालकाचे वय लक्षात घेतले की त्याचे स्वाभाविक वर्तन, परिस्थितीमुळे निर्माण होणारे वर्तन लक्षात येते. यानंतर आपण त्याला योग्य प्रकारे मदत करू शकतो. उदा. एखादे मूल लाजाळू असेल, तर ते वर्तन दूर करून त्याच्यात आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावे लागतील, परंतु ते वर्तन वयानुसार स्वाभाविक आहे का कौटुंबिक पार्श्वभूमीमुळे निर्माण झालेले आहे हे जाणून मार्गदर्शन करावे लागेल.
- मुलांची अभिवृत्ती व कल जाणून मार्गदर्शन करणे सोपे जाते. म्हणजे बालकाला पुरवल्या जाणाऱ्या कृती, उपक्रम करत असताना त्याचे निरीक्षण केल्यास त्याची आवड, अभिरुची लक्षात येऊ शकते. त्यावरून पालकांना मार्गदर्शन करता येते.
- मुलाचे वर्तन समजून घेऊन मार्गदर्शन करता येते. एखादे मूल सतत घाबरलेले, भेदरलेले असेल तर त्याच्या भीतीमागची कारणे शोधून, त्याच्या भावनांच्या प्रगटीकरणांचे निरीक्षण व अभ्यास करून मदत करता येते.
- मुलांच्या मानसिक गरजा समजून घेण्यास मदत होते. अन्न, वस्त्र, निवारा या जशा महत्त्वाच्या शारीरिक व पायाभूत गरजा आहेत तशाच प्रेम, माया, वात्सल्य, प्रेरणा, प्रोत्साहन या मानसिक गरजाही महत्त्वाच्या आहेत. या गरजा भागवल्या गेल्या, तर मुले वारंवार योग्य वर्तन दर्शवतील. परिच्छेद वाचून झाला आहे आता प्रश्नाचे उत्तर देता येते का बघू.

  १) मुलांना समजून घ्यायचे म्हणजे नेमके काय करायचे असते?

  बघा हं, अंगणवाडीत येणारी मुले अशीच असतात ना?

  - कधी कधी खूप समस्यात्मक वाटतात.
  - खेळणी आणि खेळ खेळायला खूप आवडते.
  - अनेक गोष्टी मोडून-तोडून शोध घ्यायला आवडते. खूप प्रश्न विचारतात.
  - एकमेकांचे बघून काही गोष्टी करायला, प्रौढ व्यक्तींप्रमाणे वागायला खूप आवडते.

- कलेची माध्यमे हातात आली की, कोणी काही सांगितलेले करण्यापेक्षा मनाला येईल तसे करायला आवडते.

प्रारंभिक बाल्यावस्थेतील ही मुले म्हणजेच शालापूर्व अवस्थेतील मुले. त्यांच्या वयाला पालक, मानसशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ विविध नावांनी संबोधतात–समस्यात्मक वय, खेळणी खेळण्याचे वय, शालापूर्व वय, टोळीपूर्व वय, शोधात्मक वय, प्रश्नवय, अनुकरण वय, सर्जनशील वय.

त्यांचे नाव काहीही असू द्या, परंतु या वयोगटातील मुले भावनांशी अजून जुळवून घ्यायला शिकत असतात त्यामुळे अस्थिर असतात. समाजात अजून स्थिरावलेली नसतात. बोधात्मकदृष्ट्या उत्सुकतेने व कुतूहलाने भारावलेली असतात. शारीरिकदृष्ट्या आणि कारक हालचालींच्या दृष्टीने प्रचंड ऊर्जा घेऊन येतात, कौशल्य आत्मसात करण्याच्या मागे असतात.

### २.७.२ मुलांना समजून घेण्याच्या पद्धती :

मुलांना समजून घेणे किंवा जाणून घेणे सोपे नाही हे आत्तापर्यंत तुमच्या लक्षात आले असेलच. मग आपण मुलांबरोबर इतका वेळ वावरत असतो, की त्यांना हाताळताना आपल्याकडून एखादी गोष्ट चुकीची झाली, तर त्याच्यावर त्या गोष्टीचा कायमस्वरूपी विपरीत परिणाम होतो. त्यामुळे त्यांना जाणून घेण्याच्या विविध पद्धती आपल्याला माहिती पाहिजेत.

**निरीक्षण :** निरीक्षण पद्धतीमध्ये मुलाचे वर्तन जवळून, बारकाईने बघून त्याचा सर्वांगीण विकास जाणून घेता येतो.

- **निरीक्षण करण्याच्या पद्धती आहेत :**
  त्यामध्ये प्रासंगिक नोंदी, धावत्या नोंदी, कालावधी नोंदी असे प्रकार असतात.
- **गृहभेट :**
  मुलांच्या घरी भेट देऊन कौटुंबिक पार्श्वभूमी जाणून घेणे, घरातील वातावरणाचे निरीक्षण करणे, पालकांची मते जाणून घेणे यासाठी या पद्धतीचा उपयोग होतो.
- **पालकांची मुलाखत :**
  यामध्ये पालक शिक्षक आंतरक्रियेतून मुलाबद्दल जाणून घेण्याचा हेतू असतो.
- **तपाससूची/पडताळा सूची :**
  यामध्ये मुलाच्या वयोगटानुसार व विकासानुसार अध्ययन उद्दिष्टांची यादी तयार केली जाते. त्यानुसार मूल विकासाच्या कोणत्या टप्प्यात आहे हे शोधता येते.

**प्रात्यक्षिक :**

१) अंगणवाडीतील मुलांचे निरीक्षण करून त्यांच्या वैशिष्ट्यांच्या सविस्तर नोंदी लिहा.

२) अंगणवाडीतील स्वतःच्या बोलण्याचे वागण्याचे निरीक्षण करून ते केव्हा नकारात्मक झाले होते, ते लिहा. त्यात तुम्ही काय बदल केले ते लिहा.

३) तुम्हाला अंगणवाडीतील बालकांच्या वागण्यात कोणत्या योग्य किंवा अयोग्य गोष्टी जाणवल्या त्या लिहा. अयोग्य गोष्टींमध्ये योग्य बदल करण्यासाठी तुम्ही काय केले त्याची उदाहरणे लिहा.

---

## स्वाध्याय

१) बालविकासशास्त्राचा अभ्यास केल्याने अंगणवाडीच्या कामात स्वतःला फायदा होईल असे वाटते का, त्याची सविस्तर कारणे लिहा.

२) बालविकासाच्या अभ्यासाची गरज आणि महत्त्व सविस्तर स्पष्ट करा.

३) बालकांची वाढ म्हणजे काय? बालकांच्या वाढीची पाच उदाहरणे सविस्तर स्पष्ट करा.





४) बालकांचा विकास म्हणजे काय? बालविकासाची पाच उदाहरणे सविस्तर स्पष्ट करा.





५) बालकांच्या गरजांचे प्रकार लिहा. प्रत्येक प्रकाराची उदाहरणे देऊन माहिती लिहा.

# घटकसंच ३ : अंगणवाडी अभ्यासक्रमाची तत्त्वे




बालके स्वभावतःच अध्ययनार्थी असतात. बालके क्रियाशील असतात, अध्ययनास उत्सुक असतात आणि नावीन्यपूर्ण गोष्टींमध्ये रस घेऊन प्रतिसाद देतात. त्यांच्यात कुतूहलाची सहज भावना असते. बालकांकडे सभोवतालचे जग जाणून घेण्याची उत्सुकता असते. त्यांच्या आंतरिक कुतूहलातून, आश्चर्य व्यक्त करणे, प्रश्न विचारणे, शोध घेणे यांद्वारे सभोवतालची परिस्थिती जाणून घेण्याचा ते प्रयत्न करतात. कुतूहलाच्या भावनेतून कृती करताना त्यांचे शोध घेणे, शिकणे सुरू राहते.

*(संदर्भ : राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर – २०२४ : पृष्ठ क्र. ३६)*

**घटकसंचाविषयी थोडेसे....**

या घटकसंचामध्ये प्रामुख्याने अभ्यासक्रमाची तत्त्वे देण्यात आली आहेत. ही तत्त्वे समजण्यास सोपी जावीत, म्हणून अंगणवाड्यांमध्ये आतापर्यंत ज्या अभ्यासक्रमानुसार उपक्रम घेतले जातात, त्या 'आकार' अभ्यासक्रमाची उजळणी (वैशिष्ट्ये, विकासक्षेत्रे, घटक) करून घेण्यात आली आहे. त्यानंतर राज्य अभ्यासक्रम आराखडा २०२४ ची वैशिष्ट्ये, विकासक्षेत्रांनुसार द्यावयाचे अनुभव व त्यांचे महत्त्व, अभ्यासक्रमाचे घटक, अध्यापन पद्धती, उद्दिष्टे, अध्ययन निष्पत्ती, अंगणवाडीतील शिक्षण पद्धती इ. उपघटक अभ्यासणार आहोत.

## माझ्या नोंदी :

# घटकसंच ३ : अंगणवाडी अभ्यासक्रमाची तत्त्वे

## घटक क्र. ३.१ : 'आकार' अभ्यासक्रम (२०१५)

**या घटकसंचात आपण खालील उपघटकांचा विचार करणार आहोत.**

३.१ 'आकार' अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये

३.२ अभ्यासक्रम संकल्पना

३.३ अभ्यासक्रम तयार करण्याची आवश्यकता

३.४ अभ्यासक्रमाचे महत्त्व आणि तत्त्वे

बालक जन्माला आल्यापासून अनेक गोष्टी शिकत असते. ते प्रश्न विचारायला शिकते, विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे द्यायला शिकते, चित्रं काढायला शिकते, स्वत:चे कपडे स्वत: घालायला शिकते, कोलांटी उडी मारायला शिकते, या आणि इतर अनेक गोष्टी बालक कसे शिकते, याचा तुम्ही कधी विचार केला आहे का? ते आजूबाजूच्या बालकांचे बघून शिकते, की त्याला एखादी गोष्ट मुद्दाम शिकवल्यावरच शिकते? विशिष्ट हेतू मनात धरून बालकांना काही गोष्टी शिकवायच्या असतील, तर त्याचे नियोजन कसे करावे? एखादी नवीन गोष्ट शिकवण्यासाठी किती दिवस द्यावेत? असे प्रश्न अंगणवाडीत मुलांना शिकवताना तुम्हांला पडतात का?

अभ्यासक्रम या संकल्पनेशी तुमची ओळख झाल्यावर यातील अनेक प्रश्नांची उत्तरे तुम्हांला मिळतील. तुम्हांला शासनाने तयार केलेला 'आकार' हा बालशिक्षणक्रम (अभ्यासक्रम) माहीत आहेच. अभ्यासक्रम म्हणजे नेमके काय, हे समजून घेण्याआधी आपण 'आकार' मध्ये नेमके काय काय होते, यांची उजळणी करूया.

महाराष्ट्र राज्यातील विविध शिक्षण तज्ज्ञांनी एकत्र येऊन, ३ ते ६ वर्षे वयाच्या बालकांसाठी 'आकार' बालशिक्षणक्रम, म्हणजेच अभ्यासक्रम तयार केला आहे. हा अभ्यासक्रम २०१५ साली महाराष्ट्र शासनाने स्वीकारला व मार्च २०१६ मध्ये, या अभ्यासक्रमाला निपसिड, दिल्ली यांनी मान्यता दिली. 'आकार'मध्ये पुढे दिलेल्या विकासक्षेत्रांसाठी, ताईने द्यायचे अनुभव व अध्ययन निष्पत्ती यांची मांडणी करण्यात आलेली आहे. (स्रोत– आकार, २०१५)

'आकार' हा अभ्यासक्रम पूर्णपणे बालकेंद्री असून, त्यामध्ये विकासाच्या सर्व क्षेत्रांतील उपक्रम देण्यात आले आहेत. हे उपक्रम बालकाच्या विकासाच्या टप्प्यानुसार, तसेच वयाप्रमाणे ठरवण्यात आले आहेत.

### ३.१.१ 'आकार' अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये

१) **बालकेंद्री** : 'आकार' अभ्यासक्रमामध्ये, सर्व उपक्रमांची रचना मुलांच्या गरजा, आवड, क्षमता आणि विकासाचे टप्पे लक्षात घेऊन करण्यात आली आहे.

२) **कृतीद्वारा शिक्षण अनुभव** : लहान मुले कोणतीही नवीन गोष्ट जेव्हा प्रत्यक्ष करून बघतात, तेव्हाच शिकतात. त्यामुळे सर्व विकास क्षेत्रातील संकल्पना शिकवण्यासाठी व कौशल्ये विकसित करण्यासाठी, वेगवेगळ्या कृती देण्यात आल्या आहेत.

३) **आनंददायी आणि रंजक शिक्षण अनुभव** : विविध विकास क्षेत्रांसाठी दिलेल्या कृती करताना, मुलांना गंमत वाटली, आनंद मिळाला, तर त्या शिकण्यात मुलांना रस वाटतो, हे लक्षात घेऊन आकारमध्ये उपक्रमांची रचना करण्यात आली आहे.

४) **ताणरहित शिक्षण अनुभव** : कोणतीही गोष्ट शिकताना मुलाला भीती वाटली, ताण आला, तर ते शिकू शकत नाही. मुलांच्या क्षमतेपेक्षा जास्त कठीण गोष्टी त्याला शिकवायचा प्रयत्न केल्यास त्या गोष्टी मुलाला करायला जमत नाहीत व त्यांना त्यांची भीती वाटू शकते. त्यामुळे त्याच्या विकासाचा टप्पा लक्षात घेऊन, उपक्रम देण्यावर भर देण्यात आला आहे.

५) **मूल काय शिकते, यापेक्षा कसे शिकते यावर भर** : प्रत्येक मुलाच्या शिकण्याची गती निरनिराळी असते, त्यामुळे ते शिकत असताना निरीक्षण करून, त्याला कोणत्या अडचणी येत आहेत, ते नेमके कुठे अडखळत आहे, हे लक्षात घेऊन मदत करणे आवश्यक आहे, यावर 'आकार' अभ्यासक्रमामध्ये भर देण्यात आला आहे.

६) **स्पर्धेपेक्षा सहकार्यावर भर** : मुलांच्या सामाजिक-भावनिक विकासाचे महत्त्व लक्षात घेता, या वयामध्ये इतर बालकांबरोबर सहकार्यात्मक वृत्ती विकसित होणे आवश्यक असते.

'आकार' या अभ्यासक्रमामध्ये विकासात्मक क्षेत्रे, या क्षेत्रांशी संबंधित घटक, शिक्षकांनी द्यायचे उपक्रम, अपेक्षित अध्ययन निष्पत्ती, यांबरोबरच पुढील बाबींचा समावेश आहे

- बालशिक्षणाची तत्त्वे व उद्दिष्टे
- उपक्रमांचे संघटन व व्यवस्थापन
- वाढ व विकास वैशिष्ट्ये
- वर्ग व्यवस्थापन, भौतिक साधने व सुविधा
- बालसंगोपन व सर्वसमावेशन
- शिक्षक प्रशिक्षण
- मूल्यमापन

सध्या राज्यामध्ये, एकात्मिक बालविकास सेवा योजना कार्यक्रमाद्वारे चालवल्या जाणाऱ्या सर्व अंगणवाड्यांमध्ये, 'आकार' या अभ्यासक्रमानुसार बालशिक्षण देण्यात येत आहे. आता 'राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर' या दस्तऐवजामध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, 'आकार' अभ्यासक्रमातील घटकांमध्ये भर घालून, नवीन अभ्यासक्रम तयार केला आहे.

### ३.१.२ अभ्यासक्रम संकल्पना :

अभ्यासक्रमासंबंधित लेख वाचताना/ऐकताना, तुम्हांला पुढील प्रश्नांची उत्तरे शोधायची आहेत.

- दिलेल्या अभ्यासक्रमानुसार वर्गात उपक्रम घेण्याचे कोणते फायदे जाणवतात?

- पालकांना अभ्यासक्रम माहीत असल्यास, त्यांना त्यांच्या मुलासंबंधित कोणत्या गोष्टी समजतील?
- अभ्यासक्रम आखताना कोणकोणत्या गोष्टी लक्षात घेणे आवश्यक आहे?
- अभ्यासक्रमाच्या मदतीने, मुलांची प्रगती विकासाच्या टप्प्यांनुसार होते आहे का नाही, ते कशा प्रकारे समजते?

३.१ या उपघटकामधे दिलेल्या माहितीवरून, अभ्यासक्रम म्हणजे साधारण काय असते, ते तुमच्या लक्षात आले असेलच. आता अभ्यासक्रम या शब्दाचा अर्थ समजून घेऊ.

**'अभ्यासक्रम म्हणजे वयानुरूप, विकासानुरूप, क्षमतांनुरूप किंवा इयत्तांनुरूप देण्यात येणाऱ्या अध्ययनाच्या (शिकण्याच्या) अनुभवांची साखळी.'**

### ३.१.३ अभ्यासक्रम तयार करण्याची आवश्यकता :

अभ्यासक्रम पाहिल्यावर अंगणवाडी ताईला, नेमके काय, कसे आणि किती कालावधीसाठी शिकवायचे आहे, ते समजते व मुलांनाही, आपल्याला कोणत्या गोष्टी शिकायला मिळणार आहेत ते समजते. आपल्याकडे शिकायला येणारी मुले, लहान वयाची असल्यामुळे, जरी त्यांना हे समजले नाही, तरी मुलांच्या पालकांना मात्र आपली मुले काय शिकणार आहेत हे नक्की समजेल.

### ३.१.४ अभ्यासक्रमाचे महत्त्व आणि तत्त्वे :

तुम्ही अंगणवाडीच्या मुलांना सहलीला नेणार असाल, तर त्या कार्यक्रमाची आखणी कशी करता याचा विचार करा. सहलीचा कार्यक्रम ठरवताना, तुम्ही पुढील गोष्टींचा विचार करता का?

i) सहलीला कुठे जायचे? ii) कसे जायचे?

iii) किती वेळ जायचे? iv) सहलीचे ठिकाण अंगणवाडीतल्या मुलांसाठी सुरक्षित आहे ना?

v) खाऊ काय द्यायचा? vi) बालकांना बरोबर कोणत्या गोष्टी आणायला आवडतील?

आपल्याला एका दिवसाच्या सहलीचा कार्यक्रम ठरवायचा असेल, तर किती तरी मुद्द्यांचा विचार करावा लागतो; मग जर आठवड्यातले रोज तीन/साडेतीन तास, असे सुमारे वर्षभर मुलांना शिकवायचे असेल, त्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणायचा असेल, तर आपल्याला त्याची व्यवस्थित आखणी करणे नक्कीच आवश्यक आहे.

या आखणीमध्ये काय शिकवायचे, कसे शिकवायचे, कोणते साहित्य वापरायचे, एखादी गोष्ट शिकवण्यासाठी किती कालावधी लागणार आहे, विशिष्ट गोष्ट शिकवल्यावर मुलांना काय काय येणे अपेक्षित आहे, या सर्व प्रश्नांची उत्तरे आपल्याला अभ्यासक्रमामध्ये मिळतात.

थोडक्यात, अभ्यासक्रम म्हणजे, एखादा विषय किंवा संकल्पना शिकवण्यासाठी तयार केलेली रूपरेषा. सुनियोजित अभ्यासक्रमामध्ये स्थानिक पर्यावरण, संस्कृती, आवडी, क्षमता आणि गरजा

यांचा विचार केलेला असतो. अभ्यासक्रमामुळे अंगणवाडीताई आणि मुले, बालशिक्षणाचा प्रवास पद्धतशीररीत्या करू शकतात. एखादे मूल काही कारणांमुळे मागे राहत असेल, तर ते ताईंच्या लक्षात येऊ शकते, त्यामुळे त्या मुलाला योग्य वेळी मदत करणे शक्य होते. अभ्यासक्रम म्हणजे केवळ मुलांना शिकवण्याच्या विषयांची यादी नाही, तर मुलांना काय आणि कसे शिकवायचे यांची पद्धतशीररीत्या केलेली आखणी आहे.

## घटक क्र. ३.२ : विकासाची क्षेत्रे : राज्य अभ्यासक्रम आराखडा पायाभूत स्तर २०२४ प्रमाणे

**या उपघटकात आपण खालील विकासक्षेत्रांचा विचार करणार आहोत.**

३.२.१ शारीरिक विकास

३.२.२ सामाजिक, भावनिक, नैतिक विकास

३.२.३ बोधात्मक विकास

३.२.४ भाषा आणि साक्षरता विकास

३.२.५ सौंदर्यदृष्टीचा विकास

'आकार' मधील विकासक्षेत्रे आणि पायाभूत स्तरावरील अभ्यासक्रमातील विकासक्षेत्रे यांची मांडणी आपण बघितली. आता आपण या प्रत्येक विकासाच्या क्षेत्राची सविस्तर ओळख करून घेऊ.

### ३.२.१ शारीरिक विकास :

**काही महत्त्वाच्या गोष्टी :**

- शारीरिक कारक विकासात, स्थूल स्नायू, सूक्ष्म स्नायू, पंचेंद्रियांचा विकास आणि आरोग्यदायी सवयींचा समावेश होतो.
- स्थूल स्नायूंच्या हालचाली मुलांच्या विकासात खूप महत्त्वाच्या आहेत. ताकद वाढणे, दम वाढणे आणि चपळता येणे, अशा क्षमता वाढण्यासाठी, स्थूल स्नायूंच्या उपक्रमांचा उपयोग होतो. खेळातूनच सुरक्षितता आणि सावधपणा विकसित होतो, त्यामुळे वैयक्तिक सहभाग मिळेल याची काळजी घेणे आवश्यक आहे.
- सूक्ष्म स्नायू – विकास म्हणजे, हाताच्या बोटांच्या स्नायूंचा विकास. शरीराची बोटे विकसित होण्याचा वेग कमी असतो, त्यामुळे बोटांनी करण्याच्या कृतींची गरज असते. मनगट, बोटे, आणि डोळ्यांचे स्नायू, यांच्यातील ताळमेळ साधण्यासाठी, मुलांना सलग वर्षभर संधी मिळणे आवश्यक आहे.
- पंचेंद्रियांचे अनुभव मुलांच्या शिकण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. केवळ चव, वास, पोत, ध्वनी यांची ओळख होणे इतकेच अपेक्षित नाही. पंचेंद्रिये तीक्ष्ण होणे गरजेचे आहे. जितके

चांगले ऐकून मुले आवाजाचे भेद ओळखतील, तितकेच चांगले ते पुढे शब्दांतील भेद ओळखू शकतील.

- आरोग्यदायी सवयी लागण्याच्या दृष्टीने, लहान वय महत्त्वाचे असते. या वयात लागलेल्या सवयी दीर्घकाळ टिकतात, पण या सवयी लागण्यासाठी, वातावरण मिळणे गरजेचे असते. आपल्याला मुलांबरोबरच पालकांनादेखील या सवयींचे महत्त्व पटवून देणे गरजेचे आहे. आहाराच्या सवयीदेखील या वयासाठी महत्त्वाच्या आहेत. कसे खावे, काय खावे याची जाणीव मुलांना या वयात करून देणे आवश्यक आहे.
- मुलांना त्यांच्या वयानुसार वेगवेगळ्या उपक्रमांची संधी मिळाली पाहिजे.

### ३.२.२ सामाजिक, भावनिक, नैतिक विकास :

'बालवाडी किंवा अंगणवाडीतील प्रवेश' हा बालकांच्या सामाजिक विकासाचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. घरात सगळ्यांच्यासाठी केंद्रबिंदू असणारे बालक, आपल्यासारख्या अनेक बालकांच्या सहवासात ठरावीक वेळ घालवू लागते. वर्गात सगळे जरी एकाच वयोगटाचे असले, तरी प्रत्येकाचे सामाजिक अनुभव वेगवेगळे असतात. मुलांच्या भावनिक सामाजिक विकासाबाबत काही महत्त्वाच्या गोष्टी खालीलप्रमाणे :

- या वयातील मुलांच्या भावना तीव्र असतात.
- त्यांना त्या व्यक्त करण्यासाठी मोकळीक मिळणे गरजेचे आहे.
- गाणी म्हणणे, धावपळीचे खेळ खेळणे, कलानुभव या सगळ्यांतून मुलांच्या भावना मोकळ्या होतात.
- अंगणवाडीतील उपक्रमांतून मुलांचा सामाजिक विकास होण्यास मदत होते.
- एकटी खेळणारी मुले, हळूहळू गटात खेळता खेळता, छोटे छोटे नियम शिकू शकतात.
- इतरांमध्ये मिसळून खेळणे, काही गोष्टी वाटून घेणे आणि वापरणे, आपल्या जागेची, खेळण्यांची काळजी घेणे, अशा क्षमतांचा विकास होण्यासाठी अंगणवाडीतील वातावरणाची मदत होते.

### ३.२.३ बोधात्मक विकास :

**बोधात्मक विकासाबाबत काही महत्त्वाच्या गोष्टी पाहूया :** मुलांचा विकास व्हावा, हे बालशाळेचे मुख्य उद्दिष्ट असते, पण औपचारिक शिक्षणाकडे नेताना, मुलांची हीच प्रक्रिया सहज घडावी, हाही मुख्य हेतू आपण लक्षात घेणे गरजेचे आहे. मूल भोवतालच्या जगाची ओळख करून घेताना, पंचेंद्रियांचा वापर करत असते. पंचेंद्रियांमुळे मुले ज्ञान मिळवतात आणि म्हणूनच बालशाळेत मुलांना इंद्रियशिक्षण देणे गरजेचे आहे. प्रत्यक्ष अनुभवांतून मुले जास्त चांगल्या पद्धतीने शिकतात.

बोधात्मक विकासाची खालील परिणाम क्षेत्रे आहेत. यासाठी आपण कोणकोणत्या उपक्रमांचे आयोजन वर्गात करू शकतो, याची काही उदाहरणे बघूया. त्यासाठी आवश्यक बाबी व साहित्याची यादीदेखील पुढे दिली आहे. बोधात्मक विकासाच्या क्षेत्रांबद्दल अधिक माहिती समजून घेण्यासाठी, याबाबतचा व्हिडिओ पाहूया.

**१) विचार करायला शिकणे :**

- ठोकळे, चित्रांचा डॉमिनोसेट, पपेट इत्यादी साहित्य घेऊन गोलात गप्पा मारणे, जोड्या लावणे, एखाद्या प्रसंगावर मुलांना विचार करायला सांगून त्यावर गप्पा मारणे. जसे आपल्याला बागेत खेळायला जायचे आहे, तर काय काय वस्तू बरोबर घेऊन जाऊया?
- एखाद्या अर्धवट चित्रात काय कमी आहे ते सांगणे.
- प्रश्न विचारायला सांगणे.

अशा बाबींमधून विचार करायला शिकण्यास मदत करता येते.

**२) स्मरणशक्ती :**

- ध्वनी ओळखणे, विविध वास, चवी, स्पर्शपाट्या, चित्र गप्पा, अनुभव कथन

**३) समस्या सोडवणे/कार्यकारण भाव :**

- पझल्स, जोड-तोड खेळणी, ठोकळे, बाहुलीघर, रचना करणे, मातीकाम, गोष्टी.
- जोड्या लावणे, खोट्या नोटा, जुनी पर्स.
- बालकांना गप्पांमधून कारणे विचारावी. जर तू अंगणवाडीत येताना पावसात भिजलास, तर काय करशील?
- एखादे अपूर्ण चित्र पूर्ण करायला देणे.
- चित्र दाखवून गप्पा मारताना, कोण काय म्हणत असेल, काका कुठे चालले असतील अशा प्रकारचे प्रश्न विचारणे.

**४) कल्पनाशक्ती :**

- बाहुलीघर, फळांची मॉडेल्स, फोन, खेळण्यातले प्राणी, पपेट्स, भातुकली, कागदांचे तुकडे.
- वस्तू वापरून रचना करणे
- गाणी-गोष्टी

**५) संकल्पना निर्मिती :**

- चित्रवाचन, गोष्टी, अनौपचारिक गप्पा
- माहिती देणे.
- चित्र दाखवून त्याची माहिती देणे.
- अवकाशीय संबंध : उदा. फळ्यावर घर आणि खेळण्यातील गाडी यांची चित्रे काढणे.

**६) निर्णय घेणे :**

- रोजच्या दिनक्रमामध्ये मुलांना निर्णय घेण्याची संधी देणे. उदा. तुला या दोन्हींपैकी कोणते कपडे घालायला आवडतील?
- ३-४ कोपरे मांडल्यास त्यातील कोणता खेळ खेळायचा आहे, हा निर्णय घेण्याची मुलाला संधी देणे.

### ३.२.४ भाषा आणि साक्षरता विकास :

**काही महत्त्वाच्या गोष्टी :**

- भाषा ही केवळ विचार आणि भावना व्यक्त करण्याचे साधन नसून, ते विचार करण्याचे व भावनांचा अनुभव घेण्याचेही साधन आहे. श्रवण आणि संभाषण ही भाषा शिक्षणात महत्त्वाची कौशल्ये मानली गेली आहेत.

  **१) भाषा ग्रहण करणे :** बोलीभाषेचे आकलन होणे, म्हणजेच भाषेचे ग्रहण होणे. व्यक्त होण्याच्या आधीची ही पायरी असते. बोललेल्या भाषेचा अर्थ मुलाला समजतो, पण प्रतिसाद देताना काही शब्द मूल वापरू शकते आणि बाकी संभाषण आपल्या भावविश्वातील शब्द वापरून करते.

  **२) भाषा व्यक्त करणे :** आपल्याला भावना, गरजा, विचार, आपल्या कल्पना, हे सगळे व्यक्त करण्यासाठी शब्द, वाक्य, हावभाव आणि कधीतरी लिखित स्वरूप, या सगळ्यांची जोड लागते. यातूनच आपण संभाषण क्रिया साधू शकतो.

- भाषा साक्षरतेमधील सर्व घटक-उदयोन्मुख साक्षरता, मजकूर समृद्ध वातावरण, सहभागी वाचन, सहभागी लेखन, प्रकटवाचन, लिपीपरिचय हे आपण मोड्यूल ६ मध्ये सविस्तर बघणार आहोत.

### ३.२.५ सौंदर्यदृष्टीचा विकास :

**काही महत्त्वाच्या गोष्टी :**

- कलानुभवाला मुलांच्या जीवनात महत्त्व आहे. मुलांना काहीतरी नवीन करावेसे वाटत असते आणि नवनिर्मितीची क्षमता त्यांच्यामध्ये असते आणि म्हणूनच मुलांच्या कलानुभवाला वाव

देऊया. विशेष गरजा असणाऱ्या बालकांना देखील कलेच्या माध्यमातून अभिव्यक्त होण्याची संधी देऊया.

- सौंदर्यदृष्टीतील गुणविशेष म्हणजेच रेखीवपणा, सुबकपणा, रंगसंगती समजण्यासाठी कलानुभवाचा उपयोग होतो.
- मुलांनी स्वतः या कृती केल्यामुळे मुले स्वावलंबी होतात, त्यांचे सूक्ष्म स्नायू विकसित होतात, याशिवाय यातून आनंदही मिळतो.
- कलानुभवाच्या कृती करताना मुलांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळतो आणि सौंदर्यदृष्टी तयार होते.
- कलानुभवातून काय साध्य होते, याचे उपक्रम कोणते, ताईची भूमिका काय, हे व्हिडिओमधून सविस्तर जाणून घेऊ.

## घटक क्र. ३.३ : अभ्यासक्रमाचे घटक

**या उपघटकात आपण खालील विकासक्षेत्रांचा विचार करणार आहोत.**


३.३.१ उद्दिष्टे

३.३.२ अध्यापन पद्धती

३.३.३ नियोजन आणि वर्गव्यवस्था

३.३.४ मूल्यांकन

अभ्यासक्रमानुसार अंगणवाडी चालवणे म्हणजे मुलांबरोबर नुसते उपक्रम घेणे असे नाही, तर विशिष्ट उपक्रम घेतल्यावर, मुलांच्या कोणत्या क्षमता विकसित होणे अपेक्षित आहे, तो उपक्रम कोणत्या पद्धतीने घेणार, उपक्रम घेण्यासाठी कोणती तयारी करायला हवी, शिकवलेली संकल्पना मुलांना समजली का नाही ते कसे तपासणार, या सर्व गोष्टींचा समावेश अभ्यासक्रमामध्ये होतो.



### ३.३.१ उद्दिष्टे :

उद्दिष्टे म्हणजे, ठरावीक कालावधीच्या शेवटी बालकाला कोणती कौशल्ये व क्षमता प्राप्त होणे अपेक्षित आहे, या बद्दल केलेली विधाने. आता पुढील वाक्ये वाचून पाहा –

- जेवण झाल्यावर बालकाला स्वत:चे हात कोणाच्याही मदतीशिवाय धुता येणे.
- आकारमानाप्रमाणे ५ वस्तू क्रमाने लावता येणे.
- गोष्ट ऐकल्यावर ती स्व–लिपीमध्ये लिहिता येणे.

**उद्दिष्टे दोन प्रकारची असतात** : दीर्घकालीन आणि अल्पकालीन

| दीर्घकालीन उद्दिष्टांची वैशिष्ट्ये | अल्पकालीन उद्दिष्टांची वैशिष्ट्ये |
|---|---|
| व्यापक स्वरूपाची | नेमकी |
| कालावधी : १ वर्ष किंवा ६ महिने | कालावधी : १ महिना/१ आठवडा/१ दिवस |
| दीर्घकालीन उद्दिष्टे छोट्या अल्पकालीन उद्दिष्टांमध्ये विभागलेली असतात. | एकमेकांशी संबंधित अनेक अल्पकालीन उद्दिष्टे मिळून दीर्घकालीन उद्दिष्ट तयार होते. |
| मोठ्या कालावधीच्या शेवटी, बालकांनी काय साध्य करायचे आहे ते स्पष्ट होते. | कमी कालावधीसाठी विशिष्ट संकल्पना, कौशल्ये किंवा मूल्ये यांना समान कालावधी देणे शक्य होते. |
| | ठरवलेल्या कालावधीमध्ये, अल्पकालीन उद्दिष्ट साध्य झाले नाही, तर कालावधी आवश्यकतेप्रमाणे काही दिवस/महिने असा वाढवावा लागतो. |

दीर्घकालीन उद्दिष्टे विकासाच्या प्रत्येक क्षेत्रासाठी ठरवली जातात.

उदा : प्रौढ व्यक्तींशी संवाद साधणे, हे दीर्घकालीन उद्दिष्ट असेल, तर त्यासाठी परिचित व्यक्तींनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे, परिचित व्यक्तींशी स्वत:हून संवाद साधणे, अपरिचित व्यक्तींच्या सहवासामध्ये पालक किंवा कुटुंबातील व्यक्तींच्याशिवाय सहजपणे राहणे, अपरिचित व्यक्तींनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे, अशा प्रकारची अल्पकालीन उद्दिष्टे असू शकतात.

बालकांचे सातत्याने मूल्यमापन करत राहावे, त्यामुळे बालकांना उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी नेमकी कोणती जास्तीची मदत किंवा अनुभव देण्याची आवश्यकता आहे, हे समजते.

**लक्षात ठेवा :** जरी अल्पकालीन उद्दिष्ट मुलांनी साध्य केले, तरी त्यांना अधूनमधून आधी शिकलेल्या संकल्पना व कौशल्ये यांचा सराव द्यावा. त्यामुळे शिकलेल्या संकल्पना कायम लक्षात राहतात व अधिक दृढ होतात.

## अध्ययन निष्पत्ती :

अभ्यासक्रमाची मांडणी विविध प्रकारे केली जाते. काही अभ्यासक्रमांमध्ये उद्दिष्ट न देता, अध्ययन निष्पत्ती दिल्या जातात. अध्ययन निष्पत्ती म्हणजे, एखादे सत्र, कोर्स, अभ्यासक्रम शिकल्यानंतर विद्यार्थ्यांमधील मापनयोग्य (मोजता येईल असे) कौशल्य, क्षमता, ज्ञान किंवा मूल्य. अध्ययन निष्पत्ती ही विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून लिहिली जाते, म्हणजे विशिष्ट अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर त्या विद्यार्थ्याला काय करता येईल, याचा विचार यात केलेला असतो.

**अध्ययन निष्पत्तीची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे** :

१) **नेमकेपणा** : दिलेल्या अध्ययन निष्पत्तीतून, विद्यार्थ्याला काय करता येणे अपेक्षित आहे, ते नेमकेपणाने दिलेले असते, म्हणजे बालक इतरांबरोबर बोलते असे नुसते न म्हणता, बालक आजूबाजूच्या परिचित लोकांबरोबर संभाषण करते; रोजच्या शालेय प्रसंगांमध्ये समवयस्कांबरोबर व शिक्षकांबरोबर संभाषण सुरू करते; घटना, प्रसंग, गोष्ट किंवा त्यांच्या गरजा यांच्याशी संबंधित संभाषणात सहभागी होते आणि प्रश्न विचारते अशा प्रकारे नेमकी मांडणी केलेली असते

‘आकार अभ्यासक्रम आणि पायाभूत स्तरांसाठी असलेल्या राज्य अभ्यासक्रम आराखड्यामध्ये अध्ययन निष्पत्तींच्या आधारे अभ्यासक्रमाची मांडणी केली आहे.

२) **मोजण्याजोग्या** : बालकाला एखादी गोष्ट शिकवल्यावर, त्याचे वर्तन, आकलन या बाबी मापन करण्याजोग्या असणे आवश्यक आहे.

राज्य अभ्यासक्रम आरखड्यामध्ये, विकासाच्या सर्व क्षेत्रातील क्षमतांसाठी अध्ययन निष्पत्ती देण्यात आल्या आहेत.

उदा : ३ ‘सुदृढ आणि लवचीक शरीर’ विकसित होते.

**C-3.1 : अध्ययन निष्पत्ती** — **तक्ता – १३**

**C-3.1 : विशिष्ट कृती करताना, ज्ञानेंद्रियांच्या संवेदना व शारीरिक हालचाली यांत समन्वय दर्शवतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • चेंडू पकडणे, फेकणे आणि चेंडू लाथेने उडवणे (kick) या कृती नियंत्रितपणे करतो. | • मोठा चेंडू झेलणे, फेकणे आणि लाथेने वेगाने चेंडू पुढे उडवणे या कृती जोर लावून करू शकतो.<br>• चेंडू जवळच्या लक्ष्यावर काही प्रमाणात अचूकतने फेकतो. | • वेगवेगळ्या आकारांचे चेंडू झेलणे, फेकणे आणि लाथेने उडवणे या कृतींमध्ये सुधारणा करतो. | • एखादा खेळ, स्पर्धा इ. प्रसंगांमध्ये चेंडू झेलणे, पकडणे आणि लाथेने उडवणे. (kicking Balls) या कृती सहजतेने करतो. | |

### ३.३.२ अध्यापन पद्धती :

**अ) अध्यापन पद्धती पार्श्वभूमी :** आपण अंगणवाडीत पूर्वशालेय शिक्षण पूर्वीपासून देत आलो आहोत. हे शिक्षण देणे का गरजेचे आहे? याचा इतिहास काय? याबद्दल थोडीशी चर्चा करूया. केवळ खाऊ, गाणी, गोष्टी याकरता अंगणवाडीत मुलांना आणायचे नाही, तर पहिलीत जायच्या आधी त्यांच्या सर्व विकास क्षेत्रांना चालना देणारे उपक्रम त्यांना मिळणे महत्त्वाचे आहे. ते जर झाले, तर मुले पुढे उत्तम शिकू शकतात. हा एक खूप मोठा अभ्यास आहे. अनेक विचारवंतांनी जगातल्या वेगवेगळ्या देशात मोठी कामे करून, सहा वर्षांच्या आतल्या मुलांचा अभ्यासक्रम काय असावा, याबद्दल जे प्रयोग केले, ते सिद्ध झाले आणि आता आपल्या देशाच्या नवीन अभ्यासक्रमात त्यांचा समावेश झाला आहे. सगळ्यांनी एक गोष्ट अगदी ठासून सांगितली; ती म्हणजे, मुलांना 'कसे' शिकवायचे. यात अगदी एकमताने असे मांडले गेले आहे, की पहिली पासून जे खडू-फळा, वह्या, पुस्तके वापरून लेखन वाचन शिकवले जाते, तसे सहा वर्षांच्या आतील मुलांना शिकवू नये. त्यांना शिकवण्याची पद्धत, त्यांच्या वयोगटाशी अगदी मिळती जुळती पाहिजे. ती कोणती हे आपण पाहूया.

जगभरात सहा वर्षांखालच्या मुलांच्या शिक्षणाला इतके महत्त्व होते, की त्याच्याबद्दल खूप संशोधन झाले. अगदी थोडक्यात आपण काही मुख्य शिक्षणतज्ज्ञ आणि त्यांनी दिलेले योगदान पाहूया, म्हणजे आपल्याला तीन ते सहा वयोगटाच्या अभ्यासक्रमाचा इतिहास समजेल.

थोडक्यात माहिती खालच्या तक्त्यात दिली आहे

| वर्ष | शिक्षणतज्ज्ञ / शासन | बालशिक्षणाचा नमुना / शाळाप्रकार |
|---|---|---|
| १८३७ | फ्रोबेल | किंडरगार्टन (KG) |
| १९०७ | माँटेसरी | कासा द बांबिनी (मुलांचे घर) |
| १९२० | गिजुभाई बधेका | बालक मंदिर |
| १९३६ | ताराबाई मोडक | शिशुविहार |
| १९४० | लॉरिस मालागुझी | रेजिओ इमिलीया |
| १९४५ | ताराबाई मोडक | बालवाडी |
| १९५७ | ताराबाई मोडक | अंगणवाडी |
| १९६५ | अमेरिकन सरकार | हेडस्टार्ट प्रोग्राम |
| १९७० | डेव्हिड वैकार्ट | हाय स्कोप शिक्षणक्रम |
| १९७५ | भारत सरकार | एकात्मिक बालविकास योजना |

| वर्ष | शिक्षणतज्ज्ञ/शासन | बालशिक्षणाचा नमुना/शाळाप्रकार |
|---|---|---|
| २०१५ | (ICDS) महाराष्ट्र राज्य | आकार शिक्षणक्रम |
| २०२० | भारत सरकार (MHRD) | राष्ट्रीय शिक्षण धोरण |
| २०२३ | NCERT, नवी दिल्ली | राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर |
| २०२४ | SCERT, महाराष्ट्र | राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर |

आपल्या असे लक्षात येईल, की गेले शतक आपण सहा वर्षांच्या आतील मुलांना, अनुभवांतून शिकायला मिळावे याकरता, पालक, शिक्षक आणि सरकारी पातळीवर जागृती करत आहोत. पहिली सहा वर्षे शिकायचे कसे असते, याकरता असतात, त्यामुळे प्रत्येक अभ्यासक्रमाचे हे कर्तव्य आहे, की मुलांना भरपूर अनुभव मिळत राहावेत.

**ब) अंगणवाडीतील शिक्षणपद्धती :** तुम्ही दहावीत असताना कसे शिकलात, आठवतंय का? सगळे कसे आखीव होते. ठरावीकच धडे सगळ्यांना, सर्व विषयांत शिकावे लागले होते. ती होती औपचारिक पद्धत आणि आपल्या अंगणवाडीत असते, ती अनौपचारिक पद्धत. दोन्हींतील फरक समजून घेऊ.

**औपचारिक पद्धत** :

१) मुलांशी बोलताना ठरावीक भाषेचा, त्यातील शब्दांचा वापर करतात, कारण मुलांना ती भाषा समजते असे गृहीत धरले जाते.

२) मुलांनी ठरावीक वेळात, ठरलेला अभ्यास पूर्ण करावा, अशी अपेक्षा असते.

३) काय चुकले, काय बरोबर, याचे निकष ठरलेले असतात, त्यामुळे त्यावरून मुलांचे मूल्यमापन केले जाते.

४) वाचून अनेक गोष्टी समजाव्यात अशी रचना असते.

५) अनुभवाने शिकण्याचे प्रमाण कमी असते किंवा काही विषयांपुरते मर्यादित असते.

**अनौपचारिक पद्धत :**

१) मुलांच्या बोली भाषेत, त्यांना समजेल अशा पद्धतीने बोलले जाते.

२) मुलांना त्यांच्या आवडीप्रमाणे उपक्रम करता येतात, उपक्रम करण्याबाबत वेळेचे बंधन नसते.

३) मूल कसे शिकते यावर जास्त भर असतो, बरोबर उत्तर येण्याचा आग्रह नसतो.

४) मुलांची शिकण्याची प्रक्रिया, विचार करण्याची प्रक्रिया जास्त महत्त्वाची असते.

५) अनुभवाने शिकण्यावर जास्तीत जास्त भर असतो.

### अंगणवाडीत कोणत्या पद्धतीने शिक्षण अपेक्षित आहे?

वरील प्रकारांच्या अभ्यासावरून आपल्या असे लक्षात येईल, की अनुभवातून शिकणे हे आपल्या संकल्पना स्पष्ट करण्यासाठी अधिक उपयुक्त आहे. सहा वर्षांपर्यंतच्या मुलांची वैशिष्ट्ये देखील आपण बघितली आहेत. यावरून मुलांबरोबर काम करताना, आपल्याला अनुभवाधारित शिक्षण प्रकाराचा वापर प्रभावीपणे करायला शिकत राहायचे आहे.

### अंगणवाडीत अनौपचारिक पद्धत कशी वापरायची?

आता आपण अंगणवाडीतील अभ्यासक्रमात प्रामुख्याने ही प्रकल्प पद्धत वापरली गेली आहे, जी त्याबाबत माहिती करून घेऊ.

### प्रकल्प पद्धत :

जन्मापासून ते तीन वर्षांपर्यंत, मुलांना त्यांच्या आजूबाजूच्या परिसरात अनेक गोष्टी दिसतात, जाणवतात आणि त्यांचे काही प्रमाणात अर्थ समजतात. काय असते बरे त्यांच्या आजूबाजूला? झाडे, प्राणी, पक्षी, भाज्या, फुले, शेत, इमारती, वाहने अशी अनेक उदाहरणे देता येतील. या सर्वांना मुलांचे अनुभव विश्व म्हणता येईल. एकीकडे बालविकासाचे शास्त्र मुलांच्या सर्व विकासाच्या बाबतीत महत्त्वाची माहिती उलगडून दाखवत होते आणि आपण जर 'आकार' चे वार्षिक वेळापत्रक पाहिले, तर आपल्याला ते प्रकल्प पद्धतीने मांडलेले दिसेल. प्रत्येक महिन्यासाठी एक विषय जसे, जून महिन्यात पाणी आणि पाऊस, याप्रमाणे विषय ठरवून, त्या प्रमाणे मुलांना रोजचे ८ ते ९ उपक्रम अनुभवायला दिले, म्हणजे मुलांची उत्सुकता पण पूर्ण होईल आणि प्रत्येक विकासाला पण चालना मिळेल. चला आपण एक महिन्याचे 'आकार' मधील वेळापत्रक बघू या.

**ब. ३ विकास क्षेत्रांनुसार वार्षिक नियोजन पद्धत :** बालविकासाची सर्व क्षेत्रे तुम्हांला माहिती आहेतच. त्या प्रत्येक क्षेत्राच्या विकासाचे वार्षिक नियोजन तयार करता येते. काही बालवाड्या या प्रकारचे नियोजन करतात. ते कसे?

**चला एक उदाहरण बघू :** स्थूल स्नायू विकास घेऊ. यात खालील क्षमतांचा विकास अपेक्षित आहे

- हाताचे, खांद्यांचे स्नायू
- पायांचे, गुडघ्यांचे स्नायू
- पावलांचे स्नायू
- कंबर, पाठ, मान यांचे स्नायू

प्रत्येक स्नायूच्या विकासाबरोबर प्रत्येक स्नायूचे इतर स्नायूंबरोबर समन्वय असणे देखील गरजेचे आहे, त्यामुळे ३ ते ४ वयोगटातील मुलांच्या वार्षिक नियोजनात वर्षभर मुलांसाठी विविध उपक्रमांचे नियोजन करायचे. एक उदाहरण बघूया..

| स्थूल कारक विकास | जून | जुलै | सप्टेंबर | ऑक्टोबर | नोव्हेंबर |
|---|---|---|---|---|---|
| पायांचे, गुडघ्यांचे स्नायू | एका जागेवर उड्या मारणे | पुढे, मागे उड्या मारणे | रांगत जाणे | लांब ढांगा टाकत चालणे. | सशाच्या उड्या मारणे. |
| | | | | | |

अशा प्रकारे वार्षिक नियोजन करून, त्यानुसार महिन्याचे आणि आठवड्याचे नियोजन करता येते.

एकंदरीत असे म्हणता येईल, की बालविकासाने आपल्याला मुलांच्या विकासाचे जे टप्पे दिलेत, त्यावरून प्रत्येक वयोगटाच्या मुलांना, त्यांच्या सर्वांगीण विकासाच्या क्षमता विकसित करायला संधी मिळायला पाहिजेत, हे स्पष्ट आहे. या क्षमता विकसित करण्यासाठी, आपल्याला जे अनुभव द्यायचे आहेत, त्यांना उपक्रम म्हणूया आणि हे सगळे उपक्रम ज्या नियोजनात बसतात, त्याला म्हणूया अंगणवाडीचा अभ्यासक्रम!

### ३.३.३ नियोजन आणि वर्गव्यवस्था :

मुलांच्या क्षमता विकसित होण्यासाठी, अभ्यासक्रमाचे नियोजन आणि वर्ग व्यवस्थापन हे घटक महत्त्वाचे आहेत. नियोजनामध्ये केवळ वार्षिक नियोजन करणे पुरेसे नसते, तर त्याचबरोबर मासिक व दैनंदिन नियोजन करणे आवश्यक असते. पूर्वबाल्यावस्थेतील गरजा लक्षात घेऊन, अंगणवाडीमध्ये सकारात्मक वर्ग वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे, त्याचबरोबर अंगणवाडी ज्या ठिकाणी आहे, तिथले सामाजिक वातावरणही तितकेच महत्त्वाचे आहे. वर्ग वातावरण जितके समृद्ध व वैविध्यपूर्ण असेल, तितकी मुले अंगणवाडीमध्ये रमतात व त्यांना अंगणवाडीमध्ये येण्याची आवड निर्माण होते. अंगणवाडीचे व्यवस्थापन करताना, रचना व उपक्रम यांचे व्यवस्थापन करणे अपेक्षित आहे. अभ्यासक्रम नियोजन व व्यवस्थापनेमध्ये, वेळेचे व्यवस्थापन, साहित्याचे व्यवस्थापन, मनुष्यबळाचे व्यवस्थापन आणि वर्ग व्यवस्थापन या घटकांचा विचार अंगणवाडी ताईने करायचा आहे. त्याचबरोबर अंगणवाडीमध्ये ठेवाव्या लागणाऱ्या नोंदी व रजिस्टर यांसाठी जो वेळ द्यावा लागतो, त्याचेही व्यवस्थापन योग्य पद्धतीने करणे गरजेचे असते. या सर्व घटकांचे व्यवस्थापन योग्यरीत्या झाले, तरच अभ्यासक्रम अंमलबजावणी मध्ये सुसूत्रता येते.

(वर्ग व्यवस्थापन व वर्ग व्यवस्थापनाशी संबंधित असणाऱ्या विविध घटकांचे व्यवस्थापन सविस्तरीत्या आपण घटकसंच 'सात' मध्ये अभ्यासणार आहोत.)

### ३.३.४ मूल्यांकन :

अध्ययन–अध्यापन प्रक्रियेमधील एक महत्त्वाचा घटक म्हणजे मूल्यांकन. कोणत्याही अभ्यासक्रमाची प्रथम उद्दिष्टे निश्चित केली जातात. ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, अध्यापनाद्वारे अध्ययन अनुभव दिले जातात. मूल्यांकनाच्या साधनांच्या साहाय्याने, बालकांचे अध्ययन तपासले जाते, त्यामुळे बालकांचे अध्ययन, तसेच बालशिक्षण कार्यक्रम योग्य पद्धतीने चालला आहे का नाही, ते समजते. बालकांची अध्ययन निष्पत्ती विकासाच्या टप्प्यांनुसार आहे का नाही, हे समजण्याबरोबरच त्यांना कोणत्या विकास क्षेत्रामध्ये अधिक मदतीची गरज आहे, ते देखील समजते. मूल्यांकनासाठी निरीक्षण, प्रासंगिक नोंद, पडताळा सूची, घटना नमुना, संचयिका (पोर्टफोलिओ) यांसारखी विविध साधने वापरणे शक्य आहे.

मूल्यांकनाद्वारे बालकाच्या प्रगतीची माहिती शिक्षक व पालक या दोघांनाही मिळते. सातत्यपूर्ण मूल्यांकनातून प्राप्त माहितीचा उपयोग करून, शिक्षक बालकांसाठी अध्ययन अनुभवांचे नियोजन आणि आयोजन करतात. मूल्यांकनाची रचना, ही प्रत्येक बालकाचा विचार करून केली जाते. प्रत्येक बालक वेगळे असते व त्याची शिकण्याची गती देखील वेगवेगळी असते. मूल्यांकनावरून प्राप्त होणाऱ्या निष्कर्षांवरून, बालकाची प्रगती ओळखण्यास मदत होते. त्या माहितीच्या आधारे शिक्षक बालकांना अतिरिक्त मार्गदर्शन करू शकतात.

(मूल्यांकन व त्यामधील विविध महत्त्वाच्या घटकांचा सहभाग यांविषयी सविस्तर माहिती आपण घटकसंच 'दहा' मध्ये अभ्यासणार आहोत.)

**प्रात्यक्षिक :**

१) मुलांच्याबरोबर दोन शारीरिक विकासासाठीचे खेळ घ्या. त्याची कृती लिहा. खेळाचा फोटो जोडा.

२) मुलांमध्ये स्वावलंबन विकसित करता यावे, म्हणून तुम्ही अंगणवाडीत विविध उपक्रम घ्या. त्यांचे फोटो पर्यवेक्षिकेला पाठवा. दोन उपक्रमांची माहिती सविस्तर लिहा.

३) मुलांच्या सौंदर्यदृष्टीचा विकास होण्यासाठी, तुम्ही तुमच्या अंगणवाडीत उपक्रम घ्या. त्यांचे फोटो पर्यवेक्षिकेला पाठवा. दोन उपक्रमांची माहिती सविस्तर लिहा.

---

## स्वाध्याय

१) अभ्यासक्रम म्हणजे काय? अभ्यासक्रम तयार करण्याची आवश्यकता सविस्तर स्पष्ट करा.

२) अंगणवाडीतील मुलांच्या विकासाची कोणतीही पाच क्षेत्रे स्पष्ट करा.

३) शारीरिक विकास म्हणजे काय, ते विविध उदाहरणे देऊन स्पष्ट करा. (किमान पाच उदाहरणे)

४) सामाजिक व भावनिक विकास म्हणजे काय, ते विविध उदाहरणे देऊन सविस्तर स्पष्ट करा.

५) बोधात्मक विकास ही संकल्पना विविध उदाहरणे देऊन स्पष्ट करा.

६) भाषा आणि साक्षरता विकास म्हणजे काय? भाषा व साक्षरता विकासासाठी कोणते उपक्रम योजाल?

७) सौंदर्यदृष्टीचा विकास ही संकल्पना विविध उदाहरणे देऊन लिहा.

# घटकसंच ४ : अध्ययन-अध्यापनशास्त्र




बालके कृती आणि खेळातून सर्वोत्तमरीत्या शिकतात. बालकांना धावणे, उड्या मारणे, रांगणे आणि तोल सांभाळणे आवडते. ते पुनरावृत्तीचा आनंद घेतात. ते लयीला उत्स्फूर्त प्रतिसाद देतात. ते बोलतात, विचारतात आणि ते तर्क करतात, तसेच त्यांना विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देतात. शोध, प्रयोग व कृती यांचा समावेश असलेल्या प्रत्यक्ष अनुभवांद्वारे ते शिकतात.

साहित्य, कल्पना, विचार आणि भावना यांच्या माध्यमातून बालकांची सर्जनशीलता, लवचीक विचार आणि समस्या सोडवण्याच्या क्षमता विकसित होण्यास मदत होते. त्यामुळे एकाग्रता, लक्ष आणि चिकाटी वाढते. वास्तविक परिस्थितीची पुनर्रचना अथवा काल्पनिक जगाची निर्मिती करताना, बालके त्यांचे विचार, शब्दसंग्रह, कल्पनाशक्ती, संभाषण व श्रवण कौशल्य खेळाद्वारे विकसित करतात.

*(संदर्भ : राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर – २०२४ : पृष्ठ क्र. ३६)*

**घटकसंचाविषयी थोडेसे....**

बालकांचे शिकणे आनंददायी होण्यासाठी, बालशाळेतील वातावरण ताणरहित असणे आवश्यक असते. हे ताणरहित वातावरण निर्माण करण्यासाठी, कोणते घटक लक्षात घ्यावेत, याची माहिती या घटकामध्ये मिळणार आहे. बालशाळेतील सुरक्षित, प्रेरक व सौहार्दपूर्ण वातावरण, वर्गातील आणि वर्गाबाहेरचे भौतिक वातावरण, खेळाचे कोपरे, अध्ययनाच्या गरजा, अध्ययन प्रक्रिया, अध्ययनाच्या पायऱ्या, म्हणजेच पंचपदी, विविध अध्यापन पद्धती, बालविकासातील गोष्टी, संभाषण, संगीत, कलानुभव यांचे बालविकासातील स्थान, बालशाळेमध्ये दिले जाणारे विविध कलानुभव हे उपघटक आपण यात अभ्यासणार आहोत.

## माझ्या नोंदी :

# घटकसंच ४ : अध्ययन-अध्यापनशास्त्र

**या घटकात आपण खालील उपघटकांचा विचार करणार आहोत :**

४.१ अंगणवाडीतील सुरक्षित, प्रेरक व सौहार्दपूर्ण वातावरण
४.२ अध्ययनाच्या गरजा
४.३ अध्ययन प्रक्रिया
४.४ अध्यापन पद्धती–खेळाद्वारे अध्ययन

## घटक क्र. ४.१ : अंगणवाडीतील सुरक्षित, प्रेरक व सौहार्दपूर्ण वातावरण

लहान मूल कृतिशील, कल्पक व स्वतःचे स्वतः शिकण्यास सक्षम असते. मोठ्या माणसांच्या मदतीने आजूबाजूच्या परिसराचा अनुभव घेऊन, विविध गोष्टी व पदार्थ हाताळून, मुले आपल्या ज्ञानाची रचना करीत असतात. अंगणवाडीत त्यांना शिकण्यासाठी प्रेरणादायी व तणावमुक्त वातावरण उपलब्ध करून देणे व त्यांच्या शिकण्याच्या प्रक्रियेला हातभार लावणे, हे अंगणवाडी सेविकेचे महत्त्वाचे काम आहे. सुरक्षित वातावरण हा मुलांचा हक्क आहे.

सुरक्षित वातावरण म्हणजे, असे वातावरण, की जेथे मुलांना शारीरिक, मानसिक अथवा भावनिकदृष्ट्या इजा पोहोचणार नाही.

प्रेरक वातावरण म्हणजे, असे वातावरण, की जेथे मुलांना अनेक गोष्टी व साहित्य हाताळून आणि इतर मुलांशी व शिक्षकांशी बोलून शिकता येते.

सौहार्दपूर्ण वातावरण म्हणजे, मैत्रीपूर्ण वातावरण, जेथे मुले न घाबरता बोलू शकतील आणि प्रश्न विचारू शकतील.

**या घटकात आपण काय शिकणार आहोत?**

- अंगणवाडीत सुरक्षित, प्रेरक व सौहार्दपूर्ण वातावरण कसे निर्माण करावे?
- अंगणवाडीत अशा वातावरणाची काय गरज आहे?

**अंगणवाडीच्या वातावरणाचे भाग :** अंगणवाडीच्या वातावरणाचे दोन प्रमुख भाग आहेत.

१) भौतिक वातावरण  २) सामाजिक वातावरण

**१) अंगणवाडीतील भौतिक वातावरण** :

अंगणवाडीतील भौतिक वातावरणाचे दोन भाग आहेत.

१) वर्गाबाहेरील वातावरण  २) वर्गातील वातावरण

**१) वर्गाबाहेरील वातावरण :** वर्गाबाहेरील वातावरणात खेळाचे मैदान व परिसराचा अंतर्भाव होतो. अंगणवाडीचा परिसर स्वच्छ असावा. शेजारी उघडे गटार किंवा रहदारीचा रस्ता

नसावा. खेळण्यासाठी छोटे का होईना, मैदान असावे. ते सपाट हवे. त्यातील काही भागावर तरी सावली हवी.

पिण्याच्या पाण्यासाठी पिंप, फिल्टर किंवा नळ असावा. बालकांना सहज वापरता येईल, असे लहान आकाराचे शौचालय असावे. त्यात पाण्याची सोय असावी.

मुलांना खेळण्यासाठी वाळू तसेच काही सुस्थितीतील झोपाळा व घसरगुंडीसारखी खेळणी असावीत.

प्रश्न : तुमच्या अंगणवाडीत वरीलपैकी कोणकोणत्या सुविधा उपलब्ध आहेत?

**२) वर्गातील वातावरण :**

- वर्गात आवश्यक तेवढेच फर्निचर असावे. ते गरजेनुसार हलवता यावे. शक्यतो बाक नसावेत; जेणेकरून मुलांना वर्गात मोकळेपणाने हालचाल करता येईल. विशेष गरजा असणाऱ्या बालकांना वर्गात सुलभतेने वावरता येईल, यासाठी आवश्यक सुविधा असाव्यात.
- भिंतीवर प्रकल्पाला अनुसरून, गाण्यांचे व चित्रांचे तक्ते असावेत. भिंतीवर मुलांचे काम (चित्रे, स्व–लिपीतील लेखन इ.) असावे. पूर्ण भिंत भरून चित्रे अथवा तक्ते नसावीत, कारण त्यामुळे मुलांचा गोंधळ होतो.
- वर्गात खेळांचे कोपरे असावेत. खेळांचे कोपरे म्हणजे काय आणि ते का व कसे मांडायचे हे महत्त्वाचे असल्याने, त्याबद्दल आपण विस्ताराने पाहू.

**खेळांचे कोपरे म्हणजे काय?**

खेळांचे कोपरे म्हणजे अशा जागा की, जेथे मुलांना रस वाटेल असे साहित्य मांडलेले असते व जेथे मुले लहान लहान गटात शिक्षकांच्या मदतीशिवाय खेळू शकतात.

**खेळाचे कोपरे का मांडावेत?**

१) खेळाच्या कोपऱ्यात मुले विविध पदार्थ व वस्तू हाताळत नवीन शिकत असतात व मनात संकल्पना तयार करत असतात.

२) मुलांना वर्गात हालचाल करण्याचे स्वातंत्र्य मिळते. दिवसभर गोलात किंवा एकत्र बसून राहण्यापेक्षा, ३–४ खेळांच्या कोपऱ्यात जाऊन खेळ खेळल्याने त्यांना कंटाळा येत नाही, उलट अंगणवाडीत रोज येण्याची प्रेरणा मिळते.

३) कुठल्या कोपऱ्यात जाऊन कुणाबरोबर काय व कसे खेळावे, किती वेळ खेळावे हे मुलांचे निर्णय असल्याने, मुले स्वयंनिर्णय करायला शिकतात व आपल्या निर्णयाच्या परिणामांची जबाबदारी घ्यायला शिकतात.

४) गटात खेळल्याने मुले समवयस्कांबरोबर वाटून घेणे, आपले म्हणणे मांडणे, इतरांचे ऐकून घेणे, सहकार्य करणे, आपली पाळी येईपर्यंत थांबणे, इत्यादी महत्त्वाची सामाजिक कौशल्ये शिकतात.

५) खेळाच्या कोपऱ्यात मुले आपल्या मातृभाषेत बोलतात. एकमेकांशी होणाऱ्या संवादातून मुलांचा भाषा विकास होतो.

६) या कोपऱ्यांमध्ये मुले आपापल्या गतीने खेळतात, नव्याने मिळवलेल्या विविध कौशल्यांचा सराव करतात आणि नव्याने मिळवलेल्या संकल्पना दृढ करतात.

**खेळाचे कोपरे कसे मांडावेत?**

**अ) अंगणवाडीची वर्ग रचना** :

१) ठोकळे, भातुकली, कला, पुस्तकालय, विज्ञान असे खुली निष्पत्ती असणारे कोपरे, वर्गात रोज मांडलेले हवे. त्या व्यतिरिक्त गणित व भाषेचे कोपरे मांडावेत. खुली निष्पत्ती असणारे कोपरे म्हणजे; असे कोपरे, की ज्यात कोणत्याही कृतीचे एक आणि एकच उत्तर नसते, तर अनेक उत्तरे असू शकतात; जसे, रंगीत दगड आणि काड्या मांडलेल्या कोपऱ्यात, काही मुले एखादी रचना करतील, (लॉली पॉप वगैरे) तर काही त्यांचे गट करतील.

२) कोपरे मांडताना तेथे साहित्य नुसतेच टोपलीत भरून न ठेवता, नीट मांडून ठेवावे.

३) ज्या कोपऱ्यात खेळताना आवाज होतो, असे कोपरे शक्यतो पुस्तकालयापासून दूर असावेत.

**ब) अंगणवाडीच्या वातावरणातील सामाजिक घटक** :

अंगणवाडीतील वातावरण निर्मळ, सौहार्दपूर्ण व बालविकासास आणि मुलांच्या शिकण्यासाठी पोषक असे हवे. त्यासाठी सेविकेने काही गोष्टी जरूर करायला हव्यात, तर काही गोष्टी कटाक्षाने टाळायला हव्यात.

**क) सौहार्दपूर्ण वर्गवातावरणासाठी गृहभाषेचे महत्त्व :**

राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० मध्ये आणि राज्य अभ्यासक्रम आराखडा–पायाभूत स्तर २०२४ मध्ये, गृहभाषेचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

अंगणवाडीत मुलांना आपल्या गृहभाषेत बोलण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य असावे. मुलांची गृहभाषा परिसर भाषेपेक्षा वेगळी असल्यास, अंगणवाडी सेविकेने मुलांच्या भाषेतील निदान काही शब्द शिकून घ्यावेत व वापरावेत. गृहभाषा स्वीकारल्याने मुलांचा आत्मसन्मान वाढतो. गृहभाषेच्या शाळेतील वापराने मुले तणावमुक्त होतात, कारण

आपली गृहभाषा त्यांना चांगली येत असते, त्यामुळे त्या भाषेत ती स्वतःला व्यक्त करू शकतात, तसेच सेविकेने ती भाषा वापरल्यास त्यांना वर्गातील सूचना समजतात.

**ड) प्रेरक वातावरण निर्मितीसाठी अंगणवाडी सेविकेने काय करायला हवे?**

अंगणवाडी सेविकेने मुलांच्या आवडीनिवडी व गरजा लक्षात घेऊन, ठोकळे, रंगीत खडू, कागद, शाडूमाती, पुस्तके, पझल्स, वर्गीकरणाचे खेळ, शिवणपाटी, मॅचिंगचे पत्ते इत्यादी खेळ वर्गात उपलब्ध करावेत.

निसर्गात आढळणारे बिया, खडे, चिंचोके, वाळू, पाने, गुंजा, तसेच परिसरात सहज उपलब्ध होणारे बटणे, लोकर, दोरे, आईस्क्रिमच्या काड्या इत्यादी साहित्य मुबलकपणे उपलब्ध करून द्यावे.

या साहित्याशी खेळताना मुले शिकत असतात, जसे की दोन रंग मिसळले, की तिसरा रंग मिळतो, ओल्या मातीला हवा तसा आकार देता येतो. खाली मोठा ठोकळा ठेवला, तर उंच मनोरा बांधता येतो इत्यादी.

मुलांना खेळाची निवड करण्याचे व खेळाबद्दल काय, कसे, किती वेळ व कुणाबरोबर खेळायचे हे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य द्यावे. मुले खेळत असताना, त्यांचे निरीक्षण करून, त्यांचे शिकणे व विचारप्रक्रिया अभ्यासाव्यात. मुलांनी काढलेली चित्रे व त्यांचे स्व–लिपीतील लेखन आळीपाळीने फलकावर लावावे.

## घटक क्र. ४.२ : अध्ययनाच्या गरजा

लहान वयात मुलांना शिकण्यासाठी काय काय लागते, याचा जर विचार केला, तर आपल्या असे लक्षात येईल, की काही विशिष्ट गरजा पूर्ण केल्या तर मुलांचे शिकणे अधिक अर्थपूर्ण होते. या भागात आपण हा प्रयत्न करूया, मुलांच्या गरजा नीट समजून घेऊ, म्हणजे आपले त्यांच्याशी वागणे, त्यांच्याशी खेळणे, त्यांच्यासाठी वर्गात मांडणी करणे, सगळे अर्थपूर्ण होईल.

१) **प्रत्यक्ष सहभागाची गरज :** आपल्याला हे माहीत आहे, की सहा वर्षांच्या आतील मुले, ही चौकस असतात, त्यांना सतत काहीतरी करून बघायचे असते, खूप खेळायचे असते आणि बोलायचे असते. आपण कधीही विचारले, की 'कोण बरे येणार आधी उडी मारायला', तर जवळ जवळ निम्मा वर्ग तयार असतो. असा प्रचंड उत्साह, उर्मी असलेल्या मुलांना समजून घेणे गरजेचे असते. आपण जर काही गोष्टी नीट लक्षात ठेवल्या, तर वर्गातील वातावरण, मुलांना द्यायचे अनुभव यांची नीट आखणी आपण करू शकतो.

मुलांचे शिकणे खेळातून होते, हे तुम्ही वारंवार ऐकले असेल, अनुभवलेही असेल. आपण अंगणवाडीत सतत खेळातून शिकण्याची संधी देतो; ते का बरे, कारण खेळताना आपण

संपूर्ण सहभागी असतो. आपले लक्ष, आपल्या हालचाली, आपले बोलणे, सगळे कसे एका लयीत असते. अगदी असेच शिकताना घडायला हवे म्हणूनच, येथून पुढे कधीही मुलांना काहीही शिकायचे असले, तर त्यात त्यांचा संपूर्ण सहभाग असायला हवा, असे आपले सतत प्रयत्न असायला हवेत. आता संपूर्ण सहभाग, म्हणजे एकेका मुलाला शिकवायचे का? मग मुले इतरांना कशी शिकू देतील असे प्रश्न पडणे अगदी साहजिकच आहे. सहभागातून शिकणे म्हणजे, विविध कृतींमध्ये सहभागी होऊन शिकणे. आपण जर प्रत्येक संकल्पना शिकवायला मुलांना काय काय करायला देऊया असा विचार केला, की हे आपल्याला सहज जमेल.

२) **स्वत:हून निर्णय घेण्याची गरज :** मुलांना आपण अंगणवाडीत निर्णय घ्यायला शिकवू शकतो का? इतक्या लहान वयात कोणते निर्णय घ्यायचे असतात बरे? चला, बघूया आपल्याला काय काय करता येणार आहे. जेव्हा निवडीचे स्वातंत्र्य मिळते, तेव्हा निर्णय घेता यायला लागतो. आपण नाही का साडी खरेदी करताना तीन–चार साड्या बघतो, हात लावून स्पर्श करतो, रंग आपल्यावर कसा दिसतो, हे बघतो आणि मग ठरवतो कोणती साडी घ्यायची? तसेच वर्ग मांडलेला असेल, विविध साधने ठेवलेली असतील, तर मुलांना निवड करण्याची संधी मिळते आणि काय आधी खेळायचे ते मुले ठरवू शकतात, तसेच साधनांनी खेळतांना सुद्‌धा मुलांची निर्णय घेण्याची क्षमता वाढीस लागते.

३) **समवयस्कांसोबत खेळण्याची गरज :** मुले तर दिवसभर खेळतच असतात. मग ठरवून, अंगणवाडीत खेळायला दिल्याने, असे काय होणार आहे? बघूया बरे, काय होते असे अनुभव दिल्याने?

खेळ हेच मुलांचे रोजचे महत्त्वाचे काम आहे. तुम्ही बघितले असेल, मुले मुक्त खेळात ठोकळे खेळताना एकमेकांच्या कल्पना ऐकत, मिळून काम करतात आणि काहीतरी कल्पक वस्तू, रचना इ. बनवतात. आपल्याला जे दिसत नाही, ते मुलांच्या कल्पनेतून सहज निर्माण होत असते.

४) **व्यक्त होण्याची गरज :** मुलांना रोज कितीतरी गोष्टी दिसत असतात, जाणवत असतात, प्रश्न पडत असतात. अंगणवाडीत जर त्यांना वाव मिळाला, तर ती जे जे जाणवले, ते ते विविध मार्गांनी व्यक्त करू शकतील. हे मुलांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. एक तर आपल्याला जे वाटते, ते सांगायचे असते, याची जाणीव याच वयात व्हायला हवी, म्हणजे मुले त्यांच्या मनातले मोकळेपणाने व्यक्त करतील; नाहीतर उगाच भीड बाळगून बसतील.

पण असे प्रत्येक मुलाला विचारत बसायचे का? तसा वेळ असतो का? तर आपल्या अंगणवाडीत फरशीवर खडू आहेत, मुले मनसोक्त रेघोट्या मारत आहेत, माती/कणीक अशा गोष्टी मांडल्या आहेत, मुले त्याच्यावर थापत आहेत, मुलांना बागेत/हिरवळीवर सुरक्षितपणे धावता, लोळता

येत आहे, मुले खळीचे रंगकाम करताना हाताने पसरवण्यावर रमली आहेत, ताईंच्या हातातील पपेटशी गप्पा मारत आहेत, ओढणीचे पंख लावून बागडत आहेत, असे चित्र जर नियमितपणे दिसत असेल, तर मुले अतिशय मोकळ्या वातावरणात आहेत आणि ती त्यांच्या मनातील भाव व्यक्त करत आहेत असे म्हणता येईल. मुलांनी काढलेली चित्रे जर समजून घेतली, तर त्यातूनही मुले काय व्यक्त होत आहेत हे समजण्यास मदत होते. मुळात स्वत:ला जे वाटते, ते व्यक्त करायची संधी मिळत राहणे, ही एक मूलभूत गरज आहे.

**५) आश्वासक, प्रतिसादात्मक नातेसंबंधांची गरज :**

तुम्ही कधी हा खेळ खेळला आहात किंवा बघितला आहे का? यात दोन खेळाडू एकमेकांकडे सतत ते फूल टोलवत असतात, तसेच मुलांना देखील साद आणि प्रतिसाद यांचा अनुभव गरजेचा असतो. मूल आपल्याला अनेक संकेत देत असते, ज्यातून आपल्याला त्यांच्या आवडी, त्यांना काय करावेसे वाटते हे समजत असते. जसे, मुले कधी न बोलता फक्त आपल्या अवतीभोवती फिरतात, तेव्हा त्यांना काहीतरी सांगायचे असते, पण धीर होत नसतो किंवा आपण दाखवत असलेली एखादी वस्तू मुले बघायची टाळतात. कदाचित त्यांना त्याची भीती वाटत असते. अशा छोट्या गोष्टी टिपल्या, तर मुलांना आपण योग्य प्रतिसाद देऊ शकतो. जर आपण त्याला योग्य प्रतिसाद दिला, तर मुलांना आपल्याविषयी एक विश्वास निर्माण होतो आणि तीही आपले बोलणे, सांगणे नीट ऐकू लागतात. अंगणवाडीत आपल्याला असे अनेक उपक्रम घ्यायचे आहेत, ज्यात मुलांना आपल्याला प्रतिसाद देता येईल. मुलांना आपल्यासोबत प्रसन्न वाटले पाहिजे, ही अगदी साधी पण खूप महत्त्वाची गरज आहे. यामुळे मुलांना अंगणवाडीत येण्याची गोडी लागते. आपण मुलांशी गोडीने बोलतो, त्यांच्यासाठी खूप उपक्रम मांडतो, त्यांच्याकडे लक्ष देऊन त्यांचे म्हणणे ऐकतो असे वातावरण जर मुलांना अंगणवाडीत मिळाले, तर त्याचा खूप फायदा होतो. त्यांना शिकण्याची आवड लागते, अंगणवाडीविषयी आत्मीयता निर्माण होते आणि पहिलीत जाताना ती निर्धास्तपणे नवीन शाळेत जाऊ शकतात.

आपण जर पाहिले, तर बालविकासाची सर्व क्षेत्रे, आपल्याला मुलांच्या त्या त्या विकासाच्या विशिष्ट गरजा उलगडून दाखवतात. यावरच तर अध्ययन क्षमता ठरवल्या जातात.

**मुलांना देण्याच्या अनुभवांची निवड आणि आपला स्थानिक परिसर :**

आपल्याकडे मुले २ ते ३ वर्षे असतात. या काळात त्यांच्या संकल्पना विकसित करणे गरजेचे आहे. त्याकरता आपण आता कटाक्षाने दिवसभरातील उपक्रमांचे नियोजन करणार आहोत, मुलांना भरपूर अनुभव देणार आहोत. हे सगळे करत असताना, एका गोष्टीचे भान मात्र पाळायला पाहिजे. ते म्हणजे, अंगणवाडीत आपण जी बालशिक्षणाची सेवा पुरवत आहोत, ती अत्यंत महत्त्वाची आहे. मात्र हे लक्षात ठेवूया की सेवा पुरवताना आपल्या अंगणवाडीत जी

परिस्थिती आहे, त्याचा विचार आपण प्रामुख्याने करायचा आहे. आपल्या परिसरात काय मिळते, कधी मिळते, कधी कोणत्या गोष्टी घडतात; ज्यातून मुलांना नवीन अनुभव मिळतील, याकडे आपले लक्ष असले पाहिजे. याने मुलांना त्यांच्या अनुभव विश्वातून शिकता येते हे महत्त्वाचे आहे. लहान वयात गरजा भागलेली मुले, पुढील आयुष्यात समाधानी राहतात, आनंदी मनोवृत्तीची होतात असे म्हटले जाते. आपण देखील अंगणवाडीत मुलांच्या गरजांचा सन्मान करूया.

## घटक क्र. ४.३ : अध्ययन प्रक्रिया

आजवर आपण अंगणवाडीत अनेक उपक्रम घेतले असतील. त्यासाठी तयारी करावी लागते, हे देखील आपल्याला माहीत आहे. आता आपण हीच तयारी अधिक प्रभावी कशी करता येईल ते पाहूया. नवीन अभ्यासक्रमात काही विशिष्ट पायऱ्या असलेली, नियोजनाची एक पद्धत दिली आहे. त्याची आकृती नीट पाहून घ्या, म्हणजे प्रत्येक पायरीचे उपक्रम कसकसे निर्माण करता येतील, ते आपल्याला समजेल. ही पद्धत, मेंदू कसा शिकतो यावरून तयार झालेली आहे. संकल्पना तयार होताना मदत करण्यासाठी आता आपल्याला ही पद्धत उपयोगी पडेल.

### अध्ययनाची पंचपदी

**पाच पायऱ्यांची अध्ययन प्रक्रिया – 'पंचपदी' ही अध्ययन-अध्यापनाचे नियोजन करताना कोणता क्रम अनुसरावा, यासाठी एक चांगली मार्गदर्शिका आहे.**




**आकृती ४.३ : पंचपदी – पाच पायऱ्यांची अध्ययन प्रक्रिया**

१) **अधिती (परिचय) :** कोणतीही संकल्पना शिकवायची ही सुरुवात आहे. या पायरीवरचे उपक्रम मुलांना त्या संकल्पनेबाबत काय माहीत आहे हे जाणून घेण्यासाठी असतात. येथे आपण माहिती द्यायची नसते. कधी कधी काही मुलांना संकल्पनेबाबत बरीच माहिती असू शकते. अशा वेळेस त्यांना पुढच्या पायरीवर अजून आव्हानात्मक उपक्रम देता येतील.

२) **बोध (समज) :** ही पायरी आपल्यासाठी खूप महत्त्वाची आहे. यामध्ये अनेक छोटे छोटे अनुभव देत, मुलांमध्ये संकल्पनेची समज वाढवायची आहे. मुलांना प्रश्न पडतील अशाही काही

कृती यात देता येतील. आपले काम म्हणजे, मुलांच्या सगळ्या अनुभवांना शब्दांत मांडणे. आपले समजावून सांगणे सोप्या भाषेत असावे.

३) **अभ्यास (सराव) :** एकदा आपण संकल्पना समजावून सांगितली, की मुलांनी त्याचा सराव करणे खूप महत्त्वाचे आहे. या पायरीमध्ये आपल्याला मुलांना एकेकट्याने करून बघण्यासाठी उपक्रम द्यायचे आहेत. एकट्याने केल्याशिवाय अनुभव पूर्ण होत नाही. याकरता आजूबाजूच्या उपलब्ध वस्तू जसे पाने, काड्या देऊन सुद्धा हा सराव देता येतो.

४) **(उपयोजन) :** सराव केला म्हणजे संकल्पना समजते आणि मग ती उपयोगात आणून पाहिली म्हणजे ती दीर्घकाळ लक्षात राहते. उपयोगात आणण्यासाठी वेगवेगळ्या वस्तू किंवा चित्रे किंवा कृतिपत्रके वापरता येतात.

५) **प्रसार (विस्तार) :** ही पायरी मुलांना त्यांना जे येते, ते इतरांसमोर व्यक्त करण्यासाठी मदत करते. जेव्हा आपण दुसऱ्याला काही समजावून सांगतो, तेव्हा आपल्याला ते अधिक समजते. संकल्पनेचे प्रकटीकरणदेखील रंजकतेने होणे गरजेचे आहे. अशा पायऱ्यांनी समजलेली संकल्पना, मुलांना पुढील संकल्पना समजून घेण्यासाठी मदत करते. मुलांचा शिकण्याचा वेग वाढतो आणि 'शिकायचे कसे'? हे मुलांच्या मेंदूत रुजते.

## घटक क्र. ४.४ : अध्यापन पद्धती – खेळाद्वारे अध्ययन

**या घटकात आपण खालील उपघटकांचा विचार करणार आहोत :**

४.४.१ गोष्टी

४.४.२ संभाषण

४.४.३ संगीत

४.४.४ कलानुभव

### ४.४.१ गोष्टी :

**या घटकात आपण काय शिकणार?**

१) मुलांच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टींचे महत्त्व समजेल.

२) परिणामकारकपणे गोष्ट सांगण्याचे कौशल्य विकसित करता येईल.

३) मुलांसोबत चित्रकथांची पुस्तके वापरून, त्यांना गोष्ट बनवण्यात सहभागी करून घेता येईल.

४) गोष्टी सांगण्यासाठीच्या विविध माध्यमांची माहिती होईल.

लहान मुलांना गोष्ट ऐकायला खूप आवडते. बालविकासासाठी गोष्ट हे एक खूप प्रभावी माध्यम आहे. गोष्ट हे मुलांच्या भावनिक विकासाचे मोठे माध्यम आहे. मुलांना भावना व्यक्त करण्यासाठी, त्यांना मोकळे करण्यासाठी गोष्ट खूप प्रभावी ठरते. मुलांच्या पातळीवरचे विनोद निर्माण होतील,

अशा गोष्टी सांगितल्या, की मुले पटकन गोष्टीत सहभागी होतात. मुलांना ज्या प्रकारच्या प्रसंगात स्वतः रमायला आवडते, असे प्रसंग गोष्टीत घातले, तर मुलांना खूप मजा येते. गोष्टीतील पात्रांचे मानवीकरण करणे म्हणजेच माणूस वागतो, बालतो तसेच गोष्टीतील प्राणी, झाडे, वस्तू इ. बोलतात, वागतात असे दाखवणे मुलांना आवडते. त्यामुळे मुलांना सोबत घेऊन, गोष्ट तयार करणे हे खूप महत्त्वाचे असते.

### ४.४.२ संभाषण :

- भाषा विषयाचे महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे 'संभाषण'.
- लहानपणापासून मुलांच्या कानावर अनेक शब्द, स्वर पडत असतात.
- लहान मुलांची शब्द उच्चारून बघण्याची इच्छा ही नैसर्गिक असते.
- शाब्दिक माध्यम लक्षात आले, की मुलांचे संभाषण चालू होते. सुरुवातीला मुलांच्या विश्वातील शब्द वापरून ती संभाषणासाठी पहिले पाऊल उचलतात.
- मुलांना बोलते करायला किंवा संभाषण करण्यासही प्रोत्साहन द्यायला, ताईला पण विविध पद्धती आणि भाषा वापराच्या संधी उपलब्ध करून द्याव्या लागतात.
- संभाषण करता यावे, यासाठी खालील उद्दिष्ट कृतींमधून, खेळांमधून पूर्ण होणे गरजेचे असते.

  १) स्वरांचा उच्चार करता येणे.

  २) शब्दांचा उच्चार स्पष्टपणे करता येणे.

  ३) शब्दांचे अर्थ माहीत होऊन, त्याचा वाक्यात वापर करता येणे.

  ४) निरीक्षण करून वर्णन करता येणे. उदा. चित्र, वस्तू.

  ५) प्रश्न विचारता येणे.

  ६) दिलेल्या प्रसंगावर बोलता येणे.

  ७) कल्पना करून बोलता येणे.

  ८) शब्दांच्या अर्थामागील गंमत जंमत समजून त्याचा संभाषणात वापर करता येणे.

  ९) विनोद समजणे आणि विनोद करता येणे.

  १०) इतरांशी संवाद साधून आपल्याला पडलेल्या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न करणे.

  वरील उद्दिष्टे साध्य करता येतील अशा अनेक कृती घेता येतात.

### ४.४.३ संगीत :

संगीत हे अत्यंत प्रभावी असे माध्यम आहे. आपण जेव्हा संगीत ऐकतो, तेव्हा एक वेगळ्या प्रकारची शांतता मिळते आणि ताण नाहीसा होतो.

मुलांना संगीताविषयी प्रेम असते, त्यामुळे शिकवताना आपण अध्ययनाकरिता संगीताचा आधार नक्की

घेऊ शकतो. संगीतामध्ये ज्याप्रमाणे बालगीतांचा समावेश असतो, तसाच सांगीतिक खेळ, सांगीतिक कृती, वाद्य वापरून गाणी किंवा विविध वाद्यांची ओळख, तालाच्या कृती हेही उपक्रम असतात.

एखाद्या वस्तूमधून विशिष्ट प्रकारचा आवाज येत आहे, हेच खूप कुतूहल निर्माण करणारे असते. त्यामुळे अगदी साध्या सोप्या वस्तूंमधून निर्माण होणाऱ्या संगीतापासून, ते वाद्यांची ओळख ही प्रक्रिया मुलांसाठी निखळ आनंद देणारी असते.

संगीताच्या कृतीमध्ये सहभागी झाल्यावर मुलांना काय फायदे होत असतील?

१) संगीतामुळे सर्जनशीलतेचा विकास होतो.

२) शब्दसंग्रहात भर पडण्याबरोबर शब्द स्मरणात राहायलाही मदत होते.

३) अवधानकक्षा वाढायला मदत होते.

४) श्रवणकौशल्य विकसित होते.

५) विविध आवाजातील फरक कळायला मदत होते.

६) बालकांमध्ये असणारी ऊर्जा सकारात्मक पद्धतीने वापरली जाते.

७) भावनांना मोकळीक मिळते.

संगीताच्या कृती, बालगीतांचे प्रकार, तालाच्या कृती, वाद्यांच्या कृती यांबद्दल आपण अधिक जाणून घेऊ.


### ४.४.४ कलानुभव :

येथे आपण पुढील मुद्द्यांचा विचार करूया.

- कलानुभवाचे बालशिक्षणातील महत्त्व व गरज
- विविध कलानुभव

**कलानुभव** : कोणकोणते कलानुभव बालवाटिकेसाठी आयोजित करता येतील?

मुलांच्या काही कलाकृती पुढे दिलेल्या आहे.



**कला आणि हस्तकलेचे बालशिक्षणातील महत्त्व :**

या कलाकृती बघितल्यावर कोणकोणते विचार आपल्या मनात आले?

आपल्यापैकी बऱ्याच जणांसमोर चित्रकला, रंगकाम यांतील विविध कृती येत असतील. चित्रकला, रंगकाम यांवर आधारित अध्ययन निष्पत्ती करता विविध कृती आपण आयोजित करत असतो. हे बघताना विशिष्ट वयोगटातील मुले आपल्या नजरेसमोर आली असतील आणि हे साहजिकच आहे. बघा ना, गिरगिटण्याचे चित्र बघितल्यावर मुक्तपणे गिरगिटणारे अंगणवाडीत दाखल झालेले मूल आपल्या डोळ्यांसमोर येतेच. यातून एक बाब कळते, ती म्हणजे मूल कोणतीही सर्जनशील कृती करते, तेव्हा त्या कृतींच्या विकासाच्या टप्प्यातून ते पुढे जात असते, म्हणजेच त्या कृतीत सफाईदारपणा यायला त्याला अनेक टप्प्यांतून जावे लागते. कोणतीही कृती करताना, त्याचे अंतिम दृश्यस्वरूप हे सुंदर असण्यापेक्षा, ती कृती करताना मूल कोणत्या प्रक्रियेतून पुढे जात असते, ती प्रक्रिया महत्त्वाची असते, तसेच त्याचे प्रयत्न महत्त्वाचे असतात. यामुळे या कलानुभवांचे बालशिक्षणातील महत्त्व जाणून घेणे महत्त्वाचे ठरते.

कला हा शिक्षणाचा आधार आहे. कलेचा आणि हस्तकलेचा अभ्यास, केवळ सौंदर्यविषयक संवेदनशीलता विकसित करण्यासाठीच नाही, तर सामग्रीची हाताळणी कशी करावी हे शिकण्यासाठी आणि कामासाठी आवश्यक दृष्टिकोन आणि कौशल्ये विकसित करण्यासाठीदेखील आवश्यक आहे. (राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२०)

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये, कला व हस्तकला शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आलेले आहे. धोरणातील परिच्छेदात नमूद केलेले कला, हस्तकला यांचे महत्त्व, तसेच तुमचा अनुभव, याआधारे कला व हस्तकला बालशिक्षणात कसे महत्त्वाचे आहेत, या मुद्द्यांची यादी करू या.

१) सौंदर्यविषयक दृष्टिकोन कलेतून तयार होतो.

२) कागद फाडणे, मातीला आकार देणे यांसारख्या कृती हात व डोळे यांच्या समन्वयासाठी मदत करते.

३) कलाविषयक साहित्याची हाताळणी कशी करावी, हे मुलांना प्रात्यक्षिकातून समजते.

४) अभिव्यक्तीचे माध्यम म्हणून कलेकडे बघितले जाते.

**बालवाटिकेतील विविध प्रकारचे कलानुभव** : कलेचे दृश्यकला; ज्यात चित्रकला, रंगकाम इत्यादींचा समावेश होतो, तसेच सादरीकरण कला ज्यात गायन, नृत्य, नाट्य इत्यादींचा समावेश होतो, असे प्रकार पडतात. बालवाटिकेसाठी निश्चित केलेल्या विविध अध्ययननिष्पत्तींच्या मदतीने, विविध कलानुभव जाणून घेऊया. अध्ययननिष्पत्तींवर आधारित कला अनुभवांच्या कृती आयोजित करताना, स्थानिक संदर्भांचा विचार करावा. नवीन अभ्यासक्रम आराखड्यात जशा अध्ययननिष्पत्ती दिल्या आहेत, त्याप्रमाणे कलानुभव ही असे मांडता येतील.

- **चित्रकला** : बालकांना चित्रे काढायला आवडते. सुरुवातीला ती आपल्या इच्छेने विविध आकार खडू, काडी यांनी गिरगिटतात.हळूहळू विशिष्ट आकार, रचना काढतात.

  **अध्ययन निष्पत्ती :** चित्र रेखाटतो आणि चित्रात काय काढले आहे, हे तोंडी सांगतो. (वयोगट ३ ते ४)

  **कृती :** बालकांना आवडेल ते चित्र काढण्यास सांगावे. चित्रात काय काय काढले ते विचारावे.

- **रंगकाम** : रंगासोबत काम करायला मुलांना आवडते. बालशिक्षणकेंद्रात रंगकांड्या, खडू, ब्रश, कागद, कापड इत्यादी साहित्य व साधने उपलब्ध असल्यास आणि बालकांना ती हाताळायला ती दिल्यास मुक्तपणे ते रंगवतात. मुक्तपणा मिळाला, की सर्जनशीलता बहरते. रंगकामात कौशल्य प्राप्त होण्यास, विविध कलानुभव बालकांना देता येतील. यामध्ये विशेष गरजा असणाऱ्या बालकांनाही सहभागी होता येईल, अशी व्यवस्था असावी.

  **अध्ययन निष्पत्ती :** योग्य कलासाहित्य, साधने आणि उपकरणे हाताळतो. (वयोगट ३ ते ४)

  **कृती :** कलेकरता लागणारे साहित्य हाताळण्याची संधी देणे.

  उदा. दिलेल्या चित्रात मुक्तपणे क्रेयॉनच्या मदतीने रंग भरण्यास सांगणे, खडूने जमिनीवर गिरगिटणे. सहज उपलब्ध साहित्यावर गिरगिटण्यास सांगणे.

  उदा. वर्तमानपत्र, कागद यांवर पेन्सिलने, क्रेयॉनने गिरगिटणे.

  या अध्ययननिष्पत्तीसाठी आणखी कोणत्या कृती घेता येतील. त्या कृती मुलांसोबत घेऊन, त्यांचे फोटो गटात पाठवा. कृती घेतानाचे अनुभव संपर्क सत्रामध्ये सांगा.

- **चिकटकाम** : चित्रांमध्ये विविध प्रकारच्या आकारांवर डिंकाच्या साहाय्याने रंगीत कागद, काड्या, कापडाचे तुकडे इत्यादी चिकटवण्याची कृती मुलांसोबत घेता येईल.

  **अध्ययन निष्पत्ती :** स्वतःच्या रचनेमध्ये वेगवेगळ्या घनतेचे, रंगांचे आणि पोतांचे साहित्य एकत्र करून, कोलाज तयार करतो. (वयोगट ५ ते ६)

  **कृती :** मुलांना जुनी वर्तमानपत्रे, मासिके इत्यादींची पाने द्या. त्यांना त्यांचे स्वतःचे कोलाज बनवण्यासाठी प्रोत्साहित करा. जुन्या कापडाचे तुकडे आणि इतर टाकाऊ पदार्थ/पाने/ पाकळ्या इत्यादी, ते कोलाजच्या कामात पेस्ट करण्यासाठी वापरू शकतात. हे स्वातंत्र्य मुलांना द्या. स्वतःची रचना करण्याची संधी मुलांना द्या.

  मुलांचे कोलाजचे नमुने


- **मातीकाम** : माती भिजवणे, मातीच्या गोळ्याला आकार देणे इत्यादी कृती मुलांसोबत घेता येतील.

  **अध्ययन निष्पत्ती :** माती किंवा कणीक यांसारखे साहित्य थापून किंवा वळकटी करून त्रिमितीय आकार तयार करतो. (वयोगट ४ ते ५)

**कृती :** मुलांना पीठ किंवा चिकणमाती द्या. त्यांना माती भिजवून मळायला सांगा आणि त्यांना त्यांच्या आवडीचे काहीही बनवण्यास सांगा, जसे की मातीच्या वा पिठाच्या गोळ्यांचे भिन्न आकार, चपाती इ.

वरीलप्रमाणे आणखी काही कलानुभव मुलांना देता येतील. काही कला अनुभवांची यादी खालील-प्रमाणे : फाडकाम, घडीकाम, रचना करणे, ठसेकाम, कातरकाम.

**कलानुभवात अंगणवाडीताईची भूमिका :**




**कृती :**

१) वर्गात दोन-तीन खेळांचे कोपरे मांडून, त्यांचे फोटो पाठवा.

२) आजूबाजूला आढळणाऱ्या गोष्टी; जसे - बिया इत्यादी गोळा करून, त्याचा संग्रह करा.

३) या कलाकृतींचे नमुने तयार करा.

| कृती नाव | करायची कृती |
|---|---|
| ठसेकाम | भाज्या वापरून मुक्त ठसेकाम.<br>आकारात बोटांचे ठसेकाम.<br>झाकण वापरून ठसेकाम. |
| चिकटकाम/कोलाज | हाताने कागद फाडून कागदावर चिकटवणे.<br>कात्रीने कागद कापून आकारात चिकटकाम.<br>विविध स्पर्श असणाऱ्या वस्तूंचे चिकटकाम. |

**प्रात्यक्षिक :**

१) तीन प्रकारच्या खेळांचे कोपरे मांडा. त्याचे फोटो काढून जोडा. मुले तेथे काय करत होती, ते लिहा.

२) मुलांच्याकडून वर्गात कलाकाम करून घ्या. त्याचे पाच प्रकारचे नमुने जोडा. कोणत्याही दोन प्रकारच्या कलाकामाच्या कृती लिहा.

३) मुलांकरता कलाकाम करण्यासाठी आवश्यक वस्तूंचा संग्रह तयार करा. त्याची यादी करा. मुलांना त्यावर कृती करायला सांगून त्याचे फोटो काढा. ते जोडा.

४) मुलांना गोष्ट सांगा, या गोष्टीतील मुलांना काय काय आवडले, ते लिहा. त्यांनी काही प्रश्न विचारले असतील, तर ते लिहा किंवा मुलांनी आपला अनुभव सांगितला असेल, तर तो लिहा.

५) मुलांना चांगले संभाषण करता यावे म्हणून, वर्गात विविध उपक्रम घ्या. तुम्ही घेतलेल्या किमान तीन उपक्रमांची माहिती लिहा.

६) तुमच्या अंगणवाडीचा नकाशा काढा. त्यात असुरक्षित असलेल्या जागा दाखवा. मुलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने, तुम्ही त्यात काय बदल कराल ते लिहा.

---

## स्वाध्याय

१) बालशाळेतील सुरक्षित व सौहार्दपूर्ण वातावरण म्हणजे काय? असे वातावरण तयार होण्यासाठी तुम्ही काय कराल?

२) गोष्ट ऐकणे हे मुलांच्या कोणकोणत्या विकासास चालना देते? गोष्टीला जोडून कोणते उपक्रम घेता येतील त्यांची उदाहरणे द्या.

३) गोष्ट सांगणे हे मुलांच्या कोणकोणत्या विकासास चालना देते ते सविस्तर लिहा. ३ ते ६ वर्षांच्या मुलांना, गोष्टीतील कोणकोणत्या बाबी आवडतात?

४) कोणती माध्यमे वापरून गोष्ट सांगता येईल, याची थोडक्यात माहिती द्या.

५) अध्ययनाची पंचपदी वापरून, कोणतीही एखादी संकल्पना शिकवण्याचे उपक्रम लिहा.

६) अध्ययनाची पंचपदी वापरून वर्गीकरण संकल्पनेचे उदाहरणासहित स्पष्टीकरण द्या.

७) कला आणि हस्तकलेची काही उदाहरणे द्या (किमान ५) आणि त्यांचे मुलांच्या शिक्षणातील महत्त्व सांगा.

८) विविध अध्यापनपद्धतींची नावे लिहा व त्यांची थोडक्यात माहिती लिहा. (किमान पाच)

९) संगीताचे मुलांना होणारे फायदे, तुमच्या शब्दांत सविस्तर लिहा.

# घटकसंच ५ : खेळ व खेळणी आधारित अध्यापन पद्धती




बालकांचे अध्ययन आणि विकास यांचा केंद्रबिंदू खेळ हा आहे. विकासाची सर्व क्षेत्रे व अभ्यासक्रमाची सर्व उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी खेळ हे बालकांना अनेक संधी उपलब्ध करून देतात. निवड, आश्चर्य आणि आनंद हे बालकांच्या खेळाचे प्रमुख पैलू आहेत. निवड, आश्चर्य आणि आनंद या तीन पैलूंच्या आधारे बालकांची वर्गांतर क्रिया अधिक उत्तम होणे सुलभ होईल.

*(संदर्भ : राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर – २०२४ : पृष्ठ क्र. ३७)*

**घटकसंचाविषयी थोडेसे....**

खेळ हा मुलांच्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. खेळाच्या माध्यमातूनच मुले अनेक संकल्पना शिकत जातात, तसेच संकल्पना दृढ व्हायला मदत होते, म्हणून खेळ व खेळणी यांची भूमिका मुलांच्या अनुभव घेण्याच्या प्रक्रियेत महत्त्वाची असते.

सदरच्या घटकात खेळ, खेळांचे स्वरूप, बालविकासातील खेळांची भूमिका, बालविकासाचे टप्पे व खेळांच्या पायऱ्या, खेळ आधारित अध्यापन पद्धती, खेळणी आधारित अध्यापन पद्धती, खेळाचे नियोजन, जादुई पिटारा, पंचकोश आणि खेळ यांचा सहसंबंध हे उपघटक अभ्यासणार आहोत.

## माझ्या नोंदी :

## घटकसंच ५ : खेळ व खेळणी आधारित अध्यापन पद्धती

### आपण काय शिकणार आहोत?

**या घटकात आपण काय शिकणार आहोत?**

५.१ खेळाचे स्वरूप

५.२ खेळ आधारित अध्ययन–अध्यापन पद्धती

५.३ खेळणी आधारित अध्ययन–अध्यापन पद्धती

५.४ खेळाचे नियोजन

५.५ जादुई पिटारा

### घटक क्र. ५.१ : खेळाचे स्वरूप

बालपण हे खेळातून समृद्ध होत असते. आपण बालशिक्षणाचा अभ्यास करत आहोत त्यामुळे मुलांचा आणि खेळाचा घनिष्ट संबंध समजून घेणे महत्त्वाचे ठरते. खेळणे ही मुलांची नैसर्गिक प्रवृत्ती आहे व खेळात निर्भेळ आनंद मिळवणे हेच उद्दिष्ट असते. तसेच खेळामुळे सकारात्मक व्यक्तिमत्त्व घडण्यास मदत होते.

**खेळाचे स्वरूप :**

१) खेळ हा उत्स्फूर्त आणि ऐच्छिक असतो.

२) खेळ हे काल्पनिक असतात, परंतु वास्तविक म्हणजेच खरे असल्यासारखे खेळले जातात.

३) खेळण्यावर लक्ष केंद्रित केलेले असते, त्यातून कोणतीही निर्मिती अपेक्षित नसते.

४) खेळांमध्ये सक्रिय सहभाग आवश्यक असतो.

५) खेळणे आनंददायक असते.

६) लवचीकता हे खेळाचे वैशिष्ट्य आहे.

**खेळाचे महत्त्व खालीलप्रमाणे :**

**शारीरिक विकास :**

- खेळामुळे स्नायू आणि ज्ञानेंद्रिये विकसित होतात.
- मुले खेळणी हाताळतात, तेव्हा त्यांची सूक्ष्म स्नायू कौशल्ये व संवेदनशील क्षमता विकसित होतात.

- पालथे पडणे, वस्तू हातात घेऊन टाकणे, उभे राहणे, चालणे, उडी मारणे इत्यादी हालचालींमुळे मुलांच्या स्थूल स्नायूंचा विकास होतो.

**बोधात्मक विकास** :

- मुले खेळातून वस्तूंचे आकार, आकारमान, रंग, पोत, संख्या आणि नावे यांच्यातील फरक शिकतात.
- मुले विशेष नातेसंबंध समजून घेणे, अमूर्त विचार करणे आणि समस्या सोडवण्याच्या उपक्रमांमध्ये समरस होतात.
- खेळ मुलांना वास्तविक आणि काल्पनिक यातील फरक समजायला मदत करतात.
- मुलांची स्मरणशक्ती तसेच अवधान क्षमता वाढते.
- खेळांमुळे भाषेचा विकास होतो.

**सर्जनशील विकास :**

- खेळताना मुले वेगवेगळ्या पद्धतीने वस्तूंना हाताळतात. त्यातून ते नवनवीन शोध लावत असतात.
- खेळामुळे प्रत्येक मुलाचा इतरांपेक्षा वेगळा असा वैयक्तिक दृष्टिकोन आणि सर्जनशील अभिव्यक्तीची त्यांची स्वतःची वैयक्तिक पद्धत विकसित होते.
- बालके नाटकातून स्वतःच्या भावना, विचार प्रकट करतात.

**उपचारात्मक विकास** :

- खेळांमुळे ताण–तणाव दूर होतो.
- मुले त्यांच्या भावना मुक्तपणे व्यक्त करतात.
- प्रौढांच्या देखरेखीखाली एरवी भीती वाटणाऱ्या कृती करता येतात का? याची चाचणी घेतात, ज्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो.

**सामाजिक, नैतिक व भावनिक विकास :**

१) खेळ हा मुलांसाठी संवाद साधण्याचा नैसर्गिक मार्ग आहे.

२) खेळाच्या माध्यमातून सामाजिक व सांस्कृतिक मूल्यांची उजळणी होते.

३) जेव्हा मुले प्रौढ, पालक आणि समवयस्कांशी खेळतात, तेव्हा ते सामाजिक संबंध विकसित करतात.

४) सहकार्य करणे, स्वतःची वेळ येईपर्यंत वाट बघणे आणि वाटाघाटी करणे यांसाठी खेळातून संधी मिळतात.

५) खेळामुळे संवेदना, सहानुभूती, सहभागीत्व (sharing) या भावना विकसित होतात.

## बाल विकासाचे टप्पे आणि खेळाच्या पायऱ्या

१) खेळ हा मुलांच्या जीवनातील अविभाज्य घटक आहे.

२) मुलांमध्ये खेळणे हे नैसर्गिकरीत्या आणि सहजतेने होणारी क्रिया आहे.

३) खेळ मुलांच्या विकासाबरोबर बदलतही जातो.

४) खेळताना मुले त्यांच्या शरीरातील प्रत्येक अवयवाचा कळत नकळत वापर करत असतात आणि पंचनेंद्रियांद्वारे मेंदूत प्रतिमा निर्माण करत असतात.

५) जसे विकासाचे टप्पे बदलतात, तसे खेळाच्या पायऱ्या बदलतात.

**खालील तक्त्यात वयानुसार विकासाचे टप्पे व खेळाच्या पायऱ्या दिल्या आहेत.**

| वय | खेळाच्या पायऱ्या |
|---|---|
| जन्म ते ३ महिने | मुले हात-पाय हलवतात. आवाजाच्या दिशेने बघू लागतात. नजर स्थिर होत असते. ही पहिली पायरी असते. |
| ३ महिने ते २ वर्षे | मुले प्रतिसाद द्यायला लागतात. वस्तू हातात पकडतात. खेळण्यांशी खेळतात. अजून स्पष्ट बोलता येत नसते, त्यामुळे संवाद साधला जात नाही. ही दुसरी पायरी |
| २ ते ३ वर्षे | मूल उभे राहते, चालते, धावते, दोन्ही पायांवर उडी मारते. आजूबाजूला सारख्या वयाची मुले असली तरी मूल बऱ्याच वेळा एकटेच खेळते. पण दुसऱ्यांचे अनुकरण करते. या पायरीला समांतर खेळ म्हणतात. |
| ३ ते ४ वर्षे | मुले इतरांबरोबर खेळतात, पण त्यात समन्वयाचा अभाव असतो. ती बोलू शकतात आणि एकमेकांना खेळणी देतात, पण तरीही ती बऱ्याचदा स्वतंत्र खेळताना दिसतात. गटात खेळण्याची तयारी नसते. याला सहयोगी पायरी असे म्हणतात. |
| ४ ते ६ वर्षे | मुले एकत्र येऊन खेळतात. सामान्य ध्येय किंवा तशीच आवड असलेल्या मुलांचा गट तयार होतो. गटातील एक जण नेता बनतो आणि इतर त्याच्यासह खेळतात. ही सहकार्यात्मक खेळाची पायरी आहे. इथे गटाचे नियम, खेळाचे नियम पाळले जातात. |

आपल्या लक्षात आले असेल, की मुलांच्या विकासाचे टप्पे आणि खेळाच्या पायऱ्या, म्हणजे एक छान गुंफण आहे. मुलांच्या वाढीत त्यांच्या स्थूल आणि सूक्ष्म स्नायूंचा विकास होण्यासाठी, ज्या

हालचाली केल्या जातात ते एकप्रकारे खेळणेच असते. या हालचालींमुळे त्याच्या बुद्धीचाही विकास होत असतो, म्हणूनच मुलांच्या सुदृढ व सर्वांगीण वाढीत, खेळ फार महत्त्वपूर्ण ठरतात. म्हणूनच अंगणवाडी ताईने आपल्या अभ्यासक्रमात खेळ आधारित उपक्रमांचे नियोजन करणं आवश्यक ठरते.

या घटकात आपण समजून घेतले की खेळ म्हणजे करमणूक नसून मुलांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी आवश्यक घटक आहे, म्हणूनच काही मुलांना इतरांसारखे खेळता येत नसल्यास आवश्यक मदत देण्यात येणे गरजेचे आहे.

## घटक क्र. ५.२ : खेळ आधारित अध्ययन-अध्यापन पद्धती

खेळ आधारित अध्ययन-अध्यापन पद्धती म्हणजे, खेळाद्वारे शिकणे व शिकवणे होय. यात संकल्पना समजावून देण्यासाठी जे उपक्रम राबवले जातात, ते खेळ आधारित असतात. या ठिकाणी मुलांना प्रत्यक्ष वस्तू हाताळून, अनुभव घेऊन, स्वतःची समज निर्माण करता येण्यासाठी, पूर्ण स्वातंत्र्य दिले जाते. त्याला खेळातून अध्ययन म्हणतात.

'खेळणे' या शब्दामध्ये मुलांसाठी मनोरंजक आणि गुंतवून ठेवणाऱ्या सर्व कृतींचा समावेश होतो. यामध्ये भाषिक खेळ, बौद्धिक खेळ, इंद्रियविकासाचे खेळ, कल्पनाविकासाचे खेळ इत्यादींचा समावेश होतो.

खेळ वेगवेगळ्या पद्धतीने खेळले जातात.

**खेळाच्या विविध पद्धती खालीलप्रमाणे :**

**१) मुक्त खेळ :**

- जेव्हा मुले स्वतः ठरवतात, की त्यांना काय, कसे व किती वेळ खेळायचे आहे, तेव्हा त्याला मुक्त खेळ म्हणतात. हे खेळ संपूर्णपणे मुलांनी सुरू केलेले असतात आणि स्वयंमार्गदर्शित असतात, म्हणजे मुले स्वतःच स्वतःला कसे खेळायचे हे शिकवतात.

  मुक्त खेळात शिक्षक अप्रत्यक्ष भूमिकेत असतात. ताईने खेळासाठी विकास क्षेत्रांनुसार कोपरे तयार करावेत; जसे की वाचनाचा कोपरा - जिथे मुलांना सहज घेता येतील अशा अंतरावर पुस्तके असतील आणि बसायला पुरेशी जागा असेल. घर कोपरा - जिथे सगळ्या प्रकारची भांडी आणि स्वयंपाक घरात लागणाऱ्या इतर वस्तू असतील, तसेच या घर कोपऱ्यात बाहुल्या, वापरात नेसलेल्या ओढण्या धुऊन ठेवलेल्या असतील. एका कोपऱ्यात ठोकळे, विविध प्रकारचे जोडो ब्लॉक्स असतील, तर एक कोपरा कलेचा असेल जिथे कोरे कागद, रंगीत खडू, कात्री, स्केचपेन्स, डिंक, रंगीत कागद, शिंपले, चिकणमाती, फळ्यावर

लिहिण्याचे खडू, रांगोळी इत्यादी. एक फळा असेल, तसेच याच कोपऱ्यात खुळखुळे, खंजिरी, वापरात नसलेल्या तेलाच्या डब्यापासून बनवलेला ड्रम, वापरात नसलेल्या दात घासायच्या ब्रशपासून ड्रम वाजवण्यासाठी काठ्या, छोट्या टाळा, इत्यादी असेल. एका कोपऱ्यात भिंग, वाळूचे घड्याळ, मीठ, साखर, दगड अशा साहित्याची मांडणी करावी.

- इथे मुले खेळत असताना, शिक्षकांनी मुलांचे निरीक्षण करायचे असते. मुलांना गरज असेल, तेव्हा मदत करावी.
- मुक्त खेळ मुलांना स्वतःवर नियंत्रण ठेवण्यास व सामाजिक कौशल्ये विकसित करण्यास मदत करतात. उदा. खेळताना सवंगड्यांचे बोलणे ऐकणे, एकत्र येऊन खेळणे, खेळणी एकमेकांना देणे, इत्यादी.
- मुक्त खेळ उदाहरणासहित समजून घेऊ :
  ताई वर्गातील कोपऱ्याची ओळख करून देते. मुले त्यांना कोणत्या कोपऱ्यात खेळायला जायचे हे ठरवतात. मुले खेळात रमतात. ताई प्रत्येक कोपऱ्यात जाऊन, मुलांचे निरीक्षण करते व निरीक्षणाच्या नोंदी करते. मुले खेळून झाल्यानंतर आवराआवर करतात. मुले त्यांच्या खेळाविषयी चर्चा करतात.

**२) मार्गदर्शित खेळ :**

- खेळाच्या या प्रकारात मुले जरी खेळत असली तरी, मुलांच्या सहवासातील प्रौढ व्यक्ती सुलभकाचे काम करतात, जसे की, मुलांना आकार किंवा रंग शिकण्यास मदत करण्यासाठी, ताई विशिष्ट आकार किंवा रंगाचे ठोकळे वापरतात. मुलांना गोलात बसवून त्यांना त्या ठोकळ्यांच्या आकारांची आणि रंगांची ओळख करून देतात.
- विकासाच्या सर्व क्षेत्रांशी संबंधित कौशल्ये वाढवण्यासाठी मार्गदर्शित खेळ, हे सर्वांत प्रभावी मानले जातात. मार्गदर्शित खेळ मुलांना व शिक्षकांना सहकार्याने शिकण्या-शिकवण्याची संधी उपलब्ध करून देतात, तसेच शिक्षकांना मुलांसोबत चर्चेत सहभागी होण्याची आणि मुलांच्या खेळांबद्दल प्रश्न विचारण्याची संधी मिळते. उदा. शब्दसंग्रहाची ओळख करून देताना, कथेतील यमक शोधणे व त्याबद्दल बोलणे.
- मुलांनी अनुभवातून शिकावे यासाठी, अंगणवाडी सेविका आपल्या दर दिवशीच्या वर्गप्रक्रियेमध्ये मार्गदर्शित खेळांचा समावेश करू शकते. जसे की – आकारमान ओळखमध्ये छोटा आणि मोठा चेंडू घ्यावा. मुलांना दोन्ही चेंडू खेळायला देऊन त्यावर चर्चा करावी. इथे मुले दोन्ही चेंडू हाताळतील आणि ते स्वतःच छोट्या आणि मोठ्या चेंडूतील फरक ओळखतील आणि आकारमान ही संकल्पना समजून घेतील.

- मार्गदर्शित खेळ उदाहरणासहित समजून घेऊ.

  ताई मुलांना पाने आणि फुले यांपासून वेगवेगळ्या तीन-चार पद्धतीने आकृतिबंध (पॅटर्न) तयार करून दाखवते. ते पाहून मुले दिलेल्या साहित्यापासून त्यांच्या पद्धतीने वेगवेगळे आकृतिबंध (पॅटर्न) बनवतात. ताई प्रत्येक मुलाजवळ जाते. त्याचे निरीक्षण करते.

**३) संरचित खेळ :**

- संरचित खेळ हे विशिष्ट नियम व मार्गदर्शक सूचना असलेले शिक्षक दिग्दर्शित कृती असतात, जसे की गोलात उभे राहून, मुलांना गाणे शिकवणे. इथे ताई गाण्यातील बोलांना साजेशा शारीरिक हालचाली करते आणि मुले तिचे अनुकरण करतात.
- अंगणवाडीतील मुलांमध्ये विशिष्ट क्षमता आणि अध्ययन निष्पतींवर लक्ष केंद्रित करण्यासाठी, संरचित खेळ सर्वांत उपयुक्त आहेत. नियम असलेले खेळ व कृतींच्या माध्यमातून शिक्षक संरचित, खेळाधारित अध्ययन अनुभव देऊ शकतात, जसे की अंकांची ओळख करून देताना ताई मुलांना त्या संख्येइतक्या वस्तू आणायला सांगते. इथे मुले वस्तू घेऊन खेळत न बसता, ती वस्तू ताईला आणून देतात आणि पुन्हा आपल्या जागेवर जाऊन बसतात. यात मुलांना हालचाल करण्याची संधी मिळते, पण त्याचवेळी मुले इकडे तिकडे न जाता पुन्हा ताईसमोर येऊन गोलातच बसतात.
- खेळाच्या या प्रकारामध्ये शिक्षकांनी स्पष्ट मर्यादा निश्चित केलेल्या असतात, की ज्यामध्ये विशेषतः शिकण्याचा क्रम, खेळातील नियम पाळायचे असतात, जसे की स्थूल स्नायूंच्या विकासासाठी ताईने एक खेळ मांडला आहे. जिथे मूल गोलात उडी मारते, खुर्चीवर चढते, टेबलाखालून रांगत बाहेर येते आणि आपल्या जागेवर जाऊन बसते. इथे मुलांना खेळाचा क्रम लक्षात ठेवायचा आहेच, पण इकडे तिकडे न जाता, ताईने सांगितल्याप्रमाणे नियम पाळून एका वेळेस एक मूल अशा पद्धतीने खेळ खेळला जातो.

**संरचित खेळ उदाहरणासहित समजून घेऊ :**

ताई 'आईचे पत्र हरवले' हा खेळ खेळायचा आहे अस सांगते. ताई मुलांना खेळाचे नियम सांगते. 'सगळ्यांनी गोल बसायचे आहे. तुमच्यापैकी एक जण रुमाल घेऊन गोलाभोवती फिरेल आणि आपल्या बसलेल्या एखाद्या सवंगड्याच्या मागे तो रुमाल ठेवेल. ज्याच्या मागे रुमाल ठेवला आहे ते मूल तो रुमाल घेऊन, आधीच्या सवंगड्याला पकडण्याचा प्रयत्न करेल आणि आधीच्या सवंगड्याने आपल्याला पकडणाऱ्या सवंगड्याच्या जागेवर बसायचे.' मुले सर्व नियम पाळून, खेळ खेळतात. मुलांना सहज समजावे, म्हणून काही खेळांचे तक्तेदेखील लावता येतील.

## घटक क्र. ५.३ : खेळणी आधारित अध्ययन-अध्यापन पद्धती

खेळण्यांच्या मदतीने विविध मनोरंजक कृती करता येतात. मुलांना खेळणी आकर्षक व मनोरंजक वाटतील आणि सहज खेळावीशी वाटतील अशी असावीत. मुले वस्तूंबरोबर खेळता खेळता शिकतात. खेळणी ही मनोरंजनाचे साधन तर आहेच, पण त्याचबरोबर ती अध्ययन अनुभवाचे साधनसुद्धा आहे. आपण संकल्पना समजावून देण्यासाठी जे साहित्य वापरतो, तीसुद्धा खेळणीच असतात.

**या घटकात आपण काय शिकणार आहोत?**

५.३.१ खेळणी आधारित अध्यापन पद्धती

५.३.२ खेळण्यांचे प्रकार

५.३.३ खेळणी निर्मिती

### ५.३.१ खेळणी आधारित अध्यापन पद्धती :

३ ते ८ वयोगटातील मुलांचे शिक्षण, हे खेळाद्वारे किंवा खेळणी आधारित होत असते, कारण खेळ खेळणे व खेळणी खेळणे ही बालकांची स्वाभाविक प्रवृत्ती आहे, जसे की मुलांना 'क' अक्षराची ओळख करून देताना ताई कप, कागद, कापड, कांदा, कमळ, केरसुणी अशा वस्तू हाताळायला देते. त्यामुळे प्रत्येक वस्तू हातात घेऊन क - कप, क - कमळ अशा पद्धतीने वस्तू व अक्षराचा आवाज यांचा एकमेकांशी असलेला संबंध मुलांना स्पष्ट होतो. अशाप्रकारे खेळणी किंवा वस्तू वापरून संकल्पना अधिक चांगल्या पद्धतीने शिकवता येतात आणि मुलेही त्या सहजपणे समजून घेऊ शकतात. खेळणी आधारित अध्ययन पद्धतीत मुले गटात किंवा एकट्याने कृतीद्वारे शिकतात. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी खेळणी हे उपयुक्त साधन आहे.

**लक्षात घेऊया :**

- खेळणी मुलांना त्यांची आवड व हेतू शोधण्यास मदत करतात.
- खेळण्यांच्या वापराने, मुलांमध्ये ज्ञान व कौशल्ये आत्मसात करण्यास, नैसर्गिकरीत्या मदत होते.
- मुले खेळण्यांच्या साहाय्याने अधिक गतीने व आनंदाने शिकतात.

### ५.३.२ खेळण्यांचे प्रकार :

मुलांसाठी विविध माध्यमांतून खेळणी बनवली जातात. मुलांसाठी वर्गात वापरले जाणारे शैक्षणिक साहित्य, यांचादेखील खेळण्यांमध्ये समावेश होऊ शकतो.

**खेळण्यांचे प्रकार खालील भागात विभागले आहेत.**

१) विकत घेतलेली खेळणी २) अंगणवाडीताईने तयार केलेली खेळणी

१) **विकत घेतलेली खेळणी :** यात बाजारात विकत मिळणाऱ्या लाकडी, धातूच्या, प्लॅस्टिकच्या खेळण्यांचा समावेश होतो. ही खेळणी टिकाऊ असतात, पण बऱ्याच वेळेस ही खेळणी खर्चीक असतात. ती सर्वच मुलांना मिळतात असे नाही.

२) **अंगणवाडीताईने तयार केलेली खेळणी :** संकल्पना समजावून सांगण्यासाठी अंगणवाडी ताई जे साहित्य बनवते त्याचा या खेळण्यांमध्ये समावेश होतो, तसेच मुक्त खेळासाठी जे कोपरे तयार करावयाचे असतात त्यासाठीही अधिकचे साहित्य लागते, आजुबाजूच्या परिसरात सहज उपलब्ध होते. अशा साहित्यातून ती मुलांसाठी खेळणी बनवते. बाहुल्या, कठपुतळी, बिन बॅग, स्पर्शपुस्तक, भिरभिरे, वेगवेगळ्या चित्रांचे कटआउट्स, जसे की आकार पाने, फुले, तक्ते इत्यादी. ही खेळणी कमी खर्चीक असतात, तसेच मुलांच्या दृष्टीने सुरक्षित व हाताळायला सोपी असतात आणि पर्यावरणपूरकही असतात.

### ५.३.३ खेळणी निर्मिती :

खेळणी निर्मिती करणे हे कौशल्याचे काम आहे, तरीही सातत्याने काम केले असता, त्यामध्ये प्रभुत्व मिळणे सहज सोपे आहे.

**खेळण्यांची निवड किंवा निर्मिती करताना लक्षात घ्यायचे मुद्दे :**

१) **मुलांचा वयोगट :**

प्रथम मुलांचा वयोगट लक्षात घेणार आहोत. आपल्याकडे येणारी मुले, ही ३ ते ६ वयोगटातील असणार आहेत. त्यामुळे हाताळायला सोपी आणि सुरक्षित अशी खेळणी असावीत हे लक्षात घेतले पाहिजे.

२) **साहित्याची उपलब्धता :**

खेळणी बनवण्यासाठी लागणाऱ्या साहित्याची उपलब्धता लक्षात घेतली पहिजे. कमी खर्चात खेळणी तयार करता येतात. कापड, बाटल्या, पुठ्ठ्याची खोकी, सुतळी, झाडांच्या बिया, नारळाच्या करवंट्या, यांसारख्या सहज उपलब्ध वस्तूंपासून खेळणी बनवता येतात. त्यासाठी टाकाऊ वस्तूंना सातत्याने गोळा करून ठेवणे गरजेचे आहे.

३) **सर्जनशीलता व शिकण्याची वृत्ती :**

खेळण्यांची निवड आणि निर्मिती करताना मुलांची स्वतः शिकण्याची वृत्ती विकसित होण्यास मदत होईल, याची काळजी घ्यावी.

४) **नियोजन व अंमलबजावणी :**

खेळणी तयार करताना व वापरताना आलेली आव्हाने नोंदवून ठवणार आहोत, ज्यामुळे पुन्हा खेळणी निर्मिती करताना, अशा आव्हानांचा पूर्वविचार करणे शक्य होणार आहे, जसे की,

एखादे खेळणे बनवताना ते कागदापेक्षा कापडाचे जास्त टिकाऊ होईल किंवा सर्वच मुलांना एकाच प्रकारचे खेळणे द्यायचे असल्यास, ते खेळणे त्याप्रमाणात उपलब्ध झाले नाही. पुढील वेळेस त्या खेळण्याची तरतूद केली जाईल.

**५) मूल्यमापनासाठी खेळ व खेळणी :**

संकल्पनांच्या मूल्यमापनासाठी खेळता येतील अशी साधने तयार करावीत.

**६) सुरक्षा व सुरक्षितता :**

खेळ व खेळणी निवडताना, मुलांची सुरक्षा आणि सुरक्षितता लक्षात घेणे अत्यंत गरजेचे आहे. आपण खेळणी बनवण्यासाठी वापरत असलेले साहित्य, व्यवस्थित बघून घ्यावे. मुलांना इजा होणार नाही याची दक्षता घेणे गरजेचे आहे.

**७) खेळण्यांची काळजी :**

मुलांना हाताळण्यासाठी देण्यात येणारी खेळणी, आकाराने मोठी आकर्षक, सुस्थितीत व कोणतीही इजा होणार नाही अशा प्रकारची असावीत. ठरावीक अंतराने खेळण्यांची पडताळणी करावी, त्यामुळे तुटलेल्या, फाटलेल्या, तडा गेलेल्या खेळण्यांची वेळोवेळी दुरुस्ती केली जाईल किंवा त्या जागी नवीन खेळणे बनवले जाईल.

## घटक क्र. ५.४ : खेळाचे नियोजन

मुलांना खेळ खेळायला देताना, अंगणवाडीताईला नियोजन करणे महत्त्वाचे ठरते, तसेच ठरलेले नियोजन साध्य होणार नसेल, तर त्यासाठी पर्यायी व्यवस्था करणेही आवश्यक आहे, जसे की ताईने मुलांना मैदानावर घेऊन जायचे ठरवले आहे आणि पाऊस पडला. अशा वेळी तोच खेळ वर्गात किंवा वर्गाबाहेर मोकळ्या जागेत घेता येईल का? किंवा दुसरा खेळ खेळायचा का? याचा विचार आधीच केलेला असेल, तर वेळापत्रक व्यवस्थित पाळले जाईल. मुलांचा वेळ वाया जाणार नाही.

**या घटकात आपण काय शिकणार आहोत?**

५.४.१ खेळाचे नियोजन करत असताना लक्षात घ्यावयाच्या गोष्टी

५.४.२ खेळ व खेळणी अध्यापन पद्धतीत पालक/कुटुंबाचा सहभाग

### ५.४.१ खेळाचे नियोजन करत असताना लक्षात घ्यावयाच्या गोष्टी :

**१) खेळाचा प्रकार :**

कोणत्या प्रकारचा खेळ खेळणार आहोत? जसे की मैदानी खेळ, मार्गदर्शित खेळ, मुक्त खेळ, इत्यादी.

**२) खेळ खेळण्यासाठी जागेची उपलब्धता व स्वच्छता :**

खेळाच्या प्रकारावरून जागा किती लागणार आहे, ते ठरवता येते. त्यानुसार मुलांना बसण्याची किंवा उभे राहण्याची रचना करता येते. विशेष गरजा असलेल्या मुलांच्या दृष्टीनेही जागेचा विचार करणे आवश्यक आहे, तसेच मुलांच्या आरोग्याच्या दृष्टीने जागा स्वच्छ असावी.

**३) साहित्य व साधने :**

साहित्य वापरणार असाल, तर त्यांची योग्य निवड, उपलब्धता यांची पूर्तता करावी. सर्व उपकरणांवर त्या उपकरणाच्या नावाच्या चिठ्ठ्या लावणे, तसेच साहित्यात साधने तुटली असतील, तर ती बदलणे किंवा त्यांची दुरुस्ती करून ठेवणे.

**४) प्रथमोपचार पेटी :**

प्रथमोपचार पेटी तयार ठेवणे.

**५) अध्ययन निष्पत्ती :**

कोणत्या अध्ययन निष्पत्ती साध्य करणार आहोत, हे लक्षात घेणे तसेच कार्यवाहीच्या टप्प्यांचे नियोजन अत्यंत गरजेचे आहे.

**६) मूल्यमापन :**

त्या खेळातून मूल्यमापन करणार असाल, तर त्यासाठी लागणाऱ्या साधनांबाबत योजना व पूर्वतयारी करणे.

खेळण्याआधी ताईने मुलांना खेळाचे नियम सांगावेत. खेळायला घेतलेल्या साधनांची ओळख करून द्यावी. खेळादरम्यान ताईने मुलांचे निरीक्षण करून, आवश्यक त्या नोंदी लिहून ठेवाव्यात. खेळाच्या शेवटी ताईने मुलांबरोबर साहित्य आवरून ठेवावे.

### ५.४.२ खेळ व खेळणी अध्यापन पद्धतीत पालक/कुटुंबाचा सहभाग :

खेळण्यांची निर्मिती व त्याचा परिणामकारक वापर करत असताना, पालकांचाही सहभाग घेणे अपेक्षित आहे. ज्यामुळे पालकांची खेळण्यांविषयीची संकल्पना स्पष्ट होईल व घरी पण पालक मुलांना विविध खेळणी देऊन, त्यांच्या विकासास हातभार लावतील. यासाठी ताईने पालकसभा घ्यावी. त्यावेळी पालकांसाठी विविध उपक्रम आयोजित करून मुले खेळातून कशी शिकतात, याचा अनुभव द्यावा, ज्यामुळे पालकांना मुलांच्या जीवनातील खेळाचे महत्त्व लक्षात येईल.

३ ते ६ वयोगटातील पालकांना नेहमीच मुलांच्या लिखाणाची घाई असते. आपल्या मुलाला याच वयात लिहिता-वाचता आले पाहिजे हा त्यांचा समज, पालकसभेतील उपक्रमांमधून दूर करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

महागडी खेळणी न घेता, घरातील वस्तूंबरोबर मुले कोणते खेळ खेळू शकतात, याबद्दल पालकांशी चर्चा करावी. उपयोगात नसलेल्या वस्तू टाकून न देता, त्यापासून खेळणी तयार करण्याबद्दल पालकांचे प्रबोधन करावे. पालकांना मुलांबरोबर खेळल्याने होणाऱ्या फायद्याविषयी माहिती द्यावी.

## घटक क्र. ५.५ : जादुई पिटारा

एखाद्या व्यक्तीच्या विकासासाठी आणि संपूर्ण समाजाच्या दीर्घकालीन फायद्यासाठी पायाभूत टप्पा महत्त्वपूर्ण असतो, हे लक्षात घेऊन, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० मध्ये असे उद्दिष्ट मांडण्यात आले आहे, की ३ ते ८ वर्षे वयोगटातील प्रत्येक मुलास, मुक्त, सुरक्षित, उच्च दर्जाचे, विकासाला योग्य असे बालशिक्षण मिळाले पाहिजे. आदर्श बालशिक्षणाचे अध्यापन–अध्ययनशास्त्र हे लवचीक, विविधअंगी, बहुस्तरीय खेळ आणि कृतींवर आधारित असावे, असे राष्ट्रीय धोरणात नमूद केले आहे. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी वयोगटानुसार स्वदेशी खेळणी आणि खेळाची उपकरणे वापरात आणणे आवश्यक आहे. खेळण्यांचा वापर करून, कोणतीही संकल्पना समजून घेणे मुलांना सहज शक्य होते. खेळण्यांमुळे शिकण्याची प्रक्रिया आनंददायी आणि तणावरहित होईल. यासाठी एस.सी.ई.आर.टी. ने पायाभूत टप्प्यात, मुलांसाठी या खेळण्यांचा विचार जादुई पिटाराच्या रूपात केला आहे.

मुले वस्तू हाताळताना, ती जोडतात–तोडतात. विविध पद्धतीने वापरून बघतात. यासाठी वर्गातील वातावरण, हे मुलांना शोध घेण्यास भाग पाडणारे असावे.

त्यासाठी वर्गात विविध पद्धतीने तोडता, जोडता, वेगवेगळ्या पद्धतीने वापरता येणाऱ्या वस्तू/ खेळणी, फ्लॅशकार्ड्स, चित्रकार्ड्स इत्यादी साहित्य मुबलक प्रमाणात उपलब्ध करून दिले पाहिजे. मुलांच्या सभोवतालच्या परिसरात उपलब्ध असलेल्या स्थानिक खेळण्यांचाही उपयोग शिक्षक व पालकांनी मुलांच्या शिकण्याच्या प्रक्रियेत करावा, ज्यामुळे मुलांचे शिकणे आनंदी व तणावमुक्त राहील.

मुलांना वेगवेगळ्या प्रकारचे शैक्षणिक साहित्य हाताळायला मिळणे व सुरक्षित, आरामदायी व आनंदी वर्ग वातावरण तयार होणे हा अत्यंत महत्त्वाचा पैलू आहे. यातूनच पायाभूत टप्प्यात ती चांगल्या प्रकारे शिकती होतील व त्यांचा सर्वांगीण विकास होईल. विशेष गरजा असणाऱ्या मुलांच्या क्षमतादेखील दिलेल्या साहित्याचा वापर करून, कशा विकसित होतील याचादेखील विचार व्हावा.

### जादुई पिटाऱ्याची गरज :

मुलांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी, मुक्त खेळाला जास्त वेळ दिला पाहिजे. या मुक्त खेळात सर्व विकासक्षेत्रांचा विकास होण्यासाठी, योग्य आणि चांगल्या दर्जाचे शैक्षणिक साहित्य मुलांना पुरवले गेले पाहिजे. तसेच पायाभूत स्तरावर मुलांना केंद्रस्थानी ठेवून उत्कृष्ट दर्जाचा अभ्यासक्रम व वर्ग वातावरण तयार करण्यासाठीसुद्धा शैक्षणिक साहित्याची गरज असते. सर्वसमावेशक साहित्यामुळे, संकल्पना शिकणे

आणि शिकवणे चांगले आणि सोपे होते. त्यामुळे एकीकडे मुलांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि दुसरीकडे संसाधनांसह शिक्षकांना सुसज्ज करण्यासाठी, जादुई पिटाऱ्याची गरज होती.

परिणामकारक आणि आनंदी शिक्षणासाठी मुलांना स्वतःच्या हाताने, प्रत्यक्ष कृती करू दिली पाहिजे. मुले प्रत्यक्ष कृती करूनच, अनुभवानेच, अवतीभवतीच्या वातावरणाबद्दल शिकत असतात. वय आणि विकासाच्या दृष्टीने, योग्य असे शिकण्यासाठी व शिकवण्यासाठीचे जादुई पिटाऱ्यातील साहित्य, मुलांना प्रत्यक्ष कृती करून शिकण्याची व शिक्षकांना प्रत्यक्ष कृती करून संकल्पना उलगडून सांगण्याची संधी देईल, तसेच विचार करणे, तर्क करणे, वर्गीकरण करणे, समस्या सोडवणे इत्यादी कौशल्ये विकसित होण्यास मदत होईल. पायाभूत स्तरासाठी जादुई पिटाऱ्याचे महत्त्व व गरज अनन्यसाधारण आहे.

**विकास क्षेत्र १ : शारीरिक विकास (अन्नमय कोश, प्राणमय कोश)**

मुले जेव्हा खेळतात, तेव्हा ते ऐकणे, पाहणे, स्पर्श करणे, चाखणे, वास घेणे आणि वेगवेगळ्या हालचाली करणे या सर्व गोष्टींचा उपयोग करून, सकारात्मक अनुभव घेतात. सकारात्मक शिक्षण व अनुभव लहान मुलांच्या विकसनशील मेंदूला यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेल्या पेशींची जोडणी करतात.

**विकास क्षेत्र २ : सामाजिक, भावनिक, नैतिक विकास (मनोमय कोश)**

सामाजिक विकास ही एक सक्रिय व परस्परसंवादी प्रक्रिया आहे. मुले त्यांच्या सामाजिक व सांस्कृतिक अनुभवांमध्ये सक्रियपणे गुंतलेली असतात आणि त्यांच्या धारणा आणि त्यांचे अनुभव समजून घेण्यासाठी ती सतत नवीन माहिती मिळवत असतात व त्याचा उपयोग करून बघत असतात. मुले जेव्हा साथीदारांसोबत खेळत असतात त्यावेळेस त्यांना त्यांच्यासोबत समन्वय साधण्यासाठी मदत होते व त्याचबरोबर लोकांशी नातेसंबंध जोपासता येतात. समूहात कसे वावरता येते, हे यातून मुले शिकत असतात.

सामाजिक भावनिक नैतिक विकासाच्या दृष्टीने, पेटीमध्ये काही साहित्य दिले आहे, त्याचा वापर कसा करावा हे बघण्यासाठी, घटकसंच ६ मधील व्हिडिओ पाहावेत.

**विकास क्षेत्र ३ – बोधात्मक विकास (विज्ञानमय कोश)**

मुलांमध्ये निरीक्षणक्षमता, तार्किक विचार, क्रमिक विचार, स्मरणशक्ती व गणितीय क्षमता जसे, आकार, प्रमाण, मोजमापे इत्यादी विकसित करण्यासाठी जादुई पिटाऱ्यातील खेळणी उपयुक्त आहेत. चित्रांचे निरीक्षण करून, वर्णन करण्यात व चित्रांचे विविध तुकडे जोडून चित्र पूर्ण करण्यात मुलं गुंततात. खेळाच्या माध्यमातून संख्यांची ओळख, क्रमबद्धता शोधण्यास मदत होते, तसेच मुलांची निर्णय क्षमता विकसित होते व समस्या निराकरण करण्याची वृत्ती वाढीस लागते.

जादुई पिटाऱ्यातील खेळण्यांचा वापर कसा करावा व कोणती खेळणी या विकासक्षेत्रासाठी वापरावीत या घटकाचे व्हिडिओ युनिलर्न या प्लॅटफॉर्मवर पाहा.

**विकास क्षेत्र ४ – भाषा आणि साक्षरता विकास (विज्ञानमय कोश)**

खेळ ही मुलांची सहजप्रवृत्ती असल्यामुळे, खेळांद्वारे शब्दसंग्रह, कल्पनाशक्ती वाढते. बोलणे, ऐकणे यातून मुलांची भाषिक कौशल्ये विकसित होतात. मुले खेळत असताना जोडीदारासोबत संवाद साधतात, त्यातून त्यांचे संवादकौशल्य विकसित होते. खेळातून ती व्यक्त होताना दिसतात आणि त्यांच्या कल्पना वास्तविक जीवनाशी जोडतात. वेगवेगळ्या चित्रांचे निरीक्षण करून व्यक्त होताना दिसून येतात. याद्वारे मुलांचा भाषिक विकास होतो. जादुई पिटाऱ्यामध्ये अशी काही खेळणी आहेत, जी मुलांच्या भाषिक विकासास साहाय्यभूत होतील.

**विकास क्षेत्र ५ – सौंदर्य दृष्टी आणि सांस्कृतिक विकास (आनंदमय कोश)**

मुले कलेच्या माध्यमातून स्वतःच्या कल्पना आणि भावना व्यक्त करण्यासाठी सर्जनशील कल्पकतेने काम करतात. खेळता खेळता त्रिमितीय (3 D) व द्विमितीय (2 D) कलाकृती तयार करून त्याचा वापर अध्ययनासाठी करणे, विविध संकल्पना समजण्यासाठी करणे, हेही यातून साध्य करता येते व नवनिर्मितीचा आनंद मुलांना मिळतो. अभिनय, नृत्य आणि विविध हालचाली करण्यासाठी स्वत:चा आवाज शरीर, जागा आणि विविध वस्तूंचा चौकसपणे उपयोग करतात.

**प्रात्यक्षिक :**

१) अंगणवाडीत मुक्तखेळ मांडून मुले त्याबरोबर खेळत असताना, त्यांचे फोटो काढा. मुलांच्या खेळाचे निरीक्षण करून नोंदी लिहा.

२) मुलांना खेळणी खेळायला द्या. त्याचे फोटो काढून जोडा. मुले खेळण्यांबरोबर काय करत आहेत, याचे निरीक्षण करून नोंदी लिहा.

३) भाषासाक्षरता विकासासाठी तुम्ही कोणती खेळणी तयार कराल त्यांची सविस्तर माहिती लिहा.

४) गणनपूर्व संकल्पनांसाठी तुम्ही कोणती खेळणी तयार कराल याची माहिती सविस्तरपणे लिहा.

५) तुमच्या अंगणवाडीत असलेल्या किमान १० खेळण्यांची यादी तयार करा, त्यामुळे मुलांच्या कोणत्या विकासाला त्यांचा विविध प्रकारे फायदा होईल ते लिहा.

---

## स्वाध्याय

१) खेळ म्हणजे काय, हे सांगून खेळांचे बालकांच्या विकासातील महत्त्व सविस्तरपणे लिहा.

२) तुमच्या अंगणवाडीतील मुलांचे निरीक्षण करून, ते खेळाच्या कोणत्या पायरीवर आहेत ते लिहा. त्यांचा सामाजिक विकास होण्यासाठी कोणत्या खेळांचे नियोजन करता येईल, ते सविस्तरपणे लिहा.

३) खेळाच्या विविध पद्धतींबाबत सविस्तर माहिती द्या.

४) मुक्तखेळ व मार्गदर्शित खेळ यांमधील फरक उदाहरणे देऊन स्पष्ट करा.

५) बोधात्मक विकासासाठी उपयुक्त संरचित खेळांची यादी करा. दोन खेळांची सविस्तर माहिती द्या.

६) खेळणी आधारित अध्ययन पद्धती म्हणजे काय? दोन खेळण्यांची सविस्तर माहिती लिहा.

७) तुम्हांला तुमच्या अंगणवाडीतील मुलांसाठी कोणती खेळणी तयार करणे गरजेचे वाटते? खेळणी निर्मिती करताना कोणत्या बाबी लक्षात घ्याल.

८) खेळांचे नियोजन करताना, कोणत्या बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे ते सविस्तर लिहा.

९) तुम्ही खेळ व खेळणी आधारित अध्ययन पद्धतीचा वापर करण्यासाठी, पालकांचा सहभाग कोणत्या प्रकारे घ्याल?

१०) मुलांच्या शारीरिक विकासाच्या टप्प्यांच्या आधारे त्यांच्या खेळाचे टप्पे/पायऱ्या लिहा.

११) मार्गदर्शित खेळ म्हणजे काय ते सांगून, दोन खेळांच्या कृती सविस्तर लिहा.

१२) संरचित खेळ म्हणजे काय ते सांगून, त्याची दोन उदाहरणे कृतींसह सविस्तर स्पष्ट करा.

# घटकसंच ६ : साक्षरता व संख्याज्ञान




रूढ अर्थाने अस्खलित वाचक आणि लेखक बनण्याआधीच, बालके वाचन–लेखनाविषयी जी कौशल्ये, विचार व ज्ञान विकसित करतात, त्यास ‘उदयोन्मुख साक्षरता’ असे म्हटले जाते. छापील साहित्याची ओळख करून देऊन, लेखन आणि वाचन यांसाठी संधी दिल्याने पारंपरिकपणे (अक्षरे आणि शब्द वापरून) नि:सांकेतिकरण (सांकेतिक लिपीचा अर्थबोध) करण्यास शिकण्याआधीच बालके अगदी लहानपणापासूनच वाचन आणि स्व–लिपीत लेखन करू शकतात.

*(संदर्भ : राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर – २०२४ : पृष्ठ क्र. ३७)*

**घटकसंचाविषयी थोडेसे....**

लहान मुलांबरोबर भाषा व गणित या विषयांवर कसे काम करावे, याबद्दल आपण या घटकसंचात जाणून घेणार आहोत. या घटकात आपण उदयोन्मुख साक्षरता, मजकूर समृद्ध वातावरण, उदयोन्मुख वाचन, उदयोन्मुख लेखन, सहभागी लेखन, भाषेच्या रचनेची जाणीव, लिपी परिचय, गणनपूरक संबोध, संख्याज्ञान, मापन हे उपघटक अभ्यासणार आहोत.

## माझ्या नोंदी :

# घटकसंच ६ : साक्षरता व संख्याज्ञान

लहान मुलांबरोबर भाषा व गणित या विषयांवर कसं काम करावं, याबद्दल आपण या घटकसंचात जाणून घेणार आहोत. या घटकात आपण उदयोन्मुख साक्षरता, मजकूर समृद्ध वातावरण, उदयोन्मुख वाचन, उदयोन्मुख लेखन, सहभागी लेखन, भाषेच्या रचनेची जाणीव, लिपी परिचय, गणन पूरक संबोध, संख्याज्ञान, मापन हे उपघटक अभ्यासणार आहोत.

**या घटकसंचात**

| | | | |
|---|---|---|---|
| ६.१ | उदयोन्मुख साक्षरता | ६.६ | भाषेच्या रचनेची जाणीव |
| ६.२ | मजकूर समृद्ध वातावरण | ६.७ | लिपी–परिचय |
| ६.३ | उदयोन्मुख वाचन | ६.८ | गणनपूरक संबोध |
| ६.४ | उदयोन्मुख लेखन | ६.९ | संख्याज्ञान |
| ६.५ | सहभागी लेखन | ६.१० | मापन |

## घटक क्र. ६.१ : उदयोन्मुख साक्षरता

### या घटकात आपण काय शिकणार?

### उदयोन्मुख साक्षरता

मूल साक्षर होण्याची सुरुवात केव्हा होते? रस्त्याने जाताना मुले म्हणतात, ‘हे पाहा इथे आईस्क्रिम चे दुकान आहे.’ किंवा ‘इथे दुकानाचे नाव लिहिले आहे.’ किंवा ’इथे गाडीचा नंबर लिहिला आहे.’ अक्षर ओळखही नसलेली मुले लिखित चिन्हांचा योग्य अर्थ लावत असतात. लिखित चिन्हे किंवा अक्षरे व शब्द आणि चित्रे अर्थपूर्ण असतात. ही जाणीव झालेल्या मुलांची साक्षर होण्यास सुरुवात झाली आहे असे म्हणता येईल. यालाच उदयोन्मुख साक्षरता म्हणतात.

सूर्योदय हा शब्द सर्वांना परिचित आहे. उदय होणे म्हणजे उगवणे हा अर्थही सर्वांना माहीत आहे. सूर्य जसा उगवतो किंवा बीजाला जसा अंकुर फुटतो, तशीच साक्षरतेची संकल्पनाही हळूहळू विकसित होते, म्हणून रूढ अर्थाने मूल लिहिते–वाचते होण्याआधीपासूनच लिहिण्या–वाचण्याविषयी त्याच्या मनात काही जाण निर्माण झालेली असते. मुलांच्या वागण्यातून ते आपल्याला समजते. मुलांच्या या वागण्याला आपण ‘उदयोन्मुख साक्षरता’ म्हणतो.

आजूबाजूच्या मोठ्या माणसांचे किंवा मोठ्या मुलांचे निरीक्षण करून, छोटी मुले वाचनाचे नाटक करू लागतात. कधी वाचून दाखवलेली गोष्ट तशीच म्हणून दाखवतात, तर कधी चित्रांना अनुसरून त्यात बदल करतात. या त्यांच्या वाचनाला ‘उदयोन्मुख वाचन’ म्हणतात.

मूल स्वतःच्या भावना व्यक्त करण्यासाठी चित्र काढायला सुरुवात करते. हे चित्र म्हणजे मुलाच्या लेखनाची सुरुवात असते. या चित्रांबरोबरच मुले खडू, पेन घेऊन कागदावर गिरगिटतात. गिरगटणे हे त्यांच्या स्वत:च्या लिपीतले लेखनच असते. हे त्यांचे गिरगिटणे म्हणजे त्यांची स्व–लिपीतील अभिव्यक्ती असते, याला उदयोन्मुख लेखन म्हणतात.

मुलांना शाळेत गेल्यानंतर, अक्षरे शिकविल्यावर आणि ती त्यांना ओळखता व लिहिता यायला लागल्यावर, मुलांच्या साक्षरतेची सुरुवात होते असे पूर्वी समजले जात असे, पण आता आपल्याला माहीत आहे, की उदयोन्मुख साक्षरतेची सुरुवात कितीतरी आधीपासून होते. या घटकात आपण त्याबद्दल शिकणार आहोत.

उदयोन्मुख साक्षरतेबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी घटकसंच सहामधील पहिला 'उदयोन्मुख साक्षरता' हा व्हिडिओ पाहा व त्याबरोबर दिलेले प्रश्न सोडवा.

**या घटकासाठी प्रात्यक्षिक काम नाही.**

या घटकाचा व्हिडिओ पाहिल्यानंतर खालील प्रश्नांची उत्तरे लिहूया.

१) मुलांच्या साक्षरतेची सुरुवात कधीपासून होते? तुम्ही आपल्या अंगणवाडीमधील मुलांमध्ये उदयोन्मुख साक्षरतेची लक्षणे बघितली आहेत का, त्याबद्दल लिहा.

## घटक क्र. ६.२ : मजकूर समृद्ध वातावरण

**या घटकात आपण काय शिकणार?**

६.२.१ भाषासमृद्ध वातावरण

६.२.२ तारेवरचे वाचनालय

६.२.३ वर्गातील तक्त्यांचे वाचन

### ६.२.१ भाषासमृद्ध वातावरण :

मुलांच्या लेखन–वाचनाची, म्हणजेच उदयोन्मुख साक्षरतेची सुरुवात कधी व कशी होते, ते आपण मागच्या घटकात बघितले. उदयोन्मुख साक्षरतेसाठी, मुलांना लेखन–वाचनाचे वातावरण देणे गरजेचे असते. मुलांना पुस्तके वाचून दाखवणे, त्यांना अर्थपूर्ण लेखनाच्या संधी देणे गरजेचे असते. यासाठी अंगणवाडीमध्ये भाषासमृद्ध वातावरण तयार करणे गरजेचे आहे.

भाषासमृद्ध वातावरण म्हणजे असे वातावरण, की जेथे मुलांना तोंडी व लेखी भाषा स्वेच्छेने (स्वत:च्या इच्छेने), उस्फूर्तपणे, विविध हेतूंसाठी वापरून पाहण्याच्या संधी उपलब्ध असतात. मजकूरसमृद्ध वातावरण म्हणजे, जिथे मुलांच्या परिसरात विपुल प्रमाणात लिखित साहित्य उपलब्ध असते, यालाच लेखनसमृद्ध वातावरण असे देखील म्हणतात. असे वातावरण निर्माण करण्यासाठी, अंगणवाडीमध्ये मुलांना छोट्या गटांमध्ये एकमेकांशी मुक्तपणे बोलता येईल, अशा

संधी उपलब्ध असायला हव्यात. आपण आपल्या अंगणवाडीमध्ये मुलांसाठी छोट्या छोट्या सूचना लिहून ठेवू शकतो. उदा. – येथे चपला काढा, खेळण्याचे सामान इथे ठेवा इत्यादी. मुलांना सहजपणे दिसेल अशा उंचीवर अंगणवाडीत घेतली जाणारी बडबडगीते, गाणी, गोष्टी चार्टवर लिहून लावावी. मुलांची उपस्थिती लिहिण्यासाठी तक्ता लावावा व त्यावर सही करण्याची संधी मुलांना दररोज द्यावी.

वर्गात लावलेल्या या वेगवेगळ्या प्रकारच्या मजकुराकडे मुलांचे लक्ष वेधावे, तो मजकूर वापरण्याची संधी त्यांना द्यावी. वर्गात एखादी सूचना कुठे लिहिली आहे, ते दाखव किंवा इथे कोणती सूचना लिहिली आहे, ते सांग अशा कृती करून घ्याव्यात. मुलांनी केलेले लेखन, काढलेली चित्रे, केलेले रंगकाम वर्गात प्रदर्शित करावे. मुलांचे काम प्रदर्शित करणे, हे भाषासमृद्ध वातावरण तयार करण्यासाठी अतिशय महत्त्वाचे आहे.

वर्गात भाषासमृद्ध वातावरण कसे तयार करावे, हे समजून घेण्यासाठी घटकसंच सहामधील 'भाषासमृद्ध वातावरण' हा व्हिडिओ पाहा व त्याबरोबर दिलेले प्रश्न सोडवा.

### ६.२.२ तारेवरचे वाचनालय :

मजकूरसमृद्ध वातावरण तयार करण्यासाठी आणि मुलांचा उदयोन्मुख साक्षरतेकडे प्रवास करण्यासाठी, वर्गात तारेवरचे वाचनालय तयार करणे हा एक सोपा पर्याय आहे. लहान मुलांचा साक्षरतेकडील प्रवास गोष्टींच्या पुस्तकांच्या माध्यमातून सहजपणे करता येतो. वर्गात तारेवरचे वाचनालय तयार करण्यासाठी मुलांचा हात पोहोचेल अशा उंचीवर दोन खिळ्यांच्या मदतीने तार लावून घ्यावी. या तारेवर पुस्तके बरोबर मध्यभागी उघडून उलटी ठेवता येतात. अशा वाचनालयामुळे मुलांना त्यांच्या आवडीची पुस्तके रिकाम्या वेळात हाताळता येतात. पुस्तक हाताळण्यासंबंधी सूचना लिहून, त्या तारेवरच्या वाचनालया शेजारी लावता येतील. त्या मुलांना वाचून दाखवल्या, म्हणजे वाचनालयाचा वापर कसा करावा हे मुलांना कळते.

**प्रात्यक्षिक काम**
आपल्या वर्गात लिखित साहित्य लावा व त्याचा फोटो गटावर टाका.

### ६.२.३ वर्गातील तक्त्यांचे वाचन :

मुलांसाठी मजकूरसमृद्ध वातावरण तयार करताना, या लिहिलेल्या मजकुराचा मुलांना वापर करता यायला हवा. यासाठी वर्गात दैनिक नियोजनाचे तक्ते, मुलांच्या उपस्थितीचे तक्ते, कॅलेंडर यांचा वापर करू शकतो. हे तक्ते मुलांना वाचून दाखवायला हवेत. हळूहळू मुलांना हे तक्ते परिचयाचे झाले, की त्यांना वाचायची संधी द्यायला हवी. अशाप्रकारे मुलांना तक्ते वाचून दाखवल्याने, आपल्या अंगणवाडीचे दैनिक

**प्रात्यक्षिक काम**
वर्गात तारेवरचे वाचनालय तयार करावे व त्याचा फोटो गटावर पाठवावा.

नियोजन असते, ताई ते लिहून ठेवतात, आपल्याला ते वाचता येते, ताई ते नियोजन वाचून कृती घेतात, हे मुलांच्या लक्षात येते. यातून मुलांचा साक्षरतेकडे प्रवास सुरू होतो.

> **प्रात्यक्षिक काम**
> आपल्या वर्गात दैनिक नियोजनाचा तक्ता लावावा व त्यावरील नियोजन मुलांना वाचून दाखवावे व त्याचा व्हिडिओ गटावर टाकावा.

या घटकाचा व्हिडिओ पाहिल्यानंतर, खालील प्रश्नांची उत्तरे लिहूया.

१) मुलांसाठी वर्गात भाषासमृद्ध वातावरण असणे का गरजेचे आहे व ते तयार करण्यासाठी काय करावे लागेल?

२) वर्गात तारेवरचे वाचनालय असल्याने काय फायदे होतात?

## घटक क्र. ६.३ : उदयोन्मुख वाचन

**या घटकात आपण काय शिकणार?**

६.३.१ उदयोन्मुख वाचन म्हणजे काय?

६.३.२ प्रकटवाचन

६.३.३ सहभागी वाचनाची ओळख

६.३.४ सहभागी वाचन कसे करावे

### ६.३.१ उदयोन्मुख वाचन म्हणजे काय? :

मुलांना अक्षरे कळू लागण्याच्या बऱ्याच आधी, त्यांची साक्षर होण्याची प्रक्रिया सुरू झालेली असते, हे आपण पहिल्या घटकात पाहिले. आता मुलांच्या वाचनाची सुरुवात कशी होते हे पाहूया. मूल मोठ्यांना पुस्तके, बातमीपत्र, लिहिलेल्या सूचना, वस्तूंच्या किमती वाचताना पाहते. लिहिलेल्या मजकुराला काही तरी अर्थ असतो, हे यातून मुलांच्या लक्षात यायला लागते. वाचताना डावीकडून उजवीकडे, वरून खाली वाचतात, हे मुलाला कळायला लागते. लिहिलेल्या मजकुरात आणि चित्रांत मूल फरक करू लागते. बऱ्याचदा मूल एकही अक्षर माहिती नसतानादेखील, त्यांना माहिती असलेल्या गोष्टीचे पुस्तक वाचण्याची नक्कल करू लागते, याला मुलांचे उदयोन्मुख वाचन म्हणतात, पण यासाठी मुलांचा परिसर लेखी भाषेने समृद्ध असणे गरजेचे असते.

उदयोन्मुख वाचन म्हणजे काय आणि मुलांच्या भाषा विकासासाठी, मुलांबरोबर चित्रगप्पा कशा कराव्यात, हे समजून घेण्यासाठी घटकसंच सहामधील उदयोन्मुख वाचन हा व्हिडिओ पाहा.

### ६.३.२ प्रकटवाचन :

मुलांना गोष्टी सांगणे, गोष्टी वाचून दाखवणे साक्षरतेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे असते.

पुस्तकामध्ये गोष्टी असतात त्या आपण वाचू शकतो हे मुलांना कळायला हवे. यासाठी आपण मुलांबरोबर गोष्टीच्या पुस्तकांचे प्रकट वाचन करू शकतो. प्रकटवाचन म्हणजे आपण गोष्टीचे पुस्तक घेऊन त्यातील गोष्ट मुलांना आवाजातील चढ–उतारासह वाचून दाखवणे. वाचून दाखवताना मुलांना गोष्टीतील चित्रेदेखील वाचन थांबवून दाखवावीत. गोष्ट वाचून दाखवताना, काही ठिकाणी थांबून मुलांबरोबर चर्चा करता येते. यातून मुलांना विचार करण्याची संधी देता येते.

प्रकटवाचन करताना 'आता पुढे काय होईल बरे गोष्टीत', 'कशाचा आवाज आला असेल?' असे प्रश्न विचारून मुलांना विचार करण्याची संधी देता येते. गोष्टीची रचना कशी असते, याकडेदेखील आपण मुलांचे लक्ष, प्रकट वाचनाच्या माध्यमातून वेधू शकतो. चांगले वाचक कसे वाचतात, याचे एक उदाहरण आपण प्रकट वाचनातून मुलांना दाखवत असतो.

**प्रात्यक्षिक काम**

प्रकटवाचन या व्हिडिओच्या आधारे अंगणवाडीत मुलांसोबत वाचन करावे. यासाठी ४ ते ५ मिनिटांत वाचता येईल, अशी गोष्ट निवडून त्याचा व्हिडिओ गटावर टाकावा.

प्रकटवाचन म्हणजे काय आणि मुलांबरोबर प्रकट वाचन कसे करावे, हे समजून घेण्यासाठी घटकसंच सहामधील प्रकटवाचन हा व्हिडिओ पाहा व त्याबरोबर दिलेले प्रश्न सोडवा.

### ६.३.३ सहभागी वाचनाची ओळख :

मुलांना साक्षर बनवण्यासाठी, प्रकटवाचनाच्या जोडीने सहभागी वाचनदेखील महत्त्वाचे आहे. सहभागी वाचनात, त्याच्या नावाप्रमाणे मुलांचा सहभाग आपल्याला घ्यायचा आहे. सहभागी वाचनात आपण पुस्तक वाचत असताना ते सर्व मुलांना दिसेल अशा प्रकारे धरायला हवे. प्रत्यक्ष वाचनाला सुरुवात करण्यापूर्वी पुस्तकाचे मुखपृष्ठ, मलपृष्ठ यांच्याविषयी चर्चा करावी. त्यावर पुस्तकाचे नाव कोठे लिहिले आहे, लेखकाचे नाव कोठे लिहिले आहे, चित्रात काय दाखवले आहे याविषयी चर्चा करावी. मुलांना पुस्तक वाचून दाखवताना, आपण वाचत असलेल्या प्रत्येक शब्दावर बोट ठेवून वाचावे, पुन्हा पुन्हा येणारे शब्द मुलांना ठासून सांगावे. यातून लिपीची वैशिष्ट्ये मुलांना माहिती व्हायला लागतात. पुस्तकाचे सहभागी वाचन एकदा करून पुरेसे होत नाही. एकदा वाचून दाखवल्यावर मुलांना पुस्तकाचा परिचय होतो आणि पुढच्या वेळी वाचताना मुलांचा वाचनात सहभाग वाढत जातो.

**प्रात्यक्षिक काम**

सहभागी वाचन या व्हिडिओच्या आधारे अंगणवाडीत मुलांसोबत लहान गोष्टीचे सहभागी वाचन करावे व त्यानंतरच्या कृती घेऊन, त्यांचा व्हिडिओ गटावर टाकावा.

सहभागी वाचन म्हणजे काय? मुलांबरोबर सहभागी वाचन कसे करावे, हे समजून घेण्यासाठी घटकसंच सहामधील 'सहभागी वाचन, हा व्हिडिओ पाहा व त्याबरोबर दिलेले प्रश्न सोडवा.

### ६.३.४ सहभागी वाचन कसे करावे :

एका पुस्तकाचे सहभागी वाचन अंगणवाडीमध्ये काही दिवस तरी चालायला हवे. प्रत्येक दिवशी सहभागी वाचन एकेका टप्प्याने पुढे जाते, सहभागी वाचनात मुलांचा सहभाग वाढत जातो. पहिल्या दिवशी आपण मुलांना पुस्तकाचे मुखपृष्ठ दाखवून, त्यावर चर्चा करून, पुस्तक मुलांना दाखवत ओघवते वाचून दाखवावे, मधे मधे काही प्रश्नदेखील विचारावे.

दुसऱ्या दिवशी सहभागी वाचन करताना, मुलांचा सहभाग वाढलेला आपल्याला दिसतो. यासाठी ताईंनीदेखील मुलांना एखादा शब्द कोठे लिहिला आहे, ते दाखवायला सांगावे. जास्त प्रश्न विचारून मुलांचा सहभाग वाढवण्याचा प्रयत्न करावा.

अंगणवाडीमध्ये सहभागी वाचन कसे करावे, टप्प्याटप्प्याने ते पुढे कसे घेऊन जावे, हे समजून घेऊन, त्याबरोबर दिलेले प्रश्न सोडवा.

या घटकाचा व्हिडिओ पाहिल्यानंतर, खालील प्रश्नांची उत्तरे लिहूया.

१) मुलांचे उदयोन्मुख वाचन म्हणजे काय? उदयोन्मुख वाचन करण्यासाठी अंगणवाडीमध्ये आपण मुलांना कशा प्रकारे मदत करू शकतो?

२) सहभागी वाचन म्हणजे काय? सहभागी वाचन करताना काय काय करायला हवे?

## घटक क्र. ६.४ : उदयोन्मुख लेखन

**या घटकात आपण काय शिकणार आहोत?**

### उदयोन्मुख लेखन :

लहान मूल अनेकदा कागदावर काहीतरी गिरगिटत असते किंवा चित्र काढण्याचा प्रयत्न करत असते, पण ही चित्रे मोठ्यांना कळतील अशी नसतात. मग ही मुले नेमके काय काढत असतात? आता आपल्याला विविध संशोधनातून हे समजले आहे, की मुलांची ही चित्रे किंवा गिरगिटणे, म्हणजेच मुलांचे लेखन आहे. मोठ्यांना जरी त्यातला अर्थ कळत नसला, तरी मुलांच्या दृष्टीने त्याला अर्थ असतो. हळूहळू मुले या प्रकारच्या लेखनातून प्रमाण लेखनाकडे वळतात. मुलांच्या या प्रकारच्या लेखनाला, आपण 'उदयोन्मुख लेखन' म्हणतो. मुले मोठ्यांना न समजणारे हे जे लेखन करतात, त्या लेखनाच्या लिपीला आपण मुलांची स्वलिपी म्हणतो.

मुलांच्या लेखनाला प्रोत्साहन देण्यासाठी, सुरुवातीला त्यांना लेखनाच्या अर्थपूर्ण संधी देणे गरजेचे असते. अशा लेखनाच्या संधी मुलांना कशा द्याव्या? यासाठी आपण मुलांना त्यांच्या वयाला साजेशा गोष्टी सांगून, त्या गोष्टीविषयी लिहायला सांगू शकतो. अशा वेळी मुले सुरुवातीला काही चित्रे काढतात. मुलांनी अशी चित्रे काढली, की आपण त्या चित्रांविषयी मुलांबरोबर गप्पा मारायला हव्यात. मुलांनी काय काढलंय,

हे मुलांना विचारून, आपण ते त्यांच्या चित्राच्या खाली लिहून द्यावे. आपण मुलांच्या चित्रामध्ये रस दाखवणे मुलांच्या दृष्टीनं खूप महत्त्वाचे असते. अशावेळी मुलांच्या चित्रातील चुका काढू नयेत.

मुलांना लिहिण्याचे विषय मिळावे यासाठी मुलांना वेगवेगळे अनुभव देता येतात. मुलांना गोष्टी सांगणे, त्यांच्या बरोबर गप्पा मारणे, त्यांना फिरायला घेऊन जाणे, पुस्तक वाचून दाखवणे, वर्गात वेगवेळ्या कृती (पाककृती) करून दाखवून, त्याविषयी लिहायला देणे, असे वेगवेगळे अनुभव आपण मुलांना देऊ शकतो.

हळूहळू मुले चित्रांच्या पुढे जाऊन स्वतःची लिपी तयार करून लिहू लागतात. या लिपीत गोळे, अस्ताव्यस्त रेषा किंवा इतर वेगवेगळे आकार असतात. ही लिपी मोठ्यांना कळत नाही. मुलांच्या या लिपीला मुलांची स्वतःची लिपी म्हणजेच स्व–लिपी म्हणतात. या नंतर मुलांच्या लेखनात प्रमाण मानल्या जाणाऱ्या म्हणजेच प्रमाणलिपीची वैशिष्ट्ये दिसू लागतात, म्हणजे मुलांनी स्व–लिपीत लेखन केले असले, तरी या लेखनात मुलांनी अक्षरांवर टोप्या म्हणजे शिरोरेषा दिलेल्या दिसतात, दोन शब्दांमध्ये अंतर सोडलेले असते. जसजसे आपण मुलांना अक्षरे व अंकांची ओळख करून द्यायला लागतो, तसतसे ही अक्षरे किंवा अंक मुलांच्या स्वलिपीत दिसू लागतात, पण ही अक्षरे किंवा अंक, कुठेही कशीही वापरलेली असतात. आताही हे लेखन मोठ्यांना वाचता येईलच असे नाही. मुलांना विचारून, हे लेखन आपण समजून घ्यावे आणि त्याच्या बाजूला किंवा खाली, आपण ते प्रमाण लेखनाची लिपी वापरून मुलांना लिहून दाखवावे.

मुलांच्या लेखनावर प्रतिक्रिया देताना, मूल त्याचे विचार अधिक सुसूत्रपणे मांडू शकेल, लेखनात आणखी माहितीची, भावनांची भर घालू शकेल अशा प्रकारे प्रतिक्रिया द्यावी. एक उदाहरण पाहूया. जर मुलाने गावातील यात्रेबद्दल लिहिले असेल, तर त्याला आपण पुढील प्रकारे प्रतिक्रिया देऊ शकतो. 'तू जे लिहिले आहेस, त्यातून मला तुझ्या गावातील यात्रेबद्दल कळले, तिथे खाऊची दुकाने होती, खेळण्यांची दुकाने होती हे पण कळले, पण तू या जत्रेत कोणाबरोबर गेला होतास, जत्रेतून खेळणी घेतल्यावर तुला काय वाटले, दुकानदाराबरोबर तू काय बोललास, हे पण लिहितोस का?'

पुढच्या टप्प्यात मुलांच्या हे लक्षात येते, की आपण जे लिहितो आहोत ते आणि मोठे जे लिहितात त्यात बराच फरक आहे. अशावेळी बऱ्याचदा मुले 'मला लिहिता येत नाही' असे म्हणतात. आपण मुलांबरोबर काम करत रहावे. हळूहळू मुले प्रमाणलिपीतील अक्षरे वापरून लिहायला लागतात. यावेळी मुलांच्या लेखनातील अक्षरे सुंदर काढण्याकडे जास्त लक्ष न देता, मुलांनी काय लिहिले आहे, त्यातील आशयाकडे जास्त लक्ष देणे गरजेचे आहे.

उदयोन्मुख लेखन म्हणजे काय, मुलांच्या उदयोन्मुख लेखनाचे टप्पे कोणते हे समजून घेण्यासाठी, घटकसंच सहामधील 'उदयोन्मुख लेखन' हा व्हिडिओ पाहा व त्याबरोबर दिलेले प्रश्न सोडवा.

**प्रात्यक्षिक काम**

वर्गात मुलांना पुस्तके वाचून दाखवल्यावर, तोंडी गोष्टी सांगितल्यावर किंवा त्यांना आलेल्या अनुभवावर मुलांना उदयोन्मुख लेखन करायला द्या. मुलांचे लेखन झाल्यावर त्यांनी काय काय लिहिले हे त्यांना विचारून खाली लिहा. मुलांनी केलेल्या उदयोन्मुख लेखनाचे फोटो गटावर टाकावे.

या घटकाचा व्हिडिओ पाहिल्यानंतर खालील प्रश्नांची उत्तरे लिहूया.

१) मुलाचे उदयोन्मुख लेखन म्हणजे काय? मुलांचे उदयोन्मुख लेखन टप्प्याटप्प्याने कसे विकसित होते?

## घटक क्र. ६.५ : सहभागी लेखन

**या घटकात आपण सहभागी लेखन समजून घेऊ.**

### सहभागी लेखन :

बोललेली भाषा कशी लिहिली जाते, याचे प्रात्यक्षिक अंगणवाडीत मुलांसमोर दाखवल्याने, मुलांची लेखी मजकुराची समज वाढते. यासाठी मुलांनी आपले अनुभव सांगणे आणि ताईंनी ते मुलांसमोरच लिहून दाखवणे, हे अंगणवाडीत नेमाने करावे लागते. अशा प्रकारे मुलांचा सहभाग घेत घेत केलेल्या लेखनाला, सहभागी लेखन म्हणतात. मुलांसमोर लेखनाचे प्रात्यक्षिक केल्यास त्यातून मुले लेखी मजकुराबाबतच्या अनेक बाबी शिकतात. जसे की, आपल्या बोलण्यात शब्द आणि वाक्ये असतात. त्यांचे लेखन डावीकडून उजवीकडे आणि वरून खाली केले जाते. लिहिताना दोन शब्दांमध्ये जागा सोडतात, लिहिलेला मजकूर पुन्हा-पुन्हा वाचता येतो, मराठीत शब्दाच्या डोक्यावर रेषा देतात इत्यादी. मुलांचे बोलणे लिहून दाखवण्याच्या अनेक जागा अंगणवाडीच्या कार्यक्रमात असतात. वर उदयोन्मुख लेखन या भागात, मुलांना लिहिण्याची संधी देण्यासाठी काय करता येईल ते सांगितलेले आहे. त्यातील एक अनुभव घेऊन, मुलांसाठी सहभागी लेखन कसे करता येईल ते पाहूया.

समजा, आपण मुलांना दुकानात भेटीसाठी घेऊन गेलो आणि त्यानंतर मुलांबरोबर चर्चा करत, आपण या अनुभवाचे सहभागी लेखन करत आहोत. यासाठी पहिल्यांदा मुलांबरोबर, या भेटीत त्यांनी काय-काय पाहिले हे आपण आता लिहिणार आहोत, असे म्हणून त्यांनी काय काय पाहिले असे विचारावे.

मुले जे सांगतील, ते मुलांसमोर फळ्यावर लिहीत जावे. काय सांगावे, हे सुचण्यासाठी आपण मुलांना सूचक प्रश्न विचारावे. अनुभव सांगताना मुले बऱ्याचदा त्यांच्या घरच्या भाषेतील शब्द सांगतात. अशा वेळी मुलांनी सांगितलेले शब्द स्वीकारावे. मुले सांगतील, तसेच वाक्य लिहावे. आपण वाक्य फळ्यावर लिहीत असताना, ते मोठ्याने उच्चारत लिहावे, म्हणजे लिहिले कसे जाते हे मुलांना दिसते. मुलांच्या लेखनाला यातून मदत होते.

सहभागी लेखन म्हणजे काय, मुलांबरोबर सहभागी लेखन कसे करावे हे समजून घेण्यासाठी, घटकसंच सहामधील 'सहभागी लेखन' हा व्हिडिओ पाहा व त्याबरोबर दिलेले प्रश्न सोडवा.

**प्रात्यक्षिक काम**
मुलांसोबत सहभागी लेखन करणे व त्याचा व्हिडिओ करून गटावर पाठवणे.

या घटकाचा व्हिडिओ पाहिल्यानंतर खालील प्रश्नांची उत्तरे लिहूया.

१) मुलांसाठी सहभागी लेखन करायचे, म्हणजे काय? व्हिडिओमध्ये दाखवल्याप्रमाणे दुसरे एखादे उदाहरण घेऊन, मुलांसाठी सहभागी लेखन कसे कराल हे लिहा.

## घटक क्र. ६.६ : भाषेच्या रचनेची जाणीव

**या घटकात आपण काय शिकणार?**

६.६.१ वाक्यातील शब्द मोजणे.

६.६.२ वाक्यातील शब्द बदलणे.

६.६.३ वाक्यातील शब्द वाढवणे.

६.६.४ शब्दांतील आवाजांची जाणीव

### ६.६.१ वाक्यातील शब्द मोजणे :

आपण बोलत असलेल्या वाक्यांमध्ये, सुटे सुटे शब्द असतात. वाक्यांमधील हे शब्द बदलता येतात किंवा शब्दांची भर घालून वाक्य वाढवता येते. या गोष्टी वाढत्या वयाबरोबर मुलांच्या लक्षात येत असतात, पण लेखन वाचन शिकवताना, मुलांचे याकडे लक्ष वेधणे गरजेचे असते. आपण सहज बोलत असताना, वाक्यातील शब्द सुटे ओळखणे अवघड असते. मला नाही माहिती, हे वाक्य ऐकताना ‘मलनाईमाईत’ असे ऐकू येते. लहान मुलांच्या लेखनात बऱ्याचदा असे लिहिलेले दिसते. वाक्यातील हे शब्द वेगळे ओळखायला, मुलांना शिकवायला हवे. वाक्यात सुटे शब्द असतात हे मुलांच्या लक्षात येते. वाक्यातील हे शब्द बदलता येणे, वाक्यात नवीन शब्द घालून, ते वाक्य वाढवता येणे, हे यातील पुढील टप्पे.

वाक्यातील शब्द सुटे करून, एका वाक्यात किती शब्द आहेत, हे ओळखण्यासाठी मुलांबरोबर पुढील कृती करता येते.

यासाठी ‘मी एक वाक्य सांगणार आहे. आपण त्यात किती शब्द आहेत हे मोजणार आहोत’. असे म्हणून एक सोपे, साधारण ३ शब्दांचे वाक्य सांगावे. वाक्य सांगताना एका शब्दाला एक टाळी वाजवावी. नंतर विचारावे किती शब्द आहेत या वाक्यात, किती टाळ्या वाजवल्या मी? वाक्य पुन्हा एकदा टाळ्या वाजवत म्हणून दाखवावे. अशा प्रकारे मुलांना वाक्यात किती शब्द आहेत, हे ओळखता यायला लागले, की वाक्यातील शब्द वाढवत साधारण ६ शब्दांपर्यंत घेऊन जावे.

### ६.६.२ वाक्यातील शब्द बदलणे :

मुलांना वाक्यात किती शब्द आहेत, हे ओळखता यायला लागले, की पुढील टप्प्यावर मुलांबरोबर वाक्यातील शब्द बदलण्याची कृती करून घ्यावी. ताईने स्टुलावर बसून सर्व मुलांना समोर एकत्र बसवावे. मुलांना सांगावे, ‘मी तुम्हांला एक वाक्य सांगणार आहे, त्याप्रमाणे टाळी वाजवणार आहे. नंतर मी त्यातील एक

शब्द बदलणार आहे. मी कोणता शब्द बदलला ते तुम्ही मला सांगा?' असे म्हणून मुलांना वाक्य सांगावे, 'माझी पेन्सिल शाळेत हरवली.' आता मी शब्द बदलून वाक्य सांगते, असे म्हणून दुसरे वाक्य सांगावे, 'माझी पिशवी शाळेत हरवली'. मुलांना विचारा, मी कोणता शब्द बदलला? मुले सांगतील पेन्सिल. मुलांना विचारा मी कोणता शब्द नवीन घातला? मुले सांगतील 'पिशवी'. मी हे नवीन वाक्य फळ्यावर लिहून दाखवते असे म्हणून हे वाक्य फळ्यावर लिहून दाखवावे.

**प्रात्यक्षिक काम**
एक शब्द, एक टाळी आणि वाक्यातील शब्दबदल या कृती वर्गात घेताना, त्यांचे व्हिडिओ करा आणि ते गटावर पाठवा.

यानंतर अशी सोपी वाक्ये घेऊन, त्यातील एखादा शब्द मुलांना बदलायला सांगावा. कोणता शब्द बदलायचा हे मुलांना तुम्ही सांगू शकता. गरज वाटल्यास तुम्ही तो शब्द बदलून दाखवू शकता. गरज वाटल्यास तुम्ही मुलांना दुसरा शब्द देखील सुचवू शकता.

वाक्यातील शब्द मोजणे आणि वाक्यातील शब्द बदलणे या कृती मुलांबरोबर कशा घ्याव्यात हे समजून घेण्यासाठी  परिशिष्टातील 'वाक्यांचे खेळ' हे पाठ टाचण वाचा.

### ६.६.३ वाक्यातील शब्द वाढवणे :

मुलांना वाक्यांतील शब्द सहजपणे बदलता यायला लागले, की आपण मुलांबरोबर वाक्यात नवीन शब्दांची भर घालून वाक्य वाढवण्याची कृती करू शकतो. यातून मुलांना आपण वाक्यात नवीन शब्दांची भर घालून वाक्य वाढवू शकतो, हे कळते आणि वाक्याची रचना त्यानुसार कशी बदलते हे देखील कळायला लागते.

यासाठी आपण मुलांना एक सोपे आणि छोटे वाक्य सांगावे आणि 'आता मी या वाक्यात एका नवीन शब्दाची भर घालून, हे वाक्य वाढवते लक्ष द्या हं', असे म्हणून तुम्ही त्या वाक्यात कोणत्या शब्दाची भर घालणार आहात, तो शब्ददेखील सांगावा व त्या शब्दाची भर घालून वाक्य मुलांना सांगावे.

वाक्यातील शब्द वाढवणे ही कृती मुलांबरोबर कशी घ्यावी, हे समजून घेण्यासाठी, घटकसंच सहामधील 'वाक्यातील शब्द वाढवणे' हा व्हिडिओ पाहा व त्याबरोबर दिलेले प्रश्न सोडवा.

### ६.६.४ शब्दांतील आवाजांची जाणीव :

मुलांना वाक्यातील शब्द मोजणे, बदलणे आणि वाढवणे जमायला लागल्यानंतर, मुलांमध्ये शब्द हे आवाजाचे बनलेले असतात याची समज विकसित करण्यासाठीच्या कृती करणे गरजेचे असते. आपण जी अक्षरे लिहितो, ती या शब्दांतील आवाजांची चिन्हे असतात, हे कळण्याची ही पहिली पायरी असते. आता शब्द ही आवाजाची चिन्हं असतात म्हणजे काय? जेव्हा आपण बदक लिहितो, तेव्हा त्यातील एकेका आवाजासाठी एक एक चिन्ह म्हणजे ब, द, क आपण एकत्र लिहीत असतो.

**प्रात्यक्षिक काम**
शब्दांतील आवाजाचे शब्दभेंड्या, अटीप्रमाणे शब्द हे खेळ मुलांना शिकवतानाचा व्हिडिओ करून गटावर पाठवा.

यासाठी आपण मुलांबरोबर शब्दभेंड्यांसारखे खेळ घेऊ शकतो. आपण एखादा शब्द सांगायचा आणि त्यातील शेवटच्या अक्षरापासून सुरू होणारा शब्द मुलांनी सांगायचा,

मुलांनी सांगितलेल्या शब्दातील शेवटच्या अक्षरापासून सुरू होणारा शब्द पुढे मुलांनी सांगायचा. असा हा खेळ घेता येतो. याशिवाय एखादे विशिष्ट अक्षर शब्दाच्या सुरुवातीला मधे किंवा शेवटी येणारे शब्द सांगा, अशा कृतीदेखील घेता येतात.

शब्दांतील आवाजांची जाणीव मुलांना करून देण्यासाठी, मुलांबरोबर कोणत्या कृती कराव्या, हे समजून घेण्याकरता घटकसंच सहामधील, 'शब्दांतील आवाजांची' जाणीव हा व्हिडिओ पाहा व त्याबरोबर दिलेले प्रश्न सोडवा.

या घटकाचा व्हिडिओ पाहिल्यानंतर, खालील प्रश्नांची उत्तरे लिहूया.

१) मुलांबरोबर वाक्यातील शब्द मोजणे, वाक्यातील शब्द बदलणे आणि वाक्यात शब्द वाढवणे या कृती करण्यासाठीची वाक्ये लिहा. या कृती करताना या वाक्यातील कोणता शब्द बदलणार किंवा वाक्यात कोणत्या शब्दांची भर घालणार, ते लिहून तयार होणारी वाक्ये लिहा.

२) मुलांमध्ये शब्दांतील आवाजांची जाणीव निर्माण करण्यासाठी, कोणत्या कृती घेता येतात आणि त्या तुम्ही कशा घ्याल याबद्दल सविस्तर लिहा.

## घटक क्र. ६.७ : लिपी परिचय

**या घटकात आपण काय शिकणार?**

६.७.१ अक्षर परिचयाचा क्रम

६.७.२ अक्षर परिचयाचे तंत्र

६.७.३ स्वरचिन्ह परिचय

### ६.७.१ अक्षर परिचयाचा क्रम

मुलांना अंगणवाडीत अक्षरे कशी शिकवायला हवी? कोणी म्हणेल, की मुलांना आधी अ, आ, इ, ई शिकवावी, मग क, ख, ग, घ शिकवावे आणि नंतर त्यांच्याकडून बाराखडी पाठ करून घ्यावी. आपण ही अक्षरे अशीच शिकलो, असेच मुलांना शिकवायचे, पण यामुळे मुलांना एवढी सगळी अक्षरे एकत्र लक्षात ठेवावी लागतात. हे मुलांसाठी बरेच कठीण काम आहे. त्याशिवाय सगळी अक्षरे ओळखता यायला लागल्याशिवाय मुलांना प्रत्यक्ष वाचन करता येत नाही. सुटी अक्षरे वाचता आली, तरी त्याला काही अर्थ नसतो. त्यामुळे अक्षरे पाठ करणे त्यांच्यासाठी कंटाळवाणे काम असते.

यामुळे मुलांना सुरुवातीला काही निवडक अक्षरे (५ ते ७) आणि एखादे (१ ते २) स्वरचिन्ह शिकवावे. ही अक्षरे आणि स्वरचिन्हे कशी निवडायची, तर या निवडलेल्या अक्षरांचा आणि स्वरचिन्हांचा वापर

करून मुलांच्या अनुभवविश्वातील बरेच शब्द तयार व्हायला हवेत आणि छोटा पण अर्थपूर्ण मजकूरदेखील तयार करता यायला हवा.

मुलांना अक्षरे शिकवताना, त्याचा क्रम कसा असावा, हे समजून घेण्यासाठी घटकसंच सहामधील 'अक्षर परिचयाचा क्रम' हा व्हिडिओ पाहा व त्या बरोबर दिलेले प्रश्न सोडवा.

मुलांना अक्षरे शिकवताना, ती कशी शिकवायची, सगळी एकत्र शिकवायची का, क – कबुतराचा अशाप्रकारे शिकवायची का, पाटीवर गिरवून शिकवायची का, या प्रश्नांचा विचार करणे देखील महत्त्वाचे आहे. पारंपरिक पद्धतीने आपण क – कबुतराचा, घ – घराचा अशाप्रकारे शिकवत होतो, पण संशोधनातून असे दिसून आले आहे, की अशाप्रकारे शिकवणे फारसे फायदेशीर नाही, त्यामुळे आपण निवडलेली अक्षरे, मुलांना एक–एक करून शिकवावी लागतात.

### ६.७.२ अक्षर परिचयाचे तंत्र :

अक्षरे शिकवताना, मुलांना त्या अक्षराचा आवाज, ज्या वस्तूंच्या नावात आहे, अशा वस्तू दाखवत, त्या अक्षराच्या आवाजाकडे मुलांचे लक्ष वेधून घ्यावे. त्यानंतर मुलांना त्या अक्षराचा आवाज येणारे आणखी शब्द सांगायला सांगावे. हे शब्द मुलांना फळ्यावर लिहून दाखवावे. मुलांनी सांगितलेले शब्द फळ्यावर लिहून झाले, की या शब्दांच्या मध्यभागी, आपण जे अक्षर शिकवत आहोत, ते लिहावे आणि त्याला गोल करावा. फळ्यावर लिहिलेल्या शब्दांबद्दल मुलांशी चर्चा करावी. लिहिलेल्या शब्दांपैकी एका शब्दात आपल्याला शिकवायच्या अक्षराला गोल करून दाखवावा आणि नंतर मुलांना बाकी शब्दांतील त्या अक्षराला गोल करायला सांगावे.

> **प्रात्यक्षिक काम**
> अक्षरगटातील एक दोन अक्षरे मुलांना शिकवा. शिकवताना अक्षर परिचयाच्या टप्प्यांचे व्हिडिओ करून गटावर टाकावा.

मुलांना अक्षरांचा परिचय कसा करून द्यावा, हे समजून घेण्यासाठी घटकसंच ६ मधील 'अक्षर परिचयाचे तंत्र' हा व्हिडिओ पाहा व त्याबरोबर दिलेले प्रश्न सोडवा.

### ६.७.३ स्वरचिन्ह परिचय :

अर्थपूर्ण शब्द व मजकूर मुलांना वाचता येण्यासाठी, त्यांना अक्षरांबरोबरच स्वरचिन्ह देखील शिकवणे गरजेचे असते. पारंपरिक पद्धतीमध्ये आपण क ला काना का, मला एक मात्रा मे, स ला वेलांटी सी असे मुलांना शिकवतो, पण यामुळे मुले 'कावेरी' हा शब्द वाचताना क ला काना का, व ला एक मात्रा वे, र ला मोठी/दुसरी वेलांटी री, कावेरी असे वाचतात यामुळे त्या शब्दाचा अर्थ लावताना मुलांना बरीच अडचण येते आणि वाचनाचा वेग अतिशय कमी राहतो. मुलांना स्वर चिन्ह शिकवताना क – आ... का, प ए... पे अशा प्रकारे शिकवायला हवे.

> **प्रात्यक्षिक काम**
> कोणतेही एक स्वरचिन्ह घेऊन, मुलांना शिकवा आणि त्याचा व्हिडिओ करून गटावर टाकावा.

मुलांना स्वरचिन्हांचा परिचय कसा करून द्यावा, हे समजून घेण्यासाठी घटकसंच सहामधील, 'स्वरचिन्ह परिचय' हा व्हिडिओ पाहा व त्याबरोबर दिलेले प्रश्न सोडवा.

या घटकाचा व्हिडिओ पाहिल्यानंतर, खालील प्रश्नांची उत्तरे लिहूया.

१) मुलांना अक्षरे कोणत्या क्रमाने शिकवावी? हा असा ठरावीक क्रम का वापरावा? सविस्तर लिहा.

२) मुलांना 'ट' हे अक्षर तुम्ही कसे शिकवाल, हे अक्षर शिकवण्यासाठी तुमच्या अंगणवाडीमध्ये काय काय कराल?

३) मुलांना स्वरचिन्ह कसे शिकवायला हवे, ते लिहा.

## घटक क्र. ६.८ : गणनपूरक संबोध

**या घटकात आपण काय शिकणार?**

६.८.१ वर्गीकरण

६.८.२ तुलना

६.८.३ क्रमवारी

६.८.४ दृश्य अवकाशीय शब्दांची समज

६.८.५ आकृतिबंध

६.८.६ एकास एक संगती

मुलांना संख्या शिकवताना किंवा गणिताचा परिचय करून देताना आणि त्याशिवायही इतर अनेक ठिकाणी, रोजच्या आयुष्यात मुलांना या संकल्पनांची मदत होत असते. मुलांना लहान वयात योग्य वेळी या संकल्पना माहीत झाल्या, तर त्याचा फायदा त्यांना पुढे मिळतो. या संकल्पनांचा फायदा मुलांना संख्या किंवा मोजणी शिकतानादेखील होतो, म्हणून यांना गणन पूरक संबोध देखील म्हणतात. आपण एक एक करून या संकल्पनांची माहिती घेऊया.

### ६.८.१ वर्गीकरण :

आपण रोजच्या आयुष्यात अनेक ठिकाणी वर्गीकरणाचा उपयोग करत असतो. स्वयंपाकघरात भांडी लावताना आपण ताट-ताटल्या एकीकडे, कढई-पातेली एकीकडे ग्लास एकीकडे असे वेगवेगळे ठेवतो. कपडे ठेवताना ते कोणाचे आहेत, त्यानुसार वेगळे करून ठेवतो किंवा गहू-तांदूळ निवडताना, आपण गहू, माती, खडे, कचरा, काड्या, यांच्या मिश्रणातून, गहू किंवा तांदूळ वेगळे करत असतो. अशा प्रकारे वस्तू वेगळ्या वेगळ्या करण्याला आपण वर्गीकरण म्हणतो. हे वर्गीकरण आपण वस्तूतील एखाद्या सारखेपणाच्या आधारावर करतो. वस्तूतील या सारखेपणाला वस्तूंचे गुणधर्म असे आपण म्हणू शकतो.

मुलांना वर्गीकरण शिकवताना, आपण सुरुवातीला त्यांना वेगवेगळ्या वस्तू देऊन, त्या वस्तूंचे वेगवेगळे गट करायला सांगू शकतो किंवा त्यातून एखाद्या प्रकारची वस्तू वेगळी करायला सांगू

शकतो. उदाहरणार्थ, मुलांना रंगीत मणी, पाने, ठोकळे. वस्तू वेगळ्या करण्यासाठी, ताटल्या, वाट्या देऊन त्यांना या वस्तूंचे वेगवेगळे गट करायला सांगू शकतो किंवा मुलांना पाने आणि फुले देऊन, यातली फुले वेगळी काढून दे, असे सांगता येते. यात आपण ती फुले आहेत हा गुणधर्म वापरून, वर्गीकरण केले आहे. नंतर आपण मुलांना वेगवेगळ्या प्रकारची पाने व वेगवेगळ्या प्रकारची, वेगवेगळ्या रंगाची फुले देऊन, त्यातली विशिष्ट रंगाची फुले काढून दे असे सांगू शकतो. इथे आपण फूल आणि एक विशिष्ट रंग, असे दोन गुणधर्म वापरून, वर्गीकरण करत आहोत. असेच पुढे चालू ठेवून आपण तीन गुणधर्म वापरून, वर्गीकरण करू शकतो.

**प्रात्यक्षिक काम**
वर्गीकरणाच्या दोन कृती विद्यार्थ्यांबरोबर घ्याव्या व त्याचा व्हिडिओ करून गटावर टाकावा.

मुलांना वर्गीकरण कसे शिकवावे, हे समजून घेण्यासाठी घटकसंच ६ मधील, करूया वर्गीकरण हा व्हिडिओ पाहा व त्याबरोबर दिलेले प्रश्न सोडवा.

## ६.८.२ तुलना :

लहान–मोठा, कमी–जास्त, उंच–बुटका, लांब–आखूड अशा अनेक प्रकारे, आपण रोजच अनेक गोष्टींची तुलना करत असतो. मुलांना देखील या प्रकारे तुलना करता यायला हवी आणि पेक्षा जास्त, पेक्षा कमी किंवा पेक्षा उंच, पेक्षा बुटका असे शब्द वापरून, ही तुलना सांगता यायला हवी. मुलांना खरे तर, रोजच्या अनुभवांतून या प्रकारे तुलना करता यायला लागते, पण त्याच जोडीला अंगणवाडीतील कृती देखील मदत करतात.

विविध प्रकारची तुलना मुलांना करता यावी, यासाठी मुलांबरोबर प्रत्यक्ष वस्तूंचा वापर करून, त्यांना तुलना करण्याची संधी देणे गरजेचे असते. एक लांब आणि एक आखूड काडी दाखवून, एक उंच व एक बुटके झाड दाखवून, एक मोठा तर एक छोटा चेंडू दाखवून, एक हलकी तर एक जड वस्तू हातात देऊन मुलांबरोबर तुलनेच्या कृती करवून घेता येतात. मुलांना 'ही वस्तू दुसऱ्या वस्तूपेक्षा लहान आहे किंवा मोठी आहे' अशा वाक्यांमध्ये केलेली तुलना मांडता यायला हवी.

**प्रात्यक्षिक काम**
तुलनेच्या दोन कृती विद्यार्थ्यांबरोबर घ्याव्या व त्याचा व्हिडिओ करून गटावर टाकावा.

मुलांना आपण त्यांच्या परिसरातून किंवा अंगणवाडीतून लहान मोठ्या, जड–हलक्या, उंच–बुटक्या, लांब–आखूड अशा वस्तूंच्या जोड्या शोधून आणण्याचं काम देऊ शकतो. प्रत्यक्ष वस्तू वापरून, तुलना करता यायला लागली की मग मुलांना चित्र दाखवून त्यातील वस्तूंची तुलना करायला सांगावे.

मुलांना तुलना कशी शिकवावी, हे समजून घेण्यासाठी घटकसंच ६ मधील, 'तुलना' हा व्हिडिओ पाहा व त्याबरोबर दिलेले प्रश्न सोडवा.

### ६.८.३ क्रमवारी :

मुलांना तुलना करता यायला लागली, की त्याच्या पुढील पायरीवर मुलांना वस्तूंचा क्रम लावण्यास देता येतो, याला आपण क्रमवारी म्हणतो. उदाहरणार्थ दोन वस्तूंमध्ये लहान आणि मोठे ओळखता आले, की तीन किंवा चार वस्तूंचा लहान मोठेपणा मुलांच्या लक्षात आणून द्यावा. वस्तूंचा क्रम दोन प्रकारे लावता येतो. लहानाकडून मोठ्याकडे आणि मोठ्याकडून लहानाकडे. प्रथम मुलांना लहान ते मोठा असा क्रम लावायला द्यावा आणि हे जमल्यानंतर, मोठा ते लहान असा क्रम लावायला द्यावा. मुलांना ३ वस्तूंचा क्रम लावणे, ४ वस्तूंचा क्रम लावणे नंतर ५ वस्तूंचा क्रम लावणे असे टप्प्याटप्प्याने पुढे घेऊन जावे.

> **प्रात्यक्षिक काम**
> क्रमवारीच्या दोन कृती विद्यार्थ्यांबरोबर घ्याव्या व त्याचा व्हिडिओ करून गटावर टाकावा.

लहान ते मोठ्या वाट्यांचा क्रम लावताना, मुलांना आपल्या समोर बसवावे. मुलांना कोणती वाटी सर्वांत लहान आहे, यापेक्षा मोठी कोणती. असे करत क्रम लावावा. क्रम लावून झाला, की ही सर्वांत लहान वाटी, ही त्यापेक्षा मोठी वाटी, ही त्यापेक्षा मोठी वाटी, ही सर्वांत मोठी वाटी असे म्हणत, ते मुलांच्या लक्षात आणून द्यावे. लांब–आखूडची क्रमवारी लावताना, सुरुवातीला मुलांना वस्तू एका रेषेत ठेवायला अडचण येऊ शकते, त्यासाठी त्यांना एक सरळ रेष काढून द्यावी आणि क्रमवारी लावताना वस्तू या रेषेवर ठेवाव्या हे सांगावे. एकदा मुलांना हे कळले, की रेषेचा वापर बंद करावा.

### ६.८.४ दृश्य अवकाशीय शब्दांची समज :

दृश्य अवकाशीय हा शब्द ऐकायला कठीण वाटत असला, तरी त्याचा अर्थ अगदी सोपा आहे. दृश्य म्हणजे, जे आपल्याला डोळ्यांनी दिसते ते. अवकाशीय म्हणजे आजूबाजूच्या जागेमधील दृश्य. अवकाशीय म्हणजे, आजूबाजूच्या वस्तू डोळ्यांनी पाहून, त्याबद्दल अंदाज करणे. म्हणजे आजूबाजूला दिसणाऱ्या वस्तूंचे स्थान कोठे आहे, ते दाखवणारे शब्द म्हणजे दृश्य अवकाशीय शब्द. वर–खाली, जवळ–दूर, आत–बाहेर, उजवीकडे– डावीकडे हे काही दृश्य अवकाशीय शब्द आहेत. असे शब्द आपण दररोज वापरत असतो. हे शब्द स्थानदर्शक शब्द आहेत. प्रत्येक शब्द कोणती जागा दाखवतो हे मुलांना माहीत झाले पाहिजे. संख्या, त्यावरील क्रिया करतानाही या शब्दांचा वापर केला जातो. मुलांना हे शब्द आजूबाजूच्या परिसरातून माहीत होत असतात, पण त्याचबरोबर अंगणवाडीतील कृती, मुलांची समज विकसित होण्यासाठी महत्त्वाच्या असतात. यासाठी अतिशय सोप्या कृती अंगणवाडीमध्ये करता येतात.

बाकी दृश्य अवकाशीय शब्दांच्या तुलनेत, उजवीकडे–डावीकडे हे समजायला अधिक कठीण असते. हे शब्द मुलांना कसे शिकवावेत, हे आपण पाहू. हे शिकवताना ताईने मुलांना आपल्या दोन्ही बाजूला, ताईचा व मुलांचा चेहरा एकाच दिशेला असेल असे बसवावे. समोर मध्यभागी एक

वस्तू ठेवावी. समजा, आपण मध्यभागी बाटली ठेवली. त्यानंतर एक एक करत त्या वस्तूच्या उजवीकडे व डावीकडे वस्तू ठेवायच्या आहेत. वस्तू ठेवताना, 'मी बाटलीच्या उजवीकडे पेन्सिल ठेवत आहे, मी बाटलीच्या डावीकडे काडी ठेवत आहे.' असे म्हणत, त्या वस्तू ठेवायच्या आहेत. बऱ्याच वेळा हे करून दाखवल्यानंतर, ताईंनी मुलांना वस्तू ठेवायला सांगावे – 'हे रबर बाटलीच्या डावीकडे ठेव. काडी पेन्सिलीच्या उजवीकडे ठेव.' पुढे मुलांना, यावर एखादी वस्तू दुसऱ्या वस्तूच्या कोणत्या बाजूला ठेवली आहे, हे विचारावे. प्रत्यक्ष वस्तूंच्या आधारे मुलांना उत्तरे देता यायला लागली, की मुलांना असेच प्रश्न चित्रांच्या आधारे विचारावे.

मुलांना उजवीकडे–डावीकडे कसे शिकवावे, हे समजून घेण्यासाठी घटकसंच सहामधील 'अवकाशीय शब्दांची समज' हा व्हिडिओ पाहा व त्याबरोबर दिलेले प्रश्न सोडवा.

> **प्रात्यक्षिक काम**
> वर्गीकरणाच्या दोन कृती विद्यार्थ्यांबरोबर घ्याव्या व त्याचा व्हिडिओ करून गटावर टाकावा.

## ६.८.५ आकृतिबंध :

आपल्याला परिसरात अनेक ठिकाणी वेगवेगळे आकृतिबंध (पॅटर्न) दिसत असतात. साडीवर, चादरीवर, चित्रांमध्ये असे अनेक पॅटर्न आपल्याला पाहायला मिळतात. वस्तू, चित्र, नक्षी, कृती यांचा जेव्हा एखादा विशिष्ट क्रम असतो आणि तो क्रम पुन्हा पुन्हा येतो, याला आकृतिबंध किंवा पॅटर्न (pattern) म्हणतात. मुलांना असे आकृतिबंध ओळखता येणे आणि तयार करता येणे, यासाठी अंगणवाडीमध्ये काम करणे गरजेचे असते. दोन वस्तूंपासून तयार होणाऱ्या सोप्या आकृतिबंधांपासून सुरुवात करून, हळूहळू मुलांना जास्त वस्तूंचा वापर करून तयार होणारे आकृतिबंध आणि आवाज किंवा कृतींच्या आकृतिबंधांपर्यंत घेऊन जाता येते.

यासाठी आधी आपण मुलांना आकृतिबंध तयार करून दाखवावा व त्यात काय केले आहे, हे मुलांना विचारावे, नंतर आपण सुरू केलेला आकृतिबंध मुलांना वाढवायला सांगावा, चित्रातील आकृतिबंध ओळखून तो पुढे वाढवायला सांगावा व शेवटच्या टप्प्यात आवाजाचा आकृतिबंध तयार करून, तो वाढवावा.

> **प्रात्यक्षिक काम**
> आकृतिबंधाच्या दोन कृती विद्यार्थ्यांबरोबर घ्यावा व त्याचा व्हिडिओ गटावर टाकावा.

आपल्या अंगणवाडीमध्ये मुलांबरोबर आकृतिबंधावर काम कसे करावे हे समजून घेण्यासाठी, घटकसंच ६ मधील, 'आकृतिबंध' हा व्हिडिओ पाहा व त्याबरोबर दिलेले प्रश्न सोडवा.

## ६.८.६ एकास एक संगती :

आपण अनेकदा एका वस्तूबरोबर एका वस्तूची जोडी लावत असतो. जसे जेवताना एका व्यक्तीला एक ताट, एका व्यक्तीला एक ग्लास, एका बाटलीला एक झाकण या प्रकारे एकाबरोबर एकाची जोडी लावणे यालाच एकास एक संगती असे म्हणतात. मोजताना आपण एका वस्तूबरोबर एका

संख्येचे नाव म्हणजेच संख्यानामाची जोडी लावत असतो. मोजणी शिकण्यासाठी मुलांना एकास एक संगती शिकवणे अतिशय गरजेचे असते.

एकास एक संगती शिकवताना, आधी समान संख्येने दोन वस्तू घेऊन, मुलांना आपण एकाबरोबर एक अशी जोडी लावून दाखववी. त्या नंतर मुलांना काही वस्तू देऊन, एकास एक संगती लावत तुलना करायला सांगावी, म्हणजे काही काड्या व मणी देऊन मुलांना सांगायचे, की इथे काही काड्या आणि काही मणी ठेवले आहेत. जोड्या लावून सांग काड्या जास्त की मणी जास्त. हा पहिला टप्पा. दुसऱ्या टप्प्यात आपण मुलांना सांगायचे, की इथे काही काड्या आणि काही मणी ठेवले आहेत. जितके मणी घेशील तितक्याच काड्या घे, म्हणजे आपण मुलांना वस्तू देऊन त्यांना एक सूचना किंवा विधानदेखील सांगायचे, की पहिली वस्तू जितकी घेशील, तितकीच दुसरी वस्तू घे किंवा पहिल्या वस्तूंपेक्षा दुसऱ्या वस्तू जास्त घे. एकदा मुलांना वस्तूंच्या मदतीने हे जमायला लागले, की याच कृती चित्रे वापरून करायला सांगता येतील. कृती केल्यावर तुलना करून, ती पूर्ण वाक्यात सांगण्याचा सराव देता येईल.

आपल्या अंगणवाडीमध्ये मुलांबरोबर एकास एक संगतीवर काम कसे करावे, हे समजून घेण्यासाठी, घटकसंच ६ मधील, 'एकास एक संगती. हा व्हिडिओ पाहा व त्याबरोबर दिलेले प्रश्न सोडवा.

**प्रात्यक्षिक काम**
एकास एक संगतीच्या दोन कृती विद्यार्थ्यांबरोबर घ्याव्या व त्याचा व्हिडिओ करून गटावर टाकावा.

## घटक क्र. ६.९ : संख्याज्ञान

**या घटकात आपण काय शिकणार?**

६.९.१ मोजणी

६.९.२ संख्याचिन्ह परिचय

६.९.३ शून्याचा संबोध

### ६.९.१ मोजणी :

मुले अंगणवाडीत येण्यापूर्वीच, काही प्रमाणात मोजणी शिकून आलेली असतात. बोलताना सहजपणे एक चॉकलेट, दोन हात अशी मोजणी ते करत असतात. याचा आधार घेत मुलांना मोजणी शिकवता येते. विविध वस्तूंचा (दगड, मणी, बिल्ले) वापर करून, आपल्याला अंगणवाडीत मोजणी शिकवता येते. मोजताना आपण वस्तूबरोबर संख्येच्या नावाची सांगड घालत असतो. मोजणी शिकवताना, पहिल्या टप्प्यात मुलांना, एक ते पाचची मोजणी शिकवावी. यासाठी ५ पर्यंत विविध वस्तू मोठ्याने मुलांसमोर मोजाव्या, मुलांनाही आपल्या बरोबर मोजायला सांगावे. मोजून झाल्यावर किती वस्तू आहेत असा प्रश्न मुलांना विचारावा. नंतर सरावासाठी एकेका मुलाला पुढे बोलून वस्तू मोजायला सांगावे. मुलांना १ ते ५ ची मोजणी जमायला लागली, की ६ ते १० पर्यंतच्या वस्तू मोजण्याचा

सराव करून घ्यावा. मोजताना मुले बऱ्याच चुका करतात, जसे की एखादी वस्तू एकापेक्षा जास्त वेळा मोजतात किंवा एखादी वस्तू मोजायचीच राहते. संख्यानामे आणि वस्तू यांची एकास एक संगती नसते किंवा कधी कधी वस्तू संपल्यानंतरही मुलं पुढील संख्या उच्चारत राहतात. अशा चुका होऊ नये यासाठी, मुलांना मोजणीचा भरपूर सराव द्यायला हवा. लक्षात घ्या, इथं संख्या कशा लिहितात हे मुलांना दाखवण्याची आवश्यकता नाही.

मुलांची मोजणी पक्की व्हावी व मुलांना संख्यांबद्दल लवचीकपणे विचार करता यावा, यासाठी मुलांबरोबर 'अंकगोलावर मोजणी' ही कृती करता येते. यात १० अंकगोल एकेक पावलाचे अंतर ठेवून सरळ रेषेत मांडावे. पाचव्या व सहाव्या अंकगोलाच्यामध्ये एक काठी ठेवावी. पहिल्या गोलावरून मुलाला एक पासून मोजणी सुरू करून, एकेका गोलावर पाऊल ठेवत पुढे मोजायला सांगावे. पाचच्या गोलावर आल्यानंतर उडी मारून सहाच्या गोलावर जायला सांगावे. म्हणजे मुलाला पाचची मोजणी कुठे संपते ते कळेल. यानंतर पुन्हा पुढे एकेका गोलावर पाऊल ठेवत दहापर्यंत मोजणी करायला सांगावे. मुलांना अशाच प्रकारे उलट मोजणी करायची संधी द्यावी.

> **प्रात्यक्षिक काम**
> मोजणीच्या दोन कृती करून घ्याव्यात व त्याचा व्हिडिओ करून गटावर टाकावा.

पुढील टप्प्यात ताईने एखाद्या अंकगोलावर जाऊन उभे राहावे व मुलांना विचारावे, 'मी कोठे उभी आहे' व मुलांना उत्तर द्यायला सांगावे. असे अनेक संख्यांसाठी करून घ्यावे. ताईंनी संख्या सांगावी व मुलांना त्या संख्येच्या गोलाजवळ जाऊन उभे राहायला सांगावे.

आपल्या अंगणवाडीमध्ये मुलांबरोबर मोजणीवर काम कसे करावे, हे समजून घेण्यासाठी घटकसंच ६ मधील, 'मोजणी' हा व्हिडिओ पाहा व त्याबरोबर दिलेले प्रश्न सोडवा.

### ६.९.२ संख्याचिन्ह परिचय :

मुलांना एक ते दहा पर्यंतच्या वस्तू मोजता यायला लागल्या, की त्यांना संख्याचिन्हांचा म्हणजेच या संख्या कशा लिहितात याचा परिचय करून द्यायला हवा. चार हे चिन्ह चार चाके, चार पाने, चार मुले अशा वेगवेगळ्या गटातील वस्तूंची संख्या सांगण्यासाठी वापरले जाते हे मुलांना कळायला हवे, यासाठी अंगणवाडीत संख्याचिन्ह परिचय हा पाठ घेणे उपयुक्त ठरते.

संख्यांची चिन्हे शिकवताना, सुरुवातीला मुलांना एक लिहिलेले कार्ड दाखवून एक असा लिहितात हे सांगायचे. त्यानंतर मुलांना सूचना द्यावी, 'बिल्ल्याच्या डब्यातून मला एक बिल्ला काढून दे.' मुलाने एक बिल्ला काढून दिला, की तो एक लिहिलेल्या कार्डसमोर ठेऊन म्हणायचे, 'या कार्डवर एक लिहिलेय म्हणून मी त्याच्या समोर एक बिल्ला ठेवते.' अशाप्रकारे मुलांना १ ते ५ संख्यांची ओळख द्यायची. दुसऱ्या टप्प्यात मुलांना १ ते ५ पर्यंतचे बिल्ले द्यायचे, म्हणजे काहींना दोन, व

> **प्रात्यक्षिक काम**
> संख्याचिन्ह परिचयाच्या दोन कृती करून घ्याव्यात व त्याचा व्हिडिओ करून गटावर टाकावा.

काहींना चार इ. त्यानंतर एखाद्या मुलाला विचारावे, 'तुझ्याकडे किती बिल्ले आहेत.' समजा रामकडे तीन बिल्ले असतील तर म्हणायचे, 'रामकडे तीन बिल्ले होते म्हणून मी त्याच्यासमोर ३ लिहिलेले कार्ड ठेवत आहे,' अशाप्रकारे उर्वरित मुलांकडचे बिल्ले मोजून, त्याप्रमाणे संख्यांचे कार्ड त्यासमोर ठेवावे. तिसरा टप्पा आहे फळ्यावरील संख्या पाहून मुलांनी बिल्ले देणे. यासाठी अंगणवाडी ताईंनी फळ्यावर एखादी संख्या लिहून, मुलांना सांगावे, 'मी फळ्यावर एक संख्या लिहिली आहे, तेवढे बिल्ले मला आणून द्या.' अशाप्रकारे १ ते ५ संख्याचिन्हे ओळखीची झाली, की, मुलांना ६ ते १० संख्याचिन्हांचा परिचय करून द्यावा.

आपल्या अंगणवाडीमध्ये, मुलांबरोबर संख्याचिन्हांचा परिचय यावर कसे काम करावे हे समजून घेण्यासाठी घटकसंच ६ मधील, 'संख्याचिन्ह परिचय' हा व्हिडिओ पाहा व त्याबरोबर दिलेले प्रश्न सोडवा.

### ६.९.३ शून्याचा संबोध :

मुलांना वस्तूंच्या मदतीने मोजणी शिकवताना, शून्य ही कल्पना कशी शिकवायची, हा प्रश्न नेहमीच आपल्यासमोर असतो. पाच शिकवण्यासाठी पाच मणी, पाच फुले, पाच बकऱ्या दाखवता येतात, पण शून्य मणी, शून्य फुले मुलांना कशी दाखवणार? यामुळेच शून्य ही संख्या मुलांना कळायला अवघड असते. मुलांना एक ते दहा मोजता यायला लागले, की त्यानंतर मुलांना शून्य म्हणजे काय हे शिकवण सोपे होते. कसे ते पाहूया.

यासाठी मुलांसमोर काही वस्तू (तीन ते दहा पर्यंत) ठेवून, त्यांना या किती वस्तू आहेत ते विचारावे. नंतर त्यातील एक एक वस्तू काढून घेत मुलांना आता किती राहिले असे विचारत रहावे. शेवटची वस्तू उचलून मुलांना विचारावे, 'आता किती उरले.' मुलांनी काहीच नाही उरले किंवा सगळे संपले असे उत्तर दिल्यावर अंगणवाडी ताईंनी मुलांना सांगायचे, 'इथे एकही वस्तू उरली नाही, म्हणजे शून्य वस्तू राहिल्या.' आणि कागदावर शून्य लिहून दाखवावे.

एखाद्या संख्येत शून्य मिळवला किंवा शून्य कमी केला, तर काय होते, हे समजण्यासाठीदेखील मुलांना अडचण येते. यासाठी मुलांसोबत कृती करायला हव्या. मुलाला काही वस्तू देऊन 'आता मी यात शून्य मिळवत आहे.' असे म्हणून हातात काहीही न घेता वस्तू मिळवण्याची नक्कल करावी. 'आता तुझ्याकडे किती वस्तू झाल्या' हे मुलाला विचारावे. उत्तर देताना मूल गोंधळले, तर मुलाला बिल्ले मोजायला सांगावे. दिलेल्या वस्तूंमधून शून्य काढण्याची कृती करावी. शून्य मिळवले किंवा शून्य काढले, तरीही संख्या बदलत नाही, याची जाणीव मुलांना या कृतींच्या माध्यमातून करून देता येते.

> **प्रात्यक्षिक काम**
> शून्याचा संबोध मुलांना शिकवण्याची कृती करून घ्या व त्याचा व्हिडिओ करून गटावर टाकावा.

आपल्या अंगणवाडीमध्ये, मुलांबरोबर शून्याच्या संबोधावर काम कसे करावे, हे समजून घेण्यासाठी, घटकसंच ६ मधील, 'शून्य संबोध' हा व्हिडिओ पाहा व त्याबरोबर दिलेले प्रश्न सोडवा.

## घटक क्र. ६.१० : मापन

बऱ्याचदा मुलांना संख्या, बेरीज, वजाबाकी यांची समज असली, तरी त्यांना एखाद्या वस्तूंची लांबी, उंची किंवा धारकता मापता येत नसते. अंगणवाडीपासूनच मुलांना मापन शिकवण्याची सुरुवात करायला हवी.

याची सुरुवात मुलांना दोन मुलांमधील अंतर पावलांनी मापायला सांगून किंवा टेबलची लांबी, फळ्याची लांबी मापायला सांगून करता येईल. ही लांबी कशाने मापायची, याबद्दल मुलांशी चर्चा करायला हवी. माप सांगताना एकक सांगणे देखील महत्त्वाचे असते, एकच लांबी वेगवेगळ्या एककांनी मापली, तर वेगवेगळी येऊ शकते, या गोष्टी मुलांच्या लक्षात आणून द्याव्या लागतात. एकक म्हणून आइस्क्रिमची काडी, माचिसची/ काडेपेटीतील काडी, पावले, वीत, काठी, पट्टी अशी एकके वापरता येतील. प्रत्यक्ष मापनाला सुरुवात करण्यापूर्वी, हे अंतर/लांबी/उंची किती असेल, याचा अंदाज करण्याची संधी मुलांना द्यायला हवी. त्यातून मुलं अंदाज करायला शिकतात.

मापत असताना मुले अनेकदा चुकतात. लांबी मापताना बऱ्याचदा मुले लांबी मापण्यासाठी वापरत असलेली काठी तिरकी ठेवतात, कधी एका काठीवर दुसरी काठी ठेवतात, कधी दोन काठ्यांमध्ये अंतर सोडतात. मुलांच्या या चुका सुधारण्यासाठी, त्यांना मदत करावी लागते. कोणतीही सलग राशी मापण्यासाठी सोईचे एकक मुलांना निवडता यायला हवे. यासाठी मुलांना वेळोवेळी मापनाच्या संधी द्यायला हव्या.

लांबी किंवा अंतर मापण्याप्रमाणेच मुलांना धारकता, वजन या राशी मापण्याचा देखील सराव देणे गरजेचे असते. त्यासाठीदेखील वीत, हात, काठी, पाऊल अशांपैकी अप्रमाणित एकक वापरून, मुलांना मापण्याची संधी द्यायला हवी. धारकता मापण्यासाठी बॉटलमध्ये किती कप पाणी मावेल, बादलीमध्ये किती मग पाणी मावेल अशा प्रकारे कृती घेता येतील.

आपल्या अंगणवाडीमध्ये, मुलांबरोबर मापनावर काम कसे करावे हे समजून घेण्यासाठी, घटकसंच ६ मधील, 'मापन' हा व्हिडिओ पाहा व त्याबरोबर दिलेले प्रश्न सोडवा.

**प्रात्यक्षिक काम**
वर्गात मापनाच्या कृती कराव्या व त्याचा व्हिडिओ करून गटावर टाकावा.

**प्रात्यक्षिक :**

१) छोट्या गटात मोजणीचा व अंकगोलावर मोजणीचा सराव करून घ्या. केलेल्या कृतींचा अहवाल लिहा.

२) वर्गात तारेवरचे वाचनालय तयार करा. त्याचा फोटो शेअर करा. वाचनालयात ठेवलेल्या पुस्तकांची यादी करा.

३) अंगणवाडीत मुलांसोबत प्रकटवाचन करावे, यासाठी ४ ते ५ मिनिटांत वाचता येईल अशी गोष्ट निवडा व त्याचा व्हिडिओ गटावर टाका व थोडक्यात अहवाल लिहा.

४) अंगणवाडीत मुलांसोबत लहान गोष्टींचे सहभागी वाचन करावे त्यानंतरच्या कृती घेऊन, त्यांचा व्हिडिओ गटावर टाका व थोडक्यात अहवाल लिहा.

५) वर्गात मुलांना पुस्तके वाचून दाखवल्यावर, तोंडी गोष्टी सांगितल्यावर किंवा त्यांना आलेल्या अनुभवावर मुलांना उदयोन्मुख लेखन करायला द्या. मुलांचे लेखन झाल्यावर त्यांनी काय काय लिहिले, हे त्यांना विचारून खाली लिहा.

६) मुलांसोबत सहभागी लेखन करा. त्याचा व्हिडिओ करून गटावर पाठवा व थोडक्यात अहवाल लिहा.

७) एक शब्द, एक टाळी आणि वाक्यातील शब्दबदल या कृती वर्गात घ्या. त्यांचे व्हिडिओ करा आणि ते गटावर पाठवा व थोडक्यात अहवाल लिहा.

८) शब्दांतील आवाजाचे शब्दभेंड्या, अटीप्रमाणे शब्द, हे खेळ मुलांना शिकवा. व्हिडिओ करून गटावर पाठवा व थोडक्यात अहवाल लिहा.

९) अक्षरगटातील एक दोन अक्षरे मुलांना शिकवा. शिकवताना अक्षर परिचयाच्या टप्प्यांचे व्हिडिओ करून, गटावर टाका व थोडक्यात अहवाल लिहा.

१०) कोणतेही एक स्वरचिन्ह घेऊन, मुलांना शिकवा आणि त्याचा व्हिडिओ करून, गटावर टाका व थोडक्यात अहवाल लिहावा.

११) वर्गीकरणाच्या दोन कृती विद्यार्थ्यांबरोबर घ्या. त्याचा व्हिडिओ करून गटावर टाका व थोडक्यात अहवाल लिहा.

१२) तुलनेच्या दोन कृती विद्यार्थ्यांबरोबर घ्या. त्याचा व्हिडिओ करून गटावर टाका व थोडक्यात अहवाल लिहा.

१३) क्रमवारीच्या दोन कृती विद्यार्थ्यांबरोबर घ्या. त्याचा व्हिडिओ करून गटावर टाका व थोडक्यात अहवाल लिहा.

१४) वर्गीकरणाच्या दोन कृती विद्यार्थ्यांबरोबर घ्या. त्यांचा व्हिडिओ करून गटावर टाका व थोडक्यात अहवाल लिहा.

१५) आकृतिबंधाच्या दोन कृती विद्यार्थ्यांबरोबर घ्या. त्याचा व्हिडिओ गटावर करून टाका व थोडक्यात अहवाल लिहा.

१६) एकास एक संगतीच्या कृती विद्यार्थ्यांबरोबर घ्या. त्याचा व्हिडिओ करून गटावर टाका व थोडक्यात अहवाल लिहा.

१७) मोजणीच्या दोन कृती करून घ्या. त्याचा व्हिडिओ करून गटावर टाका व थोडक्यात अहवाल लिहा.

१८) संख्याचिन्ह परिचयाच्या दोन कृती करून घ्या. त्याचा व्हिडिओ करून गटावर टाका व थोडक्यात अहवाल लिहा.

१९) मुलांना शून्य या संख्येचा संबोध शिकवण्याची कृती करून घ्या. त्याचा व्हिडिओ गटावर टाका व थोडक्यात अहवाल लिहा.

२०) वर्गात मापनाच्या कृती करा. त्याचा व्हिडिओ करून गटावर टाका व थोडक्यात अहवाल लिहा.

## स्वाध्याय

१) मुलांच्या साक्षरतेची सुरुवात कधीपासून होते? तुम्ही आपल्या अंगणवाडीमधील मुलांमध्ये उदयोन्मुख साक्षरतेची लक्षणे बघितली आहेत का, त्याबद्दल सविस्तर लिहा.

२) मुलांसाठी वर्गात भाषासमृद्ध वातावरण असणे का गरजेचे आहे व ते तयार करण्यासाठी काय करावे लागेल हे सविस्तर लिहा.

३) वर्गात तारेवरचे वाचनालय असल्याने काय फायदे होतात? तुमच्या वर्गात तुम्हांला असे वाचनालय बनवता येईल का? त्याचा वापर मुलांच्या क्षमता विकासासाठी कसा करता येईल?

४) मुलांचे उदयोन्मुख वाचन म्हणजे काय? मुलांना उदयोन्मुख वाचन करण्यासाठी, आपण अंगणवाडीमध्ये कशा प्रकारे मदत करू शकतो?

५) सहभागी वाचन म्हणजे काय? सहभागी वाचन करताना कोणत्या बाबी कराव्यात? स्पष्ट करा.

६) मुलाचे उदयोन्मुख लेखन म्हणजे काय? मुलांचे उदयोन्मुख लेखन टप्प्याटप्प्याने कसे विकसित होते?

७) मुलांसाठी सहभागी लेखन करायचे म्हणजे काय? एखादे उदाहरण घेऊन, मुलांसाठी सहभागी लेखन कसे करावे हे सविस्तर लिहा.

८) मुलांबरोबर वाक्यातील शब्द मोजणे, वाक्यातील शब्द बदलणे आणि वाक्यात शब्द वाढवणे या कृती करण्यासाठीची वाक्ये लिहा (किमान दहा). या कृती करताना, या वाक्यातील कोणता शब्द बदलणार किंवा वाक्यात कोणत्या शब्दांची भर घालणार, ते लिहून तयार होणारी वाक्ये लिहा.

९) मुलांमध्ये शब्दांतील आवाजांची जाणीव निर्माण करण्यासाठी, कोणत्या कृती घेता येतात आणि त्या तुम्ही कशा घ्याल याबद्दल सविस्तर लिहा.

१०) मुलांना अक्षरे कोणत्या क्रमाने शिकवावी? हा असा ठरावीक क्रम का वापरावा? सविस्तर लिहा.

११) मुलांना 'ट' हे अक्षर तुम्ही कसे शिकवाल, हे अक्षर शिकवण्यासाठी, तुमच्या अंगणवाडीमध्ये कोणत्या बाबी कराल? सविस्तर लिहा.

१२) मुलांना स्वरचिन्ह कसे शिकवावे ते सविस्तर स्पष्ट करा.

१३) एखाद्या मुलाला अक्षरओळख जमत नसेल किंवा संख्याचिन्ह समजत नसेल, तर तुम्ही त्याला कशी मदत कराल? सोदाहरण स्पष्ट करा.

माझ्या नोंदी :

# घटकसंच ७ : वर्गवातावरण व व्यवस्थापन




वर्गवातावरण हा शब्द वर्गातील भौतिक स्थिती आणि वर्गातील बालकांचे मानसिक वातावरण या दोन्हींना सूचित करतो. भौतिक वातावरण हे जिज्ञासा, बौद्धिक वाढ आणि आव्हानांना संधी देणारी रचना प्रदान करते. भौतिक व मानसशास्त्रीय वातावरण हे वर्गात घडणाऱ्या सर्व नातेसंबंधांनी आणि सामाजिक आंतरक्रियांनी बनलेले असते.

वर्गातील सुरक्षित, आरामदायक आणि आनंदी वातावरण बालकांना चांगले अध्ययन करण्यास मदत करते. शैक्षणिक साहित्य, साधने, उपकरणे आणि उपक्रम करण्यासाठी जागा, एकत्र काम करणे आणि खेळणे यांसारख्या आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. यामुळे प्रत्येक बालकाला चांगल्या प्रकारे शिकता येईल. वर्ग हे सर्वसमावेशक व सक्षम अध्ययन वातावरण असणारे असले पाहिजेत, जे प्रत्येक बालकाला स्वातंत्र्य, मोकळेपणा, स्वीकृती, अर्थपूर्णता, आपलेपणा आणि आव्हान प्रदान करतील.

*(संदर्भ : राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर – २०२४ : पृष्ठ क्र. १३४)*

**घटकसंचाविषयी थोडेसे....**

व्यवस्थापन ही एक प्रक्रिया आहे. म्हणजेच अनेक क्रिया, कृती एकत्र येऊन, ही प्रक्रिया घडते आणि योजलेले कार्य पूर्ण होते.

आपण मनामध्ये जी योजना आखलेली असते, ती पूर्ण झाल्यावर कशी दिसेल? कशी असेल? याचेही चित्र यामुळे स्पष्ट होते, म्हणून अंगणवाडीताईने अध्ययनास पूरक वर्गवातावरण निर्माण करणे व व्यवस्थापन चोख बजावणे, हे काम करायचे आहे. यासाठीच आपण सदरच्या घटकात सकारात्मक वर्गवातावरणाची गरज, सकारात्मक वर्गवातावरणामुळे काय साध्य होते, त्याचे घटक, उपयुक्तता आणि महत्त्व, याचबरोबर सकारात्मक वर्गवातावरणातून पंचकोशातील घटकांची पूर्ती, अंगणवाडीचे व्यवस्थापन व त्यामध्ये अंगणवाडीताईंची भूमिका या उपघटकांचा अभ्यास करणार आहोत.

माझ्या नोंदी :

# घटकसंच ७ : वर्गवातावरण व व्यवस्थापन

**वर्गवातावरण व व्यवस्थापन :**

व्यवस्थापन ही एक प्रक्रिया आहे, म्हणजेच अनेक क्रिया/कृती एकत्र येऊन, ही प्रक्रिया घडते आणि योजलेले कार्य पूर्ण होते.

आपण मनामध्ये जी योजना केलेली असते, ती पूर्ण झाल्यावर कशी दिसेल? कशी असेल? याचेही चित्र यांमुळे स्पष्ट होते, म्हणून अध्ययनास पूरक वर्गवातावरण निर्माण करणे व व्यवस्थापन चोख सांभाळणे हे काम अंगणवाडी सेविकेने करायचे आहे. यासाठीच आपण सदरच्या घटकात सकारात्मक वर्गवातावरणाची गरज, सकारात्मक वर्गवातावरणामुळे काय साध्य होते? त्याचे घटक, उपयुक्तता आणि महत्त्व, यांचबरोबर सकारात्मक वर्गवातावरणातून पंचकोशातील घटकांची पूर्ती, अंगणवाडीचे व्यवस्थापन व त्यामध्ये अंगणवाडी सेविकेची भूमिका या उपघटकांचा अभ्यास करणार आहोत.

## घटक क्र. ७.१ : सकारात्मक वर्गवातावरणाची गरज

**या घटकात आपण काय शिकणार?**

७.१.१ प्रारंभिक बाल्यावस्थेतील गरजांची उजळणी

७.१.२ सकारात्मक वर्गवातावरणाची उपयुक्तता

### ७.१.१ प्रारंभिक बाल्यावस्थेतील गरजांची उजळणी

अंगणवाडीतील बालके, ही ३ ते ६ वर्षे, या वयोगटातील, म्हणजेच प्रारंभिक बाल्यावस्थेतील असतात. त्यांच्या विविध गरजा आपण आधी जाणून घेतल्या आहेत. मुलांच्या, शारीरिक वाढीसोबत त्यांची विकासाची गती देखील अधिक असते. स्वत:बरोबर सभोवतालच्या नैसर्गिक व सामाजिक वातावरणाशी त्यांची ओळख होत असते. या ओळखीतूनच त्यांचा बोधात्मक विकासही घडत असतो. अंगणवाडीत मोकळेपणाने वावरता यावे म्हणून, आपण त्या बालकाच्या काही गरजा समजून घेणे आवश्यक आहे, यासाठीच आपण आधी जे शिकलो, त्याची उजळणी करूया.

**शारीरिक गरजा :** यामध्ये पोषक आहार, वस्त्र, निवारा, स्वच्छता, व्यायाम, झोप/आराम, आरोग्याची काळजी घेणे यांचा समावेश होतो.

**सामाजिक व भावनिक गरजा :** या गरजांमध्ये सुरक्षितता, प्रेम व वात्सल्य, (मायेचा स्पर्श, प्रेमळ देहबोली) व्यक्ती म्हणून आदर, सांगितलेली जबाबदारी जाणणे, समान वयाच्या म्हणजेच समवयस्क गटात ओळख, स्वत:चे कौतुक होणे. इत्यादी गरजांचा समावेश होतो.

**शैक्षणिक गरजा :** स्वावलंबन, प्रोत्साहन, उत्सुकता पूर्ण होणे, बोधात्मक कुशलता येणे, शब्दकोश वाढवणे, इत्यादी गरजा या शैक्षणिक गरजा आहेत.

### ७.१.२ सकारात्मक वर्गवातावरणाची उपयुक्तता?

सकारात्मक वर्गवातावरणाची गरज समजून घेणे व तसे प्रयत्नपूर्वक नियोजन करणे, अंगणवाडी सेविकेला गरजेचे असते. मुलांच्या शारीरिक व भावनिक गरजा, त्यांच्या सभोवतालच्या वातावरणातून पूर्ण होत असतात, म्हणूनच अंगणवाडीत भेटणारे लोक आणि तेथे निर्माण झालेले वातावरण मुलांच्या विकासाला कारणीभूत ठरू शकते. ते समजून घेतल्याने काय साध्य होते, ते घटकसंच सातमधील 'सकारात्मक वर्गवातावरणाची गरज' या व्हिडिओमध्ये पाहू शकाल.

## घटक क्र. ७.२ : सकारात्मक वर्गवातावरण

**या घटकात आपण काय शिकणार?**

७.२.१ सकारात्मक वर्गवातावरण म्हणजे काय?

७.२.२ वर्गवातावरणातील घटक

७.२.३ सकारात्मक वातावरणातील समृद्धता व विविधता

### ७.२.१ सकारात्मक वर्गवातावरण म्हणजे काय?

हे जाणून घेण्यासाठी प्रथम वातावरण म्हणजे काय? ते सकारात्मक व नकारात्मक असणे म्हणजे काय? मुलांबाबत वातावरणाचे महत्त्व काय? वातावरणाचा मुलांवर त्याचा काय परिणाम होतो? इ. बाबी पाहूया.

#### अ) वातावरण म्हणजे काय :

वातावरण म्हणजे आपल्या आजूबाजूला असलेली परिस्थिती. त्यात सजीव व निर्जीव असे दोन्ही घटक येतात. आपल्या आजूबाजूची परिस्थिती, त्यातील माणसे, त्यांचे एकमेकांशी असलेले संबंध, आपल्या घरातील वस्तू, त्याचा आपण करत असलेला उपयोग हे सगळे वातावरणात समाविष्ट होते. याचा आपल्यावर सतत परिणाम होत असतो.

#### ब) सकारात्मक वातावरण आणि नकारात्मक वातावरण :

ज्या वातावरणात आनंदी व उत्साही वाटते, त्या वातावरणाला सकारात्मक वातावरण असे म्हणतात. आपल्या मानसिक जडणघडणीला हे वातावरण पूरक ठरते; परंतु ज्या वातावरणामध्ये आपल्याला नकोसे वाटते, उत्साहवर्धक वाटत नाही, अशा वातावरणाला नकारात्मक वातावरण असे म्हणतात. आपल्या मानसिक जडणघडणीला हे वातावरण पोषक नसते.

## क) मुलांबाबत वातावरणाचे महत्त्व व त्याचा परिणाम :

सभोवतालच्या वातावरणाचा सखोल परिणाम मुलांच्या मानसिक जडणघडणीवर होत असतो, त्यामुळे मुलांच्या सभोवतालचे वातावरण सकारात्मक असणे आवश्यक आहे.

### मुलांच्या दृष्टीने वर्गवातावरण म्हणजे काय?

मुलांसाठी वर्गात असलेले वातावरण म्हणजे वर्गवातावरण होय. वर्गवातावरणाला मुलांचा 'तिसरा शिक्षक' असे म्हणतात. वर्गवातावरणातील प्रत्येक घटक, मुलांच्या शिकण्याच्या प्रक्रियेत मदत करत असतो.

## ड) मुलांबाबत सकारात्मक वर्गवातावरणाचे महत्त्व काय?

सकारात्मक वर्ग वातावरण म्हणजे, ज्या वातावरणात मूल प्रसन्न, आनंदी राहील असे वातावरण होय. मुलांसाठी सकारात्मक वर्ग वातावरण आनंददायी अनुभव देते, जे मुलांच्या शिकणे या प्रक्रियेला चालना देते, म्हणजेच सक्षम करते, कारण त्यामुळे मुलांच्या मेंदूचा विकास होतो.

## ७.२.२ वर्गवातावरणातील घटक :

**वर्गवातावरणाचे एकूण ११ घटक आहेत. त्या घटकांची ओळख करून घेऊ.**

अ) शाळेची जागा, म्हणजे शाळेतील वर्गखोल्या, व्हरांडा आणि आजूबाजूला उपलब्ध असलेली मोकळी जागा.

ब) अंगणवाडीताई व सेविका.

क) सकारात्मक मानसिक वातावरण, म्हणजे मुलांना ज्या वातावरणातून प्रेम, विश्वास आणि पोषक आहार मिळेल असे वातावरण.

ड) बोधात्मक विकासाच्या संधी, म्हणजे आव्हाने स्वीकारण्याच्या संधी, जोखीम घेण्याच्या संधी, मुलांच्या विचारांना चालना देणाऱ्या संधी, मुलांची आवड आणि क्षमता यांनुसारच्या अनुभवांच्या संधी होत. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, वरील सर्वच अनुभव आणि संधी मुलांना आनंददायी असाव्यात.

इ) मुलांच्या एकत्रित आणि वैयक्तिक कार्य करण्याच्या जागा

फ) वर्गात प्रदर्शित करायचे साहित्य, म्हणजेच मुलांसाठी तयार केलेले विविध प्रकारचे वर्गात लावायचे शैक्षणिक साहित्य होय.

ग) वर्गातील सजावट साहित्य, म्हणजे एखादा उपक्रम किंवा सणानुसार तयार केलेले सजावट साहित्य.

ह) आजूबाजूचे नैसर्गिक वातावरण

य) विविध साहित्य आणि संसाधने जसे : वर्गात लावलेले फळे, वर्गातील कपाटे, मुलांच्या बैठकीचे साहित्य, मुलांचे साहित्य ठेवायचे रॅक, वजनकाटा, उंचीचा तक्ता, विविध शैक्षणिक खेळ, परिसरातून जमवलेले दगड, वाळू, माती इ.

र) वर्गातील साधनांची अर्थपूर्ण मांडणी म्हणजे मुलांच्या विविध विकासक्षेत्रांनुसार शैक्षणिक सहित्याची मांडणी केलेली असावी. वर्गातील हे शैक्षणिक साहित्य, मुलांच्या हाताशी, त्यांना स्वत:ला ठेवता व घेता येतील अशा प्रकारे असावे, तसेच त्या शैक्षणिक साहित्याचे बालकांच्या क्षमतेनुसार गट केलेले असावेत.

ल) वर्गाबाहेरची जागा व त्यातील साहित्य

### ७.२.३ सकारात्मक वातावरणातील समृद्धता व विविधता :

मुलांच्या सर्वांगीण विकासास पोषक असे वर्गवातावरण, हे सकारात्मक असावे. असे वातावरण निर्माण करण्यासाठी वर्गवातावरणाचे वरील घटक नेमके कसे असावेत, हे आपण जाणून घेऊया.

- मुले ज्या ठिकाणी शाळेत येतात, त्या जागेची रचना सुलभ असावी. त्या जागेची रचना गुंतागुंतीची नसावी, तसेच ती जागा नीट देखभाल केलेली असावी. वर्गखोल्या मोकळ्या, हवेशीर व भरपूर उजेड असणाऱ्या असाव्यात. आजूबाजूला मोकळी जागा उपलब्ध असावी.
- मुलांना वर्गात मुक्त वावर करण्याची संधी असावी. मुलांना मुक्तपणे बागडता यावे. त्यात अडसर येईल असे मोठ्यांचे वर्तन नसावे. तेथे भौतिक सुविधांची गर्दी नसावी.
- मुलांना प्रेम, विश्वास, आपुलकीची भावना आणि भावनिक सुरक्षितता मिळावी. अशा वातावरणामध्ये मुलांना सुरक्षित वाटावे.
- नवे मित्र तयार करण्याच्या भरपूर संधी मुलांना मिळाव्यात.
- मुलांना त्यांच्या ताईशी भरपूर बोलता येईल, मन मोकळे करता येईल असे स्वातंत्र्य असावे.
- मुलांना पोषक आहार मिळावा. वर्गवातावरण मुलांना त्यांच्या निवडीनुसार कृती, गाणी, गोष्टी इत्यादी निवडण्याचे स्वातंत्र्य देणारे असावे, तसेच मुलांना आवड आणि क्षमता आधारित आनंददायी अनुभव देणारे असावे.
- मुलांना जोखीम घेण्याच्या संधी, आव्हाने स्वीकारण्याच्या संधी वर्गात मिळाव्यात. यामध्ये मुलांच्या सुरक्षिततेची पूर्ण काळजी घेणे अपेक्षित आहे. या मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होण्यास मदत होते, तसेच मुले स्वावलंबी होतात. मुलांच्या विचारांना चालना देणाऱ्या शैक्षणिक साहित्यांनी आणि संसाधनांनी वर्ग सुसज्ज असावा.

- मुलांसाठी वर्गामध्ये आणि वर्गाबाहेर कृतींचे नियोजन करता येईल, अशा जागा उपलब्ध असाव्यात.
- मुलांसाठी नियोजित केलेल्या विकासक्रमानुसार, साहित्याचे प्रदर्शन वर्गात केलेले असावे. वर्गात वैविध्यपूर्ण सजावट साहित्य असावे.
- नैसर्गिक वातावरणात शांतता असावी.
- अंगणवाडी कार्यकर्ती, मदतनीस ताई या मुलांना समजून घेत, काम करणाऱ्या असाव्यात.
- मुलांसाठी एकत्रित कार्य करण्याच्या आणि वैयक्तिक कार्य करण्याच्या जागा उपलब्ध असाव्यात. मुलांसाठी वर्गात उपलब्ध असलेली, संसाधने सर्व मुले सहजतेने वापर करू शकतील, अशी असावीत.
- वर्गात विविध संसाधनांची अर्थपूर्ण मांडणी असावी; जसे विविध शैक्षणिक साहित्य मुलांच्या हाताशी व ते त्यांना स्वत:ला ठेवता व घेता येतील अशाप्रकारे त्याची मांडणी असावी. साहित्याचे मुलांच्या क्षमतेनुसार गट केलेले असावेत.

### ७.२.४ वर्गवातावरणातून बालकांना काय हवे असते?

वर्गवातावरणातून मुलांना काय हवे असते ते पाहूया, त्याचप्रमाणे सकारात्मक वर्गवातावरणातून मुलांचा सर्वांगीण विकास कशा प्रकारे होतो तेही पाहू या.

खेळ व अध्ययनासाठी मुलांना स्वच्छ परिसर आणि हवेशीर जागा हवी असते. मुलांना अंगणवाडी ताईशी भरपूर गप्पा मारायच्या असतात. मुलांना स्वलेखन करता येईल, अशा जागा हव्या असतात. मुलांना विश्वासाची भावना आणि भावनिक सुरक्षितता हवी असते. वर्गवातावरणातून मुलांना स्व–अवकाश हवा असतो. जोखीम घेण्याच्या व आव्हाने स्वीकारण्याच्या संधी हव्या असतात. मुलांच्या गरजांनुसार विचारांना चालना देणारी संसाधने व साहित्य हवे असते. मुलांची आवड आणि त्यांची क्षमता, यांवर आधारित अनुभव हवे असतात. सकारात्मक वर्गवातावरणामध्ये मुलांना पोषक आहार हवा असतो, तसेच अर्थपूर्ण असे साहित्याचे प्रदर्शन वर्गात हवे असते.

#### सकारात्मक वर्ग वातावरणातून पंचकोश विकास :

वर्गवातावरणामुळे बालकांच्या सर्वांगीण विकासाच्या, म्हणजेच पंचकोशातील विकासाच्या घटकांची पूर्तता खालीलप्रमाणे होते.

**मनोमय कोश :** मुलांना जो प्रेमाचा स्पर्श हवा असतो, प्रेमळ वातावरण हवे असते, भावनिक सुरक्षितता हवी असते, तसेच विश्वासाची भावना हवी असते, या सर्वांमधून मुलांचा **मनोमय कोश विकास म्हणजेच भावनिक विकास** होतो.

**अन्नमय कोश :** सकारात्मक वर्गवातावरणात बालकांना स्वच्छ, हवेशीर परिसर हवा असतो. मुलांना स्वत:ला हवे ते करण्याचे स्वतंत्र्य म्हणजेच स्वअवकाश हवा असतो, मुक्त वावर हवा असतो, पोषक आहार हवा असतो यांतून मुलांचा **अन्नमय कोश म्हणजेच शारीरिक विकास** होत असतो.

**विज्ञानमय कोश :** सकारात्मक वर्गवातावरणात बालकांना जोखीम घेण्याच्या संधी, आव्हाने स्वीकारण्याच्या संधी, विचारांना चालना देणारी संसाधने व साहित्य या बाबी हव्या असतात. वर्गाला अर्थपूर्ण प्रदर्शन हवे असते. तसेच मुलांना आवडीनुसार व क्षमताधारित अनुभव हवे असतात. यातून मुलांचा **विज्ञानमय कोश म्हणजे बौद्धिक विकास** साध्य होतो.

**भाषिक विकास :** सकारात्मक वर्गवातावरणात बालकांना आपल्या ताईशी भरपूर गप्पा मारता यायला हव्या असतात. त्यांच्या स्वतःच्या अनुभवांचे स्वलेखन करता यायला हवे असते, यांतून मुलांचा **प्राणिक विकास** होतो. हा विकास भाषिक विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरतो.

**आनंदमय कोश :** सकारात्मक वर्गवातावरणात बालकांना त्याच्या आवडीवर आधारित अनुभव हवे असतात. क्षमताधारित अनुभव हवे असतात. यांतून मुलांच्या **आनंदमय कोशाचा म्हणजेच सांस्कृतिक विकास** होतो.

## घटक क्र. ७.३ : अंगणवाडीतील व्यवस्थापन

**या घटकात आपण खालील गोष्टी शिकणार आहोत.**

७.३.१ अंगणवाडीतील जागेचे व्यवस्थापन

७.३.२ अंगणवाडीच्या व्यवस्थापनातील कार्ये

७.३.३ विविध उपक्रमांचे व्यवस्थापन

### ७.३.१ अंगणवाडीतील जागेचे व्यवस्थापन :

अंगणवाडीतील मुलांसाठी भौतिक वातावरण किती महत्त्वाचे असते, ते आपण या आधी समजून घेतले. त्यासाठी, तेथील जागेची रचना करताना, आवश्यक काळजी घ्यावी, ज्यामुळे, मुलांचे अध्ययन व अंगणवाडीत घालवलेला वेळ आनंददायी ठरावा. आपण एका आदर्श वर्गरचनेचा व्हिडिओ, पुढे पाहणार आहोत. अंगणवाडी सेविकेला अशी आदर्श रचना करण्यास, दरवेळेस वाव मिळत नाही, त्यामुळे, तिची व्यवस्थापन करण्याची क्षमता व सर्व कार्ये पार पाडताना तिच्या कुशलतेची परीक्षा ठरते.

रचना करताना, भौतिक सुविधांची सुलभता, व मुलांना त्या सुविधांचा झालेला परिचय महत्त्वाचा असावा, म्हणजेच, मुलांना आपले अध्ययनाचे साहित्य आणि खेळण्यांची ओळख पुरेशी असली, तर त्या वस्तू कधी व कशा वापराव्या, याचा सराव त्यांना सहज जमू शकेल, तसेच त्या सर्वसाधनांची काळजी घेण्यात मुलांचा देखील वाटा असावा, ही भावना सेविकेने रुजवावी.

साधनांच्या व इतर भौतिक सुविधांच्या रचनेतून, आवश्यक उद्दिष्टे साध्य करायचा प्रयत्न असावा. अंगणवाडी सेविकेने तिच्या नियोजनात व कार्य करायच्या पद्धतीत सुसज्जता व तत्परता दाखवावी. आपल्या अंगणवाडीत, सहजतेने, व मोकळेपणाने वावरताना, ओळखीच्या साधनांचा प्रयोग करणे मुलांसाठी, कायम आनंद देणारे ठरावे.

### ७.३.२ अंगणवाडीच्या व्यवस्थापनातील कार्ये :

अंगणवाडीतील मुलांच्या बाबतीत, त्यांची ताई, ही सर्वस्वी जबाबदार असते. मुलांना आपल्या अनेक गोष्टी व गुपिते या ताईला सांगायला आवडतात; परंतु, हा विश्वास निर्माण होण्याचा प्रवास व त्याची खात्री करणे, ही अंगणवाडी सेविकेची जबाबदारी ठरते.

अंगणवाडीचे व्यवस्थापन करताना, लागणारे नियोजन हे आपण पूर्ण करावयाच्या कार्यांमधून समजून घेता येईल. सोबत दिलेले व्हिडिओ पाहून तुम्ही ती कार्ये सविस्तर समजून घ्यावी.

### ७.३.३ विविध उपक्रमांचे व्यवस्थापन :

अंगणवाडीतील मुलांसाठी उपक्रम घेताना, भौतिक तसेच सामाजिक वातावरणास महत्त्व असावे. मुलांच्या मूलभूत गरजा पूर्ण झाल्यास, त्यांना कोणत्याही उपक्रमात आनंदाने सहभागी करून घेता येते. त्यांच्यातील उर्जा, उत्सुकता व उत्साह, विविध नवलपूर्ण, तरी कठीण वाटणाऱ्या कृतींसाठी वापरावी.

निसर्गाच्या सान्निध्यातील कृती, समाजातील मोठ्यांबरोबर साजरे केलेले सण, गाणी, गप्पागोष्टी, सामाजिक अभियान किंवा समाजातील विविध वास्तू व ठिकाणांना दिलेल्या भेटींचा समावेश असावा. (मोठी शाळा, समाजमंदिरे, किल्ले, समुद्रकिनारे, वाचनालय, पोस्ट ऑफिस बँक, पुरातन वस्तू संग्रहालय, प्राणिसंग्रहालय, इत्यादी) यातून, मुलांचा सर्वांगीण विकास साधावा. मात्र प्रत्येक उपक्रमांचे नियोजन व कार्यवाही करताना, सेविकेने आधी दिलेल्या कार्यसाखळीचा प्रयोग करावा, तसेच उपक्रमातून साध्य होणाऱ्या मुलांच्या अध्ययनाचे मूल्यमापन करावे. मूल्यमापन कसे करावे, हे आपण पुढे स्वतंत्र घटकसंचामधून शिकणार आहोत.

अंगणवाडी सेविकेने आयोजित केलेल्या सर्व कृती घेताना, विशेष करून मुलांच्या सुरक्षिततेची जबाबदारी घ्यावी, त्याचबरोबर, विविध धोक्यांचा विचार करून, आवश्यकतेनुसार काळजी घ्यावी.

## घटक क्र. ७.४ : अंगणवाडी व्यवस्थापनात, अंगणवाडी सेविकेची भूमिका

सोबत दिलेल्या व्हिडिओमध्ये स्वत:च्या कामाचा आढावा घेण्यासाठी, काही मुद्दे दिले आहेत. या नीतींचा वापर केल्यास कार्यपद्धती सुरळीत व परिणामकारक करता येईल. उदाहरणार्थ, उपक्रम मुलांसोबत घेण्याच्या वेळेच्या, एक ते दोन दिवस आधी, सर्व साधने नियोजनबद्धरीतीने एकत्रित करून, केलेली मांडणी

मुलांसाठी सुलभतेची व्हावी. प्रत्येक मुलाच्या कृतींचे निरीक्षण करता यावे. त्यांनी दिलेले प्रतिसाद नोंदवून, त्यांच्या बरोबरीने त्यांची आव्हाने पूर्ण करण्यास, मदत करता यावी. वेळेचे नियोजन करायचा सराव, आपण नियोजनावर आधारलेल्या घटकसंचामध्ये करणार आहोत. प्रत्येक कार्यास लागणाऱ्या वेळेचा अंदाज घेऊन, नियमांचे व वेळेचे स्वत: पालन करावे, तसेच मुलांना देखील हे नियम पाळण्यास प्रोत्साहित करावे.

अंगणवाडीतील सेविकेच्या जवळ, बालकांसंबंधीची काही महत्त्वाची कागदपत्रे व दस्तऐवज नोंदी असाव्यात.

**मुलांच्या सामाजिक वर्तनातील सुयोग्यता :**

अंगणवाडीत प्रारंभिक बाल्यावस्थेत, जसे स्वावलंबनाचे धडे गिरवावे, तसेच सुयोग्य सामाजिक वर्तन कोणते, हे सेविकेला रुजवावे लागते. हे करण्यासाठी, दिनक्रमातील विविध कृतींच्या सहाय्याने हे घडवता यावे.

परिसरातील मोठ्यांच्या व समवयस्क मित्रांच्या वर्तनाचे अनुकरण करत, मुलांचे सामाजिक व्यक्तिमत्त्व घडते; जसे, मूलभूत गरजांची असलेली तातडी सांगता यावी, तसेच मुलांना कोणाच्या वर्तनाचा त्रास होत असल्यास, सांगता यावे. त्याचबरोबर कोणत्या वर्तनातून इतरांना त्रास होऊ शकतो, हे वारंवार गप्पागोष्टीतून समोर आणावे. 'नियम आणि शिस्त', या एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात, हे आपल्या वर्तनातून व अंगणवाडीतील कृतींच्या माध्यमातून समजून द्यावे. नियमांचे पालन करताना, शिस्त अंगवळणी पडावी, या दृष्टीने मुलांच्या भावना व्यक्त होण्यासाठी, विविध कृती, खेळ व अध्यापन पद्धतींचा वापर असावा. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक होऊ नये, याचे भान कायम असावे. मुलांना गाणी, गोष्टींच्या माध्यमातून याचा सराव करण्यास सतत प्रेरणा देत राहावी. विशेष गरजा असणाऱ्या मुलांमध्ये देखील स्वयंशिस्त निर्माण होण्यासाठी त्यांना मदत करावी.

**वाचा व विचार करा**

खाली दिलेल्या परिच्छेदामध्ये, अंगणवाडीतील बालकांच्या अस्वीकार्य वर्तनाचे एक उदाहरण नमूद केले आहे. वाचा व विचार करा.

**हा तिढा तुम्ही कसा सोडवाल?**

ही गोष्ट आहे, मिनी, बंड्या आणि राजसच्या अंगणवाडीची. तुम्ही म्हणाल, 'इतर कोणी त्या अंगणवाडीत नाही का?' तर तसे नाही, इतर पण मुले आहेत; परंतु या तीन मुलांच्या भोवती ही गोष्ट फिरते, म्हणून सांगितले या तिघांची अंगणवाडी.

मिनी आणि बंड्या या अंगणवाडीत मागची दोन वर्षे येतात. हे तिसरे वर्ष आहे. त्यात बंड्या खूपच चंचल मूल, म्हणून ओळखला जातो. अंगणवाडी सेविकेला त्याच्याकडे सारखे लक्ष ठेवावे लागते. कधी कोणाला धक्का दे, तर कधी कोणाचे केस ओढ, अशा नेहमीच खोड्या चालू असतात.

मिनीचे मात्र वेगळे आहे. अंगणवाडीत आल्यानंतर तेथील सवयी अंगवळणी पडायला तिला खूप दिवस लागले. मागच्या वर्षी एकदा अंगणवाडीत सेविका लेखी मूल्यमापनासाठी मुलांकडून, पाटीवरती काही अंक लिहून घेत होत्या. सेविकेने जेव्हा तपासले, तेव्हा मिनीची पाटी कोरी होती आणि ती रडत होती. ती काही बोलेना. तिच्या आईला बोलावले आणि तिची समजूत काढली. ती आईला म्हणाली, 'मी आधी एकदा लिहिले, पण बंड्याने पुसून टाकले' आई तिला सांगत होती, तू परत काढून दाखव. ती काही परत लिहायला तयार नव्हती. सेविकेने इतर कामे आटोपली आणि त्या मिनीच्या जवळ बसल्या. त्या म्हणाल्या, 'मिनी तू नंतर तुला हवं तेव्हा आईला हे लिहून दाखवशील का?' ती 'हो', म्हणून घरी गेली. सेविका, अनेक दिवस विचारात होत्या, की बंड्याच्या अशा वर्तनाला कसे बरं आटोक्यात आणावे, पण रोजच्या कामात सेविका, हा प्रसंग विसरून गेल्या.

आता मुले पाच वर्षांची होती. या वर्षी पुन्हा एकदा मिनी कोरी पाटी घेऊन बसली होती. आता तिचे म्हणणे असे होते, की तिने पाटीवर लिहिले, तर बंड्या पुन्हा पुसेल.

सेविका, आदल्या दिवशीचा मिनीचा आडमुठेपणा कसा सोडवावा, या विचारात असतानाच, आज अजून नवीन समस्या उभी राहिली होती. राजस त्यांच्या अंगणवाडीमध्ये नव्याने येऊ लागला होता. राजस शहरात राहून आला होता. त्याच्या वडिलांचे तेथील काम बंद झाले, म्हणून त्याच्या परिवाराला गावी यावे लागले. राजसने अंगणवाडीतील सर्व कृती व्यवस्थितच कराव्या, असा त्याच्या आईचा अट्टाहास असतो. अंगणवाडीमध्ये एरवी तो सगळ्या उपक्रमात आनंदाने सहभागी होतो. मात्र आजचा दिवस वेगळा होता. जेवणाच्या सुट्टी अगोदर सेविकेला काही दुसरे काम आले. सेविकेने मदतनीसमावशीला मुलांकडे लक्ष द्यायला सांगितले. मुलांना जेवायला द्यायचे होते, तेवढ्यात रडारड झाल्याचा आवाज आला. तेव्हा बंडया आणि राजस दोघेही रडत होते. सेविकेला नंतर समजले, की राजस बंड्याला चावला आहे. याच वर्षी प्रवेश घेतला असल्याने राजसच्या वागण्याचा अंदाज, सेविकेला अजून आला नव्हता.

**हा तिढा तुम्ही कसा सोडवाल? आपल्या नोंदवहीत लिहा.**

प्र. १) वरीलपैकी प्रत्येक मूल असे का वागले? त्याचे/तिचे अस्वीकार्य वर्तन घडू नये म्हणून काही काळजी घेता आली असती का?

प्र. २) अंगणवाडीतील तिन्ही मुलांच्या (मिनी, बंड्या व राजस) सुयोग्य वर्तनासाठी काय करता येईल?

**प्रात्यक्षिक :**

१) अंगणवाडीमध्ये मुलांसाठी विचारांना चालना देणाऱ्या विविध खेळांची व साहित्याची मांडणी करा व त्याचे फोटो पाठवा.

२) अंगणवाडीमध्ये मुलांसोबत पौष्टिक खाऊ तयार करा. त्याची कृती आणि फोटो पाठवा.

३) उपलब्ध साहित्य वापरून, काही सजावट साहित्य तयार करा. त्याची कृती लिहा आणि सजावटीचा फोटो पाठवा.

४) तुमच्या स्वतःच्या अंगणवाडीतील एखाद्या अस्वीकार्य वर्तनाची समस्या, तुम्ही कशी सोडवली. त्याचे व्यक्तिअभ्यास (केसस्टडी) स्वरूपात सादरीकरण करा.

---

## स्वाध्याय

१) सकारात्मक वर्गवातावरण व नकारात्मक वर्गवातावरण म्हणजे काय? सकारात्मक वर्गवातावरणाचे महत्त्व तुमच्या शब्दात लिहा. सकारात्मक वर्गवातावरण तयार करण्यासाठी तुम्ही काय कराल?

२) सकारात्मक व नकारात्मक वर्गवातावरणाचा बालकांवर काय परिणाम होतो, ते तुमच्या शब्दांत लिहा.

३) अंगणवाडी व्यवस्थापनातील अंगणवाडी सेविकेची भूमिका स्पष्ट करा.

४) वर्गवातावरणाच्या घटकांची सविस्तर माहिती लिहा.

५) मुलांमध्ये स्वावलंबन येण्यासाठी, तुम्ही कोणकोणत्या कृती कराल, ते सविस्तर लिहा.

६) पोषक आहाराबद्दल पालकांना कसे सजग करता येईल, ते सविस्तर लिहा.

७) सकारात्मक वर्गवातावरणात वैविध्यपूर्ण म्हणजेच बदलत राहणारे सजावट साहित्य हवे असते. आपल्या अंगणवाडीचा आणि त्यातील उपलब्ध साहित्याचा वापर करून, ही विविधता कशी आणता येईल, याचा विचार करून विविध उदाहरणांची नोंद करा.

# घटकसंच ८ : विशेष गरजा असलेली बालके




विकासाची प्रक्रिया ही सुसंगत मार्गक्रमण करणारी असली, तरीही विकासाच्या विविध टप्प्यांवर बालकांच्या व्यक्तिगत विकासामध्ये भिन्नता दिसून येते. सर्वच बालके एकाच वेळी विकासाचे टप्पे गाठत नाहीत. बालकांमधील भेद विविध कारणांमुळे उद्‌भवतात.

पहिली आठ वर्षे ही बालकांच्या वाढ व विकासातील अत्यंत महत्त्वाची असतात. ही आठ वर्षे भविष्यातील शिक्षणाचा पाया आहेत. शिक्षणातील आणि विकासातील आव्हाने ओळखून त्यावर आपण लवकरात लवकर उपाय शोधले, तर बालकांना यश मिळण्याची शक्यता वाढते. सकस आहार, संगोपन आणि प्रेरणादायी, उत्साहपूर्ण वातावरण हे अध्ययन आणि विकासाच्या या टप्प्यावर महत्त्वपूर्ण ठरते.

*(संदर्भ : राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर – २०२४ : पृष्ठ क्र. २१३–२१४)*

**घटकसंचाविषयी थोडेसे....**

दैनंदिन शालेय जीवनात अंगणवाडीताई म्हणून, अनेक आव्हाने आपल्यासमोर असतात. आपल्या समोर येणारे प्रत्येक बालक वेगळे आणि स्वतःची वैशिष्ट्ये घेऊन आलेले असते. प्रत्येकाला ओळखता येणे, प्रत्येकाला समजून घेणे हे आव्हान असते. हे आव्हान पेलता यावे, अगदी वेगळी असणारी बालके कशी असतात, त्यांची वैशिष्ट्ये कोणती असतात हे ओळखता यावे, त्यांना सहजतेने हाताळता यावे यासाठी सदरच्या घटकात विशेष गरजा असलेले बालक याचा अर्थ व प्रकार, विशेष गरजा असणाऱ्या बालकांच्या बाबतीत अंगणवाडीताईंची भूमिका, सर्वसमावेशक शिक्षण या उपघटकांचा अभ्यास करणार आहोत.

## माझ्या नोंदी :

# घटकसंच ८ : विशेष गरजा असलेली बालके

## घटक क्र. ८.१ : विशेष गरजा असलेली बालके : अर्थ व प्रकार

**प्रस्तावना :**

दैनंदिन शालेय जीवनात अंगणवाडीताई म्हणून अनेक आव्हाने आपल्यासमोर असतात. आपल्या समोर येणारे प्रत्येक बालक वेगळे आणि स्वत:ची वैशिष्ट्ये घेऊन आलेले असते. प्रत्येकाला ओळखता येणे, प्रत्येकाला समजून घेणे हे आव्हान असते. हे आव्हान पेलता यावे, अगदी वेगळी असणारी बालके कशी असतात, त्यांची वैशिष्ट्ये कोणती असतात हे ओळखता यावे, त्यांना सहजतेने सामावून घेता यावे, यासाठी या घटकात विशेष गरजा असलेली बालके याचा अर्थ व प्रकार, विशेष गरजा असणाऱ्या मुलांच्या बाबतीत सेविकेची भूमिका, सर्वसमावेशक शिक्षण या उपघटकांचा अभ्यास करणार आहोत.

**या घटकात आपण काय शिकणार?**

८.१.१ शारीरिक विकलांगता

८.१.२ बौद्धिक अक्षमता

८.१.३ सामाजिक व भावनिक अक्षमता (स्वमग्नता)

या घटकात आपण विशेष गरजा असलेले बालक म्हणजे काय आणि विशेष गरजांचे प्रकार कोणते आहेत हे बघणार आहोत.

'विशेष गरजा' असलेली बालके म्हणजे काय, तर शारीरिक, वैद्यकीय किंवा मानसिकदृष्ट्या अक्षम असल्यामुळे, विशेष मदतीची गरज लागणारी बालके. या बालकांना दिव्यांग किंवा विकासात्मक विलंब असलेली बालके असे म्हटले जाते.

वयानुरूप अपेक्षित विकासाचे टप्पे गाठताना, लक्षणीय उशीर होणे, म्हणजे विकासात्मक विलंब होणे. हा विलंब शारीरिक, भाषिक, सामाजिक, भावनिक, बोधात्मक इत्यादी कोणत्याही क्षेत्रात असू शकतो. याचे कारण बऱ्याच वेळा विकासाचे टप्पे समान असले, तरी प्रत्येकाची विकासाची गती वेगळी असू शकते. अशी उदाहरणे आपण पाहिलेली असतात. उदाहरणार्थ, चार वर्षांचा महेश तीन पायऱ्या चढताना उतरताना अजून अडखळतो, तर पाच वर्षांच्या निकिताला घरच्या भाषेतील दोन तीन शब्द किंवा एखादे वाक्य समजून घेताना अडचण येते. हा विलंब एकापेक्षा अधिक क्षेत्रातही असू शकतो.

विकासातील विलंब कशाच्या आधारे ठरवला जातो? हा विलंब शिक्षण, भाषा, संवाद साधण्याची क्षमता, समजून घेण्याची क्षमता, वर्तन, सामाजिक आणि गतियुक्त विकलांगता यांमधील कार्यात्मक मर्यादांच्या आधारे ठरवला जातो. काही वेळा विलंब आणि दिव्यांगत्व या दोन्ही संकल्पना स्पष्टपणे

समजण्यास कठीण वाटतात, त्यामुळे त्या पर्यायी संज्ञा म्हणूनही वापरल्या जातात. विकासात्मक दिव्यांगत्व दीर्घकाळ टिकणारे असले, तरी विकासातील अडथळे लवकरात लवकर ओळखून ते दूर केल्यास बरीच प्रगती होऊ शकते. दिव्यांग बालकाचे लवकरात लवकर निदान केल्यास व वेळीच हस्तक्षेप अपेक्षित बदल होण्यासाठी योग्य त्या उपाययोजना म्हणजेच (interventions) केल्यास विकासात्मक विलंब व दिव्यांगत्व यांवर मात करण्यास मदत होते.

**विशेष गरजांचे प्रकार**

| शारीरिक विकलांगता | बौद्धिक अक्षमता | सामाजिक व भावनिक अक्षमता |
|---|---|---|
| • अस्थिदोष<br>• दृष्टिदोष, अल्पदृष्टी<br>• श्रवणदोष<br>• वाचादोष | (अध्ययन अक्षमता)<br>१) वाचन अक्षमता (डिसलेक्सिया)<br>२) लेखन अक्षमता (डिसग्राफिया)<br>३) गणन अक्षमता (डिसकॅलकुलिया) | • स्वमग्नता (ऑटिझम) |
| इतर • बुटकेपणा • रक्तविकार • मानसिक आजार • कुष्ठरोग • बहुविकलांगता | | |

## ८.१.१ शारीरिक विकलांगता :

### अ) अस्थिदोष

| | |
|---|---|
| ठळक लक्षणे | • एखादा अवयव नसणे.<br>• दोन्ही हात पूर्णपणे वर घेता न येणे.<br>• पाठीचा कणा सरळ नसणे, अतिताठ किंवा अतिलुळे अवयव अशी दृश्य स्वरूपाची विकलांगता |
| वर्गव्यवस्थापन | • विकासाच्या टप्प्यात विलंब असणे-चालणे, धावणे, पायऱ्या उतरणे, चोखणे, फुंकणे, गिळणे, उचलणे, फेकणे, वस्तू पकडणे, झेलणे, उघडणे, बंद करणे या कृतींमध्ये अडचण येणे.<br>• शाळेमध्ये चढ-उतार करण्यासाठी सोपी वाट उपलब्ध करून देणे.<br>• सहजपणे वापरण्याजोगे शौचालय उपलब्ध करणे.<br>• गरजेनुसार लागणारी साधने, उदा : आधाराची काठी, व्हीलचेअर अथवा कृत्रिम अवयव, पालकांच्या आणि शासनाच्या मदतीने मिळण्यासाठी पुढाकार घेणे. |
| मुलांना शारीरिक हालचाली करण्यात काही अडचणी येत असतील तर त्यांच्याकडे विशेष लक्ष दिल्यास त्या मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होईल. | |

## ब) दृष्टिदोष, अल्पदृष्टी :

<table>
<tr><td>ठळक लक्षणे</td><td>• वस्तू/खेळणी बघायला नजर न वळवणे.<br>• तीन महिन्यांनंतरही समोर ठेवलेल्या खेळण्यांकडे आकर्षित न होणे.<br>• सतत लालसर डोळे, डोळ्यांतून पिवळा स्राव, किंवा अश्रू वाहणे.<br>• डोळ्यांचा तिरळेपणा.<br>• खेळणी किंवा पुस्तक डोळ्यांच्या अगदी जवळ घेऊन बघणे.<br>• चालताना सतत कशावर तरी धडकणे.<br>• पायऱ्यांचा अंदाज न येणे.<br>• इतर बालकांमध्ये खेळताना अडचण येणे.<br>• समोर असलेली वस्तू/व्यक्ती न ओळखता येणे.<br>• एखाद्या संबंधित बाबींवर प्रश्न विचारल्यास दिसत नसल्याचे सांगणे.</td></tr>
<tr><td>वर्गव्यवस्थापन</td><td>• चालण्याच्या वाटेवर वस्तू किंवा इतर अडथळे नाहीत याची दक्षता घ्यावी.<br>• एकेका मुलाला/मुलीला एकेक दिवस नेमून देऊन मदत करण्यास सांगावे.<br>• उपक्रम घेताना प्रत्येक वस्तूला स्पर्श करण्याच्या जास्तीत जास्त संधी आवर्जून द्याव्यात, तसेच श्रवणाचे जास्तीत जास्त अनुभव द्यावेत.</td></tr>
<tr><td colspan="2">प्राथमिक निदानाचे उपक्रम :<br>वर्गातील सर्व बालकांना एकत्र बसवून खालील खेळ घेणे.<br>रंग ओळखा, आकार ओळखा.<br>नजरेच्या जवळ–लांब–आणखी लांब अशा टप्प्यांवरून चेंडूंचे रंग, लहान–मोठे चेंडू ओळखायला सांगणे. विविध रंगांची खेळणी वापरून खेळ घेणे.</td></tr>
</table>

## क) श्रवणदोष, वाचादोष :

<table>
<tr><td>ठळक लक्षणे</td><td>• काही मोजकेच शब्द बोलणे, लहान (२ शब्दांची) वाक्येच बोलण्याचा प्रयत्न करणे.<br>उदा. पापा दे, दुदू दे.<br>• आपण बोलत असताना त्याकडे लक्ष न देणे.<br>• सूचना न समजणे.</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| वर्गव्यवस्थापन | • बोलताना त्यांच्याकडे बघून बोलावे.<br>• चेहऱ्यावर हावभाव असावे.<br>• आपला आवाज नीट ऐकू जाईल अशा अंतरावर बसवावे.<br>• आपल्या अंगणवाडीत एखादे कर्णबधिर मूल असेल, तर त्याने श्रवणयंत्र दिवसभर कानाला लावलेले आहेत का, ते चालू आहेत का, हे दररोज पाहावे.<br>• आपण लक्षात ठेवूया की, मुलाला ऐकायला येत नसेल, तर त्याला बोलता येत नाही. मात्र त्यांना लहान वयात ऐकायला येते का, हे तपासून श्रवणयंत्रांद्वारे ऐकायची संधी दिल्यास ते हमखास बोलू शकते. |

**बालक कर्णबधिर असल्याचे प्राथमिक निदान करण्याच्या काही सोप्या पद्धती अशा आहेत...**

१) **डोळे मिटून हालचाली :** सर्व मुलांना एकमेकांना स्पर्श होणार नाही अशा अंतरावर बसवा. डोळे घट्ट बंद करायला सांगा. सर्व मुलांना हात वर करा, हात खाली करा एक हात वर एक हात खाली अशा सूचना द्या. जी मुले या सूचनांना प्रतिसाद देणार नाहीत अशा मुलांना वारंवार सूचना द्या. तरीही ती योग्य प्रतिसाद देत नसतील तर पालकांना या मुलांच्या कानाची तपासणी करून घ्यायला सांगा.

२) **आंधळी कोशिंबीर :** सर्व मुलांसाठी हा खेळ घ्या. ज्या मुलांना ऐकायला येणार येणार नाही ती मुले डोळे बंद केल्यावर मित्रांच्या आवाजाला प्रतिसाद देणार नाहीत.

३) **ताटवाटी चाचणी :** सहा महिने वयाच्या पुढील मुलांसाठी ही चाचणी कशी घेता येईल हे पुढील व्हिडिओ लिंक वापरून पहा.

https://www.youtube.com/watch?v= ih2zpaHjVX8

४) याशिवाय व्हिडिओमध्ये अंगणवाडीताईंना कर्णबधिर मुले सामान्य मुलांच्या शाळेत मिसळून जावीत आणि त्यांचे शिक्षण योग्य प्रकारे होईल यासाठी त्यांना काय काय करता येईल याचीही चर्चा केली आहे.

**इतर दिव्यांगत्वे आणि मुकेपणा यांतील मुख्य फरक :**

अर्थात या विषयाचे वेगळेपण सर्वांत प्रथम लक्षात ठेवूया :

श्रवणदोष वगळता, इतर दिव्यांग प्रकार हे मुळातून दुरुस्त होणे अवघड आहे. मात्र बालक कर्णबधिर आहे हे अगदी लहान वयात समजले तर त्याला श्रवणयंत्रे देऊन वाचा उपचार म्हणजे स्पीच थेरपीद्वारे बोलायला शिकवता येते. मात्र कर्णबधिरता समजण्यास उशीर झाला तर वाढलेल्या वयात त्याला बोलायला शिकवणे शक्य नाही.

दुसरे असे की, इतर दिव्यांग प्रकार जन्मल्यानंतर लवकरच समजतात मात्र त्यांचा समूळ इलाज अशक्य आहे. मुकेपणा हा दिव्यांगप्रकार लवकर समजत नाही आणि ज्या बालकाचे श्रवणदोष लवकर समजून येऊन त्याचे निदान व उपचार झाले, तर त्याला मुकेपणापासून वाचवता येते.

**प्रात्यक्षिक :**

१) 'ताटवाटी चाचणी' उपक्रम पाहून त्याचे प्रात्यक्षिक वर्गात घ्या आणि मूकबधिर मूल लहान वयात, शून्य खर्चात ओळखण्याचा हा प्रयोग तुम्हांला कसा वाटला ते लिहून काढा.

## ८.१.२ बौद्धिक अक्षमता

पूर्वी बौद्धिकदृष्ट्या अक्षम मुलांना मतिमंद असे संबोधले जात असे; परंतु आता मात्र समाजात संवेदनशीलता आली आहे. प्रत्येक मूल वेगळे आहे आणि प्रत्येकाचा शिकण्याचा वेगवेगवेगळा असतो हे आपण जाणताच.

बौद्धिक अक्षमता म्हणजे काय, तर शारीरिक अक्षमतेची एक किंवा अधिक लक्षणे दिसून येतात; परंतु तीव्र पातळी असली, तर लक्षात येण्याइतकी कारक म्हणजेच शारीरिक अक्षमता यांच्यामध्ये आढळते.

| | |
|---|---|
| ठळक लक्षणे | • १५ महिन्यापर्यंत स्वतंत्र बसता न येणे.<br>• २.५ वर्षांपर्यंत चालता न येणे.<br>• स्वत:ची काळजी घेण्यात अडचण येणे.<br>• डोके आदळणे, स्वत:ला चावणे.<br>• सूचना न समजणे.<br>• ५ वर्षांनंतरसुद्धा स्वतःच्या हाताने खाणेपिणे करताना, शौचालयाचा वापर करताना अडचण येणे.<br>• शारीरिक गरजा (भूक, तहान, शू, शी, दुखापत, वेदना) समजण्यास अडचण येणे. |

| | |
|---|---|
| ठळक लक्षणे | • वस्तूंची ओळख, रंग, आकार आणि आकारमान समजण्यात अडचण येणे.<br>• खेळ व खेळांचे नियम समजण्यात अडचण येणे.<br>• अंतर, लहान–मोठे, लांब–आखूड संकल्पना अवगत नसणे.<br>• केलेली विनंती किंवा दिलेल्या सूचनांचे अजिबात आकलन होत नाही.<br>• वाचन, लेखन करताना समस्या येणे.<br>• अगदी जुजबी खाणाखुणांचीच भाषा वापरता येते.<br>• वस्तूचा वेग/गती यांची समज नसणे.<br>• विनाकारण इकडेतिकडे फिरणे, पाहणे, ओरडणे, वस्तू फेकणे. |
| बौद्धिक अक्षमता कमी–जास्त प्रमाणात असू शकते. प्रत्येक बालकाच्या क्षमतेनुसार त्याला उपक्रम देणे, सामावून घेणे गरजेचे असते. जरी पुढे जाऊन, ते बालक शालेय शिक्षण घेण्यास अपात्र असेल, तरी पण त्याला बाकी उपक्रमांमध्ये सामावून घेतल्याने, त्याचा सामाजिक/भावनिक विकास होण्यास मदत होते. | |

### ८.१.३ सामाजिक व भावनिक अक्षमता (स्वमग्नता)

आता आपण काहीसा उशिरा लक्षात येणारा आणि काहीसा दुर्लक्षित प्रकार, म्हणजे अध्ययन क्षमता याची माहिती घेऊया. कोणत्याही प्रकारची शारीरिक अक्षमता नसताना, ज्ञान व कौशल्य प्राप्तीमध्ये अपेक्षाप्रमाणे यश मिळवताना अडथळा येत असेल; तसेच समवयस्क गटाप्रमाणे कौशल्य प्राप्त करण्यामध्ये अडथळा येत असेल, तर त्याला अध्ययनक्षमता असल्याचे निदान होते. या मुलांना वाचन, लेखन, विमर्षण करणे, आठवणे किंवा माहितीचे सुसंघटन करणे अशा कौशल्यांमध्ये अडथळा येतो. परंतु हे कमी बुद्धिमत्तेचे किंवा आळशीपणाचे लक्षण नाही. ही मुले अगदी सामान्य मुलांसारखीच असतात. खेळ, नृत्य, गायन, चित्रकला इत्यादी क्षेत्रांत खूप पुढे जाऊ शकतात. हे लक्षात घेऊन या मुलांबाबत पालकांनी आणि शिक्षकांनी धैर्य आणि संयमाने काम करणे महत्त्वाचे असते.

| | |
|---|---|
| ठळक लक्षणे | • इतर मुलांच्या तुलनेत वाचन, लेखन करताना तसेच अंक समजण्यात अडचण येते.<br>• गोष्टीतला क्रम लक्षात राहत नाहीत.<br>• वारंवार अक्षरे उलट लिहितात.<br>• अक्षरांमधील फरक ओळखता येत नाही.<br>• बरीच अक्षरे आरशात प्रतिमा दिसते, तशी (mirror letters) लिहितात.<br>• गणिती संकल्पना, परिमाणे समजत नाही. |

| | |
|---|---|
| अध्ययन अक्षमता : प्रकार | • वाचन अक्षमता (डिसलेक्सिया)- अक्षर व शब्द वाचण्यात गोंधळणे.<br>• लेखन अक्षमता (डिसग्राफिया)- लेखन अतिशय हळू करणे, अक्षर व शब्द जसेच्या तसे लिहिता न येणे.<br>• गणितीय अक्षमता (डिसकॅलक्युलिया)- अंक, संख्या आणि गणितीय संकल्पना यांचे आकलन होण्यात अडचण येणे.<br>• स्मृतिभ्रंश (ॲम्नेशिया)- स्मृतिभ्रंशामुळे नवीन माहिती लक्षात ठेवणे, घटना आठवणे किंवा परिचित लोक/ठिकाणे ओळखणे यांमध्ये मर्यादा येतात. |

### स्वमग्नता (ऑटीझम) म्हणजे काय?

कधीकधी मुलांच्या वाढीच्या काळात मेंदूच्या विकासामध्ये काही अडथळा किंवा बिघाड होतो आणि त्यामुळे मानसिक समस्या निर्माण होतात. त्याला ऑटीझम म्हणतात. हा कोणताही रोग किवा आजार नाही. हा एक विकार आहे. बालक दोन ते तीन वर्षांचे असताना ऑटीझमची लक्षणे दिसून येतात. स्वमग्नता असणारी मुले सुरुवातीला सामान्य मुलांसारखीच दिसतात नंतर त्यांच्यात बऱ्यापैकी बदल दिसून येतो. ऑटीझमचे निदान जितक्या लवकर होईल, तितके संदर्भसेवेचे परिणाम चांगले होतात.

| | |
|---|---|
| ठळक लक्षणे | • डोळ्याला डोळा न भिडवणे.<br>• प्रतिसाद न देणे किंवा उशिरा प्रतिसाद देणे.<br>• वारंवार एकच कृती करणे.<br>• हात हलवून उत्तेजना प्रकट करणे.<br>• भाषा, चेहऱ्यावरचे हावभाव, शरीराच्या हालचाली सुसंगत नसणे.<br>• खेळणी एका विशिष्ट पद्धतीने खेळणे (उदा. खेळण्यातली गाडी चालवून न बघता, त्याचे एक चाक हाताने गोल फिरवत बसणे.)<br>• वातावरण, मोठा आवाज, कपडे व पदार्थ यांचा पोत आणि वास याबाबत तीव्र संवेदनशीलता. |
| वर्गव्यवस्थापन | • कामे शिकवण्यासाठी व ती कामे सुसंघटितपणे करता यावीत यासाठी, कॅलेंडर, तपास सूची अशा गोष्टींचा वापर करावा.<br>• बालकांना, रोजच्या जेवणाच्या वेळा पाळणे, गृहपाठाच्या वेळा पाळणे आणि झोपण्याच्या वेळा पाळणे याचा फायदा होतो. या बालकांना विशिष्ट नियम सांगितलेले आवडतात. |

| | |
|---|---|
| | • स्वमग्न बालकांकडून करून घेण्याच्या प्रत्येक कामाचे, अगोदर विश्लेषण करावे व त्या विशिष्ट कामाचे, काम पूर्ण करण्यासाठी छोटे छोटे टप्पे आखावेत.<br>• बालकांबरोबर बोलण्याची भाषा अत्यंत सोपी असावी. कमीत कमी शब्दात सांगावे. |

**ऑटीझमविषयी अधिक माहिती : याविषयी आणखी काही माहिती पुढील लिंक उघडून पाहावी.**

मुलाचे जर एकटे खेळणे प्रमाणापेक्षा जास्त असेल, ते दुसऱ्यांमध्ये अजिबात मिसळत नसेल, नजरेला नजर देऊन बोलता येत नसेल, आवाज दिला तर बघत नसेल, स्वतःहून आई–वडिलांना कुतूहलाने काही गोष्टी दाखवत नसेल तर, ही काळजीपूर्वक दखल घेण्यासारखी गोष्ट आहे. याचे निदान जितक्या लवकर होईल, तितके संदर्भ सेवेचे म्हणजेच रेफरल सेवेचे परिणाम चांगले मिळतात.

शाळा कशी असते, शाळेत काय करायचे असते, या सर्वांची तोंडओळख अगोदर करून द्यावी. स्वमग्न बालकांना सामाजिक आंतरक्रिया करण्यामध्ये समस्या असतात. याचप्रमाणे काल्पनिक खेळ खेळणे, सहसंपर्क साधणे यांमध्येही समस्या उद्‌भवतात. खूप कमी कृतींमध्ये सहभागी होऊ शकतात, तसेच त्यांच्या आवडींनाही मर्यादा असतात. काही स्वमग्न बालकांना बौद्‌धिक अक्षमतापण असते. झटके (फिट्स) येण्याची वारंवारिता जास्त असते. स्नायूंची लवचीकता कमी असते. सतत चिंता दर्शवतात. चेहऱ्यावर सतत चिंता भाव किंवा उत्सुकता दिसते. बदलांना विरोध करतात.

या बालकांशी बोलताना किंवा काही शिकवत असताना आवाजांमुळे (अगदी घड्याळाच्या टिक टिक आवाजानेसुद्‌धा), प्रखर प्रकाशामुळे त्यांचे चित्त लगेच विचलित होते.

या बालकांना कोणत्या गोष्टींमुळे मनावर ताण निर्माण होतो याचे निरीक्षण करावे आणि त्या गोष्टी टाळाव्यात. सामाजिक वर्तन त्यांना नैसर्गिकरीत्या समजत नाहीत, त्यामुळे त्यांना ते स्पष्टपणे सांगावेत. इतरांबरोबर आंतरक्रिया कशी करावी, बोलावे कसे हे शिकवावे, वाटणी करून वस्तू वापरणे, आळीपाळीने खेळणे अशा सामाजिक कौशल्यांसाठी छोटे छोटे खेळ घेणे, प्रश्न विचारणे असे उपक्रम

• संपर्क सत्रात गट करून स्वमग्न मुलांसाठी उपक्रम तयार करून, प्रत्यक्ष सादर करा.

## घटक क्र. ८.२ : विशेष गरजा असलेली बालके ओळखणे

### WHO ची प्रश्नसूची

विशेष गरजा असणारी मुले जर आपल्या वर्गात असतील तर एक सेविका या नात्याने आपली भूमिका काय आहे ते पाहूया. यातील पहिले काम अशी बालके कोणती याचे प्राथमिक निदान करणे हे आहे.

जागतिक आरोग्य संघटनेने अति जोखमीची बालके ओळखण्यासाठी, १० प्रश्नांची यादी दिलेली आहे, ती वापरून बालकांचे निरीक्षण करावे. त्यासाठी एक तक्ता तयार करावा लागेल. बहुतेक गोष्टी टिक मार्क करून नोंदवता येतील, पण काही बाबतीत नोंदी लिहाव्या लागतील. या नोंदींच्या आधारे काही बाबी पालकांना खासगी भेटीत बोलाव्यात. ही निरीक्षणे डॉक्टरांना मात्र निश्चितपणे दाखवावीत.

१) इतर बालकांच्या तुलनेत, बालकाला बसण्यात, उभे राहण्यात किंवा चालण्यात काही लक्षणीय विलंब झाला आहे का?

२) इतर बालकांच्या तुलनेत, बालकाला दिवसा किंवा रात्री पाहण्यात अडचण येते का?

३) बालकाला ऐकण्यास त्रास होत आहे का?

४) तुम्ही बालकाशी बोलत आहात आणि त्याला बोललेले समजत नाही, असे आढळून येते का?

५) त्याच्या हातामध्ये किंवा पायामध्ये सुलभ हालचाल जाणवते का? किंवा बालकाला चालण्यात किंवा हात हलविण्यात अडथळे येतात का? त्यांचे हात किंवा पायांत दुर्बलता किंवा ताठरता जाणवते काय?

६) बालकाबाबत फीट येणे, शरीर ताठ होणे, शुद्‌ध जाणे असे काही दिसून येते का?

७) बालक त्याच्या वयाच्या इतर बालकांप्रमाणेच कृती शिकू शकते का?

८) बालक बोलू शकते का? (बालकाचे शब्द इतरांना समजतात का? बालक समजण्याजोगे बोलते का?)

९) ३ ते ९ वर्षांतील बालकाचे बोलणे कोणत्याही प्रकारे सर्वसामान्य बालकांपेक्षा वेगळे आहे का? कुटुंबातील जवळच्या व्यक्तींव्यतिरिक्त इतरांना स्पष्टपणे समजत नाही असे घडते का? २ वर्षांचे बालक किमान एका वस्तूचे नाव सांगू शकते का? (एखादा प्राणी, खेळणे, वस्तू इत्यादी.)

१०) बालक इतर बालकांच्या तुलनेत निस्तेज किंवा मंद दिसते का?

- संपर्क सत्रातील नियोजनानुसार युनिसेफने विशेष गरजा असणारी बालके ओळखण्यासाठी तयार केलेली तपास सूची वापरून वहीत निरीक्षणे नोंदवावीत. पुढच्या संपर्क सत्रात त्याचा उपयोग कसा केला याविषयी चर्चा करावी.

## घटक क्र. ८.३ : सेविकेची भूमिका

विशेष गरजा असणाऱ्या मुलांच्या बाबतीत एक सेविका या नात्याने असणारी भूमिका फार मोलाची आहे. त्यातील काही महत्त्वाचे मुद्दे पुढे वाचूया.

| | |
|---|---|
| पालकांशी चर्चा | • आपले मूल आहे तसे स्वीकारण्यासाठी पालकांच्या मनाची तयारी करण्यासाठी, त्यांच्याशी संवाद करावा.<br>• वरपांगी सहजासहजी न दिसणारे अपंगत्व पालकांना माहीत असते. ते पालक सांगतात, तेव्हा आपण त्याच्या नोंदी ठेवाव्यात.<br>• बालकाची कार्यक्षमता आणि विकासाची पातळी कशीही असली, तरीही त्याचे पालन पोषण व संगोपन करणे आवश्यक आहे. ही सकारात्मक जाणीव असावी. |
| पालकांशी चर्चा किंवा पालक समुपदेशन | • बालकाचा स्वीकार करणे.<br>• सुजाण पालक असणे–बालकाच्या विशेष गरजा समजणे.<br>• पालकसभेत या मुलांच्या विशेष गरजांचे निदान, घरी शाळेतील शिक्षणाला पूरक अशा घेण्यासारख्या कृती, पुनर्वसन, यशोगाथा, इत्यादी व्हिडिओ दाखवावेत. वाचनासाठी साहित्य सुचवावे. |
| जनजागृती | • समाजातील इतर लोकानी दिव्यांग बालकांना व त्यांच्या पालकांना नावे ठेवू नयेत, तसेच शक्य झाल्यास काही मदतच करावी, यासाठी अंगणवाडी स्तरावर बैठकीमधून इतर पालकांशी चर्चा करावी. |
| वर्गमित्र | वर्गात सर्वसमावेशक, सहभागी आणि सहकार्याचे वातावरण निर्माण करणे. |
| संदर्भ सेवा | • आशा (Asha ANM - Auxilliary Nurse Midwife) चा संदर्भ द्यावा.<br>• PHC (Primary Health Centre, RBSK - Rashtriya Bal Swashtya Karyakram) कडे तातडीने जाण्यास योग्य ती मदत करावी.<br>• सुरुवातीला पालक नकारात्मक भूमिका घेऊ शकतात, त्यामुळे पालक मुलाला योग्य उपचारासाठी म्हणजे थेरपीसाठी अथवा पुनर्वसन समुपदेशकांचा सल्ला घेण्यासाठी जात आहेत की नाही याची खात्री करावी. |

| | |
|---|---|
| | • UDID व अपंगत्व प्रमाणपत्र अर्ज करण्यासाठी कुटुंबियांना मदत करावी. त्याचे पुढील प्रकारचे अनेक फायदे आहेत हे समजावून द्यावे.<br>➢ आरोग्य साहाय्य मिळण्यासाठी (मोफत/कमी दरात सहाय्यक उपकरणे)<br>➢ आर्थिक साहाय्य मिळू शकते<br>➢ सिंगल ID सर्व स्तरांवर समान कार्ड<br>➢ शैक्षणिक समर्थन/शिष्यवृत्ती/आरक्षण<br>➢ सरकारी योजनेसाठी अनिवार्य |

## घटक क्र. ८.४ : सर्वसमावेशक शिक्षण

सर्वसमावेशक शिक्षण म्हणजे अपंग असणारी व नसणारी मुले एकत्र शिकतात. विविध प्रकारच्या अपंग मुलांच्या शारीरिक, भावनिक व शैक्षणिक गरजा योग्य प्रकारे भागवण्यासाठी वातावरण अनुकूल असते.

**सर्वसमावेशन म्हणजे काय करायचे?**

- अंगणवाडीकेंद्रात येण्याची संधी द्या. त्यांच्याशी प्रेमाने वागा.
- सहभागाचे आणि लहानसहान यशाचेही कौतुक करून, त्यांचा आत्मविश्वास वाढवा.
- विशेष मुलांना मदत होईल, असे वातावरण निर्माण करा.
- वर्गातील विशेष मुलेही सहभागी होऊ शकतील, अशा कृती घ्या.
- ज्या विशेष मुलांकडे वेगळी कौशल्ये आहेत, ती इतरांना समजतील अशा कृती आवर्जून घ्या.
- विशेष गरजेच्या प्रकारासाठी शिकवण्याची योग्य ती पद्धत वापरा.
- शिकण्यात काही अडथळे येत असतील तर शक्य असेल, तर तो लवकर दूर करा.

**आता आपण सर्वसमावेशनासाठी योग्य असे वर्गव्यवस्थापन कसे करावे ते बघूया.**

- शारीरिक हालचालींना मर्यादा असणाऱ्या मुलांना कायम स्वतः मदत करावी. ते पाहून इतरही मुलेही मदत करायला प्रेरित होतात.
- ज्या मुलांना साधनांची गरज आहे अशा मुलांना शासनाची साधने मिळवून देण्यासाठी पुढाकार घ्यावा.
- वर्गात दिलेली सूचना, या बालकाला वैयक्तिकरीत्या पण द्यावी.
- इतर बालकांकडून होणारे चिडवणे, खिल्ली उडवणे या गोष्टींपासून, त्या बालकाचे संरक्षण करावे व इतर बालकांना सुद्‌धा याची जाणीव करून द्यावी.
- एखादे चांगले वर्तन घडले, तर लगेच त्याची दखल घ्यावी व कौतुक पण करावे.

- या बालकांना उपयोगी पडेल असे शैक्षणिक साधन वापरावे.
- प्रश्न विचारताना त्या बालकाचे नाव घेऊनच विचारावा.
- जर ते बालक दुर्लक्ष करत असेल, तर त्याच्या जवळ थांबावे.
- शारीरिक व मानसिक कृतींमध्ये समतोल साधावा.
- वर्गाचे नियम अथवा इतर वाक्ये अथवा सूचना, मोजक्या शब्दात आणि स्पष्ट सांगाव्यात.

योग्य व्यवस्थापनाने सर्व समावेशन शक्य आहे. स्वमग्न असले तरी, बौद्धिक अक्षमता असली तरी, वाचादोष असला तरी काय झाले? स्वीकार आणि प्रोत्साहन गरजेचे आहे.

पालक व समाज यांनी जागृती व स्वीकृती दाखवली, तर दिव्यांग मुलांबरोबरचे आपले सहजीवन आनंददायी होईल.

**प्रात्यक्षिक :**

१) तुमच्या वर्गात विशेष गरजा असणारी काही मुले आहेत का? अशी मुले तुम्ही कशी ओळखली ते सविस्तर लिहा.

२) अंगणवाडीमधील शिक्षण सर्वसमावेशक करण्यासाठी अ) सध्या तुम्ही काय करता याविषयी, तसेच यात आणखी कोणती भर घालावी लागेल याविषयीचे मुद्दे लिहा.

संपर्क सत्रातील नियोजनानुसार, युनिसेफने विशेष गरजा असणारी बालके ओळखण्यासाठी तयार केलेली तपाससूची वापरून, निरीक्षणे नोंदवा. पुढच्या संपर्कसत्रात त्याचा उपयोग कसा केला याविषयी चर्चा करा.

३) विशेष गरजा असणारी मुले ओळखणे आणि संदर्भसेवा यांविषयी पालकांशी पालकसभेत आणि व्यक्तिगत संवाद साधा. हा विषय संवेदनशील असल्याने योग्य ती पथ्ये पाळा. याबाबत आपला अनुभव लिहा.

४) अंगणवाडीतील बालकांना या वर्षी किंवा याआधी, संदर्भसेवांचा लाभ तुम्ही मिळवून दिला होता का? दिला असल्यास त्याबद्दल सविस्तर लिहा.

५) कर्णबधिर मुलांच्या अध्ययनासाठी काही उपक्रम सुचवा. त्यांची सविस्तर लिहा.

६) शेजारचा मिहीर १० वर्षांचा आहे; परंतु काही अक्षरे उलटी (mirror) काढतो. त्याच्याकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे असे तुम्हांला वाटते का? कसे लक्ष देणार ते लिहून काढा.

७) विशेष गरजा ओळखण्यासाठी WHO ने दिलेली तपास सूची वापरून, तुमच्या अंगणवाडीतील बालकांबाबत नोंदी करा व त्याचे फोटो जोडा.

---

## स्वाध्याय

१) विशेष गरजा असलेली मुले म्हणजे काय? विशेष गरजांचे प्रकार कोणते?

२) शारीरिक विकलांगता कोणत्या प्रकारच्या असतात? अशा मुलांसाठी अंगणवाडीत कोणत्या सुविधा असायला हव्यात, ते लिहा. तुमच्या अंगणवाडीत यांतील काही सुविधा केल्या असतील, तर त्याची माहिती लिहा.

३) मतिमंद म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुलांना, आता कोणत्या नावाने ओळखले जाते? हा बदल का केला असावा असे तुम्हांला वाटते? ते सविस्तर लिहा.

४) स्वमग्नता म्हणजे काय? त्याची तुम्हाला समजलेली लक्षणे सविस्तर लिहा.

५) स्वमग्न मुलाला 'चेंडू फेकणे' या उपक्रमात कसे सहभागी करून घेता येईल, त्याच्या पायऱ्या लिहा.

६) अंगणवाडीत विशेष गरजा असलेल्या मुलांसाठी उपक्रम घेताना, तुमची भूमिका काय असेल, ते सविस्तर स्पष्ट करा.

७) विशेष गरजा असणारी मुले ओळखण्यासाठी WHO ची तपास सूची तुमच्या शब्दांत लिहा.

८) विशेषमुलांच्या शिकण्याबाबत तुमची भूमिका काय असावी ते लिहा.

९) सर्वसमावेशक शिक्षण म्हणजे काय ते सोदाहरण स्पष्ट करा.

१०) मुलांच्या सर्वसमावेशनाबाबत तुमचे मत सविस्तर स्पष्ट करा.

११) UDID कार्डचे काय फायदे आहेत, ते तुमच्या शब्दात स्पष्ट करा.

१२) विशेष गरजा असणाऱ्या बालकांसाठी, वर्गवातावरणामध्ये आपण आतापर्यंत कधीही काही बदल केला असल्यास, सविस्तर स्पष्ट करा.

# घटकसंच ९ : कुटुंब व समाज




पालक आणि कुटुंब हे बालकाच्या अध्ययनामध्ये आणि विकासामध्ये शाळेचे सहभागीदार असतात. सुरुवातीच्या काळात शाळेत काय घडते, ते पालकांनी समजून घेऊन मदत करणे आवश्यक आहे. शिक्षकांनी बालकाची घरातील परिस्थिती समजून घेणे अधिक महत्त्वाचे आहे, त्यामुळे ते बालकाशी संवाद साधताना त्याची दखल घेऊ शकतील.

पालक आणि कुटुंब यांच्याशी संबंध निर्माण करून, ते टिकून राहण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्नशील असले पाहिजे. पालकांशी सातत्याने संवाद होणे गरजेचे आहे. त्यांच्याशी संवाद करताना ते शालेय प्रक्रियेतील सहभागीदार असल्याची जाणीव ठेवावी.

*(संदर्भ : राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर – २०२४ : पृष्ठ क्र. २४४)*

**घटकसंचाविषयी थोडेसे....**

मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे. आपण आणि आपले कुटुंब हा समाजाचा अविभाज्य भाग आहोत, तशीच आपली अंगणवाडी समाजाचा अविभाज्य भाग आहे. अंगणवाडी ही बालकांच्या सामाजिकीकरणास मदत करत असते म्हणून अंगणवाडीच्या प्रत्येक कार्यक्रमात आपण बालकांचे पालक, कुटुंबीय, त्यांच्या भोवतीचा समाज यांचा सहभाग घ्यायला हवा. हे कसे करावे, त्यासाठी कोणते कार्यक्रम आखावेत हे समजण्यासाठी सदरच्या घटकात कुटुंब सहभाग, पालकसभेचे महत्त्व व कार्यशाळा, समाज सहभाग, समाज सहभागाच्या यशोगाथा, शिक्षणविषयक जागृतीत अंगणवाडीचा सक्रिय सहभाग हे उपघटक अभ्यासणार आहोत.

माझ्या नोंदी :

# घटकसंच ९ : कुटुंब व समाज

**या घटकात आपण काय शिकणार?**

९.१ कुटुंब सहभाग

९.२ पालक सभा व कार्यशाळा

९.३ समाज सहभाग

**प्रास्ताविक :**

मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे. आपण आणि आपले कुटुंब हा समाजाचा अविभाज्य भाग आहोत, तशीच आपली अंगणवाडी पण समाजाचा अविभाज्य भाग आहे. अंगणवाडी ही बालकांच्या सामाजिकीकरणास मदत करत असते, म्हणून अंगणवाडीच्या प्रत्येक कार्यक्रमात आपण मुलांचे पालक, कुटुंबीय, त्यांच्या भोवतीचा समाज यांचा सहभाग घ्यायला हवा. हे कसे करावे? त्यासाठी कोणते कार्यक्रम आखावेत, हे समजण्यासाठी सदरच्या घटकात कुटुंब सहभाग, पालक सभेचे महत्त्व व कार्यशाळा, समाज सहभाग, समाज सहभागाच्या यशोगाथा, शिक्षणविषयक जागृतीत अंगणवाडीचा सक्रिय सहभाग हे उपघटक अभ्यासणार आहेत.

## घटक क्र. ९.१ : कुटुंब सहभाग

**या घटकात आपण काय शिकणार?**

- मुलाला कसे समजून घेता येईल?
- कुटुंबाचा सहभाग घेऊन, अंगणवाडीत सकारात्मक बदल कसे करता येतील?
- अंगणवाडी सेविका आणि कुटुंब यातील नातेसंबंध कसे दृढ करायचे?

मुलाच्या वाढीच्या टप्प्यावर कुटुंब आणि अंगणवाडी हे जर एकत्र आले, तर मुलाचा विकास अधिक चांगल्या पद्धतीने होऊ शकतो. पालक सभेतील विविध विषयांमुळे पालक घरी, परिसरात सहज खेळता खेळता अनेक उपक्रम घेऊ शकतात. त्यातून मूल अनेक विषय शिकू शकते.

**या घटकाचा व्हिडिओ बघून झाल्यानंतर, पुढील प्रश्नांची उत्तरे आपल्या कार्यपुस्तिकेत लिहा.**

१) मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी कुटुंबाचा सहभाग का महत्त्वाचा आहे?

२) अंगणवाडीच्या दैनंदिन उपक्रमात पालकांचा सक्रिय सहभाग कसा घेऊ शकतो?

३) मुलांच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या कृती व उपक्रमांमध्ये पालकांची कोणत्या प्रकारची मदत घेता येईल?

मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी कुटुंबाचा सहभाग कसा घ्यायचा, हे समजून घेण्यासाठी पुढील चित्रे पाहा. हे पाहताना आपल्याला पालक काय काय उपक्रम घेत आहेत, अंगणवाडीत त्यांचा सहभाग कशाप्रकारे आहे, पालक घरी मुलांबरोबर कसे खेळत आहेत, या बाबींचे अवलोकन करावयाचे आहे.





## घटक क्र. ९.२ : पालक सभा व कार्यशाळा

या घटकात आपण पालक सभेचे महत्त्व, पालकांसाठी विविध विषयांवर पालक सभा व कार्यशाळा आयोजित करणे. पालक कार्यशाळा कशा पद्धतीने घ्यावी? या बाबी अभ्यासूया.

मुलांच्या वाढ व विकासाचे टप्पे समजून घेण्यासाठी, पालकांचे सक्षमीकरण होणे कसे महत्त्वाचे आहे हे समजून घेण्यासाठी या घटकातील व्हिडिओ पाहा, तसेच पुढील छायाचित्रे पाहा. हे पाहताना पुढील मुद्दे नक्की लक्षात घ्या.

१) पालक कार्यशाळेत ताई पालकांचा सहभाग कशा प्रकारे घेत आहेत?

२) संदर्भसाहित्य दाखवून पालकांना माहिती देणे.





## घटक क्र. ९.३ : समाज सहभाग

या घटकात आपण अंगणवाडी विकासात समाज सहभाग कसा घेता येईल, समाज सहभागाच्या काही यशोगाथा व समाजाला भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांवर अंगणवाडीचा सक्रिय सहभाग, या बाबी अभ्यासूया.

समाजातील विविध घटकांचा अंगणवाडी विकासासाठी सहभाग घेता येईल.

### ९.३.१ अंगणवाडी विकासात समाज सहभाग

समाज म्हणजे पालक, कुटुंब, युवागट, स्थानिक स्वराज्य संस्था; जसे ग्रामपंचायत, नगरपालिका यांसारख्या शासकीय यंत्रणा, विविध समाजसेवी संघटना, संस्था इ. समाजघटक अनेक पद्धतींनी अंगणवाडीत सहभागी होऊ शकतात. याद्वारे अंगणवाडीला समाजाचा अविभाज्य भाग होण्यास मदत होईल. अशा प्रकारे विविध पद्धतीने समाजाचा सहभाग घेता येईल; जसे १०० टक्के बालकांची नोंदणी, १०० टक्के उपस्थिती, याकरता समाजातील विविध घटकांची मदत घेता येईल, पायाभूत सुविधांसाठी लोकांची मदत घेता येईल. ग्रामपंचायतीकडून विविध पायाभूत सुविधा मिळवता येतील.

### ९.३.२ समाजाला भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांवर, तसेच शिक्षणविषयक जागृतीत अंगणवाडीचा सक्रिय सहभाग

अंगणवाडी विविध सेवांच्या माध्यामातून समाजाच्या संपर्कात असते. उदा. संदर्भसेवेच्या माध्यमातून गर्भवती स्त्रियांना सकस पोषण आहार, कुपोषित मुलांना पोषक आहार इ. मध्ये अंगणवाडीची सक्रिय भूमिका, कुपोषण यांसारख्या विविध समस्यांवर मात करण्यास मदत करते.

कुपोषणासारखे विविध प्रश्न समाजाला भेडसावत आहेत. नियमित कामातून अंगणवाडीताई हे प्रश्न सुटावेत याकरता प्रयत्नरत असते. याचबरोबर समाजात राबवल्या जाणाऱ्या नावीन्यपूर्ण उपक्रमात ती सक्रियपणे सहभागी होऊ शकते.

समाजाला भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांवर अंगणवाडीच्या सक्रिय सहभागाचे उदाहरण बघूया.

वर्तमानपत्रात सोलापुरातील ताट–वाटी प्रयोगाची बातमी आपण वाचली असेल.

**सोलापूरची ताटवाटी चाचणी ठरली राज्यासाठी मॉडेल**

जिल्हापरिषद आणि 'व्हॉइसलेस'चा बिनखर्ची उपाय; यंदा पुणे व सातारा जिल्ह्यात पायलट प्रोजेक्ट

**चार हजार सेविकांना ताट–वाटीचे प्रशिक्षण**

**कर्णबधिरांना सोलापुरातून 'व्हॉईस'**

अर्थसंकल्पात तरतूद : धोरण निर्मितीमध्ये महत्त्वाचा वाटा

सोलापूर जिल्हापरिषद महिला व बालकल्याण विभाग 'व्हॉईस ऑफ व्हॉईसलेस' या सामाजिक संस्थेने लहान वयातील कर्णबधिर बालके शोधण्यासाठी सोलापूर जिल्ह्यात केलेला ताट–वाटी चाचणी प्रयोग राज्यासाठी मॉडेल ठरला आहे. या उपक्रमांत अंगणवाडीताईंची भूमिका महत्त्वाची होती. एक वर्षापर्यंतच्या कर्णबधिर मुलांना ताट–वाटी वाजवून ओळखणे यात अंगणवाडीताईंनी सक्रिय भूमिका बजावली.



तुम्ही या पद्धतीने विविध प्रश्नांसंदर्भात सहभाग दिला असल्यास PLC मध्ये यावर चर्चा करा.

**सारांश :** समाजाचा सहभाग हा बालकांच्या विकासासाठी महत्त्वाचा असतो. हा सहभाग पुढील स्वरूपाचा असतो.

- अंगणवाडी विकासात समाज सहभाग पुढील स्वरूपाचा असतो.
- समाजाला भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांवर अंगणवाडीचा सक्रिय सहभाग.

**प्रात्यक्षिक :**

१) विविध वयोगटातील पालकांचा आणि समाजघटकांचा अंगणवाडीत वेगवेगळ्या प्रकारचा सहभाग आपण कसा घेऊ शकाल, ते लिहा. यासाठी कोणकोणते उपक्रम करता येतील ते लिहा.

२) पालकांना मार्गदर्शन करण्यासाठी, एखाद्या स्रोत व्यक्तीला बोलावले असेल, तर त्याची माहिती लिहा किंवा पालकांना तुम्ही प्रात्यक्षिकांसह कसे मार्गदर्शन केले, ते लिहा.

३) अंगणवाडीच्या विकासात समाजाचा सहभाग घेतला असेल, तर त्याची माहिती लिहा.

४) पालक आणि समाज सहभाग याबाबत तुम्ही काही वर्तमानपत्रात वाचले असेल, तर त्याची कात्रणे गोळा करून चिकटवा, त्याचा फोटो काढून पाठवा. त्यावर तुमचे मत लिहा किंवा तुम्हांला सुचलेला उपक्रम लिहा.

## स्वाध्याय

१) मुलांच्या विकासासाठी कुटुंबाचा सहभाग कसा महत्त्वाचा असतो ते लिहा. अंगणवाडीत मुलांच्या कुटुंबाचा सहभाग कसा घ्याल?

२) मुलांच्या विकासात कुटुंबाची भूमिका सविस्तर स्पष्ट करा.

३) अंगणवाडीच्या विकासात समाजाचा सहभाग कसा घ्याल ते लिहा.

४) समाजातील मुलांच्या संदर्भातील कोणते प्रश्न तुम्हांला जाणवले, ते दूर करण्यासाठी तुम्ही समाजाचा सहभाग कसा घेऊ शकता ते लिहा.

# घटकसंच १० : नियोजन व मूल्यांकन



अध्यापन ही बालकांचे अध्ययन होण्यासाठी जाणीवपूर्वक केली जाणारी कृती असते, म्हणून ती सुनियोजित असणे आवश्यक आहे.

नियोजनामध्ये क्षमता आणि प्राप्त होणाऱ्या अध्ययन निष्पत्तींनुसार, वर्गातील उपक्रमांची रचना आणि संघटन, अध्यापनशास्त्र, संसाधने आणि मूल्यांकन यांचा समावेश होतो. बालकांच्या विकासाला साहाय्य करणाऱ्या कृती, गृहकार्य व वर्गात शिकवल्या जाणाऱ्या पाठांशी संबंधित गोष्टींचे वर्गात मांडलेले प्रदर्शन इ. बाबी सुद्धा नियोजनात अंतर्भूत असतात.

मूल्यांकन हा अध्ययन–अध्यापन प्रक्रियेचा एक भाग आहे. मूल्यमापन प्रक्रियेमध्ये बालकांच्या अध्ययनासंबंधी, विविध स्रोतांकडून पद्धतशीरपणे माहिती गोळा केली जाते. आशय आणि अध्यापनशास्त्राच्या मदतीने बालकांसाठी अध्ययन अनुभवांचे आयोजन केले जाते. हे करत असताना, मूल्यांकनाद्वारे शिक्षक, पालक आणि स्वत: बालकांना त्यांच्या प्रगतीबाबत माहिती मिळते. सातत्यपूर्ण मूल्यांकनातून प्राप्त माहितीचा उपयोग करून, शिक्षक बालकांसाठी अध्ययन अनुभवांचे नियोजन आणि आयोजन करतात.

*(संदर्भ : राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर – २०२४ : पृष्ठ क्र. ८३, १८९)*

**घटकसंचाविषयी थोडेसे....**

कोणत्याही कामाच्या यशस्वितेचा, नियोजन हा पाया असतो. जितके नियोजन उत्तम असेल, तेवढे काम सुरळीतपणे पूर्ण होते. कामाचा ताण जाणवत नाही, त्यामुळे बालशिक्षणात नियोजनाची भूमिका महत्त्वाची असते. रचनात्मक शिक्षणअनुभव देण्यासाठी, नियोजन आवश्यक ठरते. नियोजनपूर्वक अनुभव दिल्यानंतर मुलांना मिळालेले अध्ययनअनुभव किती प्रमाणात प्रभावी ठरले, हे बघण्यासाठी मूल्यांकन करावे लागते, म्हणून नियोजन व मूल्यांकन या घटकात, नियोजनाची गरज का असते, अभ्यासक्रम नियोजनाचे घटक, नियोजनाचे प्रकार, नियोजनाची वैशिष्ट्ये, वर्ग मांडणी–अध्ययन कोपरे, बालके खेळत असताना अंगणवाडीताईची भूमिका, मूल्यांकन व मूल्यांकनाच्या पद्धती या उपघटकांचा अभ्यास करणार आहोत.

माझ्या नोंदी :

# घटकसंच १० : नियोजन व मूल्यांकन

## घटक क्र. १०.१ : नियोजन

**या घटकात आपण काय शिकणार आहोत?**

१०.१.१ नियोजनाची गरज व घटक

१०.१.२ नियोजनाचे प्रकार :

अंगणवाडीत कोणकोणत्या घटकांचे नियोजन करावे लागते आणि त्याची काय गरज असते, हे पुढील मुद्दे वाचून तुमच्या लक्षात येईल.

### १०.१.१ नियोजनाची गरज व घटक :

हा भाग समजून घेण्यासाठी नियोजनाची गरज व घटक हा व्हिडिओ पाहा. त्याआधारे दिलेले प्रश्न सोडवा.

नियोजनाची गरज प्रत्येक ठिकाणी लागत असते. स्वयंपाक करायचा आहे, कोणते काम केव्हा आणि कसे करायचे आहे, प्रवासाला जायचे आहे. अशा अनेक कामात सातत्याने नियोजनाची गरज भासत असते. नियोजनामुळे कामे नेटकी आणि वेळेत पूर्ण होण्यास मदत होते.

**आता अंगणवाडीतील नियोजनाचा विचार करूया.**

- अंगणवाडीमध्ये प्रत्यक्ष काम करताना तुम्हांला कोणत्या बाबींचे नियोजन करावे लागते, हे तुमच्या अनुभवातून आठवा.
- त्याची यादी तयार करा.

**या घटकाचे आपण दोन भाग मानू.** १) अभ्यासक्रम नियोजन २) अंगणवाडीच्या जबाबदाऱ्यांचे नियोजन.

**१) अभ्यासक्रम नियोजन :** हा भाग मुलांच्या शिकवण्यासंदर्भातील आहे, त्यामुळे, सर्वांत महत्त्वाचा असल्याने हे नियोजन बारकाईने करणे आवश्यक असते. सर्व कामे सुरळीत होतात, वेळेत होतात. या नियोजनात विविधता, रंजकता आणि अर्थपूर्णता असली, तर मुले ही अंगणवाडीत नीट रमतील. अध्यापनाच्या आणि मुलांच्या शिकण्याच्या दृष्टीने नियोजनाचे स्वरूप समजावून घेणार आहात.

**नियोजन करता येण्यासाठी आवश्यक घटक :**

- ३ ते ६ वयानुरूप मुलांचा विकासक्रम, त्यांच्या क्षमता माहीत असणे.
- मुलांना प्रत्येक वयात काय यायला हवे, याला 'अध्ययन निष्पत्ती' असे म्हणतात. त्या साध्य करण्यासाठी शिकण्या-शिकवण्याच्या पद्धती माहीत असणे आवश्यक आहे.

अनुभवाधारित, खेळ–खेळणी आधारित, गोष्टी आधारित, शैक्षणिक साधने वापरून करण्याच्या कृती, प्रकल्प किंवा थीम आधारित अशा काही पद्धती, यासाठी वापरायच्या असतात हे माहीत असावे.

- उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मोठ्यांनी मार्गदर्शन करण्याच्या आणि मुलांनी स्वतंत्रपणे करण्याच्या कृती माहीत असायला हव्यात.
- कृतींचा क्रम आणि कालावधी माहीत असायला हवा.
- कृतींसाठी वापरावे लागणारे साहित्य तयार असावे.
- वर्गव्यवस्था, बैठक व्यवस्था, साहित्य मांडणी यांची रचना करता यावी.
- विशेष गरजा असलेल्या मुलांसाठी कृती ठरवता याव्यात.
- सर्व कृतींचे दिवसाचा आणि संपूर्ण वर्षाचा कालावधी लक्षात घेऊन विभाजन करता यावे.
- दिवसाच्या वेळेचे योग्य नियोजन करता यावे.

**२) अंगणवाडीच्या जबाबदाऱ्यांचे नियोजन :** यामध्ये अंगणवाडीतील तुमच्या सर्व जबाबदाऱ्यांच्या नियोजनाचा समावेश होईल.

- अंगणवाडीतील सर्व वस्तू, रजिस्टर्स, माहितीपत्रके, खेळणी, साधने यांच्या जागा निश्चित करणे.
- मुलांना शिकवणे आणि तुमची इतर कामे, सर्व रजिस्टर्स, पत्रके भरणे, लसीकरण इत्यादी सर्व कामांचे नियोजन.
- पालकभेटी, पालकसभा, गावातील भेटी
- तुमच्या पर्यवेक्षकांबरोबरच्या बैठका
- महिन्याभरात मुलांना कोणता खाऊ व केव्हा द्यायचा याचे नियोजन.

### १०.१.२ नियोजनाचे प्रकार :

हा भाग समजून घेण्यासाठी 'नियोजनाचे प्रकार' हा व्हिडिओ पाहा. त्यावर दिलेले प्रश्न सोडवा.

**आपण या घटकात काय शिकणार आहोत :**

- नियोजनाचे प्रकार माहीत होतील.
- वार्षिक आणि मासिक नियोजनाच्या आधारे साप्ताहिक आणि दैनिक नियोजन करता येईल.
- नियोजनानुसार वर्गमांडणी कशी करायची हे माहीत होईल.

**नियोजनाचे एकूण चार प्रकार आहेत.**

१) वार्षिक २) मासिक ३) साप्ताहिक ४) दैनिक

### १०.१.२.१ वार्षिक किंवा दीर्घकालिक नियोजन :

वर्षभरात अंगणवाडीत करण्याच्या सर्व कार्यक्रमांचे, उपक्रमांचे नियोजन करणे, म्हणजे वार्षिक नियोजन.

**वार्षिक किंवा दीर्घकालीन नियोजन :** या नियोजनाचे दोन भाग करता येतील.

१) **भाग – १ :** यामध्ये वर्षभरातील सुट्ट्या, साजरे करावयाचे सण–उत्सव, मुलांसाठीचे छोटे–मोठे कार्यक्रम, पालकसभा, गावातील सभा व गावात घेण्याचे कार्यक्रम अशा प्रकारचे नियोजन असते. दिवस, ऋतू, पारंपरिक सणांचा काळ हे लक्षात घ्यावे लागते.

२) **भाग – २ :** हे नियोजन शिकणे शिकवणे (अध्ययन–ध्यापन) यातील कृतींचे असते. बालवयातील पाचही विकासक्षेत्रे शारीरिक, सामाजिक, भावनिक आणि नैतिक विकास, बोधात्मक, भाषा व साक्षरता, सौंदर्यदृष्टी आणि सांस्कृतिक विकास, त्यातील क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती या आधारे वर्षभरात घेता येऊ शकणारे सर्व खेळ, कृती, उपक्रमांचा समावेश यात असतो किंवा विकासक्षेत्र हा शब्द न वापरता भाषा, गणित, जीवनानुभव, कला, खेळ अशी विषयानुरूप सर्व उपक्रमांची एकत्रित यादी करणे अपेक्षित असते. सर्वांत महत्त्वाचे यातील उपक्रमांचा क्रम बालकांच्या वयोगटातील विकासानुरूप ठरवावा लागतो. हे तुम्ही अध्यापन नियोजनाच्या घटकात वाचले आहे.

#### नियोजनाची वैशिष्ट्ये :

- हे नियोजन ३ ते ४, ४ ते ५, ५ ते ६ असे वयानुरूप, मुलांच्या विकासानुरूप करावे लागते.
- कोणत्या वयात कोणत्या संकल्पना मुलांना समजायला हव्यात, कोणते अध्ययन अनुभव द्यायला हवेत, याचा विचार करून वार्षिक नियोजन तयार केले जाते.
- प्रामुख्याने काही प्रकल्प किंवा विषयगोफ (थीम) पद्धती वापरायची असेल, तर त्याचे नियोजन ऋतू, सण, हवामान अशा थीमनुसार करावे लागते. मुले कोणत्या परिसरातील आहेत, त्यांचे अनुभव काय आहेत, आजूबाजूला त्यांना काय पाहायला मिळेल याचा विचार करून, प्रकल्पाचे नियोजन करावे लागते.
- अनुभव, कृती, खेळ, उपक्रम याची सोप्याकडून कठीण होत जाणारी मांडणी, या नियोजनात अपेक्षित असते.
- मुलांचे घर, समाज, परिसर, सांस्कृतिक संदर्भ घेऊन, कृती उपक्रमांची निवड केलेली असावी.

वरील बाबी विचारात घेऊन वार्षिक नियोजन तयार करा.

### १०.१.२.२ मासिक नियोजन :

वार्षिक नियोजनाच्या आधारे दर महिन्याचे नियोजन करणे म्हणजे 'मासिक नियोजन' होय. हे साधारण ११ महिन्यांचे असते. 'आकार'चे नियोजन तुमच्याकडे असेल, ते वाचा.

**मासिक नियोजनाची वैशिष्ट्ये :**

- यामध्ये प्रत्येक महिन्यात येणारे कार्यक्रम, सुट्ट्या, बैठका आणि वर्गातील शैक्षणिक उपक्रम यांचे नियोजन असावे.
- प्रत्येक महिन्यातील हवामान, उत्सव, सण यांचा आवश्यकतेनुसार संदर्भ घेऊन उपक्रमाची आखणी केलेली असावी.
- नियोजन लेखी असावे. तिन्ही वयोगटाला अनुरूप कृती, खेळ व उपक्रम ठरवलेले असावेत.
- नियोजन लवचीक असावे. मागील नियोजनानुसार काय कमी-जास्त करायचे, ते ठरवून नियोजन करावे.
- नियोजनाच्या आधारे साधने तयार करणे, संग्रह करणे याची तयारी सुरू करावी.

### १०.१.२.३ साप्ताहिक नियोजन :

- अंगणवाडीच्या साडेतीन-चार तासांची विभागणी छोट्या-छोट्या कालखंडात करावी.
- पाच विकासक्षेत्रांना अनुसरून खेळ, कृती, उपक्रम यांची आखणी आठवड्यासाठी करणे म्हणजे साप्ताहिक नियोजन.
- तिन्ही वयोगटातील मुलांना कोणते उपक्रम देणार, गट केव्हा करणार, मुले स्वतंत्रपणे केव्हा खेळतील, शिक्षिका कोणत्या मुलांना शिकवणार या प्रक्रियेचा विचार या नियोजनात करावा लागतो.
- शैक्षणिक साधने, खेळणी, वस्तू, चित्रे या सर्व शिकवण्याच्या पद्धती तंत्राचा वापर नियोजनात केलेला असावा.
- पंचपदी : पंचपदी ही शिकण्याच्या प्रक्रियेचे टप्पे स्पष्ट करणारी पद्धत आहे. त्यामुळे कोणतीही नवी संकल्पना शिकवताना आणि त्याचे नियोजन करताना, परिचय, संकल्पनेची समज, सराव, उपयोजन, विस्तार या पंचपदीचा वापर करावा. हे तुम्ही अन्य काही घटकात समजून घेतले आहेच.

परिचय म्हणजे वस्तू, चित्रातून ओळख, संकल्पना समज म्हणजे चित्र आणि गप्पातून आकलन, सराव म्हणजे साधने, खेळ पुन्हा पुन्हा वापरून कृती सवयीची करणे. त्याचा वापर करणे म्हणजे उपयोजन, प्रसार म्हणजे गोष्टी, चर्चा यातून दुसऱ्याला समजावून सांगणे या प्रकारे प्रसार करणे.

### १०.१.२.४ दैनिक नियोजन :

प्रत्येक दिवसाचे नियोजन म्हणजे दैनिक नियोजन. अंगणवाडीच्या दैनिक वेळेचे कोष्टक/विभाजन दिलेले आहे ते काळजीपूर्वक पाहा. दैनिक नियोजनाचा नमुना काळजीपूर्वक वाचा. कृती घेताना अगंणवाडीताईने मुलांना कामे कशी वाटून द्यावीत हेही लिहून दिले आहे. तुम्ही याप्रमाणे नियोजन करत गेलात की, तुम्हाला आपोआप मुलांचे गट करता येणे जमेल. कोणत्या कृती मुले स्वतंत्रपणे करू शकतात हे समजेल. मुलांना गटात किंवा स्वतंत्र काम करायला देताना, तुम्ही 'अध्ययन

कोपरे' जरूर वापरा. काही वेळ तुम्ही सर्वच मुलांना अध्ययन कोपऱ्यात पाठवा आणि तुम्ही मुलांच्या कृतींचे निरीक्षण करून, त्याची नोंद करा.

विशेष गरजा असणारी मुले बाकी मुलांच्या तुलनेत, शारीरिक किंवा मानसिकदृष्टीने (Simplification) कमी पडू शकतात, त्यामुळे वर्गव्यवस्थापन व नियोजनात, अंगणवाडी सेविकांनी, त्या मुलांचा वेगळा विचार करणे व त्यांना केंद्रस्थानी ठेवणे गरजेचे आहे.

**नमुना** : जुलै महिना आठवडा पहिला आणि वार सोमवार : यामध्ये एकाच क्षमतेच्या कृती तिन्ही गटांना दिल्या आहेत. फक्त त्यातील काठीण्यपातळी वाढवली आहे.

| सोमवार | | |
|---|---|---|
| **वेळ** | **कृती** | **वयोगट आणि गटरचना** |
| ९.३० ते १०.०० | **मुक्तखेळ** : ठोकळे, बाहुलीघर, वाळू व त्यातील साहित्य वापरून खेळणे आणि आवरणे. | सर्व मुले एकत्र |
| १०.०० ते १०.१५ | **परिपाठ** :<br>• प्रार्थना<br>• हजेरी तक्त्यामध्ये स्वतःचा फोटो लावणे.<br>• हजेरी तक्त्यामध्ये स्वतःचे नाव लावणे.<br>• हवामान तक्ता भरणे, गप्पा | सर्व मुले एकत्र |
| १०.१५ ते १०.२५ | छोटी सुट्टी | |
| १०.२५ ते १०.५५ | **बोधात्मक विकास : गणित**<br>• वस्तूंचे वर्गीकरण : खडे, बिया, काड्या, पाने, रंगीत मणी<br>• २ गुणधर्म वर्गीकरण : वर्गीकरण आकार आणि रंग – तीन आकारांचे आणि तीन रंगाचे तुकडे<br>• २ गुणधर्म वर्गीकरण : आकारमान आणि रंग | तीन गटांत मुलांना कृतीसाठी साधने देणे. ताई तीन गटातून निरीक्षण करेल. एका गटात अध्ययन अनुभव देईल. |
| १०.५५ ते ११.०५ | गाणी | एकत्र |
| ११.०५ ते ११.३५ | **भाषा** :<br>• स्वत:चे पहिले नाव सांगणे – शिक्षक<br>• स्वतःचे पूर्ण नाव सांगणे – गटात<br>• स्वत:चे नाव आणि मित्राचे नाव सांगणे – गटात | ताई साधारण तीन गटांत फिरून ही कृती करून घेईल. |
| ११.३५ ते १२.०५ | मोठी सुट्टी | |
| १२.०५ ते १२.३० | उड्या मारणे, नागमोडी रेषांवरून चालणे | सर्व मुले एकत्र |
| १२.३० ते १२.५० | भाज्यांची नावे सांगणे, एका भाजीची सविस्तर ओळख | सर्व मुले एकत्र |
| १२.५० ते १.०० | चित्राच्या आधारे गोष्ट सांगणे (३ ते ६) | सर्व मुले एकत्र |

**टीप :** वर एक दिवसाच्या नियोजनाचा नमुना दिला आहे. सोमवार ते शनिवार असे सर्व दिवसांचे नियोजन केले, की ते आठवड्याचे नियोजन तयार होईल. साप्ताहिक नियोजनात मुले कशी बसतील हे लिहिले नाही, तरी चालेल.

**दैनिक आणि साप्ताहिक नियोजन तयार करा. अंगणवाडीत वापरून पाहा.**

## १०.१.२.५ वर्गमांडणी – अध्ययन कोपरे :

**साप्ताहिक आणि दैनिक नियोजनाचा एक आवश्यक भाग म्हणजे वर्गरचना त्यात अध्ययन कोपऱ्याची मांडणी करणे :** अध्ययन कोपरे म्हणजे मुलांना सहज शिकण्यास सोयीचे होईल अशा जागा. अंगणवाडीत मुक्तखेळ, भाषिक कोपरा, गणिती कोपरा, कलाकामाचा कोपरा असे साहित्य मांडावे. आणि मुलांना त्यात काही वेळ स्वतंत्रपणे खेळू द्यावे. या कोपऱ्यात कोणती साधने मांडायची याचे नियोजन तुम्हाला करावे लागेल. एकेका अध्ययन कोपऱ्यात मांडलेले साहित्य, साधारण ८ ते १५ दिवस ठेवता येते. गरजेनुसार त्यात बदल करता येतो. याचा अर्थ दोन आठवड्यात तुम्ही मुलांना भाषा, गणित, जीवन कौशल्ये यासाठी जे अनुभव द्यायचे ठरवले असतील, त्याला लागणारे पूरक साहित्य, खेळ, साधने तुम्ही अध्ययन कोपऱ्यात मांडू शकता. सर्व वयोगटासाठी साहित्य एकत्र ठेवावे. मुले आपल्या आवडीनुसार साहित्य घेऊन, त्यांच्याशी खेळून त्यात कौशल्य निर्माण करत असतात. अडचण आली, तर मुले तुम्हांला विचारायला येतात किंवा मित्रांच्या मदतीने खेळतात. आवश्यक त्या ठिकाणी तुम्ही प्रात्यक्षिक घेऊन दाखवावे.

या घटकाचा व्हिडिओ पाहून अध्ययन कोपरे कसे मांडले आहेत, याचे फोटो पाहा.

प्रत्येक कोपऱ्यात काय काय काय साधने मांडता येतील याची यादी तक्त्यात दिली आहे.

| भाषा कोपरा | गणित कोपरा | मुक्त खेळ (वय ३ ते ६ वर्षे ) | इंद्रियानुभव (वय ३ ते ६ वर्षे ) | कलाकाम (वय ३ ते ६ वर्षे ) |
|---|---|---|---|---|
| लेखन साहित्य – पेन्सिली, कागद, मोठे खडू (वय ३ ते ६ वर्षे ) | विविध वस्तू एकत्र केलेली टोपली आणि मोठ्या वाट्या, लहान मोठे मणी असलेली मोठी वाटी आणि मणी वेगळे करायला वाट्या, ओवायला दोरे. | रचना करता येतील असे ठोकळे, खोकी इ. | वेगवेगळे रंग जाणवतील असे कपडे | रंगीत माती, प्लॅस्टिक कागद, ओला रुमाल |
| चित्रमय गोष्टींची पुस्तके, वर्तमानपत्रे, रंगीत चित्रे असलेली जुनी मासिके | लहान–मोठ्या वस्तू (वय ४ ते ६ वर्षे) लांब–आखूड वस्तू | बाटल्या, खोकी, दोरे अशा वस्तू ज्यातून मुले रचना आकृती तयार करू शकतील. | वेगळे स्पर्श जाणवतील असे कपडे – लहान बाळाचे मऊ कपडे, हातरुमाल, मोजे, हात पुसायचे जाडसर फडके, पिशव्या, काही कापडांचे मध्यम आकारांचे तुकडे | रंगीत खडूच्या डब्या, रंगीत पेन्सिली, साध्या पेन्सिली |

| भाषा कोपरा | गणित कोपरा | मुक्त खेळ (वय ३ ते ६ वर्षे ) | इंद्रियानुभव (वय ३ ते ६ वर्षे ) | कला काम (वय ३ ते ६ वर्षे ) |
|---|---|---|---|---|
| चित्र व शब्द यांच्या जोड्या लावणे | | वाळूचा मोठा टब आणि वाळू भरायला बाटल्या, नरसाळी अशा वस्तू | रंग, स्पर्श यांनुसार मुलांना कपडे वेगळे ठेवता येतील, यासाठी खोकी किंवा कप्पे असलेले एखादे साहित्य | पाठकोरे कागद, वर्तमानपत्र कागद (घड्या घालणे यासाठी) |
| प्रसंग, चित्रे व घटना जोडणे | अंक आणि समूह यांच्या जोड्या लावता येतील यासाठी उपलब्ध साधने (वय ५ ते ६ वर्षे) | | भाज्या, प्राणी, पक्षी अशी चित्रे (पाहण्यासाठी, किंवा त्याचे गट करण्यासाठी.) | आकार काढून दिलेली चित्रे |

या साधनांच्या आधारे, प्रत्येक ठिकाणी सहा ते आठ मुले खेळू शकतील. मुले आपणहून कोपरे बदलतील. खेळ निवडतील. ताईने आणि सेविकेने मुलांच्या खेळण्याचे निरीक्षण करायचे आहे, तसेच त्या आठवड्यात मुलांना जे नवे शिकवायचे आहे, त्याचा उपक्रम तुम्ही त्या मुलांच्या बरोबर लहान गटात घ्यावा, यामुळे उपक्रम मुलांना नीट समजेल. या पद्धतीमुळे तुम्हांला एकच उपक्रम दोन तीन वेळा घ्यावा लागतो, पण दोन ते तीन दिवसांत सर्व मुलांच्या पर्यंत पोहोचता येते. मुलांनाही गटात खेळण्याची आणि स्वतंत्रपणे खेळण्याची सवय लागते. यातील साहित्य मुलांच्या साप्ताहिक नियोजनानुसार आणि मुलांच्या गरजेनुसार बदलायचे असते.

**लक्षात ठेवू या** : अध्ययन कोपऱ्यात मुलांना एकट्याला, जोडीने किंवा गटाने खेळू द्यावे.

सुरुवातीला तुम्ही दिवसातील अर्धा ते पाऊण तासाची वेळ ठरवूनही, मुलांना अध्ययन कोपऱ्यात स्वतंत्र खेळायला पाठवू शकता.

**मुले खेळत असताना ताईची भूमिका :**

- मुले काय खेळत आहेत आणि कसे खेळत आहेत याचे निरीक्षण करावे.
- निरीक्षण करताना नोंदी घ्याव्यात.
- प्रत्येक कोपऱ्यात काही मुले आहेत ना, हे पाहावे.
- मुले दररोज त्याच त्याच कोपऱ्याची आणि त्याच त्या साधन खेळांची निवड करत आहेत, का सारखी साधने बदलत आहेत, हे पाहावे.
- आवश्यक तेव्हा त्यांना वेगळे खेळ घेण्यास सुचवावे.

- मुले कसे काम करत आहेत याचे निरीक्षण करावे.
- काही खेळात मुले जास्त रमली, तर मुलांना जबरदस्तीने उपक्रम बदलायला लावू नये. यात थोडी लवचीकता ठेवावी. काही वेळेस काही मुले आधीचा उपक्रम करत असतील आणि काही मुले पुढील उपक्रमात जातील असेही घडू शकते.

**लक्षात ठेवूया** : साप्ताहिक नियोजन व साधन खेळ मांडणी हे नियोजन प्रत्येक आठवड्याचा आढावा घेऊन करावे लागते. मुलांच्या शिकण्याच्या गरजेनुसार आणि गतीनुसार उपक्रमामध्ये आवश्यक बदल करावे लागतात.

**प्रात्यक्षिक** : अंगणवाडीत अध्ययनकोपरे मांडा, त्यांचे फोटो तुमच्या गटावर टाका. मुले काय करत होती हे कार्यपुस्तिकेत लिहा.

## घटक १०.२ : मूल्यांकन

**या घटकात आपण काय शिकणार?**


१०.२.१ मूल्यांकनाचा अर्थ, गरज आणि वैशिष्ट्ये

१०.२.२ मूल्यांकनाच्या पद्धती

१०.२.३ समग्र प्रगतिपत्रक अर्थ आणि वापर

### १०.२.१ मूल्यांकनाचा अर्थ, गरज आणि वैशिष्ट्ये :

हा भाग समजून घेण्यासाठी मूल्यांकनाचा अर्थ, गरज आणि वैशिष्ट्ये हा व्हिडिओ पाहा. त्या आधारे दिलेले प्रश्न सोडवा.




**या उपघटकात आपण काय शिकणार आहोत?**

१) मूल्यांकन ही संकल्पना समजेल.

२) मूल्यांकनाची गरज व उद्दिष्टे समजतील.

३) मूल्यांकन केव्हा करायचे ते समजेल.

४) मूल्यांकनाची वैशिष्ट्ये आणि ताईची भूमिका समजेल.

**मूल्यांकन चक्र :**

आपण मुलांचे सहज 'मूल्यांकन' करणार आहोत. तुम्हांला या शब्दाची थोडी ओळख असेल, या घटकात त्याची सविस्तर माहिती तुम्हांला होईल. मुख्य म्हणजे त्याचा उपयोग तुम्हांला करता येऊ लागेल.

पुढील मूल्यांकन चक्र पाहा, आपण यातील प्रत्येक मुद्दा समजून घेणार आहोत आणि आपल्या अंगणवाडीत त्याचा योग्य वापर करणार आहोत.

### ‘मूल्यांकन’ म्हणजे काय?

‘मूल्यांकन’ हा बालकांच्या अध्ययनातील संपादणुकीची माहिती गोळा करण्याचा एक मार्ग आहे. शारीरिक, भाषिक, सामाजिक, भावनिक, बौद्धिक आणि सौंदर्यात्मक या पाच विकासक्षेत्रांत मुलांचा किती विकास झाला, त्यांना किती प्रमाणात कौशल्ये अवगत झाली, याची नोंद करणे म्हणजे मूल्यांकन करणे होय.

**कशाचे मूल्यमापन करायचे :** बालकांच्या पाचही विकासक्षेत्रांतील अध्ययन कौशल्यांचे मूल्यमापन बारकाईने करायचे असते.

१) शारीरिक विकास

२) सामाजिक, भावनिक, नैतिक विकास

३) बोधात्मक विकास

४) भाषा आणि साक्षरता विकास

५) सौंदर्यदृष्टी आणि सांस्कृतिक विकास

### मूल्यांकन कशासाठी करायचे – (उद्दिष्टे) :

- मुलांच्या गरजा, आवड, विकास यांबाबत सातत्याने माहिती मिळवण्यासाठी मूल्यांकन करावे लागते.
- विविध कौशल्याबाबत मुलांची प्रगती म्हणजे सकारात्मक बाजू त्यातून समजते.
- कौशल्य अवगत करण्यातील मुलांच्या अडचणी ताईच्या लक्षात येतात.
- मुलांच्या अडचणी दूर करण्यासाठी, ताईला वेगळ्या उपक्रमांची किंवा पर्यायांची निवड करता येते, त्यानुसार मुलांच्या शिकण्याचे नियोजन करता येते.
- मुलांच्या विकासातील प्रगती आणि अडचणी यांबाबत ताई पालकांना माहिती देऊ शकते.
- मुलांच्या विकासासाठी पालकांनी मुलांना काय मदत करावी, याबाबत मार्गदर्शन करता येते.

**मुलांचे मूल्यांकन कोण करू शकेल? :** पालक, अंगणवाडीताई, मुलांचा सांभाळ करणारे, अशा मुलांच्या जवळच्या व्यक्ती वेगवेगळ्या मुद्द्यांबाबत मुलांचे मूल्यांकन करू शकतील. फक्त त्यांना कशाचे मूल्यांकन करायचे याची माहिती असणे आवश्यक असते. बालकाच्या काही विकासाबाबत या सर्व व्यक्ती नोंद घेऊ शकतात, परंतु काही नोंदी फक्त शाळेत करता येऊ शकणाऱ्या असतात, तर काही नोंदी फक्त घरात करता येऊ शकतात. त्यामुळे या सर्वांनी केलेल्या नोंदी बालकांचा विकास समजण्यासाठी मदत करतात.

### मूल्यांकन केव्हा करावे? :

- मुले एकटी किंवा गटात खेळत असताना.
- संकल्पना समजून घेतल्यावर, मुले साधन वापरून सराव करत असताना.
- अंगणवाडीत साजरे होणारे कार्यक्रम.

- अंगणवाडीत अचानक घडणारे प्रसंग.
- ठरावीक कालावधीनंतर
- सातत्याने मूल्यांकन करणे.

मुले रोज नव्याने शिकत असतात आणि मुलांचा विकास सातत्याने होत असतो. त्यामुळे तुम्हांलाही मुलांची प्रगती व अडचणी नियमितपणे माहीत व्हायला हव्यात, तरच तुम्हांला मुलाला पुढील विकासाच्या टप्प्यावर जाण्यासाठी मदत करता येईल, म्हणूनच मूल्यांकन वर्षातून एक ते दोन वेळा करून चालत नाही, तर मुलांना नव्या गोष्टी समजल्या आणि त्याचा सराव झाला की, नियमितपणे अंगणवाडीत चालू असलेल्या कृतींच्या वेळेस मुलांच्या नोंदी केल्या, की मूल्यांकन होत जाते. सातत्याने मूल्यांकन करत राहणे आवश्यक असते.

## १०.२.२ मूल्यांकनाच्या पद्धती :

**आपण या घटकात काय शिकणार आहोत.**

- मूल्यांकनाच्या पद्धतीची ओळख होईल.
- समग्र प्रगतिपत्रक म्हणजे काय ते माहीत होईल.
- पालकांना मुलांच्या प्रगतीची माहिती कशी द्यायची, हे माहीत होईल.

### १) मूल्यांकन पद्धती १ – निरीक्षण पद्धती :

तुमच्या घराजवळचे रोज दिसणारे एखादे झाड किंवा एखाद्या वस्तूचे वर्णन जितक्या बारकाईने लिहिता येईल, तेवढे तुमच्या वहीत लिहा. तुमच्या लक्षात येईल रोजच्या पाहण्यातील वस्तूच्या काही बाबी रोज दिसूनही लक्षात येतातच असे नाही. बारकाईने प्रत्येक गोष्ट बघितली जातेच असे नाही. निरीक्षण करायचे आहे, त्याची नोंद करायची आहे, असे ठरवून जेव्हा निरीक्षण केले जाते, तेव्हा त्याला काही हेतू प्राप्त झालेला असतो, त्यामुळे ते बारकाईने व योग्य होत असते. मुलांचे मूल्यांकन करण्याची सर्वांत प्रभावी पद्धत म्हणजे निरीक्षण करणे. केलेल्या निरीक्षणाची नोंद करण्याचे दोन प्रकार आहेत.

**अ) सविस्तर निरीक्षण नोंद** : ३ ते ६ वर्षांच्या मुलांचे मूल्यांकन करण्यासाठी निरीक्षण करणे आणि त्याची नोंद ठेवणे, ही एक आवश्यक पद्धती आहे. तुम्हांला तुमच्या अंगणवाडीत मुले रोजच दिसत असतात, पण मुलांचे हेतूपूर्वक निरीक्षण करायचे आहे. एकेका मुलाची प्रत्येक विकासाच्या क्षेत्रानुसार आणि वेळोवेळी सविस्तर नोंद करता येते. मूल कसे वागते आहे, वर्गातील नियम पाळत आहे का, एखादी कृती करताना मूल ती कृती कशी करत आहे, काय चांगले घडत आहे, अशा तपशिलाने केलेली नोंद, म्हणजे सविस्तर नोंद असते. अंगणवाडीमध्ये सुरुवातीला मूल नवे आले की, अशा सविस्तर नोंदी कराव्यात, म्हणजे त्याचा फायदा मूल समजून घ्यायला होते.

**सविस्तर निरीक्षणाचे फायदे** : मुलांचे सातत्याने, म्हणजे वेळोवेळी आणि सविस्तर निरीक्षण केल्याने, शिक्षकांना मुलांबाबत अनेक गोष्टी समजत असतात. सहा वर्षांपर्यंतच्या वयात मुले जास्त बोलत नाहीत. त्यांना समजलेली प्रत्येक गोष्ट किंवा त्यांच्या भावना ते बोलून व्यक्त करू शकत नाहीत, तर ती आपली आपली खेळत असतात. काहीतरी शोधत असतात, कोणत्याही वस्तू घेऊन काहीतरी करून पाहात असतात, त्यामुळे मुलांच्या खेळातून त्यांच्या वागण्यातून पालक आणि शिक्षकांना मूल समजून घ्यायचे असते. त्यामुळे मुलांचे निरीक्षण करणे, जे जे दिसले त्याच्या सविस्तर आणि सातत्याने नोंदी ठेवणे आवश्यक असते. मूल समजून घेण्याचा, त्याची प्रगती समजून घेण्याचा आणि त्याच्या अडचणी समजून घेण्याचा हा एक महत्त्वाचा मार्ग आहे.

**ब) प्रासंगिक नोंदी** : वेगवेगळ्या प्रसंगात मुलांचे निरीक्षण करणे आणि त्यांची नोंद करणे, याला 'प्रासंगिक नोंदी' असे म्हणतात.

**प्रसंग** :

- **तुम्ही मुलांना घेऊन बाहेर दुकान दाखवायला गेला आहात** : यामध्ये मुले उत्सुकतेने पाहात आहेत का, कोणते प्रश्न विचारतात, ते एकमेकांच्या बरोबर कसे वागतात, ठरवलेले नियम पाळतात का याच्या नोंदी करता येतात.
- **तुम्ही मुलांना गोष्ट सांगत आहात** : मुले उत्सुकतेने ऐकत आहेत का, एकाग्रता आहे का, कोणते प्रश्न विचारतात, आपले अनुभव जोडतात का, याची नोंद करता येते.
- **अंगणवाडीत अवचितपणे घडलेले प्रसंग** : त्यावेळेस मुले काय करतात, याची नोंद करता येते. मुले काय करत आहेत, वर्गात घडणाऱ्या घटना अशा वेळी मुले कशी वागतात, कशा प्रतिक्रिया देतात याची सामाजिक भावनिक विकासाच्या दृष्टीने नोंद करता येते.
- मुले अध्ययन कोपऱ्यात खेळत आहेत.
- गाणी, गोष्टींच्या कृतीत हालचाली व अभिनयासह मुले गाणी म्हणत आहेत, अशा वेळेस अंगणवाडी सेविकेने मुलांच्या नोंदी कराव्यात.

अशा अनेक प्रसंगात केलेल्या नोंदी या वर्णनात्मक असतात किंवा अगदी थोडक्यात केलेल्याही असतात. यात सर्वच मुलांचे निरीक्षण करता येते किंवा ठरवून एक–दोन मुलांचे निरीक्षण करता येते.

या नोंदींमधून मुलांच्या वर्तनाबाबतचे विशेष समजतात, तसेच अध्ययनातील टप्पे समजतात. कोणत्याही कृती करताना मुलाला कसे करता आले, म्हणजे वेगाने करता आले, नेमकेपणाने करता आले, वेळ लागून करता आले हे समजू शकते, तसेच कोणतीही कृती करताना ज्या

अडचणी आल्या, त्या समजू शकतात. मुलांची अडचण सोडवण्यासाठी अंगणवाडी ताईला पर्याय निवडता येतात. त्यामुळे या नोंदी खूप महत्त्वाच्या आहेत.

खालील प्रसंग वाचा. यातून मुलांच्या बाबतच्या कोणत्या नोंदी नोंदवू शकाल, ते लिहून ठेवा. संपर्क सत्रात त्यावर बोला.

एका अंगणवाडीत एक ताई मुलांना चित्र दाखवून गोष्ट सांगत आहे. मुले ताईभोवती बसली आहेत. गोष्ट ऐकताना काय काय घडते आहे, ते समजून घ्या. मधुरा आणि संजय उत्सुकतेने ताईजवळ सरकून गोष्ट ऐकत आहेत. राणीने गोष्ट ऐकताना एक दोन वेळा प्रश्न विचारले. पिंटू पहिल्या दोन मिनिटानंतर उठला आणि वर्गात फेरी मारून खेळणी खेळायला लागला. बाकी मुले थोडी चुळबुळ करत शांत बसून होती.

**खालील फोटो पाहा** : ताईने मुलांना काही चित्रे जमिनीवर काढायला सांगितले होते आणि त्यावर पिस्त्याची साले किंवा बाटलीची झाकणे लावायला दिली होती. या प्रसंगात मुलांची कृती चालू असताना ताईने केलेल्या नोंदी वाचा.



**मुलगा १** : पिस्त्याची साले/बाटलीची झाकणे योग्य रीतीने लावता येतात. मनाने सोपे चित्र काढता येते. दिलेले काम लवकर पूर्ण करतो.

**मुलगा २** : पिस्त्याची साले योग्य रीतीने लावता येतात. मनाने अवघड चित्र काढता येते. एक चित्र पूर्ण करून लगेच नवे चित्र करायला आवडते.

**मुलगा ३** : पिस्त्याची साले योग्य रीतीने लावता येतात. मनाने अवघड चित्र काढता येते, त्यात बारकावे दाखवता येतात.

या कृतीतून सूक्ष्म स्नायूविकास आणि कल्पना विकास याचे मूल्यांकन ताईला करता आले.

वर्गात उपक्रम चालू असताना, तुम्हांला मुलांच्या अशा एकत्रित नोंदी ठेवता येतील. त्यातून प्रत्येक मुलाची काही वैशिष्ट्ये तुमच्या लक्षात येत जातात. मुलांचा सामाजिक, भावनिक, कल्पनाशक्तीचा विकास समजून घ्यायला मदत होते.

**वैयक्तिक नोंद** : एकाच मुलाची काही दिवस सातत्याने वैयक्तिक नोंद ठेवता येते.

एका शिक्षिकेने एका आठवड्यातील वेगवेगळ्या उपक्रमांच्या वेळेस, राणी नावाच्या मुलीचे निरीक्षण करून नोंदी ठेवल्या, त्या वाचा –

**मुलीचे नाव** : राणी **वय** : ४ वर्षे ६ महिने

| विकास | उपक्रम | नोंद |
|---|---|---|
| जीवन कौशल्ये आणि शारीरिक विकास | खाऊ खाणे | राणीने खाऊच्या सुट्टीत मुलांसाठी सतरंजी अंथरायला मदत केली. तशी ती नेहमीच करते. आज तिला हे काम चांगले जमले. खाऊच्या ताटल्या द्यायला पण तिने मदत केली. |
| सूक्ष्म स्नायू विकास | लहान–मोठे मणी ओवणे | राणीने दोरा नीट पकडला होता. लहान व मोठे मणी तिने एकाआड एक ओवले. तिने तिच्या मनातला आकृतिबंध तयार केला होता. |
| कलात्मक विकास | चित्र काढून रंगवणे. | राणीने झाडाचे चित्र काढले होते. पिवळा, हिरवा रंग वापरून ती झाड रंगवत होती. रंग रेषेच्या बाहेरही जात होता. तिला रंगवायला खूप आवडत होते. |
| गणितीय विकास | ५ पर्यंत पाने मोजणे | १, २, ३ हे अंक म्हणणे आणि पाने मोजणे या दोन्ही कृती एकाच वेळी राणीला जमल्या. परंतु पुढील पाने मोजताना तिने ४, ५ असे पटकन म्हणून पान मात्र एकच ठेवले. |

अशा नोंदी करण्यामुळे राणीच्या विकासातील टप्पे ओळखायला मदत झाली. कोणती अडचण येत आहे हे समजले. तिला कोणती मदत करायला हवी, हे अंगणवाडीताईला समजले. अशा नोंदी एकत्र करून मुलांबद्दलचे निष्कर्ष समग्र प्रगतिपत्रकात देता येतात.

**लक्षात ठेवू या** : मुलांचे निरीक्षण ही सरावाने येणारी, साधी पण खूप परिणामकारक गोष्ट आहे. निरीक्षण हा मूल्यांकन करण्याचा पायाच असतो.

मुलांची निरीक्षणे करा आणि नोंद करा जास्तीत जास्त निरीक्षणे/पुरावे गोळा करा. मुलांच्या विकासासाठी योग्य नियोजन आणि कृती करा मूल्यांकन करा. (यावर संपर्कसत्रात चर्चा करा. प्रश्न असतील तर विचारा.)

**प्रात्यक्षिक** : आठवडाभर तुमच्या अंगणवाडीतील दोन–चार प्रसंगात मुलांच्या एकत्रित नोंदी ठेवा. दोन मुलगे व दोन मुली अशा ४ वैयक्तिक नोंदी ठेवा आणि त्या नोंदी संपर्कसत्रात एकमेकांच्या बरोबर वाचून दाखवा.

अशा नोंदी लिखित स्वरूपात करता येतात, तसेच त्या वेळचे फोटो किंवा मोबाइलवर व्हिडिओ तयार करून ठेवता येतात. वर्गात हे करून पाहा.

**प्रात्यक्षिक :** पुढे दिलेले तीन फोटो पाहा, त्यातील मुलांबाबत कोणत्या नोंदी करता येतील ते लिहून ठेवा. फोटोमध्ये ते सांगा.







(**फोटो सौजन्य :** ग्राममंगल बालवाड्या)

## २) मूल्यांकन पद्धती २ - पडताळा सूची (चेकलिस्ट) :

पुढे चार मुलांच्या एका गटाचे मूल्यांकन करून दाखवले आहे.

**शारीरिक विकास** : वयोगट ३ ते ४

| अ. क्र. | निरीक्षण करावयाची बाब | मुलांची नावे | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | वीणा | ममता | राहुल | पंकज |
| १) | सरळ रेषेवर चालता येते. | हो | हो | नाही | हो |
| २) | बादलीत चेंडू फेकता येतो. | हो | नाही | हो | हो |
| ३) | दोन पायांवर उडी मारता येते. | नाही | हो | हो | नाही |
| ४) | दोरीखालून सरपटत जाता येते. | हो | हो | हो | हो |

हा तक्ता वाचलात, प्रासंगिक नोंद आणि हा तक्ता यांत कोणता फरक आढळला तो लिहून ठेवा.

यात मुलांच्या अध्ययन निष्पत्तीच्या संदर्भात होय/नाही या स्वरूपात नोंदी घेतल्या आहेत. ही आहे 'पडताळा सूची'. मुलांमध्ये अपेक्षित बदल झालेत की नाही, संकल्पना समजली आहे की नाही, हे ओळखण्यासाठी आणि नोंद करण्यासाठीचे हे एक सोपे साधन आहे. शारीरिक कारक विकास, दैनिक कामे याची नोंद करण्यासाठी अशा सूची तयार ठेवल्या, की त्याचा वापर वर्गात केव्हाही करता येतो. दर महिन्याला, दर तीन महिन्याला अशा ठरावीक कालावधीनंतर मूल्यांकन करताना याचा उपयोग होतो. अशा नोंदी प्रत्येक विकासक्षेत्रातील काही अध्ययन निष्पत्तींसाठी करता येतात.

### ३) मूल्यांकन पद्धत ३ – श्रेणीयुक्त मूल्यांकन वर्णनात्मक पदनिश्चयन श्रेणी (Rubric)

**श्रेणी** : अपेक्षित अध्ययन निष्पत्तीपर्यंत मुले पोचली आहेत का, याचे अधिकाधिक अचूक मापन करण्याचे साधन म्हणजे 'श्रेणीयुक्त मूल्यांकन'. पडताळा सूचीमध्ये हो/नाही अशी नोंद करता येते. प्रत्येक विकास टप्प्याची नोंद प्रत्येक वेळेस हो किंवा नाही अशा दोन शब्दांत करणे योग्य ठरत नाही. भाषिक गणितीय विकासातील काही कौशल्ये मुलांना चांगली अवगत होतात, तर काही अर्धवट अवगत होतात, काही अडचणी असतात, यासाठी ३, ४, ५ अशा श्रेणी वापरणे उचित असते. यातील नोंद गुणात्मक असते. अध्ययनातील प्रक्रिया, मुलांच्या कौशल्याची गुणवत्ता, त्यांची संख्यात्मक नोंद श्रेणीमध्ये करता येते. कौशल्याबाबत श्रेणी नोंदवणे, हे थोडे अवघड वाटले, तरी मूल्यांकन अधिकाधिक अचूक होण्यासाठी ते उपयुक्त ठरत असते.

विकासाच्या नोंदी करण्यासाठी पुढील ४ श्रेणी वापरून मूल्यांकन करता येईल. पुढे तीन श्रेणी वापरून ३ ते ४ वर्षे वयोगटातील मुलांची नोंद कशी करायची याची यादी दिली आहे. अशी यादी वयोगटानुसार करावी. यादीत योग्य रकान्यात बरोबरची खूण करावी. असे पत्रक प्रत्येक मुलासाठी तयार करावे लागते. अशी नोंद पालकांना देण्यात येणाऱ्या समग्र प्रगतिपत्रकातही देता येईल.

**बालकाचे नाव :**

**वयोगट** : ३ ते ४ वर्षे

| अ. क्र. | निरीक्षण मुद्दे | कधीच नाही | कधीतरी | नेहमीच |
|---|---|---|---|---|
| | **सामाजिक–भावनिक विकास** | | | |
| १) | चपला काढून रांगेत ठेवतो. | | | |
| २) | परिचित आणि अपरिचित व्यक्तींमधील फरक ओळखतो. | | | |
| ३) | मित्राच्या जवळ खेळायला बसतो/बसते. | | | |
| | **बोधात्मक विकास** | | | |
| ४) | वस्तूंचे गट करता येतात, गट कशाचे केले हे सांगता येते. | | | |
| | **गणितीय विकास** | | | |
| ५) | ३ पर्यंत वस्तू मोजता येतात. | | | |
| ६) | लहान–मोठ्या वस्तू ओळखता येतात. | | | |
| | **भाषा विकास** | | | |
| ७) | गोष्ट ऐकायला आवडते. | | | |
| ८) | पुस्तके पाहायला आवडतात. | | | |
| ९) | चित्रांची नावे पटकन सांगता येतात. | | | |

**लक्षात ठेवू या** : सामाजिक आणि भावनिक विकासाबाबत पुन्हा पुन्हा निरीक्षण केल्यावर मुलांच्या वागण्याविषयीचे काही निष्कर्ष काढता येतात.

या प्रकारे विकासाच्या सर्व क्षेत्रांतील हो/नाही या दोन उत्तरात निरीक्षण करता येणाऱ्या बाबींची सूची तयार करून ठेवाव्यात. यामुळे प्रत्येक मुलाच्या विकासाबाबत आपल्याला अधिक नेमकेपणाने नोंदी ठेवता येतील व त्याला नक्की कोणत्या विकासक्षेत्रात मुलाची गती चांगली आहे किंवा कुठे मदत हवी आहे, याबाबत स्पष्टता येण्यास मदत होते.

**कृती :** आपल्या सहकारी मैत्रिणीसोबत चर्चा करून विकासाच्या एका क्षेत्राची अशा प्रकारे सूची तयार करा.

**पडताळा सूचीचे फायदे :**

- सर्व विकासक्षेत्रांतील अध्ययन निष्पत्तींबाबतचा विकास तपासण्यासाठी पडताळा सूची वापरता येते.
- मुले उपक्रमांचा सराव करत असतील, तेव्हा पडताळा सूची वापरता येतात.
- वैयक्तिक निरीक्षण करायला या उपयोगी ठरतात.
- सातत्यपूर्ण निरीक्षण करायला या सूची वापरता येतात.

| | स्तर १ : कमी (प्रारंभिक) | स्तर २ : साधारण (प्रगतशील) | स्तर ३ : चांगला (प्रवीण/निपुण) | स्तर ४ : उत्तम (प्रगती) |
|---|---|---|---|---|
| **वर्णनात्मक नोंद** | शिक्षकांची बरीच मदत घ्यावी लागते/कौशल्य अवगत झालेले नाही. | शिक्षकांच्या मदतीने अध्ययन निष्पत्ती साध्य करता येते/ अडचण येते. | स्व प्रयत्नाने अध्ययन निष्पत्ती साध्य करता येते. | सहज, अचूक अध्ययन निष्पत्ती साध्य करता येते. इतरांनाही त्याबाबत मदत करता येते. |

**लक्षात ठेवूया** : श्रेणी पद्धती वापरतानाही पडताळा सूचीप्रमाणे यादी तयार करावी लागते. ज्या मुद्द्यांची उत्तरे अधिक प्रतवारी दाखवतात, अशा मुद्द्यांसाठी श्रेणी पद्धत वापरावी लागते. प्रत्येक अध्ययन निष्पत्तीला उत्तम किंवा चांगले, साधारण, कमी अशी श्रेणी केव्हा देता येईल, याचे निकष ठरवणेही आवश्यक असते.

**निकष नमुना :**

| कौशल्य | स्तर १ (प्रारंभिक) | स्तर २ (प्रगतशील) | स्तर ३ (प्रवीण/निपुण) | स्तर ४ (प्रगती) |
|---|---|---|---|---|
| **गोष्ट सांगता येणे.** | अजिबात न सांगणे, कशीही सांगणे. | अडखळत सांगणे, क्रमात चुका होणे. | सांगण्याचा चांगला प्रयत्न करणे, काही वेळेस मदत लागणे. | क्रमाने सांगणे, आवाजात चढ–उतार असणे. |

## ४) मूल्यांकन पद्धती ४ – कलाकृती व कृतिपत्रिकांचे विश्लेषण :

कृतिपत्रिकांचे विश्लेषण करणे, म्हणजे मुलांच्या विकासाबाबत निष्कर्ष काढणे हा मूल्यांकन प्रक्रियेतील एक महत्त्वाचा भाग आहे. विकासक्षेत्रातील संकल्पना समजून घेण्यासाठी, मुलांच्या बरोबर काही कृती करून झाल्यावर, त्यांचा सराव द्यावा आणि त्यानंतर संकल्पनेच्या आधारे केलेले कृतिपत्रक द्यावे. अध्ययन निष्पत्तीच्या सरावासाठी आणि आकलन तपासण्यासाठी कृतिपत्रकांचा वापर करता येतो. मुख्य म्हणजे या एकत्रित ठेवता येतात. याला संचयिका (पोर्ट फोलिओ) असे म्हणतात. मुलांची माहिती, त्यांची चित्रे, कलाकृती, कृतिपत्रके, वेळोवेळी केलेल्या नोंदी या सगळ्याचे एकत्रीकरण संचयिकेत असते.

एकाच प्रकारच्या अध्ययन निष्पत्तींसाठी दोन–चार वेळा कृतिपत्रिका देता येतात. त्याचे विश्लेषण करून मुलांचे मूल्यांकन करता येते, तरीही लक्षात ठेवू या, की कृतिपत्रिका भरून घेणे, त्यावर मूल्यांकन अवलंबून ठेवणे हे फारसे योग्य नाही. याचे मुलांना दडपण येता कामा नये. कृतिपत्रिका सोडवणे ही पण मुलांच्या आनंदाची बाब व्हायला हवी.





मुलांनी सोडवलेल्या कृतिपत्रिका पाहून तुम्ही काय नोंद कराल ते सांगा.

**मूल्यांकन करताना ताईची भूमिका :** मूल्यांकन खरे वस्तुनिष्ठ होणे आवश्यक असते. यात अंगणवाडीताईची भूमिका महत्त्वाची आहे. मूल्यांकन मुलांच्या नकळत व्हावे.

- मुलांना काय येत नाही हे शोधण्यापेक्षा, मुलांना काय येत आहे, याकडे लक्ष द्यावे.
- मुलांच्या अडचणी नेमकेपणाने समजतील, याकडे लक्ष द्यावे.

- मुलांबाबत कोणताही पूर्वग्रह ताईंच्या मनात असू नये.
- मुलांबाबत निष्कर्ष काढताना, मूल्यांकनाच्या एकापेक्षा अधिक पद्धतींचा, पुराव्यांचा वापर केलेला असावा.

**प्रात्यक्षिक** : मुलांसाठी कोणत्याही संकल्पनेवर ५ कृतिपत्रिका तयार करा. मुलांकडून सोडवून घ्या.

**संचयिका :**

प्रत्येक मुलाची स्वतंत्र संचयिका असते. यामध्ये मुलाची माहिती, वेळोवेळी केलेल्या शारीरिक तपासण्यांची नोंद, मुलांनी केलेल्या सर्व कलाकृतींचे नमुने, सोडवलेल्या कृतिपत्रिका, मुलांच्या कौशल्य कामांचे फोटो, मुले अध्ययन करत असताना केलेले व्हिडिओ, याची साठवणूक असते. मुलांच्या समग्र प्रगतिपत्रकासोबत ही संचयिका द्यावी.

### १०.२.३ समग्र प्रगतिपत्रक अर्थ आणि वापर :

मुलांच्या मूल्यांकनाची अनेक पद्धती वापरून तयार केलेली एकत्रित नोंद म्हणजे 'समग्र प्रगतिपत्रक'. हा मुलांचा बहुआयामी अहवाल असतो. वर्षभरात केलेल्या अनेक प्रकारच्या नोंदींचे एकत्रित विश्लेषण प्रगतिपत्रकात देता येते.

**प्रगतिपत्रकात असणाऱ्या ठळक बाबी :**

- मुलांची प्राथमिक माहिती नाव, वय, वजन, उंची वगैरे.
- शारीरिक, भाषिक, सामाजिक भावनिक, बोधात्मक आणि सौंदर्यात्मक आणि कलात्मक विकास या सर्व विकासातील ठळक मुद्दे व त्यातील श्रेणी.
- प्रत्येक विकासातील मुलांच्या प्रगतीचे आणि अडचणींचे थोडक्यात वर्णन.
- पालकांनाही मुलांच्या प्रगतीबाबतचे मत नोंदवता येण्यासाठी जागा.
- मुलांना 'स्व' मूल्यमापन करण्यासाठी काही मुद्दे देता येतात. मुद्दे ताईने वाचून दाखवावे आणि मुलांनी त्यासमोर हसरा चेहरा किंवा रडका चेहरा चिकटवावा.

| | |
|---|---|
| मला अंगणवाडीत यायला आवडते. | |
| मला साधने खेळायला आवडतात. | |
| मला मित्रांबरोबर खेळायला आवडते. | |
| मला वस्तू मोजता येतात. | |
| मी दुसऱ्यांना मदत करतो. | |

**पालकांना समग्र प्रगतिपत्रक समजावून देताना :** अंगणवाडीत दर तीन महिन्यांनी एक दिवस पालकांना बोलवावे. एकाच वेळी बोलावल्यामुळे सर्व पालकांचा वेळ वाया जाऊ नये म्हणून त्यांना वेगवेगळ्या वेळी बोलवावे. पालकांना मुलांचे पत्रक दाखवावे. त्यातील काय चांगले ते मुद्दे सांगावेत, तसेच विकासाच्या कोणत्या घटकात मुलांना कोणत्या अडचणी येत आहेत हे योग्य भाषेत समजावून सांगावे. पालक मुलांना काय मदत करू शकतात हे सांगावे.

**उदाहरणार्थ :** एका अंगणवाडीतील विराज हा साडे पाच वर्षांचा मुलगा आहे. तो दहापर्यंतच्या संख्यांची मोजणी करताना अडखळतो. म्हणून अंगणवाडीताई पालकांना तसे सांगते आणि त्याला मदत व्हावी म्हणून काही गोष्टी समजावून देते. त्याला घरात असलेल्या वाट्या मोजायला सांगा. १ ते १० पर्यंतच्या संख्या म्हणत उड्या मारून घ्या, कोणतीही संख्या सांगून, तेवढ्या टाळ्या वाजवायला सांगा. एकेक रुपयाची नाणी देऊन ५ रुपये दे, आठ रुपये अशा सूचना देऊन मोजणी करून घ्या इत्यादी. पालकांना स्पष्टपणे सांगा, 'हे सारे सहज खेळ म्हणून करा. तुला अभ्यास करायचा आहे, तुला मोजता येत नाही,' असे मात्र म्हणू नका.

असे समग्र प्रगतिपुस्तक, मुलांची फाईल पालकांना द्या. त्यांनाही आनंद वाटेल. मुलाचा अभिमान वाटेल.

**प्रात्यक्षिक :**

१) एक साप्ताहिक नियोजन तयार करा.

२) तुम्हांला मुलांना क्षेत्रभेटीला न्यायचे आहे असे समजून, त्याची तयारी कशी कराल, त्याचे नियोजन कसे कराल ते सविस्तर लिहा.

३) वर्गात अध्ययन कोपरे मांडा, किमान ५ मुले या अध्ययन कोपऱ्यात काय करतात, याचे निरीक्षण करून सविस्तर नोंदी लिहा.

४) शारीरिक विकासातील नोंदी करण्यासाठी, तीन श्रेणीयुक्त (पदनिश्चयन श्रेणी) मूल्यांकनातील नमुना तयार करा. यात किमान सात ते दहा कौशल्ये लिहा.

---

## स्वाध्याय

१) नियोजनाचे महत्त्वाचे दोन भाग कोणते? अभ्यासक्रमाचे नियोजन करणे का गरजेचे असते?

२) साप्ताहिक नियोजन करताना, कोणकोणत्या गोष्टी लक्षात घेऊन नियोजन करायला हवे, ते लिहा. एक नमुना साप्ताहिक नियोजन तयार करा.

३) साप्ताहिक आणि दैनिक नियोजनाची गरज का असते ते लिहा. एका दिवसाचे दैनिक नियोजन तयार करा.

४) अध्ययन कोपरे म्हणजे काय? भाषा कोपऱ्यामध्ये काय मांडाल, ते सविस्तर लिहा.

५) गणित आणि कला अध्ययन कोपऱ्यात काय मांडाल, ते सविस्तर लिहा.

६) अध्ययन कोपरे तयार करण्यामागील भूमिका काय असते?

७) मूल्यांकन म्हणजे काय? ते केव्हा करणे आवश्यक असते, हे सविस्तर लिहा.

८) मूल्यांकन केव्हा आणि कसे करावे? उदाहरणासह स्पष्ट करा.

९) मूल्यांकन करण्याच्या पद्धतींची नावे लिहा आणि कोणत्याही दोन पद्धतींचे वर्णन करा.

१०) तीन श्रेणी युक्त मूल्यांकन आणि पडताळा सूची' यांतील प्रत्येकी तीन उदाहरणे लिहा आणि या दोन प्रकारांतील फरक सांगा.

# घटकसंच ११ : बालकांचे हक्क व सुरक्षितता




वर्तन ही सहसा न बोललेली भाषा असते, ज्याद्वारे बालके आपल्या भावना आणि विचार व्यक्त करतात. बालके ‘वाईट’ आहेत किंवा ‘आपल्याला त्रास देऊ इच्छितात’ म्हणून नाही; तर समूह वर्तन नियम किंवा वर्तनाच्या पर्यायी पद्धतींबद्दल अनभिज्ञ असल्यामुळे त्यांच्याकडून अयोग्य वर्तन घडते.

कधीकधी ते अतिरिक्त लक्ष वेधण्यासाठी अयोग्य वर्तनाचा वापर करतात. ते रागावलेले किंवा असहाय असू शकतात आणि त्यांच्या भावना व्यक्त करण्याचा दुसरा कोणताही मार्ग त्यांना माहीत नसतो. बालकांना सुरक्षित आणि नियंत्रित वाटणे गरजेचे आहे.

*(संदर्भ : राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर – २०२४ : पृष्ठ क्र. १३६)*

**घटकसंचाविषयी थोडेसे....**

कोणत्याही देशाचे भवितव्य, त्या देशातील बालकांवर अवलंबून असते, म्हणून बालकांचा विकास, व त्यांची वाढ निरोगी व आरोग्यदायी असायला हवी. बालकांना अर्थपूर्ण हक्क देणे म्हणजेच त्यांच्या वाढीला व विकासाला चालना देणे आहे. संयुक्त राष्ट्र संघाने याचा विचार केला आणि समाविष्ट देशांनी तो स्वीकारला. बालकांच्या त्यांच्या शारीरिक व मानसिक अपरिपक्वतेमुळे त्यांची विशिष्ट सुरक्षितता व काळजी घेण्याची गरज आहे. त्याचबरोबर घरातून, समाजातून, अंगणवाडीतून कायद्याने संरक्षण मिळायला हवे. सुरक्षितता आणि धोकादायक गोष्टींपासून संरक्षण हा बालकांचा मूलभूत हक्क आहे.

सदरच्या घटकात बालकांच्या हक्कांची ओळख, बालकांची सुरक्षितता निश्चित करण्यासाठी

महत्त्वाचे मुद्दे, अंगणवाडी वातावरणातील सुरक्षितता, मुलांच्या असमाजमान्य वर्तनाची कारणे– उदाहरणे व असे वर्तन घडू नये म्हणून करावयाच्या उपाययोजना आणि त्या संदर्भात अंगणवाडी सेविकेची भूमिका इ. उपघटक अभ्यासणार आहोत.

## माझ्या नोंदी :

# घटकसंच ११ : बालकांचे हक्क व सुरक्षितता

## घटक क्र. ११.१ : बालकांचे हक्क

या घटकात आपण बालकाच्या हक्कांची ओळख करून घेणार आहोत त्यातून बालहक्कांची माहिती मिळेल व बालकांच्या हक्कांबाबत सजगता निर्माण होईल.

### प्रास्ताविक :

कोणत्याही देशाचे भवितव्य हे त्या देशातील बालकांवर अवलंबून असते; म्हणूनच बालकांचा सुयोग्य विकास हा अत्यंत महत्त्वाचा आहे. बालकांची वाढ निरोगी, आरोग्यदायी होण्याबरोबरच, विकासाच्या जोडीने राष्ट्राचा विकास मनुष्यबळाचा विकास, या संदर्भात देशातील प्रत्येक बालक महत्त्वाचे आहे.

बालकांना त्यांचे हक्क मिळवून देणे, म्हणजेच बालकांची वाढ आणि विकास यांना मदत करणे किंवा चालना देणे. हाच विचार समोर ठेवून जगभरातील देशांनी बालकांचे हक्क निश्चित केले आहेत.

बालकांच्या शारीरिक, मानसिक, भावनिक सुरक्षिततेची विशिष्ट काळजी, समाजाने घेण्याची आवश्यकता असते, त्याच्यबरोबर सबळ कायद्याची गरज असते. बालक हे एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून ओळखले जायला हवे, ज्यांचे शारीरिक, मानसिक, सामाजिक, नैतिक, भावनिक, आध्यात्मिकदृष्ट्या विकसन स्वातंत्र्य आणि सन्मानाने सक्षमपणे होणे आवश्यक आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने १९७९ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय बालवर्ष' म्हणून घोषित केले. त्यामुळे बालकांसंदर्भातील हक्क मान्यतेला खऱ्या अर्थाने प्रोत्साहन मिळाले. २० नोव्हेंबर १९८९ मध्ये बालहक्कांवरील परिषदेने मुलांचे सर्व हक्क एकमताने मान्य केले. यामध्ये ५४ कलमे असून, त्यात मुलांचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, संरक्षणविषयक असे सर्व हक्क नमूद करण्यात आले आहेत.

बालक म्हणजे १८ वर्षाखालील व्यक्ती. बालकांचे हक्क हा मानवी हक्कांचा उपसमूह आहे. मानवी हक्कांच्या सनदेनुसार, जसे मोठ्या व्यक्तींचे हक्क असतात, तसेच बालकांनाही त्यांचे हक्क प्रदान करण्यात आले आहेत. त्यालाच बालहक्क किंवा बाल अधिकार म्हटले आहे.

### बालकांचे हक्क :

- सर्व जाती, रंग, लिंग, भाषा, धर्म, वंश, राजकीय किंवा इतर मते, राष्ट्रीय परंपरा किंवा सामाजिक, संपत्ती, व्यंग किंवा इतर दर्जा यांवर आधारित भेदभावापासून बालकांना संरक्षण प्रदान केले आहे. बालकांना अंगणवाडीमध्ये प्रवेश घेताना किंवा आरोग्य सेवा उपलब्ध करून देताना, कोणत्याही कारणाने नाकारले जाणार नाही.
- बालकांसंदर्भातील कृतींमध्ये, बालकांच्या सर्वोत्तम हिताला सर्वाधिक प्राथमिकता दिली

जाईल. समजा बालकाच्या आईकडे जन्म–प्रमाणपत्र नाही, अशा परिस्थितीतही बालकाला अंगणवाडीमध्ये प्रवेश दिला जाईल. इथे त्याचे हित प्राधान्याने पाहिले जाईल.

- बालकाला त्याच्या जन्मापासूनच ओळख, नाव आणि राष्ट्रीयत्वाचा हक्क आहे.
- प्रत्येक बालकाला जन्मजात जीवन जगणे, जीवनमान सुधारणे, कोणत्याही प्रकारच्या आजारावर सर्वोत्तम दर्जाचे उपचार मिळणे, बालकाचा त्याच्या संपूर्ण क्षमतेने व्यक्तिमत्त्व विकास साधणे, बुद्धिमत्ता आणि शारीरिक क्षमतावाढ यांच्याकडे निर्देशित अशा शिक्षणाचा, तसेच सामाजिक सुरक्षेचा अधिकार प्राप्त आहे.
- बालकाला आराम व विश्रांती घेण्याचा, तसेच खेळ आणि मनोरंजक कृतींमध्ये रमण्याचा अधिकार आहे. बालकाला कोणता खेळ खेळायचा आहे याचे स्वातंत्र्य आहे. मोठ्यांना आवडतो किंवा एखादा खेळ खूप महत्त्वाचा आहे, म्हणून तो बालकाला जबरदस्तीने खेळवता येणार नाही. आपल्या दैनंदिन अध्यापनात बालकांना खेळाविषयी स्वातंत्र्य कसे देता येईल, कोणता खेळ त्यांना खेळायला आवडतो, याबाबत चर्चा घडवून, मग अंगणवाडीताईला खेळाबाबत नियोजन करता येईल.
- प्रत्येक बालकाचा योग्य त्या प्रमाणात शारीरिक, मानसिक, अध्यात्मिक आणि सामाजिक विकास होईल, या दृष्टीने जीवनमानाचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे. अंगणवाडीमध्ये बालकाला योग्य प्रमाणात त्याचा सर्वांगीण विकास होईल, यादृष्टीने प्रयत्न करता येतील.
- कोणत्याही बालकाला बेकायदेशीर हस्तांतरण, अपहरण, विक्री किंवा वाहतूक इत्यादी उद्देशाने किंवा कोणत्याही प्रकारे हानी होता कामा नये. काही ठिकाणी बालकांना विकले जाते किंवा कोणतीही कायदेशीर प्रक्रिया न करता दत्तक दिले जाते. कधी कधी काही दुष्ट प्रवृत्तीचे लोक बालकाचे अपहरण करतात, त्या मोबदल्यात रक्कम मागतात किंवा परगावी नेऊन विकतात. अशा सर्व गोष्टींपासून बालकाचे संरक्षण होणे अतिशय महत्त्वाचे आहे.
- बालकाच्या दृष्टिकोनाला/मताला योग्य तो सन्मान द्यायला हवा. बालकाला स्वत:चे मत असते त्याचा स्वत:चा असा जगाकडे बघण्याचा दृष्टिकोन असतो, हे अनेक मोठ्या मंडळींना बऱ्याचदा माहीत नसल्याने, त्यांचे मत, दृष्टिकोन विचारात घेतले जात नाही; परंतु प्रत्येक बालक हे वैशिष्ट्यपूर्ण असते. त्याला त्याचा दृष्टिकोन आणि मत देण्याची संधी आपण उपलब्ध करून दिली पाहिजे.
- बालकाला त्याच्या पालकांपासून त्याच्या मनाविरुद्ध विभक्त करू नये. अपवादात्मक परिस्थितीत जेव्हा असे विभक्त करणे बालकाच्या उत्तम हितासाठी आवश्यक असेल, तेव्हाच करावे. काही कुटुंबात विभक्त होण्याची वेळ येते, तेव्हा बालकाच्या मताला आदर देणे, तसेच त्याला कुणासोबत राहायचे आहे, याबाबत निर्णय घेताना फार जबाबदारीने निर्णय घेतला

पाहिजे. बालक म्हणून त्याला आईवडील या दोघांचे प्रेम मिळणे, सहवास मिळणे हा त्याचा निसर्गदत्त अधिकार आहे. विभक्त करायचे झालेच, तर त्याचे उत्तम हित लक्षात घेतले जाईल, असे निर्णय घेणारी मंडळी पाहतील असे त्यांच्यावर बंधन आहे.

- कौटुंबिक वातावरणापासून वंचित असलेल्या बालकाला, राज्याकडून विशेष संरक्षण आणि मदत मिळवण्याचा हक्क असतो. काही बालके ही अनाथ असतात किंवा त्यांची देखभाल करण्यासाठी कोणीही तयार नसते. अशा परिस्थितीत राज्य शासन अशा बालकांची जबाबदारी स्वीकारते. बाल कल्याण मंडळ (CWC) प्रत्येक जिल्ह्यात कार्यरत आहे.
- बालकांची काळजी घेणे किंवा संरक्षण करणे, यांसाठी जबाबदार संस्था, सेवा आणि सुविधांनी संस्थापित घटकांनी निर्धारित मानकांनुसार कार्य करणे बंधनकारक आहे.
- मानसिक किंवा शारीरिकदृष्ट्या विकलांग असलेल्या मुलांनाही व्यक्ती म्हणून सन्मान जपला गेला पाहिजे तसेच हळूहळू त्यांना स्वावलंबी होऊन समाजामध्ये सक्रिय सहभाग नोंदवून, आयुष्याचा संपूर्ण आनंद घेत जगण्याचा हक्क प्रदान केला आहे. आपल्या अंगणवाडीत दिव्यांग बालकांना प्रवेश दिल्यानंतर, त्यांचे वावरणे, शिकणे सुलभ व्हावे यासाठी आपण सुद्धा विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे. आवश्यक ती शासकीय मदत मिळवणे गरजेचे आहे.
- आर्थिक शोषणापासून बालकांचे संरक्षण होणे गरजेचे आहे. आर्थिकदृष्ट्या बालक स्वावलंबी नसते. त्यामुळे या हक्काची जरुरी भासते.
- मुलांनी अंमली पदार्थ आणि मनावर विपरित परिणाम करणाऱ्या औषधांचे बेकायदेशीर सेवन करण्यास बळी पडू नये, हे अत्यंत महत्त्वाचे आहे.
- बालकांना सर्व प्रकारच्या शारीरिक किंवा मानसिक हिंसा, इजा किंवा गैरवर्तन, दुर्लक्ष किंवा निष्काळजीपणा, दुर्वर्तन किंवा शोषण, लैंगिक गैरवर्तनासह सर्व बाबींपासून संरक्षण मिळवण्याचा हक्क आहे.
- प्रत्येक मूल सर्व प्रकारच्या लैंगिक शोषण, लैंगिक छळ आणि लैंगिक गैरवर्तनापासून कायद्याद्वारे संरक्षित आहे. बालकांना त्यांचे खाजगी अवयव कोणते आणि तिथे कोणीही स्पर्श केला किंवा चुकीचे वर्तन केले, तर ते कुणाला आणि कसे सांगायचे, याबाबत विविध उपक्रमांमधून, यांतून सांगितले पाहिजे.
- कोणत्याही मुलाला बेकायदेशीरपणे यातना, इतर क्रूर वर्तणूक, अमानवीय, मानहानिकारक वर्तणूक किंवा शिक्षा भोगायला लागता कामा नये. हा हक्क त्याला प्रदान करण्यात आला आहे.
- कोणत्याही प्रकारे दुर्लक्ष, शोषण किंवा गैरवर्तणूक झालेल्या, यातना पीडित मुलांची शारीरिक आणि मानसिक हानी भरून येण्यासाठी आणि त्यांचा समाजात समावेश होण्याकरता आवश्यक त्या सर्व गोष्टी योग्य प्रकारे केल्या गेल्या पाहिजेत. एखादे बालक पीडित असेल, तर त्याची

सर्व प्रकारची काळजी सर्व समाजाने घेतली पाहिजे. त्याला समाजात सहजपणे सामावून घेतले पाहिजे.

- आरोप असलेल्या किंवा कायद्याचे उल्लंघन करताना आढळलेल्या विधीसंघर्षित मुलांना योग्य त्या सन्मानाने आणि न्यायाने वर्तणूक मिळण्याचा अधिकार आहे. बालकाकडून जाणते, अजाणतेपणाने गुन्हा घडला, तर त्याला सर्वसामान्य बालकाला जो सन्मान मिळतो, तसाच सन्मान मिळायला हवा. योग्य पद्धतीने न्यायाची प्रक्रिया राबवली गेली पाहिजे, हा बालकाचा अधिकार आहे.
- कोणत्याही मुलाच्या खाजगी जीवनात मनमानीपणे किंवा बेकायदेशीर हस्तक्षेप, तसेच त्याच्या घरावर किंवा त्याच्या सन्मान व नावलौकिकावर आघात होता कामा नये. अशा प्रकारे बालहक्कासंदर्भात कायद्यानुसार तरतूद करण्यात आलेली आहे. पीडित बालकाचे नाव जाहीर करणे, त्याचे फोटो घेऊन ते सामाजिक माध्यमावर टाकणे, ही चुकीची कृती ठरते. ते सर्व गोपनीय राहणे गरजेचे आहे.
- बालहक्कांची पूर्ती व्हावी यासाठी, भारतासह जगभरात व्यक्ती व संस्था समर्पितपणे कार्य करत आहेत. बालहक्कांचे संरक्षण, संवर्धन व्हावे व त्यातून बालकांना समृद्ध जीवन जगता यावे, यासाठी युनेस्कोसारख्या संस्था चिरस्थायी काम करत आहेत. मुलांना बालपण देण्यासाठी अनेक व्यक्तींनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे व देत आहेत. आपल्या अंगणवाडीमध्ये बाल कल्याण केंद्र, चाइल्ड हेल्प लाईन क्रमांक (१०९८) दर्शनी भागात सर्वांना स्पष्ट दिसेल असा लावून ठेवावा.

**या घटकाचा व्हिडिओ पाहिल्यानंतर, खालील प्रश्नांची उत्तरे आपल्या नोंदवहीत लिहूया.**

१) भारतीय राज्यघटना आणि युनेस्को बालकांना कोणते हक्क प्रदान करते, याची यादी तयार करा.

२) आपल्या अंगणवाडीत बालकांचे हक्क मिळवून देण्यासाठी अंगणवाडीताई म्हणून माझी भूमिका काय असेल याबद्दल लिहा. संपर्क सत्रात चर्चा करा.

## घटक क्र. ११.२ : बालकांची सुरक्षितता

**या घटकात आपण काय शिकणार?**

११.२.१ सुरक्षितता निश्चित करण्यासाठी महत्त्वाचे मुद्दे

११.२.२ अंगणवाडी वातावरणातील सुरक्षिततेच्या बाबी

### ११.२.१ सुरक्षितता निश्चित करण्यासाठी महत्त्वाचे मुद्दे :

लहान मुलांची सुरक्षितता ही एक महत्त्वाची बाब आहे. या लहान वयात मुले नवीन गोष्टी शिकत असतात आणि त्यांची जगाकडे पाहण्याची दृष्टी विकसित होत असते. या काळात त्यांना अनेक

प्रकारच्या धोक्यांना सामोरे जावे लागू शकते. सुरुवातीची ६ वर्षे ही लहान मुलांच्या विकासात सर्वांत महत्त्वाचा टप्पा म्हणून ओळखली जातात, कारण वयाची ही वर्षे अतिशय वेगाने वाढ व विकासाची असतात. या वयात मुले शारीरिकदृष्ट्या, मानसिकदृष्ट्या आणि भावनिकदृष्ट्या विकसित होण्यास सुरुवात होते. त्यांना नवीन गोष्टी शिकण्याची आणि जगाचा शोध घेण्याची उत्सुकता निर्माण होते, पण या वयात मुले अजूनही असुरक्षित असतात, कारण त्यांना धोक्यांची जाणीव नसते.

म्हणूनच या वयोगटातील लहान मुलांच्या सुरक्षिततेसाठी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.

मुलांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी महत्त्वाचे मुद्दे :

अ) शारीरिक सुरक्षितता

ब) मानसिक सुरक्षितता

क) भावनिक सुरक्षितता

ड) लैंगिक अत्याचारापासून सुरक्षितता

**अ) शारीरिक सुरक्षितता :**

वयोगट ३ ते ६ मधील मुले नव्याने परिसरात फिरायला, आजूबाजूला जायला–यायला लागतात. अशावेळी अपघाताचा धोका असतो, त्यामुळे अंगणवाडीमध्ये आणि इतर ठिकाणी मुलांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना करणे आवश्यक आहे. अंगणवाडी परिसरात जिना/पायऱ्या असतील, तर तेथे बालरक्षक जाळी बसवणे आवश्यक आहे. दारे, खिडक्या, अंगणवाडीतील साहित्य, कपाटे, धातूच्या वस्तू या सुरक्षित प्रकारच्या हव्यात, धोकादायक नसाव्यात. अंगणवाडी परिसरात एकही टपरी नसावी. गंजलेल्या, धारदार, तीक्ष्ण किंवा धोकादायक वस्तू, औषधे, गोळ्या, रसायने, तसेच विषारी द्रव्य मुलांच्या हाती लागणार नाहीत याची दक्षता घेणे आवश्यक असते.

अंगणवाडीमध्ये लहान मुले हाताळत असलेली खेळणी सुरक्षित असावी. शक्यतो बॅटरी, वीज किंवा स्फोट होण्याचा संभव असलेली खेळणी त्यांना देणे टाळावे. धातूची, टोकदार किंवा त्यांना इजा होईल अशी खेळणी सुद्धा टाळावी. परिसरातील झोके, सी–सॉ, घसरगुंडी, जंगलजीम खेळताना सुरक्षिततेची काळजी घ्यावी. खेळताना उंची, वेग, खोली यांमुळे मुलांना शारीरिक इजा होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक असते. घरातील विजेची उपकरणे व प्लग, बटणे यांपासून त्यांना दूर ठेवणे, घरातून बाहेर पडताना मुलांना नेहमी हाताला धरून नेणे, घरात, मैदानावर, बाहेर ते पडणार नाहीत याची काळजी घेणे, इत्यादी बाबी महत्त्वाच्या ठरतात.

**ब) मानसिक सुरक्षितता :**

३ ते ६ वर्षे या वयात मुलं त्यांच्या सभोवतालच्या जगाबद्दल जाणून घेण्यास सुरुवात करतात, उत्सुक असतात, मात्र अनेक प्रसंगी नक्की कसे वागावे हे त्यांना कळत नाही. यामुळे मुलं भय, चिंता, असुरक्षितता अशा नकारात्मक भावना अनुभवू शकतात. त्यामुळे मुलांच्या मानसिक

सुरक्षिततेसाठी त्यांच्याशी त्यांना विश्वास वाटेल असे बोलणे, त्यांना सुरक्षित व आपलेसे वाटेल असे वातावरण निर्माण करणे गरजेचे असते. त्यांच्या भावना समजून घेणे आणि त्यावर त्यांच्याशी आपलेपणाने व प्रेमाने चर्चा करण्याने, त्यांना मानसिक आधार मिळतो व त्यांचे भय, चिंता, असुरक्षितता या भावना विश्वासात बदलतात. मुलांना तुमच्या बद्दलचा वाटणारा हा विश्वास खूप महत्त्वाचा असतो.

**क) भावनिक सुरक्षितता :**

भावनिक सुरक्षितता म्हणजे, मुलांना स्वतः बद्दल विश्वास वाटणे होय. आपल्याला लोकांकडून प्रेम, आदर, मिळत असून, लोकांनी आपल्याला स्वीकारलेले आहे अशी खात्री त्यांच्या मनात तयार होते. अशावेळी मुलांना जगात वावरताना आत्मविश्वास मिळतो. भावनिक सुरक्षितता ही मानसिक आरोग्य आणि आत्मविश्वासासाठी आवश्यक आहे. जेव्हा आपण भावनिकदृष्ट्या सुरक्षित असतो, तेव्हा आपण तणाव आणि भावनिक आव्हानांना चांगल्या प्रकारे तोंड देऊ शकतो. इतर लोकांबरोबर मैत्री, चांगले आणि निरोगी संबंध निर्माण करू शकतो.

**ड) लैंगिक अत्याचारापासून सुरक्षितता :**

३ ते ६ वर्षे वयोगटातील ही मुले अनेक अनुभव पहिल्यांदाच घेत असतात. त्यामुळेच या वयात मुले लैंगिक अत्याचाराला बळी पडण्याची शक्यता वाढते. मुलांना सुरक्षित व असुरक्षित स्पर्शाची माहिती देणे, वैयक्तिक शरीरावयवांची ओळख करून देणे, याबरोबरीनेच अनोळखी व ओळखीच्या लोकांनी त्यांच्या शरीराला स्पर्श करायच्या मर्यादा सांगायला – शिकवायला हव्यात. त्यांच्या अंगाला कोणीही जबरदस्तीने हात लावू नये याची काळजी घेणे आवश्यक आहे. अशा प्रसंगी मुलांनी मोठ्याने मदतीसाठी ओरडणे, असुरक्षित स्पर्शाला नकार देणे व त्या व्यक्तीपासून दूर, सुरक्षित ओळखीच्या व्यक्ती जवळ जाणे, या महत्त्वाच्या गोष्टी शिकवणे किंवा सांगणे गरजचे आहे.

कोणाचाही असुरक्षित स्पर्श व वर्तन आणि त्यामुळे होणारा त्रास, ही स्वाभाविक बाब नाही हे ओळखण्यास मुलांना शिकवायला हवे. त्यातून मुलांना स्वतःचे रक्षण करण्यास मदत होईल. मुलांना त्यांच्या भावना व्यक्त करायला आणि मदत मागायला दडपण वाटणार नाही.

या बद्दल आपण सविस्तर माहिती पुढे घेणारच आहात.

३ ते ६ वयोगटातील मुलांची, शाळेतील व बाहेरील वैयक्तिक, शारीरिक, मानसिक व भावनिक सुरक्षा सुनिश्चित करण्यात, अंगणवाडी ताई महत्त्वाची भूमिका बजावू शकते, हे आपल्या लक्षात आले असेल. चला तर, या लहान मुलांसाठी आपण शारीरिक, मानसिक व भावनिक आणि लैंगिक सुरक्षेच्या दृष्टीने जागृत राहू या.

### ११.२.२ अंगणवाडी वातावरणातील सुरक्षिततेच्या बाबी

मुलांना सुरक्षितता पुरवण्यामधे अंगणवाडी ताईची, म्हणजेच तुमची भूमिका कोणती आणि ती कशी पार पाडायची हे पाहूया. ३ ते ६ वयोगटाच्या लहान मुलांच्या सुरक्षेची काळजी अंगणवाडी ताईंनी कशी करावी, याबाबत काही मुद्‌द्यांची आपण उजळणी करूया. इथे दिलेले मुद्‌दे हे सर्व समावेशक आहेत असे नाही.

यापेक्षाही अनेक वेगवेगळ्या अधिक मुद्‌द्यांचा विचार करून तुम्ही खरं तर खूप चांगलं काम करताय. यापेक्षाही जास्त चांगल्या रीतीने, वेगवेगळ्या पद्‌धतीने, मुलांच्या सुरक्षिततेची काळजी तुम्ही नक्कीच करीत आहात याची सुद्‌धा खात्री आहेच.

**अंगणवाडीतील वातावरणात सुरक्षिततेच्या बाबी :**

**अ) वर्गवातावरण व परिसरातील सुरक्षितता :**

अंगणवाडीत सुरक्षित व विश्वासार्ह वातावरण निर्माण करा. वर्ग स्वच्छ आणि सुव्यवस्थित ठेवा. अन्नपदार्थ आणि पिण्याचे पाणी सुरक्षित व योग्य आहे याची काळजी घ्या. मुलांनी हाताळायच्या वस्तू, खेळणी, साहित्य धोकादायक नसल्याची खात्री करा. जिना, माडी, गच्ची, पाण्याची टाकी, खड्‌डे याजवळ लहान मुलं सहज जाणार नाहीत याची दक्षता घ्या. विजेची उपकरणे, धारदार व टोकदार वस्तू, आदी वस्तूंपर्यंत मुलांचा हात पोहोचणार नाही या कडे लक्ष द्या.

**ब) मुलांवर सतत देखरेख ठेवणे महत्त्वाचे :**

मुलांच्या सर्व हालचालींवर नेहमीच नजर ठेवा. ती जिथे जातात. तिथे त्यांच्यावर नजर ठेवा. मुलं उंचीवर, खड्‌ड्यांकडे, रस्त्याकडे, खूप दूर जाणार नाहीत याकडे लक्ष द्या. मुलं खेळताना, धावाधाव करताना परिसर सुरक्षित, स्वच्छ, सपाट आणि खड्‌डेमुक्त आहे हे तपासून घ्या. मुलं आपल्या नजरेच्या टप्यात असतील, याची नेहमी दक्षता घ्या. वर्ग खोलीत असताना, मैदानावर खेळतांना, रहदारीच्या रस्त्याजवळ धोका–इजा–अपघात होणार नाही यासाठी दक्ष रहा.

**क) नियम व शिस्त पालन :**

मुलांसाठी स्पष्ट आणि सुसंगत नियम तयार करा. या नियमांची योग्य अंमलबजावणी करा. शिस्त पालन आवश्यक आहे हा संदेश सहजपणे द्या. शिस्तपालनासाठी मोठ्याने ओरडणे किंवा शारीरिक शिक्षा करणे, रागावणे आदी गोष्टी टाळायला हव्या. उगाच सक्ती करणारे व अवास्तव नियम तयार करणे सुद्‌धा टाळायला हवे. शिस्त आणि नियम सर्वांच्या फायद्याचे कसे आहेत हे समजावून सांगा. प्रत्येकाने पालन करायच्या शिस्तीचा व नियमपालनाचा व त्यांच्या स्वतःच्या सुरक्षिततेचा कसा संबंध आहे हे पटवून द्या.

**ड) सुरक्षितता शिक्षण :**

मुलांना सुरक्षिततेचे शिक्षण द्या. त्यांना चांगल्या आणि वाईट स्पर्शामधील फरक शिकवा. त्यांना स्वतःला त्रासदायक वाटणाऱ्या व अवांच्छित स्पर्श करणाऱ्या व्यक्तीपासून लगेचच दूर जावे, ओरडावे, मदत मागावी हे शिकवा. ओळखीच्या परिचित व्यक्ती सोडून इतरांच्या सोबत जाणे बरोबर नाही हे समजावून द्या. घरातील, मैदानावरील, रस्त्यावर, गर्दीच्या ठिकाणी, बाजारात व मॉलमध्ये, लिफ्ट व निर्जनस्थळी धोक्याचे संकेत समजावून द्या. अशा प्रसंगी ओळखीच्या वा अनोळखी व्यक्तीकडून कशी मदत मागायची ते शिकवा. मदतीसाठी कुठे आणि कसा संपर्क साधावा हे शिकवा.

**इ) मुलांसोबत क्षेत्रभटी, निसर्गभेटी व सहलीला जाताना :**

अंगणवाडी परिसराच्या बाहेर फिरायला जाताना, मुलांना त्यानंतर चालताना जोडीजोडीने न्या. हात धरून चालायला सांगा. तुम्ही त्यांच्या जास्तीत जास्त जवळून चाला. त्यांच्यावर संपूर्ण लक्ष ठेवा. मुलांना रस्त्यावरील सुरक्षा नियमांबद्दल माहिती द्या. गर्दीच्या ठिकाणी व रस्यावरुन चालताना, त्यांना नेहमी तुमच्यासोबत हात पकडून चालायला शिकवा.

**फ) प्रथमोपचार प्रशिक्षण :**

अंगणवाडी ताईंनी प्राथमिक उपचारांचे प्रशिक्षण घेतले पाहिजे. सोपे व सहज करता येणारे प्रथमोपचार माहीत असायला हवे. गरज असेल तेव्हा मुलांची काळजी घेणे आपले कर्तव्य आहे. अंगणवाडीतील मुलांना होऊ शकणाऱ्या इजांवर काय प्रथमोपचार करावे, हे ताईंना माहीत असायला हवे. यासाठी अंगणवाडीत प्रथमोपचार पेटी असायला हवी. आपत्कालीन प्रसंगी मुलांच्या लहान मोठ्या इजांवर प्रथमोपचार करायला यातील साहित्य कामी येते.

प्रथमोपचार पेटीत छोट्या मोठ्या इजा, दुखणे यांवर तात्पुरते वैद्यकीय उपचार करण्याचे साहित्य ठेवायचे असते. या मध्ये जखमेला लावायचे जंतुनाशक द्रव्य, मलम, कापूस, जखमेवर लावायची चिकटपट्टी, बँडेज, टेप, कापडी पट्टी, सुती कापड, रुमाल, जंतुनाशक पावडर, वेदनाशामक मलम, कात्री, थर्मामीटर वगैरे साहित्य प्रथमोपचार पेटीत वापरता येईल अशा स्वरूपात तयार असायला हवे.

**ग) आरोग्य तपासणी :**

मुलांची नियमितपणे आरोग्य तपासणी करा. त्यांचे शरीरावयव तसेच नखे, केस, त्वचा, दात, कान, नाक यांचे नियमितपणे निरीक्षण करत रहा. यामुळे त्यांच्या आरोग्यसमस्या सोडवायला मोठी मदत तुम्ही करीत असता, हे समजून घ्या. वैद्यकीय अधिकारी व तुम्ही केलेल्या आरोग्य तपासणीच्या नोंदी मुलांच्या पालकांना सांगा. त्वचेवरील चट्टे, डोळ्यांतील दोष, रंग

आंधळेपणा, शरीरावरील गाठी यांबाबत जागरुक असावे. कान, नाक, घसा, डोळे, पोट, छाती किंवा एखादा अवयव दुखत असल्याच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करायला नको. पालकांना सांगून, डॉक्टरांकडे जाऊन, ते तपासून बघणे गरजेचे असते. खरंच काही आजार किंवा रोग असेल, तर यामुळे वेळेत उपचार होऊ शकतात. विशेषतः मुलांना कानांनी चांगले ऐकू येते, याचीही तपासणी करून बहिरेपणा किंवा कानाचे विकार असलेल्या लहान मुलांना वेळीच उपचार देणे शक्य होते, तसेच दृष्टीचेही आहे.

**ह) आपत्कालीन योजना :**

आग, भूकंप, अपघात, गोंधळ, मूल हरवणे, अनोळखी व्यक्तीसोबत निघून जाणे अशा आपत्कालीन परिस्थितीसाठी वेगवेगळ्या योजना तयार करून ठेवा. या योजनांची माहिती मुलांना द्या. पालकांना सुद्धा हे माहीत असणे, मुलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचे ठरत असते. आपत्कालीन योजनांनुसार आपत्कालीन परिस्थिती नसतानाही, वेळोवेळी त्या परिस्थितीत काय करावे, सूचना कशा ऐकाव्या आदी गोष्टींची माहिती देऊन रंगीत तालीम करून घ्या.

आपत्कालीन परिस्थितीत ताईंनी व सहकाऱ्यानी शांत राहणे आणि योग्य अधिकाऱ्यांशी संपर्क साधणे महत्त्वाचे असते, हे लक्षात ठेवा. अंगणवाडीमधील मुलं आणि कर्मचाऱ्यांना आपत्कालीन फोन नंबर कुठे सापडतील याची माहिती असणे महत्त्वाचे आहे. हे आपत्कालीन क्रमांक, वर्गखोली, कार्यालय, अंगणवाडीच्या दर्शनी भागात स्पष्ट दिसतील अशा ठिकाणी मोठ्या अक्षरांत लावून ठेवले पाहिजेत.

आपत्कालीन प्रसंगात लागणारे आवश्यक व्यक्तींचे फोन नंबरची यादी तयार करून, ती अंगणवाडीच्या दर्शनी भागात लावण्यात यावी.

आपत्कालीन प्रसंगात लागणारे आवश्यक व्यक्तींचे फोन नंबर यादी

१) चाइल्ड हेल्पलाईन

२) अंगणवाडीचे अधिकारी

३) मुलांचे पालक किंवा कुटुंबातील व्यक्ती

४) मुलांचे ऑटो वा बस चालक

५) जवळपासचे डॉक्टर

६) खाजगी दवाखाना

७) सरकारी दवाखाना

८) पोलिस स्टेशन

९) अग्निशामक दल

१०) नगरपालिका/ग्रामपंचायत कार्यालय

११) इलेक्ट्रिशियन

१२) समाजसेवी संस्था

१३) समुपदेशक

१४) पोलिस पाटील

१५) सरपंच/ग्रामसेवक

१६) नगरसेवक/ग्रामपंचायत सदस्य

लहान मुलांची सुरक्षितता ही अंगणवाडीताईची मोठी जबाबदारी आहे. सर्व मुलांना सुरक्षित ठेवण्यासाठी अंगणवाडीताईंनी आणि पालकांनी एकत्र काम करणे आवश्यक आहे. ताई मुलांच्या सुरक्षिततेसाठी नेहमी दक्ष असताच. आता यापुढेसुद्‌धा कोणत्याही छोट्या मोठ्या कारणाने मुलांची सुरक्षितता कधीही बाधित होणार नाही याची काळजी आपण नेहमी घेऊया.

## घटक क्र. ११.३ : मुलांचे समाजमान्य नसलेले वर्तन

**या घटकात आपण काय शिकणार?**

११.३.१ 'समाजमान्य नसलेले वर्तन' म्हणजे काय?

११.३.२ समाजमान्य नसलेल्या वर्तनाची कारणे

११.३.३ समाजमान्य नसलेल्या वर्तनाची उदाहरणे

११.३.४ मुलांचे समाजमान्य नसलेले वर्तन रोखण्यासाठी करायच्या उपाययोजना

११.३.५ मुलांचे समाजमान्य नसलेल्या वर्तन प्रसंगी अंगणवाडीताईंनी वागायची पद्‌धती

या घटकामध्ये आपण समजून घेऊया, मुलांचे समाजमान्य नसलेले वर्तन म्हणजे काय? असे वर्तन होण्याची कारणे आणि अंगणवाडीताई म्हणून असे मुलांचे वर्तन टाळायला काय करायला हवे, त्याचप्रमाणे असे समाजमान्य नसलेले वर्तन सतत करणाऱ्या मुलांचे वागणे बदलण्यासाठी अंगणवाडीताईंनी काय उपाययोजना करावी त्याबद्‌दल सुद्‌धा आपण विचार करूया.

### ११.३.१ 'समाजमान्य नसलेले वर्तन' म्हणजे काय?

अनेकवेळा मुलं चुकीची वागतात असे आपण म्हणतो. मात्र मुलांना ते चुकीचे वाटत नाही. त्यांना एकतर ते योग्य वाटत असते किंवा त्याशिवाय दुसरे वर्तन कसे करावे याची माहिती त्यांना नसते.

त्याचे वय तरी काय असते? नुकतेच ते समाजातील विविध व वेगवेगळे अनुभव घ्यायला शिकत असतात. आजूबाजूला पाहून शिकत असतात. त्यामुळे ते नक्की योग्य काय किंवा अयोग्य काय किंवा कोणत्या स्थळी कोणत्या प्रसंगी कसे वागावे याचा समन्वय साधू शकत नाहीत. त्यामुळे मोठे लोक मुलांच्या अशा वर्तनाला ते चुकले, अयोग्य वागले असेच म्हणतात. त्या लहान मुलांना कोणते वर्तन सर्वांना मान्य असते आणि कोणते नसते हे कळत नाही आणि मग त्यांचा गोंधळ होतो.

### ११.३.२ समाजमान्य नसलेल्या वर्तनाची कारणे :

लहान मुलं त्यांच्या शारीरिक, मानसिक, भावनिक वाढीच्या प्रक्रियेत असतात. या वयात त्यांच्या भावना आणि विचार लवचीक असतात. त्यांना नवीन गोष्टी शिकण्याची आणि अनुभवण्याची उत्सुकता असते. या वयात त्यांना त्यांच्या स्वतःच्या अस्तित्वाची आणि त्यांच्या क्षमतांची जाणीव होऊ लागते. त्यांची स्वतःची आवड निवड विकसित होत असते. विचारांची प्रक्रिया गोंधळाची असली, तरीही मला काय हवे? याचा विचार करणे त्यांनी सुरू केलेले असते. यामुळे त्यांच्यात स्वातंत्र्य आणि स्वायत्तता मिळवण्याची इच्छा निर्माण झालेली असते.


मात्र हव्या त्या गोष्टी मिळवायला ते शारीरिकदृष्ट्या, मानसिकदृष्ट्या आणि भावनिकदृष्ट्या सक्षम नसतात. दैनिक गरजेच्या व आवडीच्या गोष्टी मिळवायला, ते कुटुंबियांवर अवलंबून असतात. याच काळात मुलांच्या स्वभावाचा पाया रचला जात असतो. त्यामुळे कौटुंबिक, सामाजिक, सांस्कृतिक तसेच, आर्थिक परिस्थिती व कुटुंबातील सदस्य यांच्या, त्यांच्याशी वागण्या बोलण्याच्या पद्धतीतून समन्वयाने मुलांच्या स्वभावाचे विकसन होत जाते. कधी कधी मुलं हट्टी, एकांगी, हवे ते करणारी, इतरांचे न ऐकणारी, मारामारी करणारी, रडकी, भांडखोर अशा नकारात्मक स्वभावाची होण्याची दाट शक्यता असते. मात्र अशा स्वभावाच्या किंवा वागण्याला समाजात स्वीकारले जात नाही. सामाजिकदृष्ट्या समाजमान्य नसलेल्या वर्तनाची कारणे काय असू शकतात याचा आपण विचार करूया.

मुलांच्या समाजमान्य नसलेल्या वर्तनाची कारणे पुढील संकल्पना चित्रात दाखवल्याप्रमाणे प्रामुख्याने चार प्रकारची असू शकतात.

अ) भावनिक कारणे          ब) मानसिक कारणे

क) सामाजिक कारणे          ड) कौटुंबिक कारणे

**अ) भावनिक कारणे :** या वयात मुलांमध्ये भावनांचे व्यवस्थापन करण्याची क्षमता विकसित होत असते. यामुळे त्यांना राग, दुःख, भीती इत्यादी. भावनांचा योग्य प्रकारे सामना करण्यास कठीण जाऊ शकते. यामुळे ते चिडचिडे, रागावणारे, किंवा लहान मुल हिंसक होऊ शकतात.




**ब) मानसिक कारणे :** या वयात मुलांमध्ये कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलता वाढते. यामुळे ते काहीवेळा वास्तव आणि कल्पना यांतील फरक समजून घेण्यास अक्षम होऊ शकतात. यामुळे ते खोटे बोलू शकतात किंवा स्वतःला इतरांपेक्षा श्रेष्ठ समजू शकतात.

**क) सामाजिक कारणे :** या वयात मुले त्यांच्या सभोवतालच्या जगाबद्दल आणि समाजातील नियमांबद्दल जाणून घेण्यास सुरुवात करतात. यामुळे त्यांना समाजातील अपेक्षा आणि नियम समजून घेण्यास कठीण जाऊ शकते. यामुळे ते नियमांचे उल्लंघन करू शकतात, किंवा इतरांशी संघर्ष करू शकतात.

**ड) कौटुंबिक कारणे :** मुलांना आपले पालक पूर्ण वेळ बरोबर हवे असतात. अनेकवेळा इच्छा असूनही काही कारणांनी अनेक पालक तेवढा वेळ मुलांना देऊ शकत नाहीत. अशावेळी मुले स्वतःला असुरक्षित समजू लागतात. अनेकवेळा पालकांनी आवश्यक वेळ न देणे, सुसंवाद न साधणे, शारीरिक, मानसिक व भावनिक, तसेच दैनंदिन गरजा पूर्ण न करणे किंवा अवास्तव लाड करणे, हवा तो हट्ट पुरवला जाणे किंवा या उलट सातत्याने प्रत्येक गोष्टीला पालकांचेकडून नकार मिळणे आदी गोष्टी समाजमान्य नसलेल्या वर्तनाला खतपाणी घालतात. असंयमी, शिस्त नसलेली मुले कौटुंबिक कारणांनी घरात, बाहेर, शाळेत समाजमान्य नसलेले वर्तन करताना आढळतात.

### ११.३.३ समाजमान्य नसलेल्या वर्तनाची उदाहरणे

मुलांकडून सामन्यात: होणारी, सामजिकदृष्ट्या समाजमान्य नसलेल्या वर्तनाची उदाहरणे आपण थोडक्यात बघूया. इतरांना मारणे, बोचकारणे, चावणे, ढकलणे, दुसऱ्याचे केस ओढणे, जीभ दाखवणे, दुसऱ्यावर थुंकणे, इतरांच्या हातातील वस्तू मागणे, इतरांच्या वस्तू हिसकावणे, हातातली वस्तू फेकणे, वस्तू तोडणे, एखादी गोष्ट मिळवायला रडणे, मनासारखे न झाल्यास आरडाओरडा करणे, एखाद्या गोष्टीसाठी सतत हट्ट करणे, जमिनीवर लोळणे, मारामारी करणे, जेवण न करणे, जेवणात भाज्या न खाणे, जेवण्यासाठी बाजारातील वेगवेगळ्या पदार्थांची मागणी करणे, हॉटेलचे पदार्थ खायला रडारड हट्ट करणे, प्यायचे पाणी फेकणे, औषधे न घेणे, चॉकलेट व तत्सम बाहेरचे

खाण्यासाठी पदार्थांसाठी हट्ट करणे, फिरायला बाहेर जाण्यास रडारड, हट्ट करणे, सांगितलेली छोटी छोटी कामे न ऐकणे, मोबाइलची मागणी करणे किंवा टीव्हीवर कार्टून पाहण्यासाठी हट्ट करणे, सकाळी झोपेतून उठायला नकार देणे, शाळेत जायला नकार देणे, बाजारात, दुकानात दिसलेली वस्तू घेण्यासाठी हट्ट करणे, रस्त्यावर पायी चालायला नकार देणे, कडेवर घेण्यासाठी रडणे, माती खाणे, नाकात बोटं घालणे अशी वेगवेगळी उदाहरणे सांगता येतील.

यापेक्षाही समाजमान्य नसलेल्या वर्तनाची कितीतरी मोठी यादी करता येईल.

अंगणवाडीत येणाऱ्या मुलांमध्ये सुद्धा अशा समाजमान्य नसलेल्या वर्तनाची सवय असलेली मुलं असतात. कधी कधी इतरांचे पाहून एखादे मूल असे समाजमान्य नसलेले वर्तन करायला लागते. त्यामुळे अंगणवाडी सेविकांना अशा वर्तनाला सामोरे जाऊन, ते वर्तन सुधारण्यासाठी प्रयत्न करावे लागतात.

### ११.३.४ मुलांचे समाजमान्य नसलेले वर्तन रोखण्यासाठी करायच्या उपाययोजना

या वयोगटातील बालकांचे समाजमान्य नसलेले वर्तन रोखण्यासाठी व सुधारण्यासाठी अंगणवाडी ताईंच्याकडून खालील उपाययोजना केल्या जाऊ शकतात.

१) **शांतता राखा आणि संयम बाळगा :** हट्ट करणारी मुले आपल्याला त्रास देण्यासाठी हे वर्तन करत नाहीत, उलट ते त्यांच्या भावना व्यक्त करण्याचा एक मार्ग शोधत आहेत, हे समजून घ्यायला हवे. आपण रागावलो किंवा चिडचिडे झालो तर परिस्थिती आणखी वाईट ठरू शकते. तुम्ही शांत राहण्याचा आणि मुलाशी शांतपणे बोलण्याचा प्रयत्न करा. बालकांशी नियमितपणे संवाद साधा. त्यांना त्या वर्तनातून नक्की काय म्हणायचे आहे, ते तुम्ही समजून घेऊ शकाल.

२) **मुलांच्या भावना समजून घ्या :** मुलांचा हट्ट काय आहे हे समजून घेण्याचा प्रयत्न करा. त्यांना काय त्रास होत आहे? त्यांना काय हवे आहे? मुलांशी शांतपणे बोलून त्यांच्या भावना समजून घेण्याचा प्रयत्न करा. कधी कधी त्यांच्या भावना वेगळ्याच असतात, मात्र गोंधळात ते वेगळ्या पद्धतीने त्या व्यक्त करत असतात. असे होते आहे काय, ते तपासून घ्यायला हवे.

३) **मुलाला निवड करण्याची मोकळीक देऊन त्याला सक्षम बनवा :** हट्टी मुलांना अनेकदा त्यांच्यावर नियंत्रण नको असते. अशावेळी त्यांना निवडीची संधी देऊन त्यांना सक्षम बनवण्याचा प्रयत्न करा. हट्ट करणारी मुले, एकांगी विचार करणारी असतात. त्यांना पर्यायी मार्गाचा विचार करायला शिकवा. मुलांच्यात त्यांच्या भावना व्यक्त करण्याचे आणि समस्या सोडवण्याचे वेगवेगळे मार्गही असतात, ही जाणीव निर्माण करा. त्यांना त्यावेळी योग्य मार्ग कसा निवडावा हे शिकवा. उदाहरणार्थ, आपण त्यांना दोन कपड्यांपैकी एक निवडण्याची किंवा दुपारच्या जेवणासाठी दोन पर्यायांपैकी एक निवडण्याची अनुमती देऊ शकता. मुक्त खेळताना खेळणे

निवडण्याची संधी त्यांना द्या. कोणासोबत खेळायचे व काय खेळायचे याचाही निर्णय त्यांना स्वतःला घेऊ द्या.

४) **वर्तनाचे नियम स्पष्ट व सकारात्मक शब्दात सांगा :** मुलांसाठी वर्तनाचे स्पष्ट व साधे नियम तयार करा. हे नियम सकारात्मक शब्दात त्यांना सांगणे महत्त्वाचे आहे. त्यांच्याकडून कोणत्या वर्तनाची अपेक्षा आहे हे त्यांना समजायला हवे.

त्यांना समजेपर्यंत नियम समजावून सांगा. त्यांना योग्य काय आणि चुकीचे काय आहे, हे शिकवा. कोणत्या ठिकाणी कोणती गोष्ट योग्य असेल व तीच बाब इतर ठिकाणी चालत नाही याचेही उदाहरण द्या. मुलांना समाजातील नियम आणि समाजाच्या अपेक्षा समजावून दिल्या, की अशोभनीय व समाजमान्य नसलेले  वर्तन नक्कीच बंद होते.

नियमांच्या बाबतीत सुसंगत आणि सर्वांना समानतेने वागवा. एकदा बालकाला अयोग्य वर्तन केल्याने काहीही मिळवता येते हे लक्षात आले, तर ते पुन्हा पुन्हा तेच करण्याचा प्रयत्न करते हे लक्षात घ्या.

५) **सकारात्मक व प्रोत्साहन देणारे शब्द वापरा :** जेव्हा मुले चांगले वर्तन करतात, तेव्हा त्यांचे कौतुक करा. त्यांना सकारात्मकतेने मानसिक व भावनिक मजबूत करा. यामुळे ते चांगले वर्तन करण्यास प्रोत्साहित होतील. मुलांना त्यांच्या चांगल्या वर्तनासाठी सकारात्मक प्रोत्साहन द्या. यामुळे त्यांना नेहमीच चांगल्या वर्तनाकडे प्रवृत्त होण्यास मदत होईल. समाजमान्य नसलेले वर्तन स्वीकारले जात नाही, हा संदेश त्यांच्यासाठी वर्तन दुरुस्तीसाठी खूप महत्त्वाचा ठरत असतो.

६) **व्यावसायिक मदत घेण्याचा पालकांना सल्ला द्या :** जर मुलांचे वर्तन सातत्याने गंभीर होत असेल, तर वैद्यकीय किंवा मानसिक आरोग्य व्यावसायिकाचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

जर तुम्हाला मुलाचा हट्ट, अस्वीकार्य वर्तन हाताळणे कठीण जात असेल, तर व्यावसायिक मदत घेण्यास पालकांना सुचवा. या कामी अजिबात संकोच करू नका. बाल मानसोपचारतज्ज्ञ किंवा बाल मानसशास्त्रज्ञ तुम्हाला याकामी चांगली मदत करू शकतात. लक्षात ठेवा – मानसोपचार तज्ज्ञाचा सल्ला घेण्याने किंवा समुपदेशकाचा सल्ला घेण्यामुळे तुमच्या मुलाला त्याच्या चांगल्या भविष्यासाठी, त्याच्या विकासासाठी तुम्ही त्याला मदतच करत आहात.

### ११.३.५ मुलांचे समाजमान्य नसलेल्या वर्तन प्रसंगी अंगणवाडीताईंनी वागायची पद्धती :

जेव्हा मूल असे समाजमान्य नसलेले वर्तन करत असतात, तेव्हा त्याचवेळी त्या मुलाशी त्याच्या भावनांबद्दल बोला. मुलांना भावना व्यक्त करू द्या. भावना योग्य पद्धतीने व्यक्त करण्याचे निकोप मार्ग सांगून, तशा रूपात भावनाचे प्रकटीकरण करायला सुचवा.

हट्ट करत असताना किंवा चुकीचे वर्तन करत असताना, त्याच वेळी मुलाला त्याच्या हट्टाच्या ऐवजी स्वीकार्य वर्तन कोणते ते समजवून द्या. अशावेळी मुलाला शांत राहण्यास आणि त्याच्या भावनांवर नियंत्रण ठेवण्यास सांगा. यामुळे त्याला कमी त्रास होईल हे सांगा, तसेच त्याच्या वर्तनाचा ताईंना व पालकांचा सुद्धा कमी त्रास होईल याबद्दल आश्वस्त करा.

अस्वीकार्य वर्तनाचेबाबत सकारात्मक दुरुस्ती दर्शविणाऱ्या मुलांची प्रशंसा करा. त्यांना शाबासकी द्या. चांगले, इतरांना त्रास न होणारे स्वीकार्य वर्तन करण्यास, तसे वागण्यास प्रोत्साहन द्या.

नेहमीच जेव्हा वर्तनाच्या समस्या होत असतात, तेव्हा सुद्धा लहान मुलाला तुमच्या प्रेमाची आणि पाठिंब्याची खात्री द्या. त्याला विश्वास वाटायला हवा, की अंगणवाडीच्या ताई माझ्या मदतीला आहेत.

अंगणवाडीताई म्हणून नेहमी लक्षात ठेवा, की प्रत्येक मूल वेगळे आहे. एका मुलावर जो उपाय काम करतो, तो दुसऱ्याला लागू होईलच हे निश्चित सांगता येत नाही. मात्र हे आणि असे सर्वच उपाय करून बघणे गरजचे ठरते.

लक्षात ठेवूया, हट्टी मुलांशी वागणे कठीण असू शकते, परंतु धीर सोडू नका. योग्य पद्धतींचा व उपायांचा वापर करून, तुम्ही त्यांना त्यांच्या हट्टावर, तसेच त्यांच्या अयोग्य व अस्वीकार्य वर्तनावर मात करण्यास त्यांना मदत करा. सोबतच चांगल्या वर्तनाची सवय लावण्याचाही प्रयत्न करा.

चला तर मग, आपण मुलांमधील समाजमान्य नसलेल्या वर्तनाची मानसिकता संपवूया. शिस्त असलेला, चांगले वर्तन करणारा, पालक व शिक्षकांचे ऐकणारा; देशाचा भविष्यातील सुजाण नागरिक घडवायला हातभार लावूया.

## घटक क्र. ११.४ : अंगणवाडीतील स्वयंशिस्त

**या घटकात आपण काय शिकणार?**

११.४.१ स्वयंशिस्त या संज्ञेचा अर्थ

११.४.२ अंगणवाडीत स्वयंशिस्तीची गरज व महत्त्व

११.४.३ स्वयंशिस्त लावण्यात अंगणवाडीताईची भूमिका

११.४.४ स्वयंशिस्त लावताना टाळावयाच्या गोष्टी

११.४.५ अंगणवाडीतील मुलांशी बोलतानाची अंगणवाडीताईंची भाषा

सुरुवातीला अंगणवाडी आणि शिस्त या घटकात आपण बघूया, शाळा आणि मुलांची शिस्त या विषयी.

### ११.४.१ स्वयंशिस्त या संज्ञेचा अर्थ :

स्वयंशिस्त म्हणजे काय तर साध्या सोप्या शब्दात सांगायचे तर वागण्याचे सर्वांसाठी ठरवलेले सर्वमान्य नियम. हे नियम सर्वांना पाळायचे असतात. स्वयंशिस्त ही एक प्रकारची मर्यादा असून ती आपण आपलीच घालून घ्यायची असते. स्वयंशिस्त म्हणजे, स्वत:च्या वर्तनावर आणि विचारांवर नियंत्रण ठेवणे. कोणीही न सांगता स्वत:हूनच आपला इतरांना त्रास होणार नाही, अशी नियमानुसार वागणूक ठेवणे म्हणजे स्वयंशिस्त.

स्वयंशिस्त म्हटले की नियम, कायदे, सूचना पालन, नियमावली, दंड व शिक्षा या अनेक बाबी या शब्दाच्या सोबतच आपल्या मनात येतात, पण या सर्व नकारात्मक बाबी सोडून आपण स्वयंशिस्तीविषयी सकारात्मक विचार समजून घेऊ या.

### ११.४.२ अंगणवाडीत स्वयंशिस्तीची गरज व महत्त्व :

अंगणवाडीत स्वयंशिस्त गरजेची आहे, कारण ती मुलांना शिकण्यास सुरक्षित आणि अनुकूल वातावरणाची निर्मिती करून देते. मुलांना जबाबदार आणि नैतिक आचरणाने परिपूर्ण असणारा चांगला नागरिक बनवते. स्वयंशिस्तीमुळे मुलांचा मानसिक, भावनिक, तसेच सामजिक विकास घडून येत असतो. पुढे हीच स्वयंशिस्त मुलांना आपल्या जीवनात यशस्वी होण्यास मोलाची मदत करते.

या सोबतच अंगणवाडीत स्वयंशिस्त गरजेची असण्याची इतरही अनेक कारणे आहेत. ती सुद्धा आपण समजून घेऊया.

**अंगणवाडीत स्वयंशिस्त गरजेची असण्याची कारणे :**

१) **सुरक्षित आणि अनुकूल वातावरण निर्मिती :** स्वयंशिस्तीमुळे अंगणवाडीत मुलांसाठी सुरक्षित आणि अनुकूल वातावरण तयार होते. त्यांच्या शिकण्यात इतरांच्या कडून कोणताही व्यत्यय किंवा बाधा उत्पन्न होत नाही.

२) **एकाग्रता वाढायला आणि शिकायला मदत :** स्वयंशिस्त असल्यामुळे वर्गात शांतता आणि सुव्यवस्था राखली जाते. यामुळे मुलांना एकाग्रता वाढवण्यास आणि चांगल्या प्रकारे शिकण्यास मदतच होते.

३) **जबाबदारी आणि आत्म-नियंत्रण :** स्वयंशिस्त मुलांना स्वतःच्या जबाबदारीची जाणीव करून देते. यामुळे मुलांना स्वतःवर नियंत्रण कसे ठेवायचे हे शिकण्यास मदत होते. सोबतच्या मुलांना आपल्यामुळे कोणताही त्रास होईल, असे काहीही वागण्यावर आपोआपच बंधन येते.

४) **सामाजिक कौशल्यांची संपादणूक :** स्वयंशिस्त ही मुलांना एकमेकांशी आदराने आणि सहकार्याने वागण्यास शिकवते. यामुळे त्यांच्यात सहयोग व समन्वय विकसित होऊन, मैत्री आणि विविध सामजिक कौशल्ये त्यांना शिकता येतात, तसेच वेगवेगळे चांगले गुण आपोआपच मुलांमध्ये रुजतात.

५) **नैतिक मूल्यांचा अंतर्भाव :** स्वयंशिस्त विद्यार्थ्यांना चांगले आणि वाईट काय आहे, योग्य आणि अयोग्य काय, हे शिकण्यास मदत करते. शिस्तीमुळे मुलांमधील नैतिक मूल्ये विकसित होण्यासही प्रोत्साहन मिळते.

६) **यशस्वी जीवनाचा पाया :** स्वयंशिस्त मुलांना जीवनात यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेली कौशल्ये विकसित करण्यास मदत करते. शिस्त अंगी आल्याने त्या सोबतच वेळेचे व्यवस्थापन, जवाबदारी, प्रत्येक गोष्ट वेळेवर पूर्ण करायची सवय, योग्य विचार करायची सवय आदी गोष्टी सहजच प्राप्त होतात.

७) **सकारात्मक वर्तनाचे विकसन :** शिस्त मुलांमध्ये सकारात्मक वर्तन विकसित करण्यास मदत करते. यामुळे व्यक्ती सगळीकडे नियमपालनाची सवय ठेवते. त्यामुळे सहजच सर्व ठिकाणी नियम पालन घडते. कधीही आपण चुकीचे वागलो का याचा विचार करावा लागत नाही, तसेच शिस्त असलेल्या व्यक्तीचा सर्वच लोक सन्मान करतात. शिस्तीत असलेल्यांना नेहमीच चांगले म्हटले जाते, हे तर तुम्ही जाणताच.

### ११.४.३ स्वयंशिस्त लावण्यात अंगणवाडीताईंची भूमिका :

वयोगट ३ ते ६ या वर्षात अंगणवाडीतील मुलांना स्वयंशिस्त लावण्यात अंगणवाडी ताईची भूमिका अतिशय महत्त्वाची असते. पालकांच्या नंतर ही मुले दिवसांतील बराचसा वेळ त्यांच्या जवळ असतात. अंगणवाडी मधील विविध कृती, उपक्रम, खेळ करताना योग्य रीतीने वागणे, नियम पालन करणे, इतरांना त्रास होणार नाही असे वर्तन ठेवणे आदी गोष्टी सहजपणे त्यांच्या बाल मनावर बिंबवण्यात अंगणवाडी ताईची प्रमुख भूमिका असते.

आता आपण अंगणवाडीत येणाऱ्या लहान मुलांना शाळेत स्वयंशिस्त लावण्यासाठी, अंगणवाडी ताई काय काय करू शकतात हे बघूया.

१) **प्रेम आणि आदरावर आधारित वातावरण निर्माण करा :** मुलांना स्वयंशिस्त लावण्यासाठी प्रेम आणि आदरावर आधारित वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. मुलांशी सकारात्मकपणे बोला आणि त्यांच्या भावनांना समजून घ्या.

२) **स्पष्ट आणि सुसंगत नियम ठेवा :** शाळेतील आणि वर्गातील नियमांबद्दल मुलांना स्पष्ट आणि सुसंगत माहिती द्या. नियमांचे उल्लंघन झाल्यास काय परिणाम होतील हे मुलांना समजावून सांगा.

३) **सकारात्मक दृढीकरणाचा वापर करा :** चांगल्या वर्तणुकीसाठी मुलांचे कौतुक करा आणि त्यांना बक्षिसे द्या. यामुळे मुलांना चांगल्या सवयी शिकण्यास आणि शिस्तीने वागण्यास

प्रोत्साहन मिळेल. मुलांच्या चांगल्या वर्तणुकीची दखल घ्या. 'तुझे हे वर्तन मला आवडले' असे आवर्जून सांगा. त्यांच्या चांगल्या वागण्याला मान्यता मिळते हे तुमच्या कृतीतून स्पष्ट होऊ द्या.

मात्र अशी प्रशंसा करताना, जरा काळजी घ्यायला हवी. बक्षीसाच्या लालचेने नव्हे, तर स्वतःहून शिस्तपालन होईल हे बघायला हवे. प्रशंसा सर्वांसमोर करणे सुद्धा एक प्रकारचे बक्षीसच समजले जाते, हे सुद्धा लक्षात असू द्या.

४) **योग्य शिस्तीच्या बाबत मुलांना समजावून सांगा :** मुलांना त्यांची कृती व शिस्त यांचे बाबतीत समजावून सांगा. चांगल्या वर्तणुकीमुळे येणाऱ्या सकारात्मकतेची माहिती द्या. वाईट वर्तणुकीमुळे येणारी नकारात्मकता समजवून सांगा. मुलांच्या वयाचा आणि क्षमतांचा विचार करून, त्यांना नियम पालन, शिस्त यांचे सकारात्मक परिणाम सांगायला हवेत.

५) **मुलांना निवडीचे स्वातंत्र्य देऊन त्यांना जबाबदार बनवा :** मुलांना निवडीचे स्वातंत्र्य देऊन त्यांना जबाबदार बनवा. यामुळे त्यांना आपरहून स्वतःला शिस्त लावण्यास मदत होईल. खेळताना खेळणी निवडायचे स्वातंत्र्य दिल्यावर, ती खेळणी जागेवर ठेवायचे महत्त्व सुद्धा समजावून द्या. डबा खायला रांगेत बसल्याने, आपल्याला इतरांचा धक्का लागत नाही हे समजावून दिल्याने, रांगेचे नियम पालन सहज होते, तसेच खाणे झाल्यावर सांडलेले अन्नपदार्थ उचलून घेणे सुद्धा शिस्त आणि चांगल्या गुणांमध्ये मोडते हे समजवायची संधी घ्यायला हवी.

६) **शांतपणा आणि संयम राखा :** मुले नियमबाह्य वर्तन करत असताना शांत राहणे आणि संयम राखणे आवश्यक आहे. रागाने किंवा त्रासाने प्रतिक्रिया देऊ नका. रागवणे, मारणे, ओरडणे टाळायला हवे. अशा वेळी आपण ठरवलेला नियम काय आणि त्यांनी नक्की काय करायला हवे, याबाबत तिथल्या तिथे सकारात्मक आणि स्पष्ट शब्दात शांतपणे सूचना द्या.

७) **पालकांशी संवाद साधा :** मुलांच्या वर्तणुकीबद्दल पालकांशी नियमितपणे संवाद साधा. मुलांना शिस्त लावण्यास पालकांना मदत करा. मुलं अंगणवाडीत जर शिस्तीत वर्तन करीत नसतील, तर त्याचे कारण पालकांशी बोलून समजून घेता येईल. घरातही शिस्त पालन होईल, यासाठी पालकांना मार्गदर्शन करा.

८) **शिस्तीबाबत सातत्य राखा :** शिस्तीच्या बाबतीत व नियमांमध्ये सातत्य असावे. वेळोवेळी नियम बदलायला नको. एकदा एक व एकदा वेगळा नियम ऐकला, तर मुलांचा गोंधळ उडतो. नक्की काय करायचे, हे समजायला कठीण जाते, त्यामुळे आपण तयार केलेल्या नियमांमध्ये सातत्य असणे आवश्यक आहे.

लक्षात ठेवा, मुलांना शिस्त लावण्यासाठी वेळ आणि धैर्य लागते. लवकर निराश होऊ नका आणि सतत प्रयत्न करत रहा. या वरील सामान्य पद्धतींचा वापर करून, अंगणवाडीताई लहान मुलांना स्वयंशिस्त लावण्यास आणि त्यांना पुढे चांगले नागरिक बनण्यास मदत करू शकतात.

**चला करून पाहू**

- तुम्ही मुलांना शिस्त लागावी यासाठी काय काय प्रयत्न करता? जरा आठवा बरं! तुमची शिस्त लावायची पद्धती कशी आहे व यासाठी तुम्ही काय प्रयत्न करता त्याची यादी तयार करा.

या सोबतच ताईंनी सुद्धा नियम पालन करणे अपेक्षितच आहे की नाही? मुलांना शिस्त तर मग अंगणवाडीताईला का नाही? ही लहान लहान मुले सुद्धा असा विचार करतात बरं का. तेव्हा अंगणवाडीताईंचे शिस्तपालन सुद्धा नियमात असायला हवे. वेळेचे पालन व इतर वेगवेगळ्या छोट्या छोट्या गोष्टींमधे आपण शिस्त भंग करत नाही ना; हे सुद्धा आपल्याला स्वतःला जाणीवपूर्वक तपासायचे असते, कारण लहान मुले आपलेच अनुकरण करत असतात. ती अनुकरण प्रिय असतात. अंगणवाडीताईंनी शिस्त पालन केले, तर अंगणवाडीमधील मुले सुद्धा नक्कीच शिस्तप्रिय आणि नियमपालन करणारी होतील, यात शंका नाही. अंगणवाडीताई म्हणून आपले वागणे शिस्तीत आहे का, आपण कुठे कुठे शिस्तपालन करतो आणि कुठे कुठे शिस्तभंग करतो, यावर विचार करा. हा स्वतःबद्दलचा विचार करून, तुम्ही तुमचे स्वतःचे आचरण सुधारणार आहात. गरज असेल, तर सुधारणा कशी व काय काय करायची ते सुद्धा ठरवा. मुलांसमोर आदर्श द्यायला यापुढे स्वतः नियम पालन करून, शिस्तीत राहण्याची खूणगाठ मनाशी बांधूया.

## ११.४.४ स्वयंशिस्त लावताना टाळण्याच्या गोष्टी

अंगणवाडीताईंनी मुलांना शिस्त लावण्यासाठी अंगणवाडीमध्ये कोणकोणत्या गोष्टी टाळायला हव्यात ते आता समजून घेऊ या.

१) चूक केल्यावर मुलांना शारीरिक शिक्षा देणे.

२) नियमभंग केल्यावर मुलांचा अपमान करणे.

३) एखादी गोष्ट करून घेण्यासाठी मुलांवर जोरजबरदस्ती करणे.

४) काम केले नाही, तर मुलांना वेगवेगळ्या शिक्षेच्या धमक्या देणे.

५) इतर सहकारी मुलांसोबत त्यांची तुलना करणे.

६) मुलांना नावे ठेवणे.

७) मुलांच्या शारीरिक व्यंग वा अक्षमतेचा उल्लेख करणे.

वरवर या सर्व गोष्टी अगदी सामान्य वाटतात, मात्र लहान मुलांसाठी या गोष्टी त्यांच्या मनात जन्मभराची जखम सुद्धा बनून राहतात, त्यामुळे अंगणवाडीताईंनी या टाळायला हव्या. मुलांवर या

गोष्टींचा खूप मोठा नकारात्मक प्रभाव पडतो. मुले अनेकवेळा या बाबींमुळे ताईंबद्दल नकारात्मक विचार करायला लागतात, यामुळे ताईंनी शिकवलेल्या भागाकडे त्यांचे लक्ष जात नाही. कधी कधी ते मुद्दामहून लक्ष देत नाहीत. यामुळे त्यांच्या अध्ययन क्षमतेवर परिणाम होऊ शकतो. यातूनच त्यांचे शिस्तीत असलेले वर्तन बेशिस्तपणामध्ये परावर्तित होतानाही अनेकवेळा दिसते.

आपल्या अंगणवाडीतील कोणत्या मुलांना तुम्ही किंवा तुमच्या अंगणवाडीतील संबंधित कोणत्याही व्यक्ती शारीरिक व्यंग, रंग, उंची, लठ्ठपणा किंवा लुकडे असल्यावरून किंवा त्यांच्या अक्षमतेवरून बोलतात काय? या अतिशय महत्त्वाच्या बाबीकडे गंभीरपणे लक्ष द्या.

## ११.४.५ अंगणवाडीतील मुलांशी बोलतानाची अंगणवाडीताईंची भाषा

अंगणवाडी मधील मुलांशी बोलतांना किंवा त्यांच्याशी संवाद करताना, अंगणवाडीताईंना खूप जपून भाषा वापरावी लागते. चला आता आपण या लहान मुलांशी बोलतांना कशी भाषा वापरावी हे बघूया.

दिलेल्या संकल्पना चित्रातून तुम्हाला मुलांशी बोलतांना कोणते मुद्दे महत्त्वाचे आहेत, हे अभ्यासता येईल.

**अंगणवाडीताईंनी मुलांशी बोलताना वापरायची भाषा**

- सोपी आणि सुस्पष्ट असावी.
- आवाज पुरेसा स्पष्ट असावा.
- सूचनांची वारंवार पुनरावृत्ती करावी.
- प्रश्न विचारावे.
- मुलाला नावानेच हाक मारावे.
- सकारात्मक संभाषण करावे.
- मुलाला जाणवणाऱ्या समस्येंबाबत संवाद साधावा.

१) **सोपी आणि स्पष्ट भाषा वापरावी :** अंगणवाडीताईंनी मुलांना समजेल अशा सोप्या शब्दांचा वापर करावा. लांब आणि क्लिष्ट वाक्ये टाळावी. ताईंची भाषा साधी सोपी असायला हवी.

२) **पुरेशा मोठ्या आणि सर्वांना ऐकू येईल अशा आवाजातच बोलावे :** मुलांचे लक्ष वेधून घेण्यासाठी ताईंचा आवाज मोठा हवा, मात्र यामधे कर्कशता येणार नाही याची काळजी घ्यावी. ताईंनी प्रसंगानुरूप आवाजात चढउतार ठेवायला हवा. संपूर्ण वर्गातील मुलांना स्पष्टपणे ऐकू येईल व त्यांचे लक्ष आवाजामुळे ताईंकडेच असेल, असा खणखणीत आवाज असावा.

३) **शिकवताना वारंवार पुनरावृत्ती करावी :** नवीन सूचना, नवीन शब्द, नव्या संकल्पना मुलांना शिकवण्यासाठी वारंवार पुनरावृत्ती करणे आवश्यक असते. शिकवलेली माहिती वेगवेगळ्या

प्रकारे पुन्हा पुन्हा सांगा. त्यांना ती समजली आहे, तसेच त्यांनी ती ग्रहण केलेली आहे, याची खात्री होईपर्यंत ठरावीक वेळेच्या अंतराने त्याची पुनरावृत्ती करत रहा.

४) **प्रश्नोत्तरांचा वापर करावा :** मुलांना प्रश्न विचारून त्यांची विचार करण्याची क्षमता वाढवा. त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी वेळ द्या आणि त्यांच्याशी संवाद साधा. प्रश्न कठीण वाटला, तर तो सोडवायला मदत करा. मुलांच्या प्रश्नांनासुद्धा सुयोग्य शब्दात वेळीच उत्तरे देऊन, त्यांची जिज्ञासा शमवा.

५) **मुलांच्या नावाचा वापर करावा :** मुलांशी बोलताना त्यांच्या पहिल्या नावाचा वापर करा,त्यामुळे तुमच्यात व त्यांच्यात एक नैसर्गिक आपलेपणा निर्माण होतो. यामुळे ताई व विद्यार्थी हे नाते घट्ट होत जाते आणि यामुळे त्यांना तुमच्याकडे अधिक लक्ष देण्यास प्रेरणा मिळते. यातूनच त्यांचा शिकण्याचा कल वाढत जातो. त्यांचे सर्वांगीण विकसन होणे शक्य होते.

६) **सकारात्मक भाषेचा वापर करावा :** मुलांशी बोलताना नेहमी सकारात्मक भाषेचा वापर करा. मुलांचे कौतुक करा. त्यांना प्रोत्साहन द्या. त्यांच्या चुका सकारात्मक भाषेत जाणवून द्या. या चुकांकडे शिकण्याची संधी म्हणून तुम्ही बघा आणि तसेच त्यांना सुद्धा बघायला शिकवा. नकारात्मक भाषेचा वापर टाळल्याने अंगणवाडीतील शिक्षणात सकारात्मकता येते, हा अनुभव घ्या.

७) **बोलताना संयम ठेवावा :** या वयोगटातील एका गोष्टीवर फार कमी काळ टिकते. त्यामुळे त्यांना संयमाने शिकवा. त्यांचे लक्ष नसेल, त्यांना समजत नसेल, अशा वेळी रागवू नका. संयम बाळगा. धीर ठेवा. तुम्ही शिकण्याचा चांगला अनुभव दिला, की ती चांगली शिकणार आहेतच. त्यांना समजेल तो पर्यंत त्यांना पुन्हा पुन्हा शिकण्याची संधी द्या.

८) **वैयक्तिक समस्येवर बोलावे :** प्रत्येक मुलाची शिकण्याची गती वेगळी असते. प्रत्येक मुलाकडे त्याच्या गरजेनुसार लक्ष द्या. प्रत्येकाची समस्या वेगळी असू शकते. तुम्ही त्याच्या समस्यांबद्दल मुलांशी बोला. तुमचे आश्वासक बोलणे त्यांची अर्धी अडचण व आलेली समस्या तात्काळ दूर करत असते, हे लक्षात घ्या. कोणाला कोणती गोष्ट कशी समजेल, ते तुम्हांला अनुभवाने कळू शकते. त्या अनुभवाचा वापर करा. त्यांना समजेल अशा प्रेमळ आणि आधार देणाऱ्या भाषेत त्यांच्या समस्या सोडवा. शिकण्याबरोबरच त्यांच्या भावनिक, मानसिक, तसेच इतरही अडचणी तुम्ही त्यांच्याशी मोकळेपणाने बोलून सोडवू शकता.

**प्रात्यक्षिक :**

१) तुम्ही अंगणवाडीमधील मुलांना स्वयंशिस्त लावण्यासाठी काही नियम ठरवा, वातावरण तयार करा, तुम्ही काय काय केले ते लिहा.

२) तुम्हांला आपल्या अंगणवाडीतील मुलांमध्ये समाजमान्य नसलेल्या वर्तनाची काही उदाहरणे दिसली असतील, तर त्या समाजमान्य नसलेल्या वर्तनांची यादी तयार करा. मुलांचे अस्वीकार्य वर्तन रोखण्यासाठी तुम्ही कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत, त्या लिहा.

३) महिन्यातील एखाद्या विशिष्ट दिवशी तुम्ही मुलांची आरोग्य तपासणी कशी करता ते लिहा.

## स्वाध्याय

१) आपल्या अंगणवाडी परिसरात मुलांच्या शारीरिक सुरक्षिततेच्या दृष्टीने धोकादायक अशा गोष्टींची यादी करा. अंगणवाडी परिसर सुरक्षित होण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराल?

२) कोणत्याही गोष्टीला सतत घाबरणारे, सतत चिंतेत असणारे किंवा सतत स्वतःला असुरक्षित समजणारे मूल, आपल्या अंगणवाडीत आहे काय? मुलांना मानसिक सुरक्षितता देण्यासाठी तुम्ही काय काय उपाययोजना करू शकाल, ते लिहा.

३) आत्मविश्वास नसलेले, इतरांशी मैत्री न करणारे, सतत भांडणारे मूल, आपल्या अंगणवाडीत आहे का? मुलांच्या भावनिक सुरक्षिततेसाठी तुम्ही काय काय करू शकाल, ते लिहून काढा.

४) अंगणवाडीतील मुलांना होऊ शकणाऱ्या सामान्य इजांवर कोणते प्रथमोपचार करावे व काय साहित्य वापरावे याची यादी तयार करा.

५) अंगणवाडीच्या वातावरणातील सुरक्षिततेबाबत कोणत्या बाबींचे तुमच्याकडे पालन होते व कोणत्या बाबींचे होत नाही, याची यादी करा.

६) कौटुंबिक कारणांमुळेच सातत्याने मूल समाजमान्य नसलेले वर्तन करत आहे, असे तुमच्या लक्षात आले आहे. अशावेळी तुम्ही त्या पालकांशी काय बोलाल, लिहून काढा.

७) मुलांचे वेगवेगळे अस्वीकार्य वर्तन, थांबवायला व सुधारायला कोणत्या कोणत्या उपाय योजना आवश्यक आहेत, ते वर्तन समस्येनुसार सविस्तर लिहा.

८) तुमच्या अंगणवाडीतील तुमची आणि मुलांची मातृभाषा वेगळी असेल, तर अशा मुलांसोबत तुम्ही कोणत्या भाषेत बोलता? अशा वेगळी वेगळी मातृभाषा असलेल्या मुलांसोबत कोणत्या भाषेत बोलायला हवे व का, हे सविस्तर स्पष्ट करा.

९) वेगवेगळ्या मातृभाषा असलेल्या मुलांना एकाच वर्गात शिकवताना, ताईंनी कसे बोलावे याबद्दल आपले विचार सविस्तर मांडा.

१०) स्वयंशिस्त म्हणजे काय ते सांगून, स्वयंशिस्तीची गरज स्पष्ट करा. स्वयंशिस्त लावताना कोणत्या गोष्टी टाळणे आवश्यक आहे?

# घटकसंच १२ : अंगणवाडी सेविकांच्या क्षमता व कौशल्य विकसन




बालकांप्रति प्रामाणिक, संयमी, शांत, समजूतदार, संवेदनशील आणि सहानुभूतीशील असणे आवश्यक आहे. आपण आपल्या बालकांना शांतपणे वेळ देऊन त्यांच्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

बालकांमध्ये आपलेपणाची भावना निर्माण झाली, की ते विश्वास ठेवू शकतात. बालकांनी मोकळेपणाने प्रयत्न करून, शोध घेता येईल असे वातावरण निर्माण केल्यास, ते चांगल्या प्रकारे अध्ययन करू शकतात.

*(संदर्भ : राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर – २०२४ : पृष्ठ क्र. ८८–८९)*

**घटकसंचाविषयी थोडेसे....**

मनातील विचार, गरजा दुसऱ्यापर्यंत पोहोचवण्यासाठी संवाद हे प्रभावी माध्यम असते. समोरच्या व्यक्तीबरोबर सौदार्हपूर्ण संबंध प्रस्थापित करण्यासाठी, संवाद हे महत्त्वाचे माध्यम आहे. जर संवाद कौशल्य अंगी बाणले, तर समोरच्याला आपलेसे करणे अवघड नसते. हीच गोष्ट नजरेसमोर ठेवून, अंगणवाडी ताईने हे कौशल्य कसे खुबीने वापरावे, मुलांना कसे आपलेसे करावे, संवादाच्या माध्यमातून वर्गाचे व्यवस्थापन कसे करावे या गोष्टी आपण शिकणार आहोत. सदरच्या घटकात संवाद म्हणजे काय, संवाद कौशल्य, संवादक म्हणून इतर घटकांशी संवाद, व्यवस्थापन कौशल्य, व्यवस्थापनामध्ये आवश्यक गोष्टी, व्यवस्थापनाचे प्रकार, एकविसाव्या शतकातील कौशल्ये, तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर, अंगणवाडीताईंची भूमिका व जबाबदारी हे उपघटक अभ्यासणार आहोत.

## माझ्या नोंदी :

# घटकसंच १२ : अंगणवाडी सेविकांच्या क्षमता व कौशल्य विकसन

## घटक क्र. १२.१ : संवाद कौशल्य

संवाद म्हणजे सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास दोन किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींशी बोलणे. संवाद ही एक कला आहे. आपल्या रोजच्या आयुष्यातील महत्त्वपूर्ण बाब आहे. बऱ्याचदा तुम्हांला असा अनुभव आला असेल, की काही लोकांच्या बोलण्यात गोडवा असतो. त्यांचे बोलणे आपल्याला ऐकत राहावेसे वाटते.

आपल्याकडे एक म्हण आहे, 'बोलणाऱ्यांची माती विकली जाते, पण न बोलणाऱ्यांचे सोने पण विकले जात नाही.' जीवनात, व्यवसायात यशस्वी व्हायचे असेल, तर आपल्याकडे उत्तम संवाद कौशल्य असणे आवश्यक आहे. संवाद म्हणजे काय, कोणाशी किती आणि कसे बोलावे याचे तारतम्य कसे ठेवावे, संवादाचा वापर कोठे करावा, त्या सर्व मुद्द्यांची चर्चा आपण करणार आहोत/प्रश्नांच्या उत्तरांचा आपण एकत्रितपणे शोध घेणार आहोत.

**या घटकात आपण काय शिकणार?**

१२.१.१ संवाद : अर्थ व महत्त्व

१२.१.२ संवादक म्हणून वर्तन : मार्गदर्शक तत्त्वे

१२.१.३ विविध भागधारकांशी संवाद

### १२.१.१ संवाद : अर्थ व महत्त्व

संवाद हा शब्द ऐकल्यावर, आपल्या डोळ्यांसमोर दोन व्यक्ती एकमेकांशी बोलत आहेत, असे चित्र साहजिकपणे उभे राहते. साध्या भाषेत सांगायचे म्हणजे, संवादामध्ये एक व्यक्ती बोलणारी व दुसरी ऐकणारी अशा किमान दोघांची गरज असते. संवादामध्ये अर्थपूर्ण संदेशाचा वापर करून, दोन व्यक्ती आपले विचार, भावना, कल्पना, गरजा, इच्छा या एकमेकांसमोर मांडतात, त्या समजून घेतात आणि परस्परांमध्ये त्यांची देवाणघेवाणसुद्धा करतात. मानवी संवाद ही दोन किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींमध्ये घडून येणारी प्रक्रिया आहे. एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीकडे/अनेक व्यक्तींकडे विशिष्ट उद्दिष्टाने संदेश पोहोचविते, तेव्हा त्याचा हेतू हा समोरच्या व्यक्ती/व्यक्तींमध्ये अपेक्षित बदल होणे हा आहे. संवादामध्ये समोरच्या व्यक्तीचे म्हणणे लक्षपूर्वक ऐकले पाहिजे. असे केल्याने ती व्यक्ती व तिचे म्हणणे आपल्यासाठी महत्त्वाचे आहे, हे समोरच्या व्यक्तीला कळते. उदा. बालकांच्या घरातील वागण्याबाबत पालक तुम्हांला काही सांगत असतील, तर तुम्ही त्यावेळी मदतनिसांना सूचना देणे, ऑनलाइन रजिस्टर भरणे अशी कामे न करता, संपूर्ण लक्ष पालकांकडे देणे अपेक्षित आहे.

### संवाद कसा साधावा?

संवाद कसा साधावा? याबाबतीत एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवावी, ती म्हणजे 'डोक्यावर बर्फ आणि तोंडात साखर.' 'बोलताना डोके शांत असावे, मन स्थिर असावे आणि बोलताना जिभेवर गोडवा असावा' म्हणजे काय, तर बोलताना समोरच्या व्यक्तीचा मान आणि मन दोन्ही राखले जाईल असा संवाद असावा.

संवाद करताना आपण काय बोलत आहोत, यापेक्षा कसे बोलत आहोत याचा जास्त परिणाम होतो. आपली देहबोली, आवाजाची पट्टी, हावभाव या गोष्टी संवादामध्ये अधिक महत्त्वपूर्ण असतात. आपली नजर समोरच्या व्यक्तीला भिडावी, आपली देहबोली, आपण संवाद साधण्यासाठी उत्सुक आहोत हे दाखवणारी असावी, म्हणजे ज्याच्याशी बोलत आहोत, त्याच्याकडे आपले तोंड असावे. समोरची व्यक्ती उभी असेल, तर शक्यतोवर आपणही उभे राहून बोलावे.

अंगणवाडीच्या संदर्भात सांगायचे झाल्यास, मदतनिसाला एखादे काम सांगताना, 'ए या वस्तू तिकडे उचलून ठेव.' असे वरच्या आवाजाच्या पट्टीत बोलण्याऐवजी, 'या वस्तू जरा तिकडे उचलून ठेवा.' असे सांगावे, म्हणजे प्रत्येकाचा स्वाभिमान राखला जाईल असा संवाद असावा.

### संवादाचे महत्त्व

संवाद ही अत्यंत महत्त्वपूर्ण बाब आहे. जीवनात, व्यवसायात यशस्वी व्हायचे असेल, तर आपल्याकडे उत्तम संवाद कौशल्य असणे आवश्यक आहे. उत्तम संवाद कौशल्य असल्याने, समाजात, कामाच्या ठिकाणी आपली इतरांवर चांगली छाप पडते. एखाद्याला आपला मुद्दा चांगल्या पद्धतीने आपण पटवून देऊ शकतो, स्वत:ची वेगळी ओळख निर्माण होते. संवाद कौशल्य असेल, तर माणसे भावनिकरीत्या एकमेकांशी जोडली जातात.

मानवी वर्तन, कृती किंवा विचार यांच्यामध्ये बदल करण्यासाठी, संवादाचा वापर केला जातो. एखाद्या अंगणवाडीताईंच्या पालकसभेला पालकांची गर्दी होत असेल, त्यांच्या गृहभेटीमध्ये सातत्य असेल, मुलांना कृती करण्याचे साहित्य किंवा खेळणी ही लोकवर्गणीतून जमा झाली असतील, मुलांचा तिच्या अवतीभोवती सतत वावर असेल, मदतनीस व ताई एकत्रितपणे आनंदाने काम करत असतील, तर हे सर्व होण्यामागे त्यांच्यातील उत्तम संवाद कौशल्याचा खूप मोलाचा वाटा आहे, असे आपल्याला दिसून येईल.

खालील प्रश्नाचे उत्तर वहीमध्ये लिहूया.

संवाद कौशल्य आत्मसात केल्यावर, अंगणवाडी सेविका म्हणून काम करताना त्याचा कसा उपयोग करून घेता येतो ते लिहा.

### १२.१.२ संवादक म्हणून वर्तन : मार्गदर्शक तत्त्वे

वर्गामध्ये बालकांशी बोलताना, काही वाक्ये आपल्या ऐकण्यात येतात, ती खालीलप्रमाणे आहेत:

'ए आरडाओरडा करत इकडे तिकडे पळू नका रे', 'आता आपण एक गोल करून बसूया.', 'बघ ती तुझ्यापेक्षा किती छान काम करते', ' हे काम करताना तुला मजा आली का?', ' बघूया सर्वांत आधी कोणाचे काम पूर्ण होते, भरभर कर जरा', ' चला आता आपण सगळ्यांनी मन लावून हे काम पूर्ण करूया'.

वर्गात सकारात्मक वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने, वरीलपैकी कोणती संवाद पद्धती योग्य ठरेल? यामध्ये काही वाक्ये ही सकारात्मक आहेत, तर काही नकारात्मक आहेत. त्यातील कोणती वाक्ये सकारात्मक आहेत ते ओळखा पाहू!

आता आपण बालकांशी कसे बोलावे, हे जाणून घेणार आहोत.

नकारात्मक पद्धतीपेक्षा सकारात्मक पद्धतीने थेट आणि दिशादर्शक सूचना द्याव्यात.

**अ) सकारात्मक सूचना या साधारणपणे सहजपणे स्वीकारल्या जातात.**

बालकांनी काय करू नये, यापेक्षा काय करावे हे त्यांना सांगणे ही कल्पना चांगली आहे. 'करू नकोस' हे शब्द वापरण्यापेक्षा 'हे कर' असे सांगितले, तर ऐकले जाण्याची शक्यता अधिक असते.

उदाहरणार्थ : वर्गात फिरू नकोस, गोंधळ करू नकोस, असे सांगण्यापेक्षा खाऊ खाण्यासाठी गोल करून बसा, हे सांगणे जास्त योग्य आहे.

**ब) स्पर्धा व तुलना करून बालकांना प्रोत्साहन देणे टाळावे.**

उदाहरणार्थ : तुझ्यापेक्षा ती बघ किती सुंदर नाच करते किंवा चला बघूया कोण बरं सर्वांत आधी काम संपवणार अशी वाक्ये वापरू नयेत.

**क) बालकाला शक्य तेव्हा कृती निवडण्याचे स्वातंत्र्य द्यावे.**

उदाहरणार्थ :

ताई – आता तुम्हांला काय करायला आवडेल?

मुले – आम्हांला आता वर्गाबाहेर खेळायला आवडेल ताई, पण बाहेर तर आता खूप ऊन आहे!

अशावेळी ताई मुलांना वर्गामध्ये करण्याच्या कृतीबाबत पर्याय देऊ शकते.

उदाहरणार्थ : तुम्हांला गोष्ट ऐकायला आवडेल, की ठोकळ्यांशी खेळायला आवडेल?

**ड) आवाज या शैक्षणिक साधनाचा प्रभावी वापर करावा.**

तुम्ही इतर लोकांशी ज्याप्रकारे बोलता, त्याचप्रकारे बालकांशी बोला. बालकांनी आपले ऐकावे असे वाटत असेल, तर बालकांच्या पुरेसे जवळ जाऊन, त्यांच्याशी सर्वसामान्य आवाजात बोलावे. बालकांनी अनुकरण करावे, यासाठी चांगल्या शैली वापरण्याचा प्रयत्न करावा. बऱ्याचदा आवाज आणि आवाजाची पट्टी नियंत्रित ठेवणे प्रभावी ठरते. शब्द व आवाजाचा पोत असा वापरावा, की जेणेकरून बालकाला विश्वास आणि सुरक्षितता वाटेल, उदाहरणार्थ, बालकाला एखादी कृती करायला भीती वाटत असेल, जंगलजिमवर चढायला भीती वाटत असेल, तर 'तू चढ मी तुझ्याजवळ उभी आहे, तुला काहीही होणार नाही.' असे आश्वासक आवाजात सांगावे.

**इ) बालकांवर रागवण्यापेक्षा अंगणवाडीताईने शांत पण ठाम आवाजात बोलावे.**

उदाहरणार्थ : तुला साधे रांगेत उभे राहता येत नाही, या ऐवजी, बालकांना रांगेत उभे राहण्यास मदत करावी, आणि 'अशा पद्धतीने तुला पुढच्या वेळेस रांगेत उभं राहायचं आहे बरं का,' असे सांगावे.

**फ) बालकांना सतत आदेश किंवा हुकूम सोडू नये.**

उदाहरणार्थ 'ए इकडे ये आणि खुर्ची उचलून ठेव.', याऐवजी 'खुर्ची उचलून या कोपऱ्यात ठेवलीस, तर तुम्हांला खेळायला जागा होईल.'

**ज) बालकांची वागणूक सुधारण्यासाठी त्यांच्या स्वाभिमानाला धक्का लागेल, असे शब्द वापरू नयेत.**

उदाहरणार्थ : 'तू ऐकत का नाहीस? तुला काही अक्कल आहे की नाही?' अशी वाक्ये वापरू नयेत.

**ह) समान मूल्ये असलेल्या व तितकीच आवड असलेल्या दुसऱ्या गोष्टींकडे बालकाचे लक्ष वळवणे आवश्यक आहे.**

उदाहरणार्थ : उंच मनोरा रचण्यासाठी एखादे मूल खुर्ची खेचत असेल, तर त्याऐवजी त्याला एखादा मोठा ठोकळा किंवा बॉक्स घे हे सांगणे योग्य ठरेल.

**य) बालकांवर कोणताही शिक्का मारू नये. अपशब्दांचा वापर कधीच करू नये.**

उदाहरणार्थ : 'तू माठ आहेस! तुला साधे मणी ओवता येत नाहीत!' किंवा 'अरे ठोंब्या, ऊठ, जा जाऊन बस त्या कोपऱ्यात,' यांसारखी वाक्ये कधीच वापरू नयेत.

**तुमच्या वर्गात सकारात्मक वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने खालीलपैकी कोणत्या कृती योग्य वाटतात?**

- ☞ मुलांकडे पाठ करून काम करत बसणे.
- ☞ सगळ्या मुलांकडे तोंड होईल अशी बसण्याची जागा निवडणे.
- ☞ जर तुला हवे असेल, तर कात्री कशी धरायची ते मी तुला दाखवते असे सांगणे.
- ☞ वर्गातील सर्वसाधारण कृतींचे नियम सतत बदलत राहणे.
- ☞ वर्गातील सर्वसाधारण कृतींच्या नियमात निश्चितता आणि सातत्य असणे.
- ☞ कागदाच्या वस्तू किंवा प्रतिकृती तयार करताना, शेवटी तयार झालेल्या वस्तूच्या सुबकपणाला महत्त्व देणे.
- ☞ कागदाच्या वस्तू किंवा प्रतिकृती तयार करताना, घडी घालणे, जुळवणे, कापणे यांसारख्या त्यातील विविध पायऱ्या व्यवस्थित करता येतील याला महत्त्व देणे.

तुम्ही काही कृतींविषयी विधाने वाचलीत, यातील काही विधाने ही सकारात्मक आहेत, तर काही नकारात्मक आहेत.

आता अंगणवाडी सेविकेने बालकांशी कसे वागावे हे जाणून घेऊया.

१) कोणतीही कृती घडत असताना, तिच्या परिणामापेक्षा ती कशी घडते, त्या प्रक्रियेला महत्त्व द्यावे.

सर्जनशील कृती करत असताना, बालकांच्या समोर कोणतीही आकृती/प्रतिकृती (मॉडेल) ठेवणे टाळावे. उदाहरणार्थ : मी एक झाड काढले आहे. आता तुम्ही हुबेहूब असेच झाड काढण्याचा प्रयत्न करा बघू, असे सांगितले, तर या गोष्टीचे मुलांवर दडपण येऊ शकते आणि त्यांच्या सर्जनशीलतेला किंवा कल्पनाशक्तीला अजिबात वाव मिळत नाही. येथे झाडाचे चित्र कसे काढले आहे यापेक्षा, चित्र काढणे ही कृती महत्त्वाची आहे.

२) जेव्हा खरोखर मदतीची आवश्यकता असते, तेव्हाच मदत करावी. बालक स्वावलंबी होईल अशाप्रकारे साहाय्य करावे.

एखादे बालक संथ गतीने एखादी कृती करत असेल आणि केवळ ती कृती लवकर पूर्ण करायची, म्हणून त्याला मदत करणे टाळावे. उदाहरणार्थ : बुटाची नाडी बांधताना वेळ लागला तरी चालेल, पण ती कृती त्यांची त्यांनाच करू द्यावी.

३) बालकांची सुरक्षितता व आरोग्य याला नेहमी सर्वप्रथम प्राधान्य द्यावे. बालकांचे निरीक्षण सहजगत्या करता येईल, अशा ठिकाणी ताईंनी वर्गाच्या आत किंवा वर्गाच्या बाहेर प्रत्यक्ष बालकांसोबत राहावे.

वर्गाच्या आत व वर्गाच्या बाहेर उपक्रम करताना किंवा खेळताना मुलांना कोणत्याही प्रकारची शारीरिक इजा होणार नाही, याकडे लक्ष द्यावे, तसेच एखाद्या बालकाची तब्येत बिघडल्यास

किंवा ते जर वर्गात एका कोपऱ्यात शांत बसले असेल, नाराज होऊन/रागावून बसले असेल/रडत असेल, तर अशा वेळी त्या बालकाकडे विशेष लक्ष द्यावे.

४) एखादी दुर्घटना किंवा अपघात टाळण्यासाठी, संभाव्य धोका आधीच लक्षात घेऊन, अंगणवाडी ताईने काळजी घ्यावी.

उदाहरणार्थ : अंगणवाडीच्या परिसरात, काचेचे तुकडे, ठेच लागतील असे दगड किंवा इतर वस्तू लगेच हटवणे गरजेचे आहे.

५) बालकांचे नियमितपणे निरीक्षण करावे व टिपणे काढावीत. असे केल्याने बालकांची आवड, त्यांना आवडणाऱ्या कृती आणि वर्तन समजायला सोपे जाते व त्या पद्धतीने कृतींची आखणी करता येते.

६) वागणुकीचे नियम स्पष्टपणे सांगावेत आणि सातत्याने आवश्यक तिथे ते पाळले जावेत.

उदाहरणार्थ : जिना चढताना, उतरताना काळजी घेणे, धक्काबुक्की न करणे इत्यादी.

७) बालकांच्या कुटुंबातील आणि समाजातील विविध अनुभवांना वर्गात स्थान मिळावे. उदाहरणार्थ: स्थानिक गाणी, कथा, खाद्यपदार्थ, कपडे, कला, संगीत हे बालकांच्या अध्ययन अनुभवाचा अविभाज्य भाग असले पाहिजे.

प्रात्यक्षिक काम, तसेच संपर्क सत्रामध्ये या घटकासाठी अंगणवाडी सेविकांनी बालकांशी कसे बोलावे आणि कसे वागावे याबाबत दिलेल्या विधानांवर आधारित नाट्यीकरण करावे.

**या घटकातील खालील प्रश्नांची उत्तरे लिहूया.**

अ) वर्गात सकारात्मक वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने खालीलपैकी कोणते संवाद योग्य व कोणते अयोग्य ठरतील व का याची कारणे क्रमवार वहीत लिहा.

१) ए आरडाओरडा करत इकडे तिकडे पळू नका रे!

२) आता आपण एक गोल करून बसूया.

३) बघ ती तुझ्यापेक्षा किती छान काम करते.

४) हे काम करताना तुला मजा आली का?

५) बघूया सर्वांत आधी कोणाचे काम पूर्ण होते, भरभर कर जरा!

६) चला आता आपण सगळ्यांनी मन लावून हे काम पूर्ण करूया.

ब) वर्गात सकारात्मक वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने कोणती कृती करणे योग्य व कोणती कृती अयोग्य ठरेल व का? याची कारणे क्रमवार वहीत लिहा.

१) मुलांकडे पाठ करून काम करत बसणे.

२) सगळ्या मुलांकडे तोंड होईल अशी बसण्याची जागा निवडणे.

३) जर तुला हवे असेल, तर कात्री कशी धरायची, ते मी तुला दाखवते.

४) रोज वर्ग निरीक्षण करून बालकांच्या प्रगतीबाबत लक्षात आलेल्या मुद्द्यांबद्दल, तसेच विशेष गोष्टींची नोंद लगेच करून ठेवणे.

५) वर्गातील सर्वसाधारण कृतींचे नियम सतत बदलत राहणे.

### १२.१.३ विविध भागधारकांशी संवाद :

- बालक
- पालक व काळजीवाहक
- समाजातील सहकार्य करणाऱ्या व्यक्ती
- मार्गदर्शक/तज्ज्ञ व्यक्ती
- मदतनीस व वरिष्ठ अधिकारी
- बालविकास व बालशिक्षण या क्षेत्रात काम करणाऱ्या सेवाभावी संस्था
- परिसरातील औद्योगिक, सामाजिक जबाबदारी विभाग (CSR)

बालकांशी असणारी वागणूक व संवाद कसा असावा, हे आपण जाणून घेतले. आता बालकाखेरीज इतर घटकांबाबत जाणून घेऊया.

- **पालक व काळजीवाहक यांच्याशी संवाद**

  बहुतांश मुले पालकांसोबत, एकत्र कुटुंबात आजी–आजोबांसोबत, जवळच्या नातेवाईकांच्या, तसेच शेजारच्या कुटुंबातील लोकांच्या सहवासात वाढतात. या सगळ्यांना काळजीवाहक असे म्हणतात.

  मुले या सगळ्यांकडून वेगवेगळे अनुभव स्वीकारतात आणि ते गरजेनुसार उपयोगात आणतात. त्यामुळे बालकांच्या वाढीमध्ये व विकासामध्ये, पालक व काळजीवाहक या दोघांची भूमिका महत्त्वाची असते; म्हणूनच अंगणवाडीताईने त्यांच्याशी संवाद साधणे गरजेचे आहे. संवाद साधण्यासाठी ताईने या सर्वांशी विश्वासाचे नाते निर्माण केले पाहिजे. यासाठी अंगणवाडीतून येता–जाता त्यांच्याकडे पाहून स्मितहास्य करणे, 'नमस्ते काका, नमस्ते मावशी' यांसारख्या अभिवादनपर शब्दांचा वापर करावा.

  कुटुंब, समाज, काळजीवाहक हे बालकाच्या विकासातील आणि अध्ययनातील भागीदार आहेत. पालकांशी बालकांच्या चांगल्या, सकारात्मक गोष्टींची चर्चा करावी. उदा. पिंकीला वर्गात दुसऱ्या मुलांना मदत करायला खूप आवडते, खेळून झाल्यावर खेळणी उचलून ठेवते इत्यादी. एखाद्या बालकाला संदर्भ सेवेची आवश्यकता आहे असे जाणवत असेल, तर पालकांना त्याची संपूर्ण

माहिती द्यावी. उदा. श्रवणदोष असेलेले बालक असेल, तर संबंधित तज्ज्ञ व्यक्ती, संस्था यांची त्यांना माहिती द्यावी. पालकांना मुलांचेबाबतीत काही माहिती द्यायची असल्यास, त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे किंवा तुम्हांला त्यांच्याशी याबाबत चर्चा करायची झाल्यास मनमोकळेपणाने खासगीत/गृहभेटीत चर्चा करावी. गृहभेट ही विशिष्ट उद्देशाने करावी. गृहभेटीच्या वेळी पालकांशी बालकाचा वयोगट, त्यांची वैकासिक गरज, पालकांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन, मुद्देसूद चर्चा करावी. उदा. बाळाचे वजन जर कमी असेल, तर त्याचे वय लक्षात घेऊन, वाढीचा तक्ता पालकांना दाखवावा, आहाराबाबत काय बदल करणे अपेक्षित आहे हे मोजक्या शब्दात सांगावे. घरगुती गप्पा मारू नयेत, त्यामुळे पालकांचे लक्ष याच मुख्य विषयाकडे राहील आणि मुलांचेबाबतीत नेमके काय करायचे आहे, याबाबत त्यांना स्पष्टता येईल. काही पालक हे भाजी विक्रेता, शिलाईकाम, सुतारकाम, गवंडीकाम, रंगकाम करणारे असतात. एखाद्या पालकांना तुम्ही अंगणवाडीत बोलवू शकता. उदाहरणार्थ : एखाद्या मुलाचे पालक भाजी विक्रेता असतील, तर विविध प्रकारच्या भाज्या घेऊन, मुलांना त्या पाहण्याचा किंवा हाताळायचा अनुभव देऊ शकता.

- **मदतनिसांशी संवाद**

  मदतनीस ही अंगणवाडीताईंची सहकारी आहे, हे आपल्या सर्वांना माहीत आहे. ती तिच्या जबाबदाऱ्या पार पाडत असताना, तिच्याशी आदराने बोलले पाहिजे आणि वागलेही पाहिजे, म्हणजे तिला कामाबाबत सूचना देताना, शांतपणे ठाम आवाजात सूचना द्याव्यात. उदाहरणार्थ, 'ए, मुले येण्याच्या आधी वर्ग झाडून ठेव, आवर पटापट' असे न सांगता 'आधी वर्ग झाडून स्वच्छ कर, म्हणजे अंगणवाडी स्वच्छ दिसेल आणि मुलांनाही प्रसन्न वाटेल,' असे सांगावे. अंगणवाडी ताई जेव्हा वर्गाच्या एका गटाबरोबर कृती घेत असेल, त्यावेळी इतर मुलांसाठी मदतनीस यांना ताई गाणी, गोष्टी यांसारखे उपक्रम घेण्यासाठी विनंती करू शकते. बालकांच्या कृतीची पूर्वतयारी करण्यासाठी तुम्ही मदतनीस यांच्याशी संवाद साधू शकता, तसेच बालकांना सूचना देताना, खाऊवाटप करताना, बैठकव्यवस्था करताना, सहभाग वाढविण्यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन मदतनीस यांना केले पाहिजे. अंगणवाडीताई आणि मदनतीस यांनी एकमेकींच्या सहकार्याने काम करावे.

- **वरिष्ठ अधिकारी**

  वरिष्ठ अधिकारी यांच्याशी आदराने, व्यावसायिक मर्यादा पाळून संवाद केला पाहिजे. देहबोली सकारात्मक ठेवावी. अंगणवाडीत केलेले किंवा नियोजित उपक्रम उदा. पालकसभा, पोस्टर प्रदर्शन, बालकांसाठी केलेल्या कृती इत्यादींची माहिती त्यांना द्यावी. नावीन्यपूर्ण उपक्रम केल्यास उदाहरणार्थ : जनजागृतीसाठी वस्तीमध्ये पथनाट्य सादर केल्यास, त्याची माहिती अधिकारी यांना द्यावी. एखादा कार्यक्रम करताना किंवा प्रशासकीय कामकाज करताना,

उदा. ॲपवर माहिती भरताना काही समस्या येत असेल, तर त्यांचे मार्गदर्शन घ्यावे. एखाद्या घटकाविषयी प्रशिक्षणाची गरज जाणवत असेल, तर त्याविषयी मनमोकळेपणाने चर्चा करावी. उदाहरणार्थ, अंगणवाडीत बालकांच्या सुरक्षिततेसाठी एखाद्या संस्थेने प्रथमोपचार पेटी भेट दिली, पण त्याचा वापर कसा करायचा याबाबत प्रशिक्षण हवे असल्यास, तसेच काही अडचणी मांडायच्या असल्यास. सुपरवायझर, सी.डी.पी.ओ. यांना त्या सांगाव्यात.

- **समाजात सहकार्य करणाऱ्या व्यक्ती**

  अंगणवाडी बालस्नेही, बालकेंद्री आणि बालसुरक्षित करावयाची असेल, तर समाजातील सहकार्य करणाऱ्या व्यक्तींचा सहभाग मिळवणे आवश्यक आहे. समाजात असलेल्या प्रतिष्ठित व्यक्ती, वस्तीतील नेता, लोकप्रतिनिधी, दानशूर व्यक्ती, समाजसेवा करणाऱ्या व्यक्ती, समाजाला साहाय्य करणाऱ्या व्यक्ती (community helper) यांची मदत घ्यावी. उदाहरणार्थ : अंगणवाडीच्या परिसरात विजेच्या मोकळ्या तारा असतील, उघडे गटार असेल, कुंपण नसेल, तर अशा वेळी मुलांची सुरक्षितता लक्षात घेऊन लोकप्रतिनिधींशी संवाद साधावा व याबाबत तत्परतेने मदत मिळवावी.

  विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या व्यक्ती, जसे की – आरोग्य, बालविकास, बालशिक्षण इ. सर्व व्यक्तींशी अंगणवाडीताईने संवाद साधावा. या व्यक्तींना तुम्ही पालकसभेसाठी तज्ज्ञ किंवा मार्गदर्शक व्यक्ती म्हणून बोलावू शकता.

- **बालविकास व बालशिक्षण या क्षेत्रांत काम करणाऱ्या सेवाभावी संस्था यांच्याशी संवाद**

  यांच्यासोबत काम करण्याआधी, वरिष्ठ अधिकारी यांची परवानगी घ्यावी. शहरी तसेच ग्रामीण भागात बालकांचे आरोग्य, आहार, बालशिक्षण, बालसुरक्षितता यांसारख्या बालविकासाशी संबंधित काही संस्था काम करतात. अशा संस्थांशी संपर्क करून, त्यांचा सहभाग कोणत्या उपक्रमांमध्ये, कशा पद्धतीने घेता येईल, याबाबत त्यांच्याशी चर्चा करण्याच्या दृष्टीने तुम्ही सुपरवायझरचे मार्गदर्शन घेऊ शकता.

- **समाजातील इतर घटकांशी संवाद व परिसरातील औद्योगिक सामाजिक जबाबदारी विभाग (CSR)**

  **प्रतिनिधींशी संवाद**

  अंगणवाडीच्या जवळच्या परिसरात काही औद्योगिक संस्था किंवा एखादी कंपनी असू शकते. यामध्ये औद्योगिक सामाजिक जबाबदारी विभाग (CSR) कार्यरत असतो. गावामध्ये किंवा शहरामध्ये काही वेळा जवळच्या अंतरावर एक किंवा दोन अंगणवाड्या असू शकतात. अशा वेळी शक्य झाल्यास दोघी–तिघींनी मिळून, एकत्रपणे अशा विभागांमध्ये जाऊन, त्यांना अंगणवाडीत दिल्या जाणाऱ्या सेवा, बालकांसाठीचे विविध उपक्रम यांची नेमकी, मुद्देसूद माहिती द्यावी.

अंगणवाडीतील बालके, पालक व समाजासाठी कशा पद्धतीची मदत त्यांच्याकडून अपेक्षित आहे, हे त्यांना स्पष्टपणे सांगावे. इथे पालक, काळजीवाहक तसेच समाजासाठी कोणत्या उपक्रमांसाठी त्यांची मदत घेऊ शकता, याची काही उदाहरणे दिली आहेत ती अशी : पालकसभेमध्ये मार्गदर्शन करण्यासाठी तज्ज्ञ म्हणून मदत करू शकता, पोस्टर प्रदर्शन आयोजित करणे, पथनाट्य सादर करणे, बालविकास, आहार, आरोग्याविषयीची पुस्तके, खेळणी प्रदर्शन आयोजित करणे, खेळणी घर उपलब्ध करून देणे. शैक्षणिक साधने तयार करणे आणि तयार साधने मिळवणे. प्रशिक्षण आयोजित करणे. अंगणवाडी व आजूबाजूचा परिसर हा बालकेंद्री, बालस्नेही, बालसुरक्षित बनवण्यासाठी मदत व मार्गदर्शन, लाभार्थींसाठी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करणे. जनजागृती कार्यक्रम आयोजित करणे. उपक्रम राबवणे, भौतिक सुविधा साहित्य खरेदी, पुस्तके, खेळणी खरेदी, शैक्षणिक साधने खरेदी करणे, यांसाठी आर्थिक मदत करू शकता. अशाप्रकारे अंगणवाडी सेविकेने विविध घटकांशी संवाद साधावा.

## घटक क्र. १२.२ : व्यवस्थापन कौशल्य

**या घटकात आपण काय शिकणार?**

१२.२.१ व्यवस्थापन म्हणजे काय?

१२.२.२ व्यवस्थापनामध्ये कराव्या लागणाऱ्या गोष्टी

१२.१.३ आपत्ती व्यवस्थापन

### १२.२.१ व्यवस्थापन म्हणजे काय?

रोजच्या आयुष्यात आपण व्यवस्थापन कुठे कुठे करत असतो? ते जरा आठवून पाहा.

व्यवस्थापन म्हणजे काय ते आपण जाणून घेऊया. उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, साधन साहित्याचे नियोजन करणे, संघटन करणे म्हणजे एकत्र करणे, योग्य व्यक्तीची निवड करणे, त्यांना आदेश देणे आणि या सगळ्याचे नियंत्रण करणे म्हणजे व्यवस्थापन होय. उदाहरणार्थ : आपल्याला बालकांना सहलीसाठी न्यायचे आहे, तर आपण काय काय करतो? आपण क्षेत्रभेटीची तारीख ठरवतो. ज्या ठिकाणी जायचे आहे, त्या व्यक्तींना भेटतो किंवा त्यांच्याशी संपर्क करतो. आपल्याला ज्या दिवशी जायचे आहे, त्या दिवशी ते स्थळ उपलब्ध आहे का, याबद्दल माहिती घेतो. त्या दिवशी आपल्याला जाण्यासाठी कोणते वाहन आज उपलब्ध आहे त्याचे नियोजन करतो. त्यानंतर आपण संघटन करतो, म्हणजे काय? तर उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ज्या ज्या व्यक्तींचा त्यामध्ये सहभाग आवश्यक आहे, त्या सर्वांना त्यासाठी एकत्र आणायचे; म्हणजे पालकांसाठी एक सूचना काढायची. त्यानंतर विद्यार्थ्यांना सांगायचे किंवा मुलांबरोबरही तुम्हीही चर्चा करू शकता, की आपण क्षेत्रभेटीला जायचे आहे. तिथे हे हे पाहायला मिळेल, एखादे पालक आपल्याबरोबर येऊ शकतात का? त्यांना सोबत घेऊनही आपण त्या ठिकाणी जाऊ शकतो, म्हणजे या ठिकाणी तुम्ही

काय केले तर एका व्यक्तीला जबाबदारी दिली. तुमच्या मदतनीस आहेत, त्यांना तुम्ही आवश्यक त्या सूचना दिल्या आणि या सगळ्या गोष्टी व्यवस्थित व वेळच्यावेळी होतील आणि एका विशिष्ट क्रमाने होतील, या सगळ्यांचे तुम्ही नियंत्रण केले. या सगळ्या गोष्टी ज्या तुम्ही व्यवस्थित आणि जबाबदारी घेऊन केल्या, त्यालाच व्यवस्थापन असे म्हणतात; म्हणजे तुम्ही जे केले तेच व्यवस्थापन. व्यवस्थापन ही काही फार वेगळी गोष्ट नाही. रोजच्या कामकाजात आपण व्यवस्थापन करतच असतो.

एखाद्या कामाची जबाबदारी घेऊन, ते काम पूर्ण करण्यासाठी या सगळ्या गोष्टी जेव्हा एकत्रितपणे आपण करतो, तेव्हा त्याला व्यवस्थापन असे म्हटले जाते.

### १२.२.२ व्यवस्थापनामध्ये कराव्या लागणाऱ्या गोष्टी :

#### १) नियोजन

नियोजन लवचीक असते. लवचीक याचा अर्थ काय, तर ऐनवेळी आपल्याला त्यामध्ये बदल करता येण्यास वाव असतो, उदाहरणार्थ आपण एखादी क्षेत्रभेट ठरवली, पण अचानक पाऊस आला. मग अशा वेळी आपल्याला आजच्या ऐवजी, कुठल्या दुसऱ्या दिवशी हे नियोजन करता येईल, त्याचा सुद्धा आपल्याला अगोदरच विचार करून ठेवावा लागतो. तुम्हांला तुमचे नियोजन बदलता यायला हवे आणि तो बदल कसा करता येईल याचा विचार आपण नियोजन करताना केलेला असेल तर ते नियोजन चांगले झाले असे म्हणता येईल. चांगल्या नियोजनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, त्यामध्ये सुधारणेला वाव दिलेला असतो. आता इथे एक उदाहरण पाहू. पावसाळा सुरू होतो, पाऊस पडतो. त्या दिवशी मुले अंगणवाडीत येतात, तेव्हा त्यांचे पाय चिखलाने बरबटलेले असतात. तसेच वर्गात येऊन ते सगळा वर्ग खराब करतात. या अनुभवातून आपल्याल, काय सुधारणा करता येईल, तर मुले येण्यापूर्वीच, दरवाजापाशी आपण एक पायपुसणे ठेवले, तर वर्ग खराब होणार नाही. हे सुद्धा एक चांगल्या नियोजनाचे उदाहरण आहे.

#### २) कोणकोणत्या गोष्टींचे व्यवस्थापन अंगणवाडीताईंना करावे लागते?

- **वर्ग व्यवस्थापन :** वर्गातल्या वस्तू, म्हणजे फर्निचर, शिकण्या–शिकवण्याची साधने आणि वर्गातल्या जागेचे व्यवस्थापन या गोष्टी वर्ग व्यवस्थापनामध्ये येतात. वर्ग व्यवस्थापन करायचे म्हणजे वर्गातल्या वस्तू, वर्गातल्या जागा, वर्गातल्या मुलांची नेहमीची बसण्याची जागा, अंगणवाडीताईला बसण्यासाठीची जागा, मुलांना खाऊ खाण्यासाठीची जागा इतर शैक्षणिक साहित्य ठेवण्यासाठी जागा, या सगळ्या जागेचे तुम्हांला व्यवस्थापन करायचे असते. एखाद्या कृतीसाठी तात्पुरती मोठी जागा हवी असेल, तर काही वस्तू बाजूला हलवून, ती कशी करता येईल याचा विचारसुद्धा तुम्हांला आधीच करून ठेवायचा आहे.

- **वेळेचे व्यवस्थापन :** वेळेचे व्यवस्थापन म्हणजे अंगणवाडीची वेळ पाळणे, ठरावीक वेळेत अंगणवाडीत येणे आणि कामाला सुरुवात करणे. गृहभेटीची वेळ पाळणे, पालकसभा वेळेवर सुरू करून वेळेत संपवणे आणि वार्षिक नियोजनानुसार बालकांसाठी वेळापत्रकाप्रमाणे कृती किंवा उपक्रम ठरवले असतील, तर ते त्या क्रमाने घेणे. हे सगळे वेळेच्या व्यवस्थापनामध्ये समाविष्ट आहे.
- **मनुष्यबळ व्यवस्थापन :** अंगणवाडीताईंच्या नेहमीच्या संपर्कात त्यांच्या मदतनीस आहेत, मुले आहेत, त्यांचे पालक आहेत किंवा काळजीवाहक आहेत तसेच समाजातल्या इतर व्यक्तीही आहेत. या सगळ्यांशी संवाद साधावा लागतो आणि या सगळ्यांचे व्यवस्थापन सुद्‌धा करावे लागते, म्हणजे या सर्वांकडून तुम्हांला योग्य वेळी चांगला प्रतिसाद मिळू शकतो. समाजातील व्यक्तींचा विचार करायचा झाला, तर समाजामध्ये काही व्यक्ती अशा असतात, की त्या विशिष्ट  विषयामध्ये तज्ज्ञ असतात. त्यामुळे तुम्ही त्यांच्याकडून ज्ञान प्राप्त करण्यासाठी, त्यांना तज्ज्ञ व्यक्ती म्हणून बोलावू शकता. याचबरोबर कधी कधी काही दानशूर व्यक्ती असतात, की त्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून द्यायचे असते, तर अशा व्यक्तींबाबतसुद्‌धा तुम्हांला व्यवस्थापन करावे लागते, की त्यांना नेमक्या कोणत्या गोष्टींची माहिती देणार, कोणत्या वेळी ते त्यांचे सहकार्य अंगणवाडीला उपलब्ध करून देऊ शकतात आणि कोणत्या वेळी अंगणवाडीला खरी गरज आहे, या सगळ्या गोष्टींची माहिती देऊन अंगणवाडी ताई मनुष्यबळ व्यवस्थापन योग्यरीत्या करू शकते. याचबरोबर बालक, पालक, समाज आणि प्रशासन यांमध्ये सुसंवाद घडवून आणणारी आणि समन्वय साधणारी अशी अंगणवाडीताईंची महत्त्वाची भूमिका आहे.
- **बालकांच्या वर्तनाचे व्यवस्थापन :** बालकांमध्ये काही वर्तनसमस्या असतात. त्या नीट हाताळाव्या लागतात आणि जर त्या नीट हाताळल्या गेल्या नाहीत, तर बालकांच्या प्रगतीमध्ये त्याचा अडथळा निर्माण होऊ शकतो आणि वर्गव्यवस्थापनामध्ये वर्ग वातावरणावरही त्याचा विपरित परिणाम होऊ शकतो, त्यामुळे या समस्या अंगणवाडी ताईंना नीट हाताळाव्या लागतात. यामध्ये काय काय गोष्टी येतात, मुलांची भांडणे सोडवणे, योग्य रीतीने त्यांची चूक त्यांना समजावून सांगणे आणि वर्गामध्ये शांतता प्रस्थापित करणे ही अंगणवाडीताईंची जबाबदारी आहे. त्याचबरोबर काही मुले अतिआक्रमक, अतिचंचल असतात. त्या बालकांचे प्रतिसादसुद्‌धा अतिशय आक्रमक असतात. ते प्रतिसादसुद्‌धा अंगणवाडीताईंना योग्य रीतीने हाताळता येणे आवश्यक असते. वर्गातील काही मुले अतिशय अलिप्त असतात, म्हणजे ती कुठल्याही उपक्रमामध्ये, कुठल्याही कार्यामध्ये सहभागी होत नाहीत, अशा बालकांना थोडेसे उत्तेजन देऊन, त्यांचे थोडेसे कौतुक

करून, त्या उपक्रमामध्ये ते कसे सहभागी होतील, कसा रस घेतील आणि त्यातून कसे शिकतील, हेसुद्‌धा अंगणवाडीताईंना पाहावे लागते. या दृष्टीनेसुद्‌धा अंगणवाडीताईंनी प्रयत्न करणे अतिशय आवश्यक आहे.

- **ताण व्यवस्थापन :** रोजच्या कामकाजाचा, घडलेल्या घटनांचा, सामाजिक परिस्थितीचा किंवा बदललेल्या जीवनशैलीचा, अशा कुठल्याही कारणाने असू दे, पण प्रत्येक व्यक्तीला ताण हा येतोच आणि या ताणाचे व्यवस्थापन अंगणवाडी ताईलापण करावे लागते. मग हे ताण व्यवस्थापन कसे करायचे? सर्वांत प्रथम म्हणजे जवळच्या विश्वासू व्यक्तीशी, मैत्रिणींशी त्याबद्‌दल बोलायचो, नियमित योग, प्राणायाम, व्यायाम करायचा, त्याचबरोबर वेळेवर आहार घेणे, पुरेशी झोप घेणे हेही महत्त्वाचे आहे. रोजच्या कामाचे आणि वेळेचे नीट नियोजन करा. हे नियोजन नीट लिहून स्वत:जवळ ठेवा, म्हणजे ते नियोजन यशस्वी होण्याची शक्यता जास्त असते आणि त्याचा आपल्याला ताण येत नाही. एका आठवड्याचे नियोजन करण्याचा नमुना इथे दिला आहे. तुमच्या सोयीनुसार, गरजेनुसार तुम्ही त्यात बदल करून घेऊ शकता. या सगळ्या गोष्टी केल्या, तरी काही ठिकाणी ताण येतोच. अशा वेळेला हा ताण कमी करण्यासाठी आपल्या आवडीच्या गोष्टी करा, एखादा छंद जोपासा, चांगले संगीत ऐका आणि याही पलीकडे जाऊन ताण सहन होत नसेल, तर मात्र समुपदेशक किंवा डॉक्टरांची नक्की मदत घ्या.

### ३) नेतृत्व :

अंगणवाडीताई कोणाचे नेतृत्व करतात? तर अंगणवाडीताईंचा गट म्हणजे, त्यांच्या मदतनीस आणि त्यांच्या वर्गात असणारी मुले. त्यामुळे अंगणवाडीताई या गटाचे नेतृत्व करतात.

**अंगणवाडीताईंसाठी नेतृत्व गुण का आवश्यक आहेत?**

बालक आणि मदतनीस या सर्वांच्या कृतीला योग्य दिशा देणे, ही अंगणवाडीताईंची जबाबदारी आहे. मदतनिसाने नेमकी कोणती कामे करावयाची आणि अंगणवाडीताईने स्वतः नेमकी कोणती कामे करावयाची याचे निर्णय घेणे, त्याची जबाबदारी वाटून देणे. काही ठिकाणी तुम्हांला पुढाकार घ्यावा लागतो. अंगणवाडीमध्ये कोणतीही समस्या असेल उदाहरणार्थ – अंगणवाडीभोवती संरक्षक कुंपण घालून घेणे, टाकीला किंवा उघड्या गटाराला झाकण करून घेणे, अशी काही महत्त्वाची कामे करून घेण्यासाठी पुढाकार घेणे, त्यासाठी लोकप्रतिनिधींकडे पाठपुरावा करणं. इथे तुम्हांला तुमच्या नेतृत्व गुणांचा उपयोग करावयाचा आहे. ही अंगणवाडीताईंची जबाबदारी आहे. त्यामुळे हे शैक्षणिक उद्‌दिष्ट साध्य करण्यासाठी आणि समाजातील घटकांचे सहकार्य मिळवण्यासाठी तुमच्यामध्ये नेतृत्व गुण असणे आवश्यक आहे.

### १२.२.३ आपत्ती व्यवस्थापन :

अंगणवाडीताईंच्या प्रशिक्षणामध्ये आपत्ती व्यवस्थापन या गोष्टीचा समावेश का केला आहे? याची थोडी पार्श्वभूमी जाणून घेऊया. काही अंगणवाड्यांच्याजवळ मोठा रहदारीचा रस्ता असतो किंवा काहींच्या भोवती कुंपण नसते. काही अंगणवाड्यांजवळ एखादी नदी असते, विहीर असते, नाला असतो. अशा गोष्टी बालकांसाठी असुरक्षित असू शकतात. अंगणवाडीताई हाताळत असलेला बालकांचा वयोगट हा साधारणपणे ३ ते ६ वर्षे हा आहे. या वयात मुलांची सुरक्षिततेसंबंधी पुरेशी समज विकसित झालेली नसते. वर्गामधील काही मुले खोडकर असतात आणि त्यांच्या साध्या साध्या वागण्यातूनसुद्धा, सर्वसामान्य अपघात वर्गात किंवा अंगणवाडी परिसरात घडू शकतात, या गोष्टी घडू नयेत यासाठी, अंगणवाडीताईने सक्षम असले पाहिजे. यासाठी आपत्ती व्यवस्थापन या घटकाचा समावेश आपण या प्रशिक्षणामध्ये केलेला आहे. आपत्ती व्यवस्थापनामध्ये आपण पुढील मुद्दे पाहणार आहोत :

- **वर्गात घडणारे सर्वसामान्य अपघात :** घशात–नाकात अन्न किंवा वस्तू अडकणे, खेळताना पडणे, कापणे, भाजणे, खरचटणे, छोटी जखम होणे, हात किंवा पाय मुरगळणे, नाकातून रक्त येणे, घुळणा फुटणे किंवा काही बालकांना फीट येणे, फेफरे भरणे यांसारखे त्रास होऊ शकतात आणि या सगळ्या गोष्टी अंगणवाडीताईला हाताळाव्या लागतात. मुले तशीही खूप खोडकर असतात आणि त्यामुळे वर्गात असे छोटे अपघात घडणे ही अगदी सामान्य गोष्ट आहे. मग अशावेळी अंगणवाडीताईने काय करायचे, याची प्राथमिक माहिती आपण संपर्क सत्रामध्ये घेणार आहोत.
- **प्रथमोपचार पेटी :** प्रथमोपचार म्हणजे काय?

  एखादा अपघात झाल्यानंतर लगेच डॉक्टर येण्यापूर्वी जे उपचार केले जातात, त्याला प्रथमोपचार असे म्हणतात. ही आहे प्रथमोपचार पेटी. या पेटीमधल्या प्रथमोपचार साहित्याचा परिचय या व्हिडिओच्या माध्यमातून आपण करून घेऊया.
- **सुरक्षिततेचे नियम :** वर्गात घडणारे सर्वसामान्य अपघात जर टाळायचे असतील, तर काही सुरक्षिततेचे नियम असणे आवश्यक आहे. या गोष्टी आपण पाळल्या, तर बरेचसे सर्वसामान्य अपघात आपण टाळू शकतो.
  - ➢ छोट्या आकाराचे टोकदार वस्तू असलेले साहित्य मुलांना हाताळायला देऊ नये.
  - ➢ विजेचे स्विच बोर्ड मुलांच्या हाताला येणार नाहीत, अशा उंचीवर असावेत.
  - ➢ अंगणवाडीमध्ये फटाके किंवा इतर ज्वालाग्रही पदार्थांचा साठा करू नये.
  - ➢ पाणी साठवण्याच्या टाकीला झाकण असलेच पाहिजे.

१) **आपत्कालीन सेवा :** कितीही काळजी घेतली, तरी छोटे–मोठे अपघात वर्गामध्ये होत असतात. अशावेळी आपत्कालीन सेवांचे संपर्क क्रमांक आपल्या हाताशी असले पाहिजेत. पोलीस,

अग्निशमन, विद्युत पुरवठा, प्राथमिक आरोग्य केंद्र, रुग्णवाहिका, रुग्णालय, डॉक्टर, आशाताई आणि वर्गातल्या मुलांच्या पालकांचे संपर्क क्रमांक. या सर्वांचा एक तक्ता तयार करून, तो अंगणवाडीत सर्वांना दिसेल अशा ठिकाणी लावलेला असला पाहिजे.

**२) आपत्ती व्यवस्थापनाची पूर्वतयारी :**

- अंगणवाडीतील बालकांमध्ये सुरक्षित स्पर्श आणि असुरक्षित स्पर्श म्हणजे safe touch आणि unsafe touch म्हणजे काय याबद्दल जाणीव व जागरूकता निर्माण करणे.
- बचाव प्रशिक्षण सराव, अर्थात ज्याला आपण मॉक ड्रिल म्हणतो, ते. बालक, पालक, मदतनीस व अंगणवाडीताई या सर्वांनी मिळून वर्षातून दोनदा करणे आवश्यक आहे. या गोष्टी खूप महत्त्वाच्या आहेत.

## घटक क्र. १२.३ : एकविसाव्या शतकातील कौशल्ये

**या घटकात आपण काय शिकणार?**

१२.३.१ एकविसाव्या शतकातील अध्ययन कौशल्ये

१२.३.२ तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर

### १२.३.१ एकविसाव्या शतकातील अध्ययन कौशल्ये

अंगणवाडी सेविकांना एकविसाव्या शतकातील अध्ययन कौशल्यांबद्दल माहिती होणे; एकविसाव्या शतकातील साक्षरता कौशल्ये, जीवन कौशल्ये आणि अध्ययन कौशल्ये आत्मसात करण्याबाबतचा योग्य दृष्टिकोन निर्माण होणे व या कौशल्यांचा सुयोग्य वापर करण्याबाबतचा योग्य दृष्टिकोन तयार होणे. या बाबी सदर उपघटकातून साध्य होतील.

- **एकविसाव्या शतकातील कौशल्ये कशासाठी शिकायची?**

  एकविसाव्या शतकातील बदलत्या घडामोडींमुळे, तंत्रज्ञान, शिक्षण, व्यापार, दळणवळण इत्यादी सर्वच क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर बदल घडून आलेले दिसून येत आहेत. उदाहरणार्थ: संगणक क्रांती, नंतर इंटरनेट क्रांती आणि नंतर घडलेली मोबाइल क्रांती, यांमुळे प्रत्येकाच्या हातात आज इंटरनेट असलेले स्मार्ट मोबाइल फोन आलेले आहेत. संपर्क साधणे खूप वेगवान झालेले आहे. नुकत्याच येऊन गेलेल्या कोविड-१९ च्या साथीमुळे जगभरात सर्वत्र वेगवेगळ्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे. साहजिकच अशा बदलत्या परिस्थितीमुळे जशी प्रत्येक क्षेत्रात उलथापालथ झाली आहे, आव्हाने निर्माण झाली, तशी ती शिक्षणक्षेत्रातही निर्माण झालेली आहेत आणि त्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी अंगणवाडीताईने सक्षम होणे गरजेचे आजे आणि यासाठी एकविसाव्या शतकातील कौशल्ये शिकायची.

- **एकविसाव्या शतकातील कौशल्ये म्हणजे काय?**

एकविसाव्या शतकातील कौशल्ये म्हणजे आजच्या जगात शिक्षण व व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी होण्यासाठी आवश्यक असणारी कौशल्ये. साहजिकच अशा बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी, अंगणवाडी सेविकेलासुद्धा एकविसाव्या शतकात आवश्यक असणारी ही विशेष कौशल्ये शिकण्यावाचून पर्याय नाही. प्रत्येक अंगणवाडीताईला या कौशल्यांची व त्यांचा वापर कसा करायचा याची माहिती असणे आवश्यक आहे. या विशेष कौशल्यांच्या आधारे, तुम्हांला स्वतःचा विकास आणि बालकांचा विकास साधता येईल. याशिवाय तुमच्या क्षेत्रात निर्माण होणारी एकविसाव्या शतकातील आव्हाने पेलण्यासाठी याची मदत होईल.

**एकविसाव्या शतकातील कौशल्ये मुख्यत: तीन प्रकारात विभागलेली आहेत.**

१) अध्ययन कौशल्ये २) साक्षरता कौशल्ये आणि ३) जीवन कौशल्ये

**१) अध्ययन कौशल्ये :**

अध्ययन म्हणजे शिकणे, अभ्यास करणे. एकविसाव्या शतकात तंत्रज्ञानामळे ज्ञानप्राप्तीचा वेग वाढलेला आहे. त्यामुळे गोष्टी कालबाह्य होण्याचा वेगसुद्धा वाढलेला आहे. त्यासाठी तुम्ही मोबाइल वापरायला शिकलात, ॲपबद्दल माहिती घेतलीत आणि अगदी स्मार्ट होऊन सराईतपणे ऑनलाइन नोंदी करायला लागलात. एकेकाळी तुम्ही मोठ्या कष्टाने रजिस्टरमध्ये नोंदी करायला शिकला असाल, पण आज त्यासाठी आपल्याकडे पोषण ट्रॅकर ॲप आहे. पूर्वी शिकलेल्या कालबाह्य झालेल्या गोष्टी टाकून दिल्याशिवाय आपण नवीन गोष्टींना जागा कशी करून देणार? पूर्वी शिकलेल्या, गोष्टी विसरणे आणि नवीन गोष्टी लगेच शिकून घेण्याचे कौशल्य, म्हणजे एकविसाव्या शतकातील अध्ययन कौशल्य! आणि ही प्रक्रिया सतत चालूच राहणार आहे. याचा अर्थ, एकविसाव्या शतकात आपल्याला स्वतःलाही विद्यार्थी व्हावे लागणार आहे. आता हेच पाहा ना, अंगणवाडीत तुम्ही मुलांना शिकवता, पण हा कोर्स करण्यासाठी तुम्ही कशा पुन्हा विद्यार्थिनी झालात आणि चक्क ऑनलाइन कोर्स करताय! नवीन गोष्टी उत्साहाने शिकूनही घेत आहात तुम्ही! हा सुद्धा एकविसाव्या शतकातील अध्ययन कौशल्याचाच एक भाग आहे. अजून काही वर्षांनी आणखी नवीन गोष्टी येतील, अशाच एखाद्या कोर्सच्या माध्यमातून तुम्हांला ते शिकण्याची संधीही मिळेल. आयुष्यभर मधूनमधून विद्यार्थिनी होण्याची तयारी असेल ना, तर मग एकविसाव्या शतकातील अध्ययन कौशल्ये आत्मसात होतीलच तुम्हांला!

**अध्ययन कौशल्यांचे 4 C'S :**

बघूया अध्ययन कौशल्यामध्ये अजून कोणकोणत्या नवीन गोष्टी आहेत शिकण्यासारख्या! अध्ययन कौशल्याच्या सगळ्या गोष्टींना एकत्रितपणे 4 C'S असे म्हणतात, कारण यामधील

प्रत्येक इंग्रजी शब्दाचे पहिले अक्षर इंग्रजी C ने सुरू होते. चिकित्सक विचार (Critical Thinking), सर्जनशीलता (Creativity), संवाद (Communication) आणि सहयोग (Collaboration). खूप अवघड वाटतात ना हे शब्द? आता आपण समजून घेऊया. या दोन अंगणवाडीताई मैत्रिणी आहेत, त्यांचा मोबाइलवरचा संवाद आपण वाचूया.

किरणताईच्या पालकसभेला पालकांची उपस्थिती खूप कमी असे. त्याबद्दल किरणताईंनी मानसीताईंना फोन केला आणि त्यांचा अनुभवी सल्ला मागितला.

**किरण** : हॅलो मानसीताई, कशी काय झाली आजची तुमची पालकसभा?

**मानसी** : छान झाली. जवळ जवळ सगळे पालक आले होते. फक्त एक जण आले नव्हते. पालकसभेला पालकांनी येणे खूप महत्त्वाचे असते.

**किरण** : वा छानच, की हो ताई, पण आज माझ्या पालकसभेला ना फक्त तीनच पालक आले होते. मला फार काळजी वाटते हो. बालकांनी अंगणवाडीत केलेलं काम दाखवायचे आहे. काही मुले मागे पडता आहेत. त्यांच्या अधिक विकासासाठी घरी करण्याच्या काही सोप्या कृती मला पालकांना द्यायच्या आहेत, पण जर पालक आलेच नाहीत तर मी काय करू?

**मानसी** : किरणताई, तुम्ही म्हणता ते बरोबर आहे.

**किरण** : मानसीताई कसं जमवता हो तुम्ही हे?

**मानसी** : किरणताई, थोडे प्रयत्न केले ना, तर अगदी सहज शक्य आहे हे!

**किरण** : ताई मला सांगा ना. मी खरंच मनापासून प्रयत्न करेन.

**मानसी** : नक्की सांगते. आधी तुम्ही मला सांगा, पालकसभेला येत नाहीत याचे काय कारण आहे?

**किरण** : ते मला कसं माहीत?

**मानसी** : अहो, मग ते आधी जाणून घ्या. पालकसभेत मुलांशी वागताना उपयुक्त ठरेल, अशी माहितीसुद्धा द्यायला सुरुवात करा त्यांना. एवढे करा आणि त्याचा काय परिणाम होतो ते मला नक्की सांगा.

**किरण** : नक्की करून बघते ताई. मनापासून आभारी आहे.

**मानसी** : शुभेच्छा किरणताई!

मैत्रिणींनो, आठवून पाहा, तुम्हांलासुद्धा कधी अशी किरणताईंसारखी समस्या आली आहे का? समस्येमधून मार्ग काढण्यासाठी तुम्ही जे काही करता, ते म्हणजे हे '4 C'S' आहेत. आता पुन्हा एकदा पाहूया किरणताईने '4 C'S' कसे वापरले ते.

सभेला पालक येत नाहीत, ही समस्या तिने ओळखली. ही समस्या इतर अंगणवाडीताई कशा सोडवतात, हे जाणून घेण्यासाठी तिने योग्य व्यक्ती म्हणजे मानसी ताईंची निवड केली. तिने

नंतर इतर अंगणवाडीताई किंवा सुपरवायझर यांना सुद्‌धा फोन केला असेल. त्यांच्याकडून अधिक माहिती गोळा केली असेल, पण त्यातल्या त्या समस्येशी निगडित आणि तिच्या उपयोगी ठरेल इतकीच माहिती तिने विचारात घेतली, म्हणजेच तिने चिकित्सक विचार क्रिटिकल थिंकिंगचा (Critical thinking) केला. त्यानंतर तिने काय केले असेल? अर्थातच पालकांशी वैयक्तिक संवाद साधला कम्युनिकेशन (Communication) पालकसभेच्या वेळेत सुयोग्य बदल केले आणि प्रत्येक पालक सभेमध्ये पालकांना उपयुक्त ठरेल, अशा माहितीचे पोस्टर तयार करून वर्गात लावले, पण तिला वाटले की एवढे पुरेसे नाही. मग तिने 'सभेला या ना हो आई–बाबा' या नावाचे एक छोटेसे नाटुकले लिहिले. मुलांना आणि मदतनीसताईंना सोबत घेऊन बालदिनाच्या दिवशी ते सादर केले, म्हणजे स्वतःचा वेगळा विचार करून तो प्रत्यक्षात आणला, याला म्हणतात सर्जनशीलता क्रीएटिविटि (Creativity) सभेला पालक येत नाहीत, या समस्येचे निराकरण करण्यासाठी तिने बालक, मदतनीस, किरणताई, इतर अंगणवाडीताई, सुपरवायझर या सगळ्यांचा सुंदर सहयोग कोलॅबोरेशन (Collaborations) साधला आणि तिचे ध्येय साध्य केले. या व्हिडिओच्या दुसऱ्या भागात, या प्रत्येक प्रकारामध्ये आणखी कोणकोणती कौशल्ये येतात, ते आपण जाणून घेणार आहोत आणि त्यांचा उपयोग कसा करायचा, याबद्दल संपर्क सत्रात प्रात्यक्षिकसुद्‌धा करणार आहोत.

**२) साक्षरता कौशल्ये :**

तुम्ही म्हणाल, की आम्ही काही निरक्षर आहोत का? नाही नाही, मला तसे म्हणायचे नाही. आपण बघूया तर एकविसाव्या शतकातील ही कोणती साक्षरता आहे ते. कोणतीही नवीन गोष्ट शिकायची असेल, करायची असेल, तर त्यासाठी आधी आपल्याला माहिती घ्यावी लागते. कुठून मिळवू शकतो आपण ही माहिती? पुस्तक वाचून, इंटरनेटच्या माध्यमातून, वेबसाइटसारख्या डिजिटल माध्यमांच्या मार्फत आणि डिजिटल संदर्भ साहित्याच्यामार्फत ही माहिती मिळवण्याचे कौशल्य म्हणजे साक्षरता कौशल्य होय.

**या प्रश्नांवर विचार करा.**

या चित्रामधली कोणकोणती माध्यमे तुम्ही वापरता? किंवा वापरून पाहिली आहेत?

तुम्ही कोणत्या प्रकारचे मेसेज इतराना फॉरवर्ड करता? मेसेजेस फॉरवर्ड करण्यापूर्वी, तुम्ही त्या माहितीच्या खरेपणाची खात्री करून घेता का?

या चित्रामध्ये दिसणारी डिजिटल माध्यमे वापरण्याची माहिती असणे, त्यावरून माहिती किंवा संदेशाची देवाणघेवाण करणे हा एक भाग झाला; परंतु त्याचबरोबर व्हॉट्सअ‍ॅप, फेसबुक, इन्स्टाग्राम यांसारख्या समाजमाध्यमांचा जबाबदारीने वापर करणे महत्त्वाचे आहे नाही का? त्याचबरोबर इंटरनेटवर मिळालेली माहिती, आपण अधिकृत वेबसाइटवरून घेतली आहे की

नाही? आलेला मेसेज किंवा ई-मेल आपली फसवणूक करणारा तर नाही ना? याबाबतीत जागरूक असणे. हे तर करायलाच पाहिजे, नाही तर आपलंच नुकसान होईल. मग या सगळ्या गोष्टींची तुम्ही अगदी जागरूक राहून काळजी घेतलीत, की तुम्ही झालात एकविसाव्या शतकातील डिजिटल साक्षर अंगणवाडीताई!

**३) जीवन कौशल्ये :**


आपले दैनंदिन आयुष्य यशस्वीपणे जगण्यासाठी आवश्यक असणारी कौशल्ये म्हणजे जीवन कौशल्ये होय. यांपैकी काही कौशल्ये पुढे दिली आहेत :

- निर्णयक्षमता, लवचीकता आणि अनुकूलन
- नेतृत्व आणि जबाबदारी
- पुढाकार घेणे आणि स्व-दिशा
- आंतरसांस्कृतिक संवाद

ही कौशल्ये काही आपल्याला वेगवेगळी वापरायची नसतात, तर बऱ्याचदा ती एकत्रच वापरावी लागतात. त्याचे सगळ्यांचे मिळून एक उदाहरण पाहूया. हे वाचताना ही कौशल्ये तुम्हांला नेमकी कुठे दिसतात, त्याकडे लक्ष ठेवा बरं! तंत्रज्ञानामुळे जग जवळ आले आहे, त्याचबरोबर शिक्षणाच्या निमित्ताने किंवा कामाच्या निमित्ताने एका राज्यातील व्यक्ती दुसऱ्या राज्यात स्थायिक होण्यासाठी जाणे किंवा एका देशातील व्यक्ती दुसऱ्या देशात राहायला जाणे, ही बाब सुद्धा आता नवीन राहिलेली नाही. ही भारती आहे आणि ती तिच्या शिक्षणाच्या निमित्ताने एका नवीन गावात राहायला आली आहे. घर सोडून राहताना तिला वाईट नक्की वाटले असेल पण तरीही तिने स्वतःसाठी भविष्यात चांगला ठरेल असा निर्णय घेतला. आता अशा सर्वस्वी नवीन वतावरणाशी जुळवून घेताना, भारतीला सतत स्वतःचेच म्हणणे खरे करता येणार नाही. तिला स्वतःमध्ये, तिच्या स्वभावामध्ये काही बदल करावे लागतात, यालाच म्हणायचे अनुकूलन. त्यासाठी स्वतःमध्ये बदल करून घेता येणे म्हणजे लवचीकता. अशा अनोळखी ठिकाणी आपल्याला राहायचे आहे म्हटल्यावर भारती हळूहळू तिथल्या स्थानिक लोकांशी ओळख करून घेण्याचा प्रयत्न करायला लागली, तिने स्वतःच्या प्रयत्नांना योग्य दिशा दिली; म्हणजेच स्व-दिशा. त्यासाठी ती तिथल्या स्थानिक लोकांशी बोलायला लागली. त्यांची भाषा, संस्कृती यांची ओळख करून घेऊ लागली, म्हणजेच तिने आंतर-सांस्कृतिक संवाद साधला. याचा काय परिणाम झाला असेल? या प्रश्नावर विचार करा. त्याचे उत्तर तुमच्या वहीत किंवा जर्नलमध्ये लिहून ठेवा. भारती लवकरच तिथल्या समाजात मिसळून गेली. तिला सहकार्य करणाऱ्या, मदत करणाऱ्या अशा छान मित्रमैत्रिणी सुद्धा मिळाल्या. पुढे काय

झाले, त्याच गावात तिच्यानंतर इतर काही विद्यार्थी–विद्यार्थिनी आले. आता भारतीने त्यांना स्वतःहून मदत केली, म्हणजेच तिने पुढाकार घेतला, जबाबदारी घेतली, थोडेसे नेतृत्वसुद्‌धा केले, तर अशी ही भारतीची गोष्ट! एकविसाव्या शतकातील जीवन कौशल्ये वापरून, तिने आपले आयुष्य कसे घडवले त्याची ही गोष्ट!

### १२.३.२ तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर



तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर याबद्दल आता आपण माहिती घेणार आहोत.

तुम्हांला शेजारी एक चित्र दिसते आहे, त्याचे निरीक्षण करा. काय दिसते आहे चित्रात? अंगणवाडीताईंनी मुलांना टीव्हीवर व्हिडिओ लावून दिला आहे. प्रत्येक बालकाच्या हातात मोबाइल दिलेला आहे. तंत्रज्ञानाचा असा वापर करणे योग्य ठरेल का? या प्रश्नावर विचार करा.

तंत्रज्ञानाच्या वापराबाबत राज्य शैक्षणिक आराखड्यामध्ये काय सांगितले आहे ते पाहूया. राज्य शैक्षणिक आराखड्यानुसार तंत्रज्ञानाचा वापर कशासाठी करणे अपेक्षित आहे?

- क्षमता विकसन करण्यासाठी
- अध्ययन–अध्यापन उपक्रम घेण्यासाठी
- भाषांतर करण्यासाठी
- शैक्षणिक साहित्यामध्ये विविधता आणण्यासाठी
- नियोजन करण्यासाठी

तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर यामध्ये आपण विचार करत आहोत, की तंत्रज्ञानाचा वापर आणखी कोणकोणत्या गोष्टींसाठी आपण करू शकतो?

- विशेष गरजा असलेल्या बालकांसाठी
- समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी
- अध्ययनातील अडथळे दूर करण्यासाठी



काही बालके दिव्यांग असू शकतात. दृष्टिदोष, श्रवणदोष, वाचादोष असलेली असू शकतात. या बालकांशी संवाद साधणे आणि त्यांच्याकडून कृती करून घेणे, हे काही मर्यादांमुळे अंगणवाडीताईंसाठी आव्हानात्मक असू शकते. या बालकांच्या अध्ययनातील अडथळे कसे दूर करता येतील, हा विचारसुद्‌धा अंगणवाडीताईंनी करणे आवश्यक

आहे. त्यांच्यासाठी विंडोज ब्लाईंड्स सॉफ्टवेअर, टॅप टॅप सी सारखे सॉफ्टवेअर; श्रवणदोष असलेल्या विद्यार्थ्यांसाठी स्पीच टू टेक्स्ट संवाद ॲप ही काही उपयुक्त ॲप्लिकेशन्स आहेत.

अशी सॉफ्टवेअर आपण वापरली, तर त्यांना समान संधी उपलब्ध होण्याच्या दिशेने प्रगती होईल आणि त्यांच्या अध्ययनातील अडथळे काही प्रमाणात तरी दूर होण्यास मदत होईल.

आपल्या शिकण्या–शिकवण्यामध्ये तंत्रज्ञानाचा वापर करणे, यामागचा मुख्य उद्देश खरा हा आहे, की शिक्षण हा एक आनंददायक अनुभव व्हावा, त्यातून बालकांचे कुतूहल वाढावे आणि बालकांनी कृतिशील अध्ययनप्रक्रियेत सामील व्हावे, म्हणून तंत्रज्ञानाचा वापर करणे महत्त्वाचे कौशल्य आहे.

**तंत्रज्ञानाचा वापर यामध्ये काय अपेक्षित आहे?**

पॉवर पॉइंट किंवा त्यासारखे सॉफ्टवेअर वापरता येणे, ज्यामध्ये आपण वेगवेगळ्या विषयांवर सादरीकरण करू शकतो. त्याचबरोबर भित्तिपत्रके म्हणजेच पोस्टर्स, सुंदर निमंत्रणपत्रिका, फ्लॅशकार्डस् इत्यादी शैक्षणिक साधने तयार करण्यासाठीसुद्धा ही सॉफ्टवेअर्स उपयुक्त आहेत.

- **आंतरजालवरील माहिती मिळवता येणे :**

  एक उदाहरण घेऊया. इंद्रधनुष्य हा निसर्गाचा एक उत्कृष्ट आविष्कार आहे, पण ही नेहमी दिसणारी गोष्ट नाही. मग आपल्या वर्गातच, साध्या साहित्याचा वापर करून, आपल्याला इंद्रधनुष्य तयार करून दाखवायचे असेल, तर याबद्दलची माहिती आंतरजालवर म्हणजे इंटरनेटवर शोधता येईल. तुम्ही नक्की शोधून पाहा आणि तुमच्या अंगणवाडीतील मुलांना करून दाखवा.


  हे चित्र तुम्ही ओळखलेच असेल. पोषण ट्रॅकर ॲप आहे हे. यामध्ये तुम्ही माहिती भरत असता. हे तंत्रज्ञान वापरता येणेसुद्धा गरजेचे आहे.

- **शैक्षणिक ब्लॉग तयार करणे :**

  आपल्या पालकांना आवश्यक असलेली शैक्षणिक माहिती किंवा पालकत्वाबद्दलची विशेष माहिती, आपण आपल्या ब्लॉगवर किंवा वेबसाईटवर ठेवू शकतो आणि ते पालकांना उपलब्ध करून देऊ शकतो. याशिवाय, एखाद्या गोष्टीबद्दल तुम्हांला पालकांना पुन्हा पुन्हा माहिती द्यावी लागत असेल, तर अशी माहिती तुम्ही एखादा ब्लॉग तयार करून, त्या ठिकाणी ठेवू शकता. पालकांना त्याची लिंक देऊन, त्या ब्लॉगवरून किंवा वेबसाइटवरून ती माहिती घ्यायला सांगू शकता, म्हणजे तुमचा वेळ वाचेल. हा ब्लॉग कसा तयार करायचा? वेबसाइट कशी तयार करायची? याबद्दल आपण संपर्क सत्रामध्ये, 'तंत्रज्ञानाचा वापर' याविषयी प्रात्यक्षिक करणार आहोत, तेव्हा त्या संपर्क सत्रासाठी तुम्ही नक्की उपस्थित राहा.

## घटक क्र. १२.४ : अंगणवाडीताईंची भूमिका व जबाबदारी

काळानुरूप अंगणवाडी सेविकांची बालकांना शिकवण्याची पद्धत निश्चितपणे बदलत आहे. या बदलत्या भूमिकेबद्दल जाणीव व जागृती असणे हे खूप महत्त्वाचे आहे.

**या घटकात आपण काय शिकणार?**


१२.४.१ विषयाची ओळख

१२.४.२ महत्त्वाची गुणवैशिष्ट्ये

१२.४.३ अंगणवाडीताईंनी वर्गात नेमके काय करायचे?

### १२.४.१ विषयाची ओळख :

अंगणवाडीताई मुलांसोबत खूप वेगवेगळ्या गोष्टी करत असते. गाणी म्हणते, गोष्टी सांगते, वेगवेगळे खेळ घेते. बऱ्याचदा ताई आपली सांगत असते आणि मुले ते नुसते ऐकत बसतात. खरे तर, मुलांना खूप बोलायचे असते, प्रश्न विचारायचे असतात, पण कधीकधी संधीच मिळत नाही, तर अशावेळी ताईंनी नेमके काय करायचे? तर मुलांना जास्त बोलते करण्याचा किंवा त्यांना सहभागी करून घेण्याचा प्रयत्न करायचा. या सगळ्याला काय म्हणतात माहिती आहे; याला 'सुलभन' असे म्हणतात. सुलभता निर्माण करणे म्हणजे काय?




सुलभता म्हणजे एक खेळीमेळीचे मोकळे वातावरण निर्माण करणे, ज्यात मुले आपणहून आनंदाने आणि सहजपणे सहभागी होतील. या प्रक्रियेला 'सहभागी जबाबदारी' किंवा 'शेअर्ड रिस्पॉन्सिबिलिटी' असे संबोधले जाते, तर ही अशी नवीन भूमिका आणि जबाबदारी तुमच्यावर येणार आहे. हे अगदी सोपे आहे आणि याचा मुलांना खूप फायदा होणार आहे.

### १२.४.२ महत्त्वाची गुणवैशिष्ट्ये :

सहभागी जबाबदारी उत्तम प्रकारे निभावण्यासाठी, अंगणवाडीताईने अनेक गुण आत्मसात करणे हे खूप महत्त्वाचे ठरते. बघूया नेमकी कोणकोणती गुणवैशिष्ट्ये आहेत ही!

- **नि:पक्षपाती असणे, लक्षपूर्वक श्रवण करणे वस्तुनिष्ठ दृष्टिकोन :** प्रत्येक मुलाला समान संधी देणे. केवळ चटकन आणि बरोबर उत्तर देणाऱ्या ठरावीक मुलांवर सगळे लक्ष केंद्रित न करणे, जी मुले नेहमी आपले म्हणणे ऐकतात, त्याच मुलांना वारंवार जास्त प्रोत्साहन किंवा बोलण्याची संधी दिली जाते. कधी कधी त्यांना काही सवलत दिली जाते आणि हे नकळत होते, तर असे होऊ नये म्हणून काळजी घ्यायची आहे.
- **अंगणवाडीताईंमध्ये समस्या निराकरण क्षमता असणे, बालकांना विचार करण्यास प्रवृत्त करणे:** मुलांनी कागदाची एखादी होडी केली आणि ती पाण्यात सोडली. थोड्या वेळाने ती पाण्यात

बुडाली, तर ताईंनी मुलांना असे विचारले पाहिजे, की असे का झाले असेल? ही होडी थोड्या वेळापूर्वी तर छान तरंगत होती!

- **लवचीकता :** तुम्ही गोष्ट सांगायची असे ठरवले, तशी तयारी तुम्ही केली आहे, पण त्यावेळी अचानक पाऊस थांबतो, ऊन पडते आणि मुलांना गोष्ट ऐकण्यापेक्षा बाहेर खेळायला जायची घाई असते. मग ऐनवेळी सुद्धा आपले वेळापत्रक थोडे बदलणे योग्य ठरेल.
- **समजूतदारपणा :** एखादे मूल जर हिरमुसलेले आहे असे वाटले, तर त्याच्यावर कृती करण्याची सक्ती करू नये.
- **संवाद साधण्याचे कौशल्य :** सारख्या सूचना देण्याऐवजी, बालकांशी सहज गप्पा माराव्यात. 'बोटाला काय लागले? आज छान भांग पाडून आला आहेस' असे अगदी सहज साध्या पद्धतीने बोलावे.

### १२.४.३ अंगणवाडीताईंनी वर्गात नेमके काय करायचे?

- ताईंनी बालकांना अर्थपूर्ण कृतीत गुंतवून, त्यात त्यांचा संपूर्ण सहभाग मिळवावा. उदाहरणार्थ, परिसरातील वेगवेगळ्या गोष्टी, जसे की, पाने, दगड, काड्या, जमवून यांची रचना तयार करणे.
- बालकांचे निरीक्षण करून, त्यांच्याशी अर्थपूर्ण संवाद साधायचा प्रयत्न करावा. उदाहरणार्थ, एखादे मूल कोपऱ्यात हिरमुसून बसले असेल, तर त्याच्याशी मोकळेपणाने बोलून, त्याला काय वाटते हे जाणून घ्यावे. त्याला दिलासा देऊन त्याला सुरक्षित वाटेल असा संवाद साधावा.
- त्याला बोलते करण्यासाठी प्रश्न विचारावे. मात्र जेवण झालं का?

  असे मोजक्या शब्दात उत्तर येईल असे प्रश्न न विचारता, आज तू काय काय जेवलास? स्वयंपाक करताना आई कोणकोणत्या वस्तू वापरते? असे विचारावे.
- मुलांच्या स्व-अध्ययनाला जास्तीतजास्त चालना मिळेल असे वातावरण निर्माण करावे. उदाहरणार्थ, मुलांच्या आजूबाजूला अशा वस्तू ठेवा की, त्यांना कुतूहल वाटेल, ती गोष्ट करायला गंमत वाटेल, जिज्ञासा जागृत होईल. त्यांना आव्हानात्मक वाटेल अशा कृती करण्याची संधी द्यावी. उदाहरणार्थ स्व-मदत कोडी किंवा डॉमिनोज.
- कारणमीमांसा करणे : उदाहरणार्थ, आकाशात इंद्रधनुष्य केव्हा आणि का दिसते?
- समस्या सोडवण्यास किंवा पर्याय शोधण्यास संधी आणि प्रोत्साहन देणे. उदाहरणार्थ, दूध खूप गरम असेल, तर ते गार करण्यासाठी काय काय कराल?
- गटाने मिळून विचार करण्यास प्रवृत्त करणे. मुलांना आपापसात चर्चा करण्याची संधी देणे. उदाहरणार्थ, सहलीला जाताना आपल्याला कोणकोणत्या वस्तू बरोबर न्याव्या लागतील? वर्गाची साफसफाई करायची असेल, तर काय काय करावे लागेल? कामाची वाटणी कशी कराल? या मुद्द्यांवर चर्चा घडवून आणता येईल.

**प्रात्यक्षिक :**

१) तुमच्या अंगणवाडीच्या परिसराचे निरीक्षण करून, तिथे दिसणाऱ्या असुरक्षित बाबींवर तुम्हांला काय उपाय करता येतील, त्यावर विचार करा व सविस्तर लिहा.

२) आपत्कालीन सेवांची आवश्यकता स्पष्ट करा. या घटकात उल्लेख केलेल्या आपत्कालीन सेवांचा तुमच्या भागातील संपर्क क्रमांकांचा एक तक्ता तयार करून, तो अंगणवाडीत सर्वांना दिसेल अशा ठिकाणी लावा व त्या पूर्ण भिंतीचा फोटो काढून जोडा. हे संपर्क क्रमांक तुम्हांला कोणकोणत्या परिस्थितीत उपयोगी ठरू शकतील ते लिहा.

३) एखाद्या विषयावर वर्गात सहज गप्पा मारा, खाली दिलेल्या मुद्द्यांचा आधार घ्या.

- चर्चेदरम्यान वर्गात सर्वांत जास्त प्रतिसाद कोणी दिला?
- स्वतःहून न बोलणाऱ्या मुलांना प्रयत्नपूर्वक बोलते करण्यासाठी तुम्ही कोणते प्रश्न विचारले?
- नेहमीपेक्षा काही वेगळे प्रतिसाद मिळाले असतील, तर त्याची नोंद करा.
- सर्वांनी मिळून शेवटी कोणते निर्णय घेतले त्यांची नोंद करा.

## स्वाध्याय

१) अंगणवाडीताईंनी पालकसभा घेण्यापूर्वी कोणत्या बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे, याची यादी करा.

२) बालकांच्या तीन गृहभेटी करण्यापूर्वी पालक/काळजीवाहक यांच्याशी कसे बोलावे, याबाबतचे मुद्दे सविस्तर स्पष्ट करा.

माझ्या नोंदी :

**माझ्या नोंदी :**

# परिशिष्ट १ : पारिभाषिक शब्दावली

१) **अध्ययन अनुभव :** मुलांना शिकवताना काहीतरी शैक्षणिक उद्देश मनात असतो. तो पूर्ण होईल या रीतीने त्यांना शाळेत निरनिराळे शैक्षणिक अनुभव देण्याचे नियोजन ताई करतात. मुलांकडून अपेक्षित असलेल्या अध्ययनाला मदत करणाऱ्या या अनुभवांना 'अध्ययन अनुभव' असे म्हणतात.

२) **अनुदेशन प्रणाली :** शैक्षणिक उद्देशानुसार उपक्रमांचे नियोजन करणे, त्यातून मुले किती शिकली यांचे मूल्यमापन करणे, मिळालेल्या माहितीच्या आधारे मूळ नियोजन गरजेनुसार बदलणे अशा सतत चालणाऱ्या नियोजनाच्या चक्राला 'अनुदेशन प्रणाली' असे म्हणतात.

३) **अभिवृत्ती :** अभिवृत्ती म्हणजेच मनाचा कल. जन्मतःच आपल्याला मनाचा कल दाखवण्याची क्षमता मिळालेली असते. आपले विचार, संवेदना व भावना यांना अनुभवांची जोड मिळत जाते ते अनुभव एकत्रित होऊन आपण व्यक्त होत असतो. ती आपली आवड असते किंवा त्या गोष्टी करण्याकडे आपला कल असतो. हे प्रगटीकरण म्हणजेच अभिवृत्ती.

४) **अर्भक :** जन्मानंतर पहिले १५ दिवस म्हणजे बाळाची नवजात अवस्था. ती संपल्यावर १८ महिने पूर्ण होईपर्यंत बाळाला 'अर्भक' असे म्हणतात.

५) **अवांछित गोष्ट :** नको असणारी गोष्ट.

६) **गुणात्मक प्रगती :** बालकाच्या वयाबरोबर त्याची उंची, वजन इत्यादी वाढते. ही प्रगती उंची दीड फूट झाली, वजन चार किलो भरले इत्यादी प्रकारे संख्या वापरून सहज मोजता येते. परंतु त्यांचे एखादे शारीरिक कौशल्य विकसित होते, विचार कौशल्य वाढते, वागणे बदलते तेव्हा अशी प्रगती संख्येत सहजपणे मोजता येत नाही. बहुतेक वेळा प्रगतीचे वर्णन करावे लागते. अशा प्रकारच्या प्रगतीला गुणात्मक प्रगती म्हणतात.

७) **गृहभाषा :** बालकाच्या घरातील सदस्यांमध्ये बोलली जाणारी भाषा.

८) **चेतना व्यायाम :** शरीराच्या कारक हालचाली म्हणजेच स्नायूंच्या साहाय्याने केल्या जाणाऱ्या हालचालींमध्ये सहजता व लवचीकता येण्यासाठी शरीराच्या विशिष्ट प्रकारे केलेल्या हालचाली. या हालचाली १ ते १० अंक मोजणीच्या साहाय्याने किंवा संगीताच्या तालावर करता येतात.

९) **दिव्यांग बालक :** कोणत्याही प्रकारची शारीरिक किंवा मानसिक अक्षमता असणारे बालक म्हणजे दिव्यांग बालक. पूर्वी यासाठी अपंग बालक हा शब्द वापरला जात होता. दिव्यांग हा शब्द बालकाला अधिक सन्मान आणि प्रोत्साहन देणारा आहे.

१०) **परिसंस्था :** शाळेत इमारत, वर्ग, मैदान इत्यादी भौतिक सुविधा असतात. ग्रंथालय, शैक्षणिक साहित्य, खेळाचे साहित्य इत्यादी शैक्षणिक सुविधा असतात. या शिवाय शिकण्या शिकवण्याचे नियोजन करणारे शिक्षक असतात. हे सारे घटक मिळून तयार होणाऱ्या परिसराला बालकाची परिसंस्था असे म्हणतात.

११) **पूर्वबाल्यावस्था :** पूर्व बाल्यावस्था म्हणजेच ३ वर्षे ते ६ वर्षे हा कालावधी.

१२) **प्रमाणलिपी :** कोणत्याही भाषेच्या लेखनासाठी भाषातज्ज्ञांनी मान्य केलेल्या आणि सर्वांच्या मताने स्वीकारलेल्या लिपीला प्रमाणलिपी म्हणतात. ही लिपी फळ्यावर लिहिताना, मुलांच्या पुस्तकात किंवा इतर पूरक साहित्यात वापरली जाते. मुलानी लेखन करताना ही लिपी टप्प्याटप्प्याने आत्मसात करणे अपेक्षित असते.

१३) **बालकेंद्री अध्यापन :** बालकाला केंद्रस्थानी ठेवून शिकविण्याचे सर्व नियोजन करणे म्हणजे बालकेंद्री अध्यापन. असे

करताना बालकाचे वाढ आणि विकासाचे टप्पे आवडी निवडी, घरची परिस्थिती, परिसर इत्यादी सर्व बाबी लक्षात घेऊन बालक अधिकाधिक चांगले शिकेल अशा प्रकारे अध्यापनाचे नियोजन केले जाते.

१४) **बीजदशा :** बीजदशा ही प्रसूतीपूर्व काळातील पहिली अवस्था आहे. या काळात स्त्रीबीज फलित होऊन त्याची पेशीसंख्या वाढत जाते व पेशींचा एक गोळा तयार होतो. पुढे त्याच पेशींचे रूपांतर मानवी देहात होते.

१५) **भ्रूणावस्था :** ही प्रसूतीच्या आधीची म्हणजे प्रसूतीपूर्व अवस्थातील दुसरी अवस्था आहे. हिचा कालावधी २ ते ८ आठवडे असा आहे. या काळातील गर्भाला भ्रूण असे म्हणतात. म्हणून या अवस्थेला भ्रूणावस्था (भ्रूण+अवस्था) म्हणतात.

१६) **भाषा ग्रहण करणे :** भाषेचा अर्थ लावून कोणीही बोललेल्या गोष्टी समजून घेणे म्हणजे भाषा ग्रहण करणे.

१७) **माध्यम भाषा :** भाषा हे शिक्षक आणि मुले यातील संवादाचे माध्यम असते. शाळेत अभ्यासक्रम शिकण्या शिकवण्यासाठी वापरली जाणारी भाषा म्हणजे माध्यम भाषा.

१८) **मार्गदर्शित खेळ :** शिक्षकांचे मार्गदर्शन आणि मदतीसह बालकांच्या निर्देशनातील खेळ. खेळाच्या या प्रकारात मुले खेळत असताना मुलांच्या सहवासातील प्रौढ  व्यक्ती मदत करून सुलभकाचे काम करतात. उदाहरणार्थ, मुलाला आकार किंवा रंग शिकण्यास मदत करण्यासाठी ताई विशिष्ट आकार किंवा रंगाचे ठोकळे वापरतात. मुलांना गोलात बसवून त्यांना त्या ठोकळ्यांचा आकार आणि रंगांची ओळख करून देतात.

१९) **मुक्त खेळ :** बालकांच्या कलाने, त्यांच्या नेतृत्वाखाली निर्देशित व शिक्षकांद्वारे विकसित केलेले चैतन्यदायी वातावरणातील खेळ. जेव्हा मुले त्यांना काय खेळायचे, कसे आणि किती वेळ खेळायचे आहे हे स्वतःच ठरवतात. तेव्हा त्या खेळांना मुक्त खेळ असे म्हणतात. हे खेळ मुलेच सुरू करून इतरांच्या मार्गदर्शनाशिवाय स्वतःच्या मनाने खेळतात.

२०) **मानवीकरण :** वस्तू किंवा गोष्टीतील पात्रे माणसाप्रमाणे बोलतात, विचार करतात, वागतात असे दाखविणे म्हणजे त्यांचे मानवीकरण करणे. उदा. सिंह भाषण करतो, भाकरी स्वतःची गोष्ट सांगते, बाहुली खेळते, अभ्यास करते इत्यादी. म्हणजे सिंह, भाकरी, बाहुली यांचे मानवीकरण.

२१) **मौखिक काम :** मुख म्हणजे तोंड. मौखिक काम म्हणजे तोंडी काम. यात स्वतःची माहिती सांगणे, कविता म्हणणे, गोष्ट सांगणे इत्यादींचा समावेश होतो.

२२) **वर्गसंस्कृती :** शिकल्यामुळे मुलांची सर्वांगीण प्रगती होणे अपेक्षित असते. यासाठी योग्य वातावरण निर्माण करावे लागते. त्यासाठी पुढील काही मुद्दे ध्यानात घ्यावे लागतात. वर्गाची रचना, बैठक व्यवस्था, साहित्य मांडणी आणि वापर. शिक्षक आणि मुलांची एकमेकांशी संवादाची पद्धत, वर्गनियम, शैक्षणिक कृतींचे नियोजन आणि आयोजन करण्याची चांगली पद्धत. अशा प्रयत्नातून  योग्य वातावरण निर्माण करावे लागते. ते नेहमी टिकवावे लागते. अशा अपेक्षित वर्गवातावरणाला वर्गसंस्कृती असे म्हणतात.

२३) **व्यक्तीविशिष्ट गोष्टी :** काही गोष्टी व्यक्तीनुसार बदलतात त्यांना व्यक्तीविशिष्ट गोष्टी असे म्हणतात उदाहरणार्थ, मूल कोणतेही असले तरी प्रत्येकाला कान, नाक, डोळे इत्यादी असतात. म्हणजे असे अवयव असणे ही व्यक्तीविशिष्ट बाब नाही. पण यांपैकी प्रत्येक मुलाची अवयवांची ठेवण वेगळी असू शकते. वाढीचा वेग, आवडी निवडी, सवयी वेगवेगळ्या असू शकतात. व्यक्तीनुसार बदलणाऱ्या या गोष्टीना व्यक्तीविशिष्ट गोष्टी म्हणतात.

२४) **वाचातज्ज्ञ :** बोलण्याच्या क्रियेबद्दल सखोल शास्त्रशुद्ध माहिती आणि याविषयीच्या समस्या हाताळण्याचा अनुभव असणारी व्यक्ती म्हणजे वाचातज्ज्ञ. ही व्यक्ती बालकांच्या बोलण्याविषयीच्या समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना करण्यास मदत करते.

२५) **शब्दखेळ :** मुलांना गंमत वाटेल, आव्हान वाटेल असे शब्दांशी संबंधित खेळ म्हणजे शब्दखेळ. उदाहरणार्थ, शब्दांच्या भेंड्या लावणे, शब्दांचे डॉमिनो, शब्दकोडे इत्यादी.

२६) **शैशवावस्था :** १८ महिने ते २ वर्षे या काळातील बाळाला शिशु असे म्हणतात. म्हणून या कालावधीला शैशवावस्था (शैशव+अवस्था) असे म्हणतात.

२७) **सक्षमीकरण :** बोलणे, लेखन, खेळ, तंत्रज्ञानाचा वापर इत्यादींपैकी कोणत्याही गोष्टीविषयी एखाद्याला सक्षम करण्याची क्रिया म्हणजे सक्षमीकरण.

२८) **समवयस्क :** सम वयाच्या म्हणजे एकाच वयोगटातील बालके, व्यक्ती म्हणजे समवयस्क.

२९) **स्वयं मार्गदर्शन :** एखादी कृती करण्याचा, समस्येची सोडवणूक करण्याचा मार्ग आपला आपण शोधत जाणे म्हणजे आपणच आपल्याला मार्गदर्शन करणे म्हणजे स्वयं मार्गदर्शन.

३०) **स्वलिपी :** लेखन शिकताना सुरुवातीला मुले पुस्तके किंवा मोठ्यांचे लेखन पाहून अनुकरणाने गिरगिटतात किंवा विविध मुक्त रेषा, आकार वापरून प्रमाण लिपीपेक्षा खूप वेगळे लेखन करतात. ती बरेचदा आपल्याला कळू न शकणारी त्यांची स्वतःची लिपी असते. तिला मुलाची स्वलिपी म्हणतात. वयानुसार आणि सरावामुळे हळू हळू स्वलिपी आणि प्रमाणलिपी यातील तफावत कमी कमी होत जाते.

३१) **स्वीकार्य वर्तन :** ज्यावेळी मुलांचे वागणे किंवा वर्तन समाजाच्या अपेक्षा आणि शैक्षणिक अपेक्षांना धरून असते. त्यावेळी ते स्वीकारण्याजोगे मानले जाते. अशा वर्तनाला स्वीकार्य वर्तन असे म्हणतात. याउलट जे स्वीकारण्याजोगे नसते ते अस्वीकार्य वतर्न म्हटले जाते.

३२) **सौहार्दपूर्ण वर्गवातावरण :** अंगणवाडीच्या वर्गामधील बालकांच्याबरोबर ताईचे प्रेमळपणाचे वागणे, बालकांना समजून घेऊन त्यांच्याशी संवाद साधणे. अशा वागण्याने निर्माण होणाऱ्या वर्गवातावरणाला सौहार्दपूर्ण वातावरण असे म्हणतात.

३३) **संख्यात्मक मापन :** संख्या वापरून केलेले मापन. उदा. वजन, उंची, अंतर, आकारमान इत्यादीचे मापन संख्या वापरून दैनंदिन व्यवहारात नेहमी केले जाते.

३४) **संवेदनक्षमता :** आपल्याला जन्मतःच संवेदनक्षमता प्राप्त असते. अनुभव येत जातात तसतशी ती अधिकाधिक प्रगल्भ होते. अगदी सोपे म्हणजे वेदन म्हणजे जाणीव आणि ज्ञान व अनुभव याच्या साहाय्याने सखोल होत जाणारी जाणीव म्हणजे संवेदन. संवेदन हे पंचेंद्रियांच्या साहाय्याने व कारक माध्यमातून होते म्हणून संवेदनक्षमता हे उच्च मानसिक कौशल्य आहे. याचे सर्व कार्य मध्यवर्ती मज्जासंस्थेमध्ये चालते. म्हणजेच त्या कौशल्याला उद्दिपन देऊन चालना द्यायची म्हणजेच कार्यान्वित करायचे.

३५) **संरचित खेळ :** शिक्षकांच्या निर्देशनाखाली मुले सक्रियपणे सहभागी होण्यासाठी आखलेली/रचना केलेला खेळ. हे खेळ खेळण्यासाठी विशिष्ट नियम व मार्गदर्शक सूचना असतात. खेळ खेळण्याच्या कृतींविषयी शिक्षक सूचना देतात. उदाहरणार्थ, गोलात उभे राहून मुलांना गाणे शिकवणे. इथे ताई गाण्यातील बोलांवर साजेशा शारीरिक हालचाली करते व मुले तिचे अनुकरण करतात. इथे गाण्याची निवड, हावभाव, गोलात उभे राहणे हे सारे ताईंनी ठरवलेले आहे. मुलांची भूमिका मुख्यतः अनुकरणाची आहे.

३६) **हस्तक्षेप :** बाळाचा जन्मानंतरचा विकास तसा अंगणवाडी बाहेरही होतच असतो. पण तो योग्यरितीने होण्यासाठी ताई त्यात मुद्दाम लक्ष घालून बाहेर न मिळणारे अध्ययन अनुभव देतात. हा एक प्रकारे त्यांच्या विकासात केलेला शैक्षणिक हस्तक्षेप असतो. बालकांच्या योग्य विकासासाठी असे नियोजन करून लक्ष घालण्याला हस्तक्षेप (intervention) असे म्हणतात. यामुळे बाळाच्या विकासातील अडचणी, विशेष गरजा इत्यादी वेळीच लक्षात येऊन उपाय व उपचार करणे सोपे जाते.

## परिशिष्ट २ : संदर्भग्रंथ सूची


१) अभ्यंकर वा. ना. (२००१), पंचकोश विकसनातून शिक्षण, ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन, पुणे.

२) नाक्रा ओनिता (२००५), अध्ययन अक्षमता आणि मुले मराठी रूपांतर – शारदा कर्वे.

३) बधेका गिजुभाई (अनुवादक : शोभा भागवत) (२०१०), दिवास्वप्न, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन, पुणे.

४) महाराष्ट्र शासन, (२०१४), बालधोरण, महिला व बालविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

५) राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, (२०१०), राज्य अभ्यासक्रम आराखडा, पुणे.

६) राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, (२०१४), आकार बालशिक्षणक्रम, पुणे.

७) सावजी मधुश्री (२०१८), वाट पंचकोश विकासाची, विद्याभारती देवगिरी प्रांत शिक्षा संस्थान, छ. संभाजीनगर.

८) Government of India. (2012). The Protection of Children from Sexual Offences Act, 2012.https:// wcd.nic.in/sites/default/files/POCSO%20Act%2C%202012.pdf

९) Government of India. (2016). The Rights of Persons with Disability Act, 2016. http:// www. disabilityaffairs.gov.in/upload/uploadfiles/files/RPWD%20ACT%202016.pdf

१०) Ministry of Women and Child Development.(2013). Draft National Early Childhood Care and Education Policy. https://wcd.nic.in/sites/default/files/National%20Early%20 Childhood%20 Care%20and%20Education-Resolution.pdf

११) Ministry of Women and Child Development.(2014). Early Childhood Care and Curriculum Framework.https://wcd.nic.in/sites/default/files/national_ecce_curr_framework_final_ 03022014% 20%282%29.pdf

१२) Ministry of Women and Child Development. (2016). National Plan of Action for Children, 2016 Safe Children- Happy Childhood. https://wcd.nic.in/sites/default/files/National%20 Plan%20 of%20Action%202016.pdf

१३) Ministry of Women and Child Development.(2017). Pre-School Education Kit (PSE Kit) Recommended list of play and learning materials. https://wcd.nic.in/sites/default/files/ Pre- School%20Education%20Kit.pdf

१४) Ministry of Education. (2020). National Education Policy 2020. https://www.education. gov.in/ sites/upload_files/mhrd/files/NEP_Final_English_0.pdf

१५) Ministry of Education.(2021). NIPUN Bharat. National Initiative for Proficiency in Reading

with Understanding and Numeracy (NIPUN Bharat): Guidelines for Implementation. https:// nipunbharat.education.gov.in/fls/fls.aspx

१६) Ministry of Education. (2022). Prashast - A Disability Screening Checklist for Schools. https:// ncert.nic.in/pdf/DSCS_booklet.pdf

१७) Ministry of Education.(2022).Toy-Based Pedagogy -A Handbook- Learning for Fun, Joy and Holistic Development. https://dsel.education.gov.in/sites/default/files/update/toy_based_ pedagogy.pdf. 2023 (323)

१८) NCERT. (2005). National Curriculum Framework 2005. https://ncert.nic.in/pdf/ncframework/ nf2005-english.pdf

१९) NCERT.(2019). The Preschool Curriculum. https://ncert.nic.in/dee/pdf/Combined_Pre_school_ curriculumEng.pdf

२०) UNICEF. (2018). Learning through play—Strengthening learning through play in early childhood education programmes. (2018). UNICEF Education Section, Programme Division. https://www. unicef.org/sites/default/files/2018-12/UNICEF-Lego-Foundation-Learningthrough-Play.pdf

## बालशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम : निर्मिती व लेखन समिती

| अ. क्र. | नाव | पद | शाळेचे/कार्यालयाचे नाव |
|---|---|---|---|
| १) | डॉ. माधुरी सावरकर | उपसंचालक | सेवापूर्व शिक्षण, बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| २) | डॉ. गितांजली बोरुडे | उपविभागप्रमुख | बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| ३) | श्रीम. सुषमा कोंडुसकर | अधिव्याख्याता तथा बालशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम समन्वयक | बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| ४) | श्रीम. संध्या नगरकर | बालविकास प्रकल्प अधिकारी | बालविकास प्रकल्प अधिकारी हडपसर, पुणे. |
| ५) | श्रीम. वृंदा शिवदे | पर्यवेक्षिका | ICDS सातारा. |
| ६) | श्री. विद्याधर शुक्ल | निवृत्त उपसंचालक, सेवानिवृत्त अधिकारी | राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| ७) | श्रीम. मनीषा अष्टपुत्रे | निवृत्त व्याख्याता | एस.एन.डी.टी. कॉलेज ऑफ होम सायन्स, पुणे. |
| ८) | डॉ. वृषाली देहाडराय | सल्लागार | विक्रमशीला एज्युकेशन रिसोर्स सोसायटी, कोलकाता. |
| ९) | श्री. नीलेश निमकर | SCF-FS तज्ज्ञ | क्वेस्ट, ठाणे. |
| १०) | श्रीम. सुषमा पाध्ये | बालशिक्षणतज्ज्ञ | ग्राममंगल, पुणे. |
| ११) | श्री. शैलेश जाधव | प्रकल्प अधिकारी | क्वेस्ट, पुणे. |
| १२) | श्रीम. अश्विनी गोडसे | बालशिक्षणतज्ज्ञ व संस्थापक | द लर्निंग प्लानेट, पुणे. |
| १३) | श्रीम. प्रियंका परंडवाल | कन्सलटन्ट | लीडरशीप फॉर इक्विटी, पुणे. |

## लेखन समिती

| अ. क्र. | नाव | पद | शाळेचे/कार्यालयाचे नाव |
|---|---|---|---|
| १) | श्रीम. मंजिरी निंबकर | SCF-FS तज्ज्ञ | प्रगत शिक्षण संस्था, फलटण. |
| २) | श्रीम. नीता वाळिंबे | बालशिक्षणतज्ज्ञ | अनुग्रह फाऊंडेशन, पुणे. |
| ३) | श्रीम. माधुरी आहेर | सुलभक | मुक्तांगण, मुंबई. |
| ४) | डॉ. अश्विन किनारकर | सहायक शिक्षक | जि. प. प्राथ. शाळा बांद्रा, पं. स. रामटेक, जि. प. नागपूर. |
| ५) | श्रीम. सोनिया वडके | बालशिक्षणतज्ज्ञ | रॉकेट लर्निंग, पुणे. |
| ६) | श्रीम. पल्लवी दळवी | फ्रीलान्सर | फ्रीलान्सर, पुणे. |
| ७) | श्रीम. मृदुला अडावदकर | सुलभक | बियॉण्ड द क्लासरूम, पुणे. |
| ८) | श्रीम. स्मिता पाटील | ECCE Expert | स्वनिल फाउंडेशन, पुणे. |
| ९) | डॉ. विनीता आपटे | ECCE Expert | फ्रीलान्सर, पुणे. |
| १०) | श्रीम. रती भोसेकर | मुख्याध्यापिका | सरस्वती मंदिर ट्रस्ट, पूर्वप्राथमिक विभाग, ठाणे. |
| ११) | श्रीम. वैदेही कुलकर्णी | कृतिनियोजक व निरीक्षक | न्यूरॉन्स कृती व संशोधन केंद्र, पुणे. |
| १२) | श्री. मुकुल देशपांडे | शिक्षक | श्री. नरसिंग विद्यालय अकोट, जि. अकोला. |
| १३) | श्रीम. स्पृहा इंदू | सहायक शिक्षक | चेंबूर एज्युकेशन सोसायटीची प्राथमिक शाळा, आर. सी. मार्ग चेंबूर, मुंबई. |
| १४) | श्रीम. कुसुम कच्छवे | विषयतज्ज्ञ | गटसाधनकेंद्र मानवत, परभणी. |
| १५) | श्री. योगेश भांगे | शिक्षक | जि. प. प्राथ. शाळा, खांडेकर वस्ती, पं. स. कुर्डूवाडी, ता. माढा, जि. सोलापूर. |
| १६) | श्रीम. कीर्ती देशपांडे | मुख्याध्यापक | ओंकार बालवाडी, छत्रपती संभाजीनगर. |

## बालशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम : वाचन साहित्य व व्हिडिओ सौजन्य

| अ. क्र. | व्यक्ती/संस्थेचे नाव | साहित्य प्रकार |
|---|---|---|
| १) | श्री. विद्याधर शुक्ल | गाणे |
| २) | श्रीम. मनीषा अष्टपुत्रे | मुखपृष्ठ व मलपृष्ठ डिझाईन |
| ३) | क्वेस्ट, पुणे | व्हिडिओ |
| ४) | ग्राममंगल, पुणे | व्हिडिओ |
| ५) | सरस्वती मंदिर ट्रस्ट, पूर्वप्राथमिक विभाग, ठाणे | व्हिडिओ |
| ६) | अनुग्रह फाउंडेशन, पुणे | व्हिडिओ व फोटो |
| ७) | श्री. भूषण कुलकर्णी व श्री. एकनाथ कोरे | व्हिडिओ शूटिंग व एडिटिंग |

# अंगणवाडी मी अंगणवाडी

अंगणवाडी मी अंगणवाडी
अंगणवाडी मी अंगणवाडी
या रे या बाळांनो लवकर
शिकण्याची मी लावीन गोडी

अंगणवाडी मी अंगणवाडी
अंगणवाडी मी अंगणवाडी
इकडे या रे च्याऊ म्याऊ
रोज खेळूया नाचू गाऊ
गप्पा मारू भेंड्या लावू
सहल काढूया बागेमधली
सोडवायची गंमत कोडी

अंगणवाडी मी अंगणवाडी
अंगणवाडी मी अंगणवाडी
जमतील सारे बहीण भाऊ
खाऊ, खेळणी वाटून घेऊ
कट्टी, भांडण विसरून जाऊ
हसुनी खेळुनी जाईल मजेत
झुई झुई झुई शिकण्याची गाडी
अंगणवाडी मी अंगणवाडी
अंगणवाडी मी अंगणवाडी

– *श्री. विद्याधर शुक्ल*





राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.